वृषाली जोशी

# विश्वकथा- ४





# विश्वकथा ४

मूळ लेखक – विविध आंतरराष्ट्रीय

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१९७४६२४५

# विश्वकथा ४

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

### म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट: ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

विश्वकथा ४

लेखक : विविध आंतरराष्ट्रीय

अनुवादिका : वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १४ सप्टेंबर २०२०

©esahity Pratishthan®2020

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

विश्वकथा ४

## प्रस्तावना

या पुस्तकात सहा कथा आहेत.

पहिली कथा 'बौध्द धर्मगुरूची बायको' ही दक्षिण आफ्रिकेतील लेखिका ऑलिव्ह स्चरेनेर हिने लिहिलेली असून, ती स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार करते. आपल्याकडील गौरी देशपांडे किंवा सानिया त्यांच्या कथांसारखी, ती मला वाटते.

दुसरी कथा 'अँजेला पोने सांगितलेली गोष्ट' ही काव्याबद्दल पुलित्झर पारितोषिक मिळवलेला अमेरिकन लेखक स्टीफन व्हीन्सेंट बेनेट याने लिहिली असून, त्यात स्वतःच्या नवऱ्याचा खून करून, तो पचवणाऱ्या मान्यवर लेखिकेची गोष्ट सांगितली आहे.

तिसरी कथा 'डॉक्टर आणि साराटोगा पेटीची गोष्ट' ही स्कॉटलंडमधील लेखक रॉबर्ट लुई स्टीव्ह्न्सन याने लिहिली असून, त्यात एक साधा निरपराध माणूस कसा राजकारणी व दुष्ट लोकांच्या कटकारस्थानात निष्कारण गोवला जातो व सुदैवाने त्यातून कसा सहीसलामत सुटतो, हे दाखवले आहे.

चौथी कथा ‘काळा मित्र’ ही ब्रिटीश लेखक जोसेफ कोनरॅड याने लिहिलेली असून, थोडी विनोदाकडे झुकणारी कथा वाटते. स्वतःच्या वरिष्ठाच्या त्रासाला कंटाळून, शेवटी त्याच्या चुकीच्या बोलण्याला युक्तीने मान्यता दिल्याचे यात रंगवले आहे.

पाचवी कथा ‘डाळिंब बी’ ही एडिथ व्हरटॉन या पुलित्झर पारितोषिक मिळवलेल्या पहिल्या स्त्री लेखिकेने लिहिलेली गोष्ट असून, या अमेरिकन लेखिकेची भुतांच्या गोष्टींची पुस्तके आहेत. या अस्वस्थ करणाऱ्या कथेतील नवरा बायकोमधील संशयाचे भूत शेवटी भूत असल्यासारखेच वाटते.

शेवटची व सहावी ‘सिमोन्सन’ ही कथा १९२८ मध्ये नोबेल पारितोषिक मिळवलेल्या नॉर्वेजियन लेखिका सिग्रिड अंडसेट यांची आहे. कामावरून सतत काढला जाणारा, त्याच्यापेक्षा वयाने बऱ्याच लहान बाईबरोबर लग्न न करता, एका मुलीला जन्म देऊन रहाणारा, पण त्या मुलीवर खूप प्रेम करणारा विधुर सिमोन्सन यात उभा केला आहे.

# कथानुक्रम

१ बौद्ध घर्मगुरूची बायको - ऑलिव्ह स्चरेनेर 9

२ अँजेला पो ने सांगितलेली गोष्ट - व्हीन्सेंट बेनेट 38

३ डॉक्टर आणि साराटोगा पेटीची गोष्ट - रॉबर्ट लुई स्टीव्हन्सन 81

४ काळा मित्र - जोसेफ कोनरॅड 139

५ डाळींब बी - एडिथ व्हरटॉन 208

६ सिमोन्सन - सिग्रिड अंडसेट 282

The Buddhist Priest's Wife

By Olive Schreiner

South Africa

# बौध्द धर्मगुरूची बायको



तिला आच्छादन घाला. किती शांतपणे ती पहुडली आहे! पांढऱ्या आच्छादनाखालून तुम्हाला तिची आकृती दिसेल. तुम्हाला वाटेल, ती झोपली आहे. सूर्यप्रकाश आत

येऊ दे. तिला ते आवडेल. तिने इतका प्रवास केला होता. वेगवेगळ्या प्रदेशात, इतके काही केले होते, इतके काही पाहिले होते. आता तिला विश्रांती किती आवडेल! इतक्या पुरुषांनी व बायकांनी तिच्यावर प्रेम केले, पण तिने कधी कोणावर निखळ प्रेम केले का? कित्येक बायकांनी तिला सहानुभूती दाखवली आणि त्या बदल्यात काही मागितले नाही. तिला कधी न मिळालेल्या प्रेमाची, तिला गरज होती का? त्यांनी घट्ट धरून ठेवलेली बोटे सोडवून घ्यावी, असे तिला कधी वाटले नाही का? ती दिसत असे, तेवढी खंबीर खरेच होती का? तिला न मिळालेल्या कशाबद्दल, कधी रात्री रडून तिला जाग आली नाही का? प्रवास आणि विचार तिच्यासाठी पुरेसे होते का? त्यांच्या वजनाने लांबलचक दिवशी, ती मोडून पडली नाही का? तिला झाका. आपण तिला पाहिलेले तिला आवडेल, असे मला वाटत नाही. एका दृष्टीने ती आयुष्यभर एकटीच होती. आताही तिला एकटे राहिलेलेच आवडेल ---- तिच्या दृष्टीने आयुष्य खूप सुंदर होते. नाहीतर ती एवढी तरुण दिसली नसती. तिला आच्छादन घाला. आपण जाऊया.

खूप वर्षांपूर्वी लंडनमधील एका उंचावरील खोलीत शेकोटी पेटली होती. जमिनीवरील निळा गालीचा, निळी छोटी फुले व शेकोटीशेजारी एका बाजूला बसलेली एक महिला, असे चित्र भिंतीला चिकटवलेल्या कागदावर दिसत होते. खालील मजल्यावरील आत शिरायच्या हॉलवर देखरेख करणारी महिला दार उघडून आत आली.

तिने विचारले, "आज रात्रीसाठी तुम्हाला काही लागणार नाही का?"

"नाही. मी फक्त मला भेटायला येणाऱ्या व्यक्तीसाठी थांबले आहे. ती येऊन गेल्यावर, मी जाईन."

"तुम्ही तुमचे सर्व सामान, आधीच गोळा करून नेले आहे का?"

"हो. फक्त हे एवढे ठेवले आहे."

वयस्क महिला खाली गेली, पण तिच्या हातात चहाचा कप घेऊन, परत वर आली.

"तुम्ही हा घेतलाच पाहिजे. ते चांगले असते. दिवसभर बांधाबांधी केल्यावर, चहासारखे दुसरे चांगले काही नाही."

शेकोटीशेजारी बसलेल्या महिलेने आभार मानले नाहीत. पण तिने वयस्क महिलेच्या मनगटापासून बोटांपर्यंत हात फिरवला.

"मी बाहेर पडेन, तेव्हा तुझा निरोप घेईन."

त्या वयस्क महिलेने विस्तव ढवळला, शेवटचे कोळसे त्यात घातले आणि गेली.

ती निघून गेल्यावर, त्या तरुण महिलेने चहा प्यायला नाही. तिच्या खिशातून चांदीची सिगरेटची डबी काढली आणि एक सिगरेट पेटवली. काही वेळ ती शेकोटी शेजारी, सिगरेट ओढत बसली. मग उठून खोलीत फेऱ्या मारू लागली.

काही वेळानंतर परत शेकोटीशेजारी बसली. सिगरेटचे टोक विस्तवात टाकून दिले. हात मागे घेऊन परत फेऱ्या मारू लागली. मग परत बसायच्या जागी जाऊन दुसरी सिगरेट पेटवली आणि परत चालू लागली. परत विस्तवाकडे बघत

खाली बसली. दोन्ही तळहात एकमेकांवर दाबले व शांतपणे विस्तवाकडे टक लाऊन बघत बसली.

मग जिन्यातून पदरव आला व दार वाजले. ती उठली. सिगरेट शेकोटीत टाकून दिली व न हलता म्हणाली, “आत या.”

दार उघडून संध्याकाळचे कपडे केलेला एक माणूस अवतीर्ण झाला. त्याच्या अंगावर पुढे उघडा असलेला मोठा कोट होता.

“मी आत येऊ शकतो का? मला हा कोट खाली कुठे ठेवावा, हे कळले नाही.” कोट काढत त्याने म्हटले. “तू कशी आहेस? हे खरोखर चिमणीचे घरटे आहे.”

तिने खुर्चीकडे निर्देश केला.

“मी तुम्हाला इथे यायला सांगितले, म्हणून तुम्ही रागावला नसाल, अशी मी आशा करते.”

“ओहो, नाही. नाही. उलट मला आनंद झाला. मला क्लबमध्ये तुझी चिठ्ठी फक्त वीस मिनिटांपूर्वी मिळाली.”

ते शेकोटीसमोर एका खुर्चीत बसले.

“मग तू खरेच भारतात चालली आहेस? किती छान! पण तिथे तू काय करणार?

“मला वाटते तू जात असल्याचे, ग्रे मला दीड महिन्यांपूर्वी म्हणाला. पण यावर विश्वास ठेवावा की नाही, हे मला कळेना. अजूनही कळत नाही. का कोण जाणे, पण मला फारच आश्चर्य वाटले.”

त्यांनी थोडा रस घेऊन, थोडे मनोरंजन झाल्यासारखे तिच्याकडे बघितले.

“किती दिवसांनी आपण भेटत आहोत. सहा की आठ महिने?”

‘ती म्हणाली, “सात.”

मला खरे तर वाटले, की तू मला टाळत आहेस. हा सबंध काळ, तू काय करत होतीस?”

“ओहो, मी थोडी व्यग्र होते. तुम्ही सिगरेट घेणार नाही का?”

तिने सिगरेटची डबी पुढे केली.

“तू एक घेणार नाहीस का? मला माहिती आहे की तू पुरुषांबरोबर ओढत नाहीस. पण माझ्याबरोबर तू ओढू शकतेस.”

तिने एक सिगरेट घेऊन पेटवली व त्याच्याकडे काडेपेटी देत म्हणाली, “आभारी आहे.”

“पण खरंच, इतका वेळ तू एकटी काय करते आहेस? तू सामाजिक, सांस्कृतिक जगातून एकदम नाहीशी झाली आहेस. मी उन्हाळयात जेव्हा ग्रॅहमला होतो, तेव्हा तू तिथे येणार असल्याचे, मला समजले आणि शेवटच्या क्षणी तू येण्याचे रहित केलेस. आम्ही सगळे खूप नाराज झालो. आता भारतात जायचे तू काय काढले आहेस? तुला हिंदू स्त्रियांना सामाजिक, बौध्दिक समानतेची तत्वे शिकवून, भडकवून द्यायचे आहे का? कुणा म्हाताऱ्या बौध्द धर्मगुरूशी लग्न करून, हिमालयावर एक झोपडी बांधून, तिथे रहायचे आणि तत्वज्ञानाची चर्चा करून ध्यान करायचे आहे का? मला वाटते तेच तुला आवडेल. तू खरेच असे करत असल्याचे मी ऐकले, तर मला काही नवल वाटणार नाही.”

तिने हसून सिगरेटची डबी बाहेर काढली.

ती हळूहळू सिगरेट ओढू लागली.

ती म्हणाली, “मी इथे गेली चार वर्षे आहे आणि आता मला बदल हवा आहे. या निवडणुकीत तुम्ही किती यश मिळवले ते बघून, मला आनंद झाला. तुम्हाला त्यात बराच रस होता, नाही का?”

“हो. हो. आम्हाला चांगलीच झुंज घ्यावी लागली. तुला माहिती आहे, की निकाल माझ्या बाजूने लागला. पण तरीही ती व्यक्तिगत बाब नव्हती, तर एक मोठी चिंता होती.”

ती बोलली, “तुम्ही वर्तमानपत्रात पत्र पाठवून चूक केली, असे तुम्हाला वाटत नाही का? तुम्ही गप्प राहीला असतात, तर तुमची स्थिती जास्त बळकट राहीली असती.”

“कदाचित तसेही असेल, असे मला आता वाटते. पण मला तसे करण्यास, सांगण्यात आले होते. पण तरीही आम्ही जिंकलो व सर्व काही भरून पावले.” ते खुर्चीत मागे टेकून बसले.

“तुमची तब्येत ठीक आहे?”

“हो उत्तम आहे. पण कंटाळलो आहे. हे जीव तोडून काम करणे कशासाठी, असे कधीकधी वाटते.”

“यावर्षी तुम्ही सुट्टीसाठी कुठे जाणार आहात?”

‘मला वाटते स्कॉटलंड. मी नेहमीच त्या जुन्या ठिकाणी जातो.”

“तुम्ही नॉर्वेला का जात नाही? त्यामुळे तुम्हाला जास्त चांगला बदल होऊन विश्रांति मिळेल. मागच्या वेळी तुम्हाला नॉर्वेमध्ये एक खेळाचे पुस्तक मिळाले का?”

“तू ते मला पाठवले होतेस का? किती छान! मी ते खूप आवडीने वाचले. मी तेव्हा लगेच तिथून निघणार होतो. बदल झालेला नक्कीच चांगला ठरेल.”

ती म्हणाली, “त्या पुस्तकाच्या शेवटच्या पानावर एखाद्याने कुठल्या गोष्टी बरोबर न्याव्यात याची एक सूची आहे. मला वाटले, त्यामुळे त्रास वाचेल. ती तुमच्या कामवाल्या माणसाला द्या आणि त्याला सगळे काय ते आणू दे. तुमच्याकडे तो माणूस अजून आहे का?”

“हो, आहे. तो एखाद्या कुत्र्यासारखा नेक आहे. मला वाटते, तो काही झाले तरी, मला सोडून जाणार नाही. मागील हिवाळ्यात माझा पाय मुरगळल्यापासून, तो मला शिकारीला जाऊ देत नाही. आणि मला तसे करावेच लागते. त्याला वाटते की त्या दुखऱ्या पायामुळे, मला नीट बसता येणार नाही. तो फार चांगला मनुष्य आहे. माझी आईसारखी काळजी घेतो. पण तू भारतात, कशासाठी जाते आहेस? तुला तेथील कोणी माहिती आहे का?” तो शांतपणे धूर सोडत बोलला.

ती म्हणाली, “नाही. मला वाटते तेथे छान असेल. मला पूर्वेकडील देशांमध्ये नेहमीच खूप रस होता. बरेच गुंतागुंतीचे पण आवडेल असे, तेथील आयुष्य आहे.”

त्यांनी वळून तिच्याकडे पाहिले.

“मला वाटते, तू म्हणशील अजून अनुभव घेण्यासाठी! तुझ्यासारखी आयुष्य झोकून देणारी बाई, मी आजतागायत पाहिली नाही. तुझ्यासारख्या हुशार व आकर्षक बाईने, सगळे आयुष्य असे हातातून निसटून द्यावे व त्याचे काहीही करू नये! तू लंडनमधील सर्वात यशस्वी महिला

असली पाहिजेस. ओहो. नक्कीच, तू काय म्हणणार, ते मला माहिती आहे. ‘तू काही पर्वा करत नाहीस.’ हेच असणार, पण ते तसे नाही. तुम्हाला नेह्मी नवनवीन अनुभव व बरेच काही मिळणार असते. पण तुम्हाला ते माहिती नसते. जेव्हा तुम्हाला पुरेसे कळते, तेव्हा तुम्ही लिहू लागता. पण ते कधीच पुरेसे नसते. तू वर्षाला दोन हजार मिळवत असशील, पण त्याचे तुला काही देणेघेणे नाही. आहे, हे असे आहे. जुनाट कपडे घालून जगणे! तू बाकी काही करणार नाहीस. तुझ्याकडे सर्व काही आहे. पण तू ते सर्व सोडून दिले आहेस.”

ती म्हणाली, “ओहो, माझे आयुष्य अगदी संपन्न आहे. फक्त दोनच गोष्टी खऱ्या आहेत. प्रेम आणि ज्ञान, त्याशिवाय काही चालणार नाही.”

तिने तिचा सिगरेटचा तुकडा फेकला व हसत अग्निकडे बघितले.

खोलीकडे चौफेर नजर टाकत ती बोलली, “ही खोली मी माझ्या एका मैत्रिणीला दिली आहे. तिला माहिती नाही, की या वस्तू मी तिच्यासाठी मागे सोडून जाणार आहे. या

माझ्या असल्यामुळे तिला आवडतील. मला वाटते, तिला त्या जगातील सर्वात सुंदर वस्तू वाटतील.”

“हो. पण तुला त्याचे काय? तू त्याचे काय करणार? तुला लग्न करून चार बायकांसारखे स्थिरस्थावर व्हायला हवे. भारत, इटाली, चीन आणि कुठेकुठे, असे फिरत बसणे बरे नाही. तू तुझ्या आयुष्याचा खेळखंडोबा चालवला आहेस. तू स्वतःला नेहमी असामान्य लोकांमध्ये ठेवले आहेस. जर मी असे ऐकले, की कुणी पुरुष वा स्त्री तुझी जवळची मित्र आहे तर मी लगेच विचारतो,  याचे कारण काय आहे? तिने तिचा पैसा गमावला आहे का? किंवा त्याने चारित्र्य गमावले आहे का? किंवा तिला बरा न होणारा आजार झालेला आहे का? जर एखादी शरीराची वा मनाची तक्रार असेल, तरच त्यात तुला रुची वाटते, असा माझा विश्वास आहे. मला वाटते,. तुला चिंध्यांची पूजा करायला आवडते. असे सगळयांपासून व सगळ्या गोष्टींपासून अलिप्त रहाणे, हे चूक आहे. हा मूर्खपणा आहे.”

गुडघ्यांशी हात धरून शेकोटीजवळ जात ती म्हणाली, “मी फार आनंदी आहे. मला काय आवडते, तर कुणाला तरी

तुमची गरज वाटली पाहिजे. हा प्रेमाचा प्रश्न नाही. जर दुसरे लोक एखादी गोष्ट करू शकत असतील, तर आपणही तीच गोष्ट करण्यात काय अर्थ आहे? जर ते तुमच्यापेक्षा चांगली करत असतील, तर ती गोष्ट आपण करत रहाणे हा स्वार्थीपणा आहे.

एकाची दुसऱ्याला गरज असल्याने, एकमेकात बंध निर्माण होतो. तुम्हाला घोडे व डोंगर आवडतात, पण त्यांना तुमची गरज नाही. मग त्याबद्दल काही बोलण्यात काय अर्थ आहे? मला वाटते आयुष्यातील सर्वात चांगली गोष्ट कुठली असेल, तर ती म्हणजे कुणाला तरी आपली गरज आहे, हे जाणवणे व आपण त्याच क्षणी त्याची पूर्ती करणे. ज्या गोष्टींना तुमची गरज नाही, त्यांच्यावर लांबूनच प्रेम करावे."

"ओहो, पण तुझ्यासारख्या बाईने लग्न करायला हवे. मुलेबाळे हवीत. तुला भेटणाऱ्या एकाकी, दयनीय व दुःखी बायका, निसटलेले गुन्हेगार आणि म्हातारे भिकारी यांच्यावर तू पैसे उधळत सुटतेस, ते त्यांच्या दृष्टीने चांगले आहे. पण तुझी ती चूक आहे."

त्याने हळूच राख झटकली.

त्याने कोपर गुडघ्यावर ठेवत व डोके पुढे झुकवत, त्याची बसण्याची अवस्था बदलली. त्यामुळे त्याचे तपकीरी केस व कडेच्या करड्या बटा तिला दिसल्या.

“जेव्हा माणूस ठराविक वयाचा होतो, तेव्हा त्याला लग्न करायचे असते. तो प्रेमात पडतो असे नाही. पण त्याला असे वाटत असते, की त्याला घर, बायको व मुलेबाळे हवीत. वर्षातील ठराविक वेळी पक्ष्यांना घरटे बांधावेसे वाटते, ते त्यासाठीच. ते प्रेम नसून, दुसरे काही असते. मी तरुण असताना, लोकांना लग्न करण्यावरून छेडत असे. ते असे का करतात, त्याचे मला नवल वाटे. ते सर्व काही गमावत असत व  काहीच कमावत नसत, असे मला वाटे. पण जेव्हा माणूस छत्तीस वर्षांचा होतो, तेव्हा त्याच्या भावना बदलतात. त्याला प्रेम, वासना यांचे विशेष काही नसते पण घर हवे असते. बायको व मुले हवी असतात. त्याच्याकडे घर व नोकरचाकर असतील. पण ते वेगळे आहे. माझ्या दृष्टीने महिलेलाही असेच वाटत असणार.’

सिगरेट बोटात धरून, थोडा वेळ ती गप्प होती. मग हळूहळू ती बोलली,

“हो. कधीकधी स्त्री मुलासाठी तरसते. विशेषतः ती तिशीची झाली किंवा त्यापेक्षा जास्त! ते कुणाही विशिष्ट व्यक्तीच्या बाबतीतील प्रेमापेक्षा वेगळे असते. स्त्रीसाठी लग्न हे पुरुषाला वाटते, त्यापेक्षा फारच गंभीर गोष्ट असते. ती ज्याच्यावर प्रेम करू शकेल असा माणूस तिला भेटला नाही, तरी ती आयुष्य काढू शकते. आणि समजा तो भेटला, तरी प्रेम शक्य असेल किंवा नसेल. आता लग्न हे फार गुंतागुंतीचे झाले आहे. ती एक बौध्दिक बाब होऊ पहाते आहे. तुम्हाला या बाबतीत काय म्हणायचे आहे?”

तिने सिगरेटची डबी त्यांच्यासमोर केली. “तुम्ही ती माझ्यावरून पेटवू शकता.” त्यासाठी ती थोडी पुढे वाकली.

“तुमच्यासारख्या माणसाने लग्न केले पाहिजे. बायको त्रास देईल, अशा काही मानसिक कामात तुम्ही बुडालेले नाही. त्यामुळे तुम्हाला पूर्णत्व येईल.” ती मागे सरकून शांतपणे सिगरेट ओढू लागली.

ते म्हणाले, “हो, खरे आहे. पण आयुष्य फार व्यग्रतेचे आहे. इतर माणसांना असते, तशी स्त्रियांच्या मागे हिंडण्यात मला रुची नव्हती व त्यासाठी वेळही नव्हता. हो. माझी गरज

वेगळी आहे. जर मला बायको हवी असेल, तर त्यासाठी मला अमेरिकेला जायला हवे.”

“बरोबर. अमेरिकन बायको तुम्हाला बरोबर हवी तशी मिळेल.”

ते म्हणाले, “हो. माझी काळजी घेण्यासाठी, मला बायको नको. ती स्वावलंबी असली पाहिजे आणि तिने मला कंटाळा आणता कामा नये. मला काय म्हणायचे आहे, ते तुला कळले असेल. जीवन हे आधीच इतके काळजीयुक्त आहे, त्यात कुणा अजाण व सतत देखभालीची अपेक्षा करणाऱ्या मुलाची भर तर नकोच नको.”

शेकोटीशेजारी ओणवून उभी रहात ती म्हणाली, “हो. तुम्हाला कणखर व तरुण बायको हवी. ती फार सुंदर नसली, तरी चालेल पण आकर्षक हवी व उत्साही हवी. व्यक्तीस्वातंत्र्याचा अती पुरस्कार करणारी नको. तशीच ती कुणाची बाजू उचलून धरणारी नको, उदासीन असलेली बरी. तिने तुम्हाला फार भावनिक गुंत्यात ओढू नये, पण ती तर्कनिष्ठ असावी. तिला तुमच्यासारखीच ध्येये व रुची असावी. लग्नानंतर स्वतःला पूर्णपणे बदलणे गरजेचे होईल, असे

असेल तर स्त्रीने त्या पुरुषाशी लग्न करूच नये. इतर स्त्रियांना तसे करायची इच्छा असू शकते, पण तिने स्वतःचे व्यक्तिमत्व आणि स्वत्व जपून ठेवावे. उत्तम चारित्र्य इतके प्रभावी असेल, की ते शेवटी सर्व गोष्टी डावलून वर येईल."

तिने विस्तवाकडे पाहिले.

"जेव्हा तुम्ही लग्न कराल, तेव्हा अशा स्त्रीशी करू नका, जी सतत तुमची स्तुती करेल. ते नेहमी खोटे असते. जर ती तुमच्यावर खरोखर प्रेम करत असेल, तर ती तुमचे गुणदोष दोन्ही सांगेल. दोन व्यक्तींना आयुष्यभर एकत्र रहायचे असेल, तर त्याना धीटपणे एकमेकांच्या नजरेला नजर मिळवून, सत्य सांगता आले पाहिजे.

त्याचा जीवनात उपयोग होतो. तुम्हाला अमेरिकेत अशा खूप स्त्रिया दिसतील. तुम्हाला यशस्वी होण्यासाठी मदत करेल अशी, तुमचे पाय खाली ओढणार नाही अशी!"

"हो. माझी अशीच कल्पना आहे. पण अशी आदर्श बायको मला कशी मिळणार?"

“जा आणि शोधा. या वर्षी स्कॉटलंडला जाण्यापेक्षा अमेरिकेला जा. ते चांगले होईल. माणसाला जे हवे आहे, ते शोधायचा त्याला हक्क आहे. स्त्रीचे वेगळे आहे. तो स्त्री व पुरुष यातील मूलभूत भेद आहे.”

तिने खाली विस्तवाकडे पाहिले.

“तो तिच्या स्वभावाचा आणि कामसंबंधांचा नियम आहे. त्यात पारंपारिक किंवा रामभरोसे असे काही नाही. कारण तिला पुढे मुलाचा भार वहायाचा असतो, पुरुषाला नव्हे. बौध्दिक दृष्ट्या दोघेही सारखे असू शकतात. मला वाटते, जर पन्नास पुरुष व पन्नास स्त्रियांना एक गणिताची समस्या सोडवायला दिली, तर ते दोघेही एकाच पद्धतीने ती सोडवतील. जितके जास्त गहन व बुद्धिमत्तेला जास्त आव्हान देणारी समस्या तितके साम्य जास्त असेल. पण तुम्ही जितके व्यक्तिगत व कामजीवन विषयक बाबींकडे वळाल, तेवढे दोघे वेगळे ठरतील. मी पुरुष व स्त्रियांच्या स्वभावाबद्दल हे एवढे सांगू शकते.”

तिने चालू ठेवले, “मला आकृती काढून दाखवायचे असेल, तर मी दोन गोल बशा घेईन. त्या प्रत्येकीची अर्धी

बाजू लाल रंगवेन. नंतर मी एकाचा डावा भाग निळ्या रंगाने व दुसऱ्याचा डावा भाग हिरव्या रंगाने रंगवेन. ते रंग कामजीवनाचे प्रतिनिधित्व करतील. तुम्ही त्यांच्या जितके जवळ जाल तेवढे दोन बशांचे रंग वेगळे दिसतील. मग तुम्ही त्यांना जर असे फिरवले की दोन लाल बाजू चिकटतील, तर ते सारखे दिसतील. पण जर तुम्ही निळा व हिरवा रंग जवळ आणले, तर ते एकदम वेगळे दिसतील. म्हणूनच तुमच्या लक्षात येईल की आक्रमक व कामांध पुरुष असा विश्वास ठेवतात, की स्त्रिया या पुरुषांपेक्षा सर्वस्वी वेगळ्या असतात. वेगळ्या जातीच्या प्राणी असतात आणि फार सुसंस्कृत, बुध्दिमान पुरुष कधीकधी असे समजतात की आपण दोघेही अगदी सारखे आहोत. असे बघा, आपल्या दोघात कामजीवनातील प्रेम सारखे असू शकेल. पण ते व्यक्त करायची पद्धत वेगळी असू शकते. ही पुरुषांची चूक नसून, निसर्गाची चूक आहे. जर एखाद्या माणसाचे बाईवर प्रेम असेल, तर तो तिला त्याच्यावर प्रेम करायला उद्युक्त करू शकतो. कारण त्याला ते उघडपणे, सरळपणे, लपाछपी न करता, करता येते. त्यात काही आडवळण घेण्याची किंवा वेगळे काही बोलण्याची गरज नसते. पण बाईच्या बाबतीत

तसे असत नाही. मोकळेपणे, साधेपणे किंवा तिची विनवणी करून जे दाखवले गेले नाही, त्याला ती प्रेम समजतच नाही. तिच्या भावना काय आहेत, ते निसर्ग तिला सांगू देत नाही. जी बाई असे सांगते, तिच्यात व तिच्या प्रियकरात एक न ओलांडता येणारी दरी निर्माण होते. आणि तिने खास आयुधे वापरून नाजूकपणे, प्रेमिकेच्या शांतपणे, कधी हातरुमाल विसरल्याचे निमित्त काढून, तर कधी लांबवरून येऊन अचानक त्याची भेट झाली तर, त्याला तिच्याजवळ ओढले, तर तिची फजिती होते. तिने प्रेम रोखून ठेवावे. नाजूकपणे व्यक्त करूनही ते आक्रमकपणे लक्षात आले, तर त्याला काही किंमत नाही. त्यामुळे कामजीवनात तिने पुढाकार घेऊ नये. जे प्रेम तिच्या पायाशी येऊन पडेल व तिची विनवणी करेल, ते प्रेम तिने खुशाल स्वीकारावे. पुरुष आणि स्त्री यांच्यामधील तोच खरा मुख्य फरक आहे. तुम्ही प्रेमाचा शोध उघडपणे घेऊ शकता, पण आम्हाला ते नाजूकपणे कुणाच्या लक्षात येणार नाही अशा रीतीने करावे लागते. बाईने नेहमी मर्यादा राखूनच चालले पाहिजे. अर्थात मैत्रीची गोष्ट वेगळी आहे. तुमचे नाते तेव्हा बरोबरीचे असते, जसे मी तुम्हाला आज बोलावले आहे. ते बुद्धीचे व बाईच्या बुद्धिमान आयुष्याचे सौदर्य आहे.

तेव्हा ती तिच्या बेड्या थोड्या सैल करते. म्हणून ती कामजीवनापासून दूर जाते. जर ती मरायला टेकली असेल, तर ती कदाचित ---- मरण म्हणजे स्त्रियांना पुरुषांपेक्षा खूप काही जास्त वाटते ---- तेव्हा तुम्हाला आयुष्यभर चिरडणारा कामजीवनाचा पाश गळून पडतो आणि तुम्ही एक बाई म्हणून नव्हे तर एक मानव म्हणून फक्त उरता. तुम्ही मुद्दाम अमेरिकेला जाऊन, म्हणूनच योग्य अशा बायकोचा शोध घ्यावा. तुम्ही खोटे बोलू नये. तुम्ही जिच्यावर निखळ प्रेम आणि फक्त प्रेमच करता, अशी स्त्री शोधा. तुम्हाला मुले व्हायला हवीत. मुलांशिवाय म्हातारपणी जगणे, फार दुःखदायक आहे."

"हो. मला मुले झालेली आवडतील. आता मला नेहमी असे वाटते की हे काम, हे अतोनात कष्ट आणि ते सोडून काहीच नाही. भयाण पोकळी! जर मला माझ्या या मोहिमेत यश मिळाले तर ----?"

"जर तुम्हाला मोठी मानाची पदवी मिळाली तर?"

"पण हा सगळा मानपान ठेवण्यासाठी मागे कुणीही नसेल, तर त्याची काय किंमत आहे? असे बसून तुझ्याशी

बोलणे, हे खरे तर विचित्र आहे. पण तू इतर स्त्रियांपेक्षा खूप वेगळी आहेस. जर सर्व महिला तुझ्यासारख्या असत्या, तर तुझी पुरुष व बायकांची बरोबरीची उपपत्ती खरी ठरली असती. तू अशी एकच बाई आहेस, जिच्याबरोबर मला स्त्रीत्व जाणवत नाही.''

''हो.''

ती विस्तवाकडे बघत उभी राहिली.

''तू किती दिवस भारतात रहाणार?''

''ओहो, मी परत येणार नाही आहे.''

''परत येणार नाहीस? ते अशक्य आहे. जर तू परत आली नाहीस, तर तू इथल्या अर्ध्या लोकांचे हृदय चुरडून टाकशील. तुझे सगळे तत्वज्ञान मला माहिती असले, तरी दुसऱ्यांच्या ह्रदयाचा असा कब्जा घेणारी इतकी ताकदवान बाई, मला तरी माहिती नाही.'' ते हसले. ''तीन वर्षांपूर्वी मला असे वाटले की मी -- जर तू प्रत्येक प्रसंगी व प्रत्येक मुद्द्यावरून, इतक्या मुक्तपणे व सतत माझ्यावर हल्ला केला नसतास, तर मी असा पिंजऱ्यात सापडलो नसतो. माणसाला

दुःख आवडत नाही. सारख्या थपडा खाणे, त्याला नाराज बनवते. पण दुसऱ्या माणसांवर असाच परिणाम होत असेल, असे नाही ---- मी मागील वर्षी एका गावी होतो, तिथे एक विचित्र माणूस होता. तुला त्याचे नाव माहिती आहे ---- "

त्याने त्याची बोटे, त्याला आठवण्याचा प्रयत्न करण्यासाठी हलवली.

"मोठ्या पिवळ्या मिशा असलेला, आत्ता आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर गेलेला मेजर आठवतो का? महिला म्हणत, की तो सतत तुझा फोटो खिशात बाळगून असतो. तू छापलेल्या मजकुराचे अवशेष तो लोकांना गूढपणे दाखवत असतो. त्याला असे वाटते, की तुझ्या नावात आणि -- तुझ्यात काही विसंगती आहे.

ती म्हणाली, "माझ्यावर प्रेम करणाऱ्या कुणाबद्दल बोललेले, मला आवडत नाही. त्याचा स्वभाव कितीही कोता आणि गरीब असला, तरी त्याने त्याच्यातले उत्तम असे काही, मला दिलेले आहे. प्रेमामध्ये विचित्र किंवा गूढ असे काही नाही. मला वाटते, पुरुषांनी एखाद्या बाईला बहाल केलेले पण तिने न स्वीकारलेले प्रेम, हे तिची उंची वाढवणाऱ्या

मुकुटासारखे आहे. मला असे वाटत नाही की माझ्यावर केले गेलेले सर्व प्रेम, नालायकपणे फुकट गेले. देखण्या पुरुषांनी मला खूप मान दिलेला आहे. त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. ती विस्तवाकडे बघत म्हणाली, "जर एखाद्या पुरुषाने त्याची छाती उघडी टाकून सांगितले, की त्याचे माझ्यावर प्रेम आहे, तर निदान दुसऱ्या लोकांना दिसू नये, म्हणून तरी तुम्ही ती मुद्दाम झाकायला गेलात, तर त्याला धक्का बसेल." ती पुढे म्हणाली, "मी हरीणी असते आणि एखादा नर हरीण माझा पाठलाग करतांना जखमी झाला असता, तर मी त्याला सहकारी म्हणून निवडणार नाही. पण कळपातील इतरांना काही कळू नये म्हणून मी त्याचे रक्त सांडलेली जागा पायाने उकरून परत होती तशी करून टाकेन." एवढे बोलून ती गप्प बसली.

खुर्चीत बसून हात उंचावून ती म्हणाली, "तरीही तुम्हाला माहिती असेल, की मला प्रेमाबद्दल सर्वसामान्य भावना नाहीत. मला वाटते, ज्याच्यावर प्रेम केले जाते, तो प्रेम करणाऱ्यावर फायदा अर्पण करतो. प्रेम ही एक सुंदर व महान गोष्ट आहे. मला वाटते त्यांचे प्रेम सफल होवो किंवा न होवो,

पण स्त्रीने पुरुषाचे व पुरुषाने स्त्रीचे ऋण त्याबद्दल मान्य केले पाहीजे.” तिने हळूवारपणे तिच्या गुडघ्यावर हात फिरवला.

त्याने घड्याळ बाहेर काढून म्हटले, “आता मला गेले पाहिजे. इथे बसून बोलत रहाणे इतके विलक्षण आहे, की मी तसा रात्रभरही बसू शकेन. पण मला दोन ठिकाणी जायचे आहे.” तो उठला. ती उठली व त्याच्यासमोर उभी राहून क्षणभर त्याच्याकडे बघू लागली.

“तू किती चांगली दिसतेस! मला वाटते तुला चिरतारुण्याचे रहस्य सापडले आहे. मी तुला चार वर्षांपूर्वी पाहीले, त्याहून एका दिवसानेही तू मोठी दिसत नाहीस तू नेहमी अग्नीतून उजळून निघाल्यासारखी दिसतेस. पण ते खरे नाही, हे तुलाही माहिती आहे.”

एखाद्या नवीन सापडलेल्या कुत्र्याकडे वा छानशा मुलाकडे करमणूक होऊन पहावे, तसे त्याने तिच्याकडे खाली वाकून पाहीले.

“आपण परत कधी भेटायचे?”

“ओहो, आता नाहीच!”

“नाहीच? नाही. नाही. तू इथली आहेस व तुला इथे परत यायला हवे. तू तुझ्या बुद्धिस्ट विचारसरणीला कंटाळून शेवटी इथे परत येशील.”

काही सामान्य बाबींची चर्चा करतानाचा ताठा सोडून, पोरकटपणे तिने विचारले, “मी तुम्हाला मला निरोप द्यायला बोलावले, तर तुम्ही याल? मला प्रत्येकाला निरोप द्यायला यायचे असते. जर मी असे केले नाही, तर मी अस्वस्थ होते आणि मग त्यासाठी परत यावेसे वाटते. निरोप घेतला की समजते, की आता शेवट झाला.”

“ओहो, हा काही शेवटचा निरोप नाही. दहा वर्षांच्या काळात तू यायला हवे. मग आपण आपल्या लिखाणाची तुलना करून बघू. तू तुझ्या बौद्ध धर्मगुरूची व मी माझ्या चांगल्या अमेरिकन आदर्शांची. कोण जास्त यशस्वी झाले ते कळेल.”

ती हसली. मला वर्तमानपत्रात नेहमी तुमच्या चालू घडामोडींबद्दल समजत राहील. कदाचित तुम्हीदेखील माझ्याबद्दल ऐकाल. त्यामुळे आपण तसे फार दूर जाणार नाही.”

“हो. मला वाटते, तू खूप यशस्वी होशील.”

ती डोळे विस्फारून त्यांच्याकडे बघत होती. ते कोट लावलेल्या खुर्चीकडे चालत गेले.

“मी तुम्हाला तो घालायला मदत करू का?”

“नको. आभारी आहे.”

त्यांनी तो घातला.

ती बोलली, “गळ्याचे बटण लावा. खोली उबदार आहे.”

ते कोट व हातमोजे घालून तिच्याकडे वळले. ते दोघे दाराशी उभे राहीले.

“ठीक आहे अच्छा. तुझा वेळ छान जाईल, अशी मी आशा करतो.”

ते तिच्याकडे बघत उभे राहीले.

तिने हवेत हात उडवत झटपट म्हटले, “मला तुम्हाला काही विचारायचे आहे.”

“विचार.”

“तुम्ही कृपया माझे चुंबन घ्याल का?”

क्षणभर त्यांनी तिच्याकडे पाहीले व मग ते खाली वाकले.

इतके वर्षांच्या काळात त्यांना सांगता आले नसते, पण ती आपल्या गळयात हात टाकत आहे असे त्यांना नेहमी वाटत असे. मृदुपणे, प्रेमाने व उत्कंठेने! आपल्या गाढ झोपलेल्या मुलाला आई जागे करू इच्छित नसतांना स्पर्श करेल, तसे. मग त्यांनी इकडेतिकडे पाहीले, तर ती गेलेली होती. दार आवाज न होता बंद झाले. क्षणभर ते संथ उभे राहीले. मग भरभर शेकोटीशी गेले व तिथे पडलेल्या सिगरेटच्या थोटुकाकडे पाहीले. नंतर ते सावकाश दाराकडे चालत गेले व दार उघडले. जिना शांत व अंधारी होता. त्यांनी जोराने घंटी वाजवली. वयस्क महिला वर आली. त्यांनी तिला विचारले, की त्यांच्याबरोबर बोलणारी महिला कुठे गेली. वयस्क महिला उत्तरली, “माहिती नाही. ती गेली.” त्यांनी विचारले की ती कुठे गेली, तेव्हा ती म्हणाली की तिला माहिती नाही. पण ती एवढे सांगून गेली की तिने तिचा नवीन पत्ता कळवेपर्यंत, सहा ते आठ महिने तिची पत्रे जपून ठेवावी.

त्याने तिला कुठे शोधावे, याची काही कल्पना आहे का असे विचारले असता, त्याना माहिती नाही असे उत्तर मिळाले. भिंतीला अजून चित्र लटकत असल्यासारखे ते रिकाम्या जागेकडे आ वासून बघत राहीले. त्यांनी शीळ घालायचा प्रयत्न केला पण आवाज आला नाही. त्यांनी वयस्क महिलेला दहा शिलिंग दिले आणि खाली उतरले.

या गोष्टीला आठ वर्षे झाली.

अजून सर्व काही नुकतेच घडल्यासारखे वाटते. जीवन किती सुंदर असले पाहिजे!

A Story By Angela Poe

Stephen Vincent Benet

America

# अँजेला पोने सांगितलेली गोष्ट




छपाईच्या व्यवसायात मी अगदी नवखा होतो. मला वाटते तो युध्दापूर्वीचा काळ होता. आता या व्यवसायात जितकी तरुण मंडळी असतात, त्यापेक्षा देखील तेव्हा मी तरुण होतो. आमच्या न्यूयॉर्कच्या कार्यालयातील काही वयस्क लोक, अजूनही जुन्या दिवसातील, कागदाची संरक्षक

बाही व विरलेले अल्पाका कोट घालत होते. तिथे जुनी व नवीनही कार्यालये आहेत. छोटीशी, चकचकीत, अती आत्मविश्वास असलेली व सराईत अकार्यक्षमतेने सतत सकारात्मक उर्जा पुरवणारी अशी नवीन कार्यालये आहेत. आणि बंद पडत आलेली, जगात काहीही चांगले करू शकणार नाहीत अशी, त्यापेक्षा लहान असलेली शहाणी, जुनी कार्यालयेदेखील आहेत. पण अनेक वर्षांपूर्वी, थ्रशवूड कॉलिन्स आणि कंपनीमधील वातावरण बऱ्यापैकी जुन्या वळणाचे आणि चांगले होते. स्वागतकक्षातील विरलेला गालीचा अनेक प्रसिध्द व्यक्तींनी तुडवलेला होता. इतर प्रकाशकांनी तरुणांना खात्रीपूर्वक सांगितलेल्या प्रसिध्द व्यक्तींच्या आकड्याएवढा तो खरोखर नसला, तरी तशा दंतकथा तरी होत्या. हेन्री जेम्स, विल्यम डीन होवेल्स, आणि किपलिंग नावाचा भारतातील तरूण मनुष्य, असे लेखक तिथे येऊन गेले होते. जोपर्यंत नवीन लेखक त्यांचा करार बघत नाहीत आणि त्यांना असा शोध लागत नाही, की त्यांचे ऑस्ट्रेलीयन हक्क देखील कॉलिन्स आणि कंपनीच्या मालकीचे झाले आहेत तोपर्यंत, आमच्याकडील वातावरण नवीन लेखकांना उत्तेजन देणारे होते. पण नंतर त्याना

कंपनीच्या मिस्टर थ्रशवूड यांना भेटावे लागे. ते त्यांना पटवून देत, की त्यांचे सर्वात यशस्वी साहित्य प्रकाशित करतांना, बरीच ड्यूटी भरावी लागली. त्यामुळे त्यांचे खूप आर्थिक नुकसान झाले.

माझे टेबल कार्यालयाच्या पुढच्या भागात, खिडकीपासून व वातानुकुलीत यंत्रणेपासून लांब होते. त्यामुळे मी उन्हाळयात भाजून निघत असे व हिवाळयात काकडत असे. पण तरी मी आनंदी असे. मी न्यूयॉर्कमध्ये होतो. पुस्तके बनवायच्या कामाचा भाग होतो. मी बड्या मंडळींना पहात असे. आणि दर रविवारी मी माझ्या कुटुंबाला त्याबद्दल लिहित असे. काही बडी मंडळीं, दिसायला फार चांगली नसत व त्यांचे लिखाणही तसेच असे. पण त्यामुळे मला खरेखुरे आयुष्य  जवळून बघायला मिळे. मिस्टर थ्रशवूड, त्यांचा बारीक वयस्क लंबर्तुळाकार चेहरा व पांढरे केस घेऊन तिथे वावरत असत, तेव्हा माझा मनुष्यजातीवरील विश्वास दृढ होत असे. जेव्हा ते त्यांचा हात माझ्या खांद्यावर ठेऊन म्हणत, “रॉबिन्स, तुझी चांगली प्रगती होते आहे, तेव्हा माझ्या अंगावर मूठभर मास चढत असे. मला बरेच दिवस कळले

नाही, की मी तीन माणसांचे काम करत होतो. पण मला ते तेव्हा माहिती असते, तरी मी फार पर्वा केली नसती. आणि जेव्हा हार्परचा रँन्डॉल डे याने आम्हाला ‘पवित्र चोर’ अशी अपमानकारक शिवी दिली, तेव्हा मी ती उद्धट लोकांबद्दलच्या योग्य अशा सणसणीत शेऱ्यासकट, परत त्याच्या घशात घातली. कारण तेव्हा उद्धट लोकांबद्दलचे आमचे धोरण तसेच होते.

आमच्याकडे चांगली मोठी यादी होती --- कारण मिस्टर थ्रशवूड इतर यशस्वी प्रकाशकांप्रमाणे, क्वचितच एखादे पुस्तक वाचत असत. त्यांचे नाक मोठे उठून दिसणारे व उल्लेखनीय असे होते. तर दुसऱ्या बाजूला मला आश्चर्य वाटेल, अशी काही आदर्शवादी नावे होती --- त्यातील पहिले नाव अँजेला पोचे होते. कास्पर ब्रीडच्या पुस्तकातील निरागस मनाची, उतरत्या हनुवटीची आणि पिळदार स्नायूंची गुराखी मुले, मी सहन करू शकत होतो. जेरेमी जेसन आणि तत्वज्ञ होमेस्पन यांची छोट्या चामडी हिरव्या वेष्टणांची पुस्तके, वेफररच्या धार्मिक श्रद्धा, वेफररची शपथ, वेफररच्या शेकोटीचा दगड, मी माझ्यात सामावू शकत होतो. ही पुस्तके

जोरदार धक्क्याने बोटाचे नख तुटावे, तशी भावना माझ्यात निर्माण करत होती. प्रकाशकाने जगायला हवे. इतर प्रकाशकांना त्यांचे ब्रीड आणि जेसन होते. पण अँजेला पो फक्त लेखिका नव्हती --- तर ती न्याहारीसारखी किंवा च्युईंगगमसारखी टाळता येणार नाही अशी, पण गबाळी, विशाल अमेरिकन संस्था होती. अनेक वर्षांपूर्वी, तिच्या उदंड वाचकांसमोर मोठ्या श्रमपूर्वक तिच्या गोष्टींचा ढाचा परत घेऊन येण्यापूर्वी, तिच्याबद्दल न्यूयॉर्क टाईम्सने जर याहून काही वेगळे सांगणे थांबवले असतेः जसे की, “अँजेला पो चे नवीन पुस्तक --- तिच्या मोठ्या प्रमाणात असलेल्या वाचकांना नक्कीच हलवू शकेल” आणि जर तिची पुस्तके मध्यम प्रमाणात विकली गेली असती, तर मी तिला आणि थ्रशवूड कॉलिन्स आणि कंपनीलाही माफ केले असते --- मी नेहमी नवल करत असे, की कोण परीक्षण करणारे, दुःखी लोक असे लिहितात. कारण ‘मार्शेसची वँडा’ पासून, ते ‘गुलाबांची राख’ पर्यंत, सर्व पुस्तके त्याला वाचावी लागत असणार. मला कळत नसे, की एका माणसाला एवढे वाचणे कसे काय शक्य होत असेल?

नॉर्वेच्या खाडीपासून टास्मानियाच्या किनाऱ्यापर्यंतच्या कादंबऱ्या आमच्याकडे असत. आणि प्रत्येक पानामध्ये त्या परदेशाचे खोलवर वर्णन असे. मार्गदर्शक पुस्तकांमधूनच फक्त जी माहिती मिळू शकेल, अशी सहज बोलता बोलता मिळावी, तशी माहिती त्यात असे. हे दृष्य बदलू शकेल, पण बाहुल्या नक्की त्याच राहतील.

टास्मानियामधील नायिकांच्या गालावरील जंगली गुलाब, हवेचा परिणाम न होता, तसेच राहतील. विशेष करून पापी व बुद्दू असलेल्या आणि घोड्यावर स्वार असलेल्या, खलनायकांच्या पकडीपासूनही त्या नायिका दूर राहतील. मला आठवते त्याप्रमाणे, हे खलनायक उच्च सामजिक दर्जा असलेले असले, तरी ते घातपाती व नास्तिक असतात व नेहमी घोड्यावर मांड टाकायच्या पोशाखात असतात. नायिका नेहमी ठेंगण्या, स्वर्गीय आणि फुलांची नावे असलेल्या असतात. आणि सर्वात कडी म्हणजे, त्यांच्यात जोश किंवा रुची अजिबात नसते. त्या म्हातारीच्या केसांसारख्या, रेंगाळणाऱ्या गोड चवीच्या असतात. अँजेला

पोची गोष्टी लिहिण्याची शैली अशी अनुकरणात्मक आहे. प्रसंगानुरूप, ही शैली परीक्षकांना रानटी राग यायला प्रवृत्त करते आणि मग ते फक्त तरुण लोक लिहितील, तशा प्रकारची दाहक परीक्षणे लिहितात. मग आमच्या स्वागतकक्षात बसलेल्या मुलीला, मिस्टर थ्रशवूडकडून दम मिळतो आणि ते दिवसभराच्या सर्व भेटी रद्द करून टाकतात. कारण अँजेला पो तिच्या पुस्तकांची सर्व परीक्षणे मोठ्या चवीने वाचते.

अशा एका प्रसंगी, मी तिला पहिल्यांदा पाहिले. मी मिस्टर थ्रशवूड यांच्या खासगी केबिनवरून चाललो होतो. तेव्हा मिस्टर कॉलिन्स याना काळजीयुक्त चेहऱ्याने बाहेर पडतांना पाहिले. लेखकांबरोबरचे व्यावसायिक संबंध नियमाप्रमाणे, ज्याने मिस्टर थ्रशवूडकडे देऊन टाकले, अशा त्या बुटक्या, जाड इसमाने कार्यालयाची तुकडी झाकोळून टाकली होती. पण यावेळी अँजेला पो मिस्टर थ्रशवूड तिथे नसतांना आली आणि त्याना अचानक पकडले.

एखाद्या बुडणाऱ्या माणसाने म्हणावे तसे, तो मला म्हणाला, “इकडे बघ, रॉबिन्स, पो यांच्या अलीकडील पुस्तकावर, मोठे काही परीक्षण छापून आले आहे का?

कुठल्या प्रकारचे परीक्षण मी म्हणतो आहे, हे तुला कळले असेल --- नुसते गोडगोड. वाषुमा नियतकालिकाने तिला साहित्यातील लालीपॉप विकणारी, असे म्हटले आहे --- आणि जर मला तिचा जाहिरात करणारा दलाल सापडला, तर त्याचे काही खरे नाही.”

मी म्हणालो, “का? मला भीती वाटते. मी --- “ मग मला आठवले, रँन्डॉल डे ला अशी वाईट सवय होती, की अँजेला पोच्या पुस्तकांवरील त्याला सापडलेली मोठीमोठी परीक्षणे, मला पाठवायची --- आणि एक त्या दिवशी सकाळीच आले होते. त्याभोवती फुले आणि हृदये यांची आरास काढलेली होती.

मी म्हणालो, “खरे पाहता माझ्याकडे आहेत, पण --“

मिस्टर कॉलिन्स माझ्याशी हातमिळवणी करत व मला ओढून त्यांच्या खोलीत नेत उत्साहाने बोलले, “आभारी आहे.”

पण पहिल्यांदा मला त्यांच्या व तिथे असलेल्या कलादिग्दर्शक मिस्टर कॅथरवूड यांच्या चेहऱ्यावरील ताणाच्या विचित्र भावनांचा अर्थ समजला नाही. त्यांच्या समोरील

खुर्चीत बसलेल्या, जाड्या, नम्र, छोट्याशा, मरगळलेल्या फुलासारखा चेहरा असलेल्या वयस्क बाईमध्ये, घाबरण्यासारखे काहीच नव्हते. ती अर्थात अँजेला पो होती. काही वर्षांपूर्वीच्या तिच्या पुस्तकातील फोटोपेक्षा, ती दहा वर्षांनी म्हातारी दिसत होती. मग ती बोलू लागली.

तिचा आवाज, गोड, किणकिणणारा, एकसुरी आणि न थांबता बोलणारा होता. ती जसजशी मिस्टर थ्रशवूडबद्दल व कॉलिन्स आणि कंपनीमधील तिच्या दयाळू मित्रांबद्दल बोलत राहिली --- तसतसा मग माझ्यात कधी बदल घडून आला, ते काही कळलेच नाही --- तिच्या छोट्याशा बागेतील फुले देखील कशी काय तिची मित्र होती! मला मिस्टर कॉलिन्सच्या चेहऱ्यावरील बदलत्या भावाचे गुपित कळले. ते शुद्ध, साधे कंटाळलेपण होते पण त्या कंटाळलेपणाची उच्च कला झाली होती. कारण जेव्हा अँजेला पो रागावली, तेव्हा तिने आवाज वाढवला नाही. ती फक्त तिच्या गोड, खालील आवाजाने खूप वेळ आणि सतत, शंखामध्ये भोक पाडल्यासारखी बोलत राहिली --- बोलत असतांना ती कंटाळली --- तिला मध्ये थांबवून किंवा संभाषण बदलूनही

काही उपयोग नव्हता. ज्या संभाषणाला काही खरा विषय नाही, ते तुम्ही बदलू शकत नाही. तरीही, तिचे आक्रमक शरीर एकसुरी, जोरदार, भीतीदायक आवाजामुळे मोडून पडू लागेपर्यंत, ती बोलत राहिली. प्रत्येक क्षण आधीच्यापेक्षा लांब वाटू लागला. ती काय करत होती, ते तिला स्पष्टपणे कळत असल्याचे, माझ्या लक्षात येऊ लागले. कसेही करून आम्ही नेहमी अँजेला पो कडे येत असू आणि वस्तुस्थिती अशी होती की ती मिस्टर थ्रशवूडसाठी थांबली होती. मला असे वाटू लागले, की मिस्टर थ्रशवूड यांची तेथील गैरहजेरी हे टोकाचे नैसर्गिक संकट होते. आणि जर ते लवकर आले नाहीत, तर मला वाटले, मी सुद्धा रडू लागेन.

सुदैवाने ते वेळेवर आले. आणि त्यांनी आम्हाला वाचवले. फक्त मिस्टर थ्रशवूडच ते करू शकत होते. सुदैवाने किंवा दुर्दैवाने, मी तिला डे ने पाठवलेले परीक्षण दाखवत होतो. त्यामुळे ती बरीच शांत झाली. तरी गंभीर आवाजात ती म्हणाली, की अर्थात ती कधीच परीक्षणे वाचत नाही. कारण त्यामुळे फुलपाखराचे पंख मोडतात. म्हणजे तिला काय म्हणायचे होते, ते मला समजले नाही. पण मी काही योग्य

असा प्रतिसाद दिला असावा. कारण मिस्टर श्रशवूडनी त्यांच्या नेपोलिअनसारख्या हावभावांनी मला माहिती दिली, की त्यादिवशी दुपारी पाच वाजल्यापासून माझा पगार महिन्याला दहा डॉलरने वाढला होता.

ते म्हणाले, “रॉबिन्स, तसेही मला तुझ्यावर फार काम टाकायचे नाही. पण मिस पो ला तुझे आजचे वागणे आवडले. तर ती एक नवीन कादंबरी लिहिणे सुरु करते आहे --- मला वाटते ती आईसलँडबद्दल किंवा फिनलँडबद्दल आहे. त्याचे एवढे काही नाही --- “ ते माझ्याकडे बघून, हसले. तुला माहिती आहे, की तिला लागणारी संदर्भ पुस्तके नेहमी आपण पुरवतो व ती आपण दर आठवड्याच्या शेवटी पाठवतो --- ती तिला पोचवायचे काम, आपल्या कार्यालयातील कोणीतरी करते. तिचे घर हडसनच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे आणि मला वाटते ती तिच्या घराला आयरी म्हणजे शिकारी पक्ष्याचे घरटे, असे म्हणते.” त्याने गालातल्या गालात हसत, पुढे चालू ठेवले. “ती खरे तर एक छोटीशी व्यवस्थित बाई आहे. आपल्या व्यवसायासाठी महत्वाची आहे.” त्याचा चेहरा तिला जुलमाचा मान देणारा बनला. तेव्हा जर तुझी हरकत

नसेल तर? मग ठरले तर! रॉबिन्स, तू किती मनमिळाऊ आहेस!” ते पोरकट हसू हसले.

मला म्हणायचे होते, की मी असले काही करणार नाही. पण तुम्ही त्यांच्याबरोबर असता, तेव्हा तुम्ही त्याच्या प्रभावाखाली असल्यासारखे होते. तथापि मी अंतर्गत बंड करत, त्या आठवड्याच्या शेवटी पुस्तकांची पिशवी घेऊन, बोटीत बसलो. मी जेव्हा तिच्या घराशी पोचलो, तेव्हा तिथे मला माझ्या आत्यासारखी एक छानशी वयस्क बाई भेटली. तिने मला स्वस्थ करुन, बरेच खायला घातले. तिने माझ्याशी योग्य असा हास्यविनोद केला. चहा भरपूर होता --- परतताना मला गाडीतून स्टेशनवर पाठवण्यात आले. माझ्या दुर्दैवाने परत जातांना, मला असे जाणवले की मला तो पाहुणचार छान वाटला. अजूनही माझ्या डोळ्यासमोर अँजेला पो चा एकसुरी, हलकासा, गुणगुणल्यासारखा आवाज घुमू लागला. तसे पाहिले तर तो काही सांगत नव्हता. पण तरी आठवत होता. मला माहिती असलेल्या शहरातील इतर चार बायकांसारखीच ती छातीवर सोन्याचे लहानसे घड्याळ लावलेली, सेलच्या वेळी दुकानात गर्दी करणारी व स्ट्रॉबेरी उत्सवाच्या वेळी नटून

थटून इकडे तिकडे फिरणाऱ्या बायकांसारखी होती. पण तरी मी तिला आठवण्याचा प्रयत्न करत होतो. तिच्यात वेगळे काहीतरी होते. असे काही गुण --- जे मी सांगू शकत नाही. त्याने तिला अँजेला पो बनवले होते. तरी सुद्धा ते काय होते? तिचे नोकर पूर्णपणे प्रशिक्षित आणि सभ्य होते. ती सांगे, तेव्हा तिचा कुत्रा त्याच्या जागेवरून उठत असे. तरीही ती जिन्यातून उतरे, तेव्हा तुम्ही सहज तिचासाठी हात पुढे करता. मला त्याचे कारण समजले नाही, पण मला माहिती होते, की मी परत तिच्या घरी जायची वाट बघत होतो, खरे तर ते लाजिरवाणे होते. पण तरुण माणसे अशी असणारच --- चहा फारच चांगला होता.

आणि मग रँन्डॉल डे ला सांगितल्याप्रमाणे, फक्त आयरि तिथे जाण्याच्या योग्यतेचे होते. ते मोठे लाकडी घर होते. त्यात मोठ्या रुंद गॅलऱ्या होत्या. ऐंशीच्या दशकात ते हडसन नदीच्या काठावरील टेकाडावर बांधले गेले. ती घरे खास व डौलदार अशा कक्कू घड्याळांची आठवण करून देत. तिथे हिरवळ, झुडुपे व मोठा मजबूत तंबू होता. फरसबंद वाट होती. कठीण लाकडाचे मजले होते. वजनदार तैलचित्रे

टांगलेली होती. हे सगळे अँजेला पो च्या नवकल्पनाशक्तीतून आले असणार. तिने सर्व काही अगदी नेटकेपणे केले होते. तिथे मिस्टर एव्हेरार्ड डी लॅसे वावरत असत. त्याना मिस्टर अँजेला पो म्हटलेले चालत नसे.

एका प्रसिद्ध लेखिकेच्या नवऱ्याबरोबरचा माझा, तो पहिला प्रसंग होता. तो माझ्या कायम लक्षात राहील. तुम्ही त्यांना पूर्वी ते भेटत असत, तसे आता वारंवार भेटू शकत नाही. मोठ्या, बडबड्या तोंडाची, छोट्या डोळयांची व तुकतुकीत कांतीची अशी ती माणसे होती. नवीन नट ही अजून एक जात होती. मिस्टर डी लॅसे फक्त सिनेमानट नव्हते, तर ते नाटकांशीदेखील संबंधित होते --- हा फरक होता. तो त्याच्या तारुण्यात नक्कीच देखणा असणार --- उतार वयातही तो देखणा होता --- काळे चमकणारे, उत्साही डोळे, निळसर जांभळया रंगाचे केस, आवाजात अजून मायकेल स्ट्रॉगॉफचा वैशिष्ट्यपूर्ण ठाशीवपणा आणि झारचा जणू वारसा मिळालेला! जेव्हा त्याने माझ्याकडे त्याच्या छोट्या डोळयांनी बघितले, तेव्हा त्याला बघायला मी एकटाच असल्याची, मोठा प्रेक्षकवर्ग नसल्याची मला लाज वाटली. पण त्याला

त्याचे विशेष काही नव्हते. आणि तो ज्या पद्धतीने त्याच्या मुलीला वागवत होता, ते मला आवडले.

ते दोघे वयस्क लोक नक्कीच एकमेकांशी चांगल्या पद्धतीने बांधले गेले होते व दोघांना एकत्र पाहिल्यावर, ते लगेच लक्षात येत होते. त्यांच्यातील फरक मित्रत्वाचा व व्हिक्टोरियन काळातील सांस्कृतिक दर्जा दाखवणारा होता. तो मला भिडणारा वाटला. एव्हेरार्ड काही त्रासदायक नव्हता, असे नाही. नेहमी नवरे असतात, तसाच तो होता. तो सध्या रंगमंचापासून दूर होता, हे मान्य होते. पण हे त्याच्या नाटयगुणांशी मिळतेजुळते नव्हते. हे देखील मान्य होते, की तो कुठल्याही क्षणी, रंगमंचावर जाऊन रसिक प्रेक्षकांच्या कौतुकास पात्र होऊ शकत होता. नंतर मला समजले, की जेव्हापासून अँजेला पो च्या पुस्तकांचा तडाखेबंद खप होऊ लागला. तेव्हापासून, तो जवळपास तीस वर्षे, काम करत नव्हता. पण त्यामुळे त्या दोघांमध्ये काही बदल झाला नाही.

ती तिच्या गोड, किणकिणणाऱ्या आवाजात म्हणेल, ‘‘मिस्टर डी लॅसेंशिवाय मी जे केले, ते करू शकले नसते. आणि एव्हेरार्ड तिला उत्तरादाखल म्हणत असे, ‘‘डार्लिंग, मी

तर गुलाबाला फक्त पाणी देऊन, त्याची काळजी घेतली. पण सगळी फुले तर तुझीच आहेत.” अशा गोष्टी जेव्हा बोलल्या जातात, तेव्हा त्या खरे तर तसे वाटण्यापेक्षा, नुसत्या बोलल्या जातात. पण डी लॅसेंला खरच तसे म्हणायचे असावे. मग ते एकमेकांकडे बघत बसत. मूर्ख जग समजते, तसे ते बंधन नव्हते. तर ते दोन जीव, खरोखर खोलवर बंधनात जखडले गेलेले होते.

त्यांचे वर्णन करतांना, मी अँजेला पो सारखे लिहू लागलो होतो. त्या वातावरणात पो मंडळीचा प्रभाव न पडणे अवघड होते. साधा, सुती फ्रॉक घातलेली सुंदर मुलगी तुम्हाला अवचितपणे बागेत भेटली असती, तिचे गाल लाल होऊन, ती दचकून रडू लागली असती व पळून गेली असती, तर मीही लाजलो असतो. पण मला थोडेही नवल वाटले नसते. अशा वेळा येत की जेव्हा मी, छोटासा लंगडा मुलगा भेटायची अपेक्षा करत असे. तेव्हा मला त्या घराच्या हिरवळीतून जाणाऱ्या वाटांवर तो अशक्त, धीट, गालांवर सूर्यास्तासारखी लाली चढलेला, मुलगा भेटे. त्यांच्या नातेवाईकांच्या खूप मुलांवर ते मायेचा वर्षाव करत असले,

तरी पो दांपत्याला  मूलबाळ नव्हते. आणि ते मला लाजिरवाणे वाटले.

तुम्ही पाहिलेत, मी चेष्टा करायला लागलो. पण मी नाही म्हटले तरी, भारावूनच गेलो होतो. ते मला खूप खायला घालत. ते माझ्याशी छान नम्रतेने वागत. ते भावनाप्रधान होते व उदारही होते. अँजेला पो चा सतत काहीबाही गुणगुणल्यासारखा बोलत रहाणारा आवाज, मला ऐकावा लागे. पण जसजसा काळ गेला, तसतशी मला त्याची सवय झाली. मिस्टर थ्रशवूड म्हणाले होते, की तिला पाहिजे तेव्हा ती, खूप शहाणी व टोकाची चटपटीत असू शकते. ती टीका सहन करू शकते, हे ऐकून मला नवल वाटले. निदान एव्हेरार्ड डी लॅसेंची टीका, तरी नक्कीच! ती आमच्यासाठी एखादे पात्र किंवा दृष्य रंगवे, तेव्हा तो मोठ्या आवाजात सतत म्हणे, “नाही डार्लिंग, असे नाही चालणार.”

“एव्हेरार्ड, पण झेफा मनोरुग्णालयातून कशी काय पळून जाईल?’

“लाडके, ते मला तुझ्या बुद्धीवर सोडून द्यावे लागेल. पण हा परिच्छेद नाही चालणार. हे अँजेला पो चे लिखाण मला तरी वाटत नाही.”

ती शरणागती पत्करून म्हणे, “ठीक आहे, डीअर.” मग मला म्हणे, “तुला माहिती आहे का, मिस्टर डी लॅसे नेहमी बरोबर असतात.” त्याच वेळेस तो म्हणे, “अरे तरुण माणसा, मी नेहमी बरोबर असतो, असे नाही. पण माझ्याकडे जी काही थोडीफार प्रतिभा आहे, ती मिसेस डी लॅसेच्या सेवेसाठी आहे ---

“एव्हेरार्ड, ही मनाच्या श्रीमंतीची ही फळे आहेत”

“ठीक आहे. लाडके, कदाचित माझ्या जिभेला महाकाव्यांची थोडी ओळख असेल --- त्या कवींचे थोडेफार परीक्षण करायचा अनुभव असेल --- “

मग प्रत्येकजण दुसऱ्याला थोडेसे हलवेल. मी न चुकता परत कक्कू घड्याळाची नव्हे, तर ज्यातून चांगल्या हवेसाठी एक म्हातारी बाहेर येते व पावसासाठी म्हातारा बाहेर येतो, अशा लाकडी ह्वादर्शक प्रेषितांची आठवण करेन. फक्त इथे म्हातारा व म्हातारी एकदम येत आहेत.

त्या दोन वयस्क लोकांनी माझ्यावर जे मत ठसवले, ते मी तुमच्यावर ठसवतो आहे. क्षुल्लक पण वेगळेच जुनाट लोक, किरकोळ चेष्टेपेक्षा जास्त, पण त्या सर्वाहून एकमेकांना महत्वाचे असलेले, असे ते दोघे होते. एका तरुणाच्या दृष्टीने हे बघणे, कधीही जास्त महत्वाचे आहे. त्याला तेव्हा ते उमजले नाही, तरी त्यामुळे त्याची विश्वाची जाणीव प्रगल्भ झाली. एका तरुणाला खऱ्याखुऱ्या आयुष्याची पहिली चव घेताना, काही भीतीदायक क्षण आले. अचानक एखाद्याला शोध लागतो, की पुस्तकातील नव्हे, तर खरीखुरी माणसे गॅसने भरलेल्या खोलीत आत्महत्या करतात. कारण त्याना जगण्यापेक्षा मरणे बरे वाटते. एखाद्याला असाही शोध लागतो, की बाकीचे दुष्ट असून आयुष्यात यश मिळवून, मजेत जगतात. त्यामुळे जसे एखादा पाण्यात पोहणारा उलटलेल्या बोटीला पकडून ठेवेल, तसे नैसर्गिकपणे कुणीही सुरक्षिततेला प्रथम पकडून ठेवतो. मी पहिल्यांदा त्यांना भेटलो, तेव्हा मला हे शक्य वाटले नाही. पण मी कुठल्या गोष्टीला चिकटून राहिलो असेन, तर तो डी लॅसे होता. मी जसजसा अँजेला पोच्या अथांग जाळयात ओढला जाऊ लागलो, तसतसे मला कळू लागले, की तिच्या नवऱ्याचे तिच्यावर किती ऋण आहे.

ओहो, त्याने खात्रीने कधीच काही लिहिले नसेल. पण त्याला उत्तम रीत्या गुंफलेले, त्याना आभासीपणे कार्यरत ठेऊन, सुदृढतेकडे नेणारे व भावनेला हात घालणारे रस्ते माहिती होते. कुठले लिखाण चालेल, हे तो जाणत होता. मला हे माहिती आहे, कारण मी अँजेला पो चे एक पुस्तक निर्मितीपासून ते त्याची विक्री होईपर्यंत, टाळाटाळ न करता बघत होतो. साहित्याच्या दृष्टीकोनातून बघता, त्याच्या सूचना फारशा बऱ्या नसल्या व पूर्णपणे भयानक असल्या, तरी उपयुक्त होत्या. योग्य वेळी चित्रातील डोंगरांमधून सूर्य उगवला. त्याच्या टीकेचा उपयोग झाला.

एक दिवस मी आयरीत आलो, तेव्हा तिला फ्ल्यू सुरु झाला होता आणि ती झोपलेली होती. तो अर्थातच तिची काळजी करत होता. पण त्याने मला चहासाठी आग्रह केला. कारण मी नेहमी चहा घेत असे. मला माझ्या काळज्या असल्या, तरी  त्यातून मला शांती मिळणार होती. त्याने आदबशीरपणे वागताना मला रंगमंच व नाटक यासंबंधी काही विनोद सांगितले. पण त्याचे डोळे आणि कान वर अँजेला झोपली होती, तिथे लागले होते. त्याला दुःख झाले नसते,

तरच मला नवल वाटले असते. पण काळजीमुळे माणसे जास्त खासगी बनतात. तिच्या कामामधील त्याचा सहभाग बघून, मी त्याचे अभिनंदन करायची संधी घेतली. त्याने नीट ऐकले नसावे. पण तो खूष झाला.

तो म्हणाला, “माझ्या आवडत्या माणसा, तू असा विचार केलास, त्यामुळे मी आनंदित झालो. नेहमी मी स्वतःशी बोलतो, “म्हाताऱ्या, यावेळेस, हुशारीचा दिवा बाधा न येता जळत राहो. पवित्र ज्योतीमध्ये अडथळा आणणारे तुम्ही कोण? पण हुशारी आणि फक्त हुशारीच --- स्वतःला सर्वसामान्यांच्या दर्जाची होण्यापासून रोखू शकते --- आणि हे रोखणे, कौतुकास्पद आहे. कदाचित मी माझा वाटा उचललेला आहे, अशी मला आशा आहे. ती माझे सर्वस्व आहे.” तो म्हणाला.

मी म्हणालो, “सर, मला ते माहिती आहे.” पण तो ऐकत नव्हता.

तो म्हणाला, “हो. आम्ही दोघे एकमेकांसाठी खूप काही आहोत. मी अशी आशा करतो, की तिला आवडत नसले तरी, ती औषधाचे थेंब घेत असेल. खरच प्रिय माणसा,

आपली पहिली भेट विजेच्या लोळासारखी होती.” तो माझ्याकडे गांभीर्याने बघत राहिला. माझी अशी इच्छा आहे की तिचा पहिला नवरा, मिस्टर वेड्ज याला हे जास्त चांगले समजले असते. पण तो जमिनीला चिकटून असलेला प्राणी होता. त्याला लग्न म्हणजे मनोमिलन, वगैरे कळण्यापलीकडील तो होता.”

“मिसेस डी लॅसे चे आधी एक लग्न झाले होते?” मी माझ्या आवाजातील आश्चर्य लपवू शकलो नाही.

मिस्टर डी लॅसे नवल वाटत, एखाद्या उमलणाऱ्या गुलाबासारखी प्रतिक्रिया देत बोलले, “अरे माझ्या मुला, “तुला माहिती नाही, हे मी विसरलोच. आम्ही पहिल्यांदा भेटलो, तेव्हा ती मिसेस मार्व्हीन वेड्ज होती.”

विचारू नयेत, असे हजारो प्रश्न माझ्या ओठावर आले व विरून गेले. कारण मिस्टर डी लॅसे यांनी परत बोलायला सुरवात केली.

ते म्हणाले, “मी तिला गोशेन, इंडीयानाचा गुलाब म्हणत असे. माझ्या बॅरेच्या प्रवासानंतर मी तिथे रहात होतो. मी मल्लयोद्धा चार्ल्सची व स्मशान खणणाऱ्याची भूमिका

करत असे. मल्लयोद्धा चार्ल्सचे काम काही फार मोठे नव्हते. ते कोणीही केले असते. पण त्यानंतर गोशेनला परतणे अवघड होते. पण मला पैशांची गरज होती. पण मी अँजेलाला भेटल्यावर, मला समजले, की माझा मार्ग सुकर झाला आहे. मिस्टर वेड्ज --- बिचारा --- तो आमचे गवत आणि पशुखाद्य हे दुकान चालवत होता. माझ्यापेक्षा मोठा होता. मी मुलगा असतांना तो माझ्यावर पाळत ठेऊन मला काठी म्हणत असे. पण तेव्हा मला अँजेला माहिती नव्हती. ती झुक स्प्रिंगहून आली होती."

तो थांबला व त्याच्या बारीक डोळयांनी माझ्याकडे रोखून बघत राहिला. मी ते संपूर्ण दृष्य पाहू शकत होतो --- एका लहान गावाचे धुळीने भरलेले रस्ते. आणि त्यावरून पळणारा गबाळा नट मुलगा --- त्याच्या पळण्याची चाचणी झाल्यावर, नकार मिळून घरी परतलेला. चाळीस वर्षांपूर्वीची अँजेला तिच्या नायिकेच्या रंगीत हलकाशा सुती कपड्यात, मी बघू शकत होतो. ते सर्व इतके निरागस व उच्च विचारांचे असले पाहिजे --- निरागस आणि रंगमंचावरील भावनेला हात घालणाऱ्या नाटकासारखे! स्वतःतच रमलेल्या सणसणीत

आकाराच्या, गवत आणि पशुखाद्य दुकानाच्या व्यापाऱ्याला देखील ते तसेच वाटले असले पाहिजे. मी त्या जोरात हसणाऱ्या व घाबरत घाबरत त्याच्या वाटची वाक्ये बोलणाऱ्या मुलाला, बघू शकत होतो --- पण तेव्हा त्याला एव्हेरार्ड डी लॅसे म्हणता आले नसते. तरी गोशेनमध्ये त्याने प्रेम व प्रणय जिंकलेला बघून मी आश्चर्यात पडलो.

मी म्हणालो, “मग मिस पो चा घटस्फोट झाला --- म्हणजे मला म्हणायचे आहे की मिस्टर वेड्‌जबरोबर घटस्फोट झाला.”

माझ्या मित्राला धक्का बसलेला दिसला. तो अदबीने बोलला, “प्रिय मुला, तिच्या एकाही पुस्तकात, तिने घटस्फोटीत महिलेचे चित्र रेखाटलेले नाही.”

मी अशक्त नव्हतो, तरी क्षीणपणे म्हणालो, “पण खऱ्या आयुष्यात ---“

मिस्टर डी लॅसे खट्टू होत म्हणाले, “अँजेला पो ची पुस्तके खऱ्या आयुष्यावर आहेत?” नंतर ते कडकपणे बोलले, “नाही. मिस्टर वेड्‌ज जिवंत नाहीत. ते वारले.”

“वारले?”

त्यांचे बारीक डोळे क्षणभर माझ्यावर रोखून ते बोलले, “मी गोशेनला परतल्यापासून, एका वर्षात. खरे तर त्यांचा खून झाला.” माझ्या मनात अशी भयंकर कल्पना आली, की आता मला विश्वास बसणार नाही, असा कबुलीजबाब ऐकावा लागणार. पण तसे झाले नाही.

शेवटी डी लॅसे म्हणाले, “त्याच्या दुकानात झालेल्या जबरदस्त चोरीत, ते झाले. त्यामुळे अँजेला पार हादरून गेली,”

मी तोंड उघडले. पण एकही शब्द न बोलता, परत मिटले.

“खरेच, ते फार उदास करणारे होते.” ते  मूर्खासारखे बोलले, “मी तिच्याजवळ असल्यामुळे मला चांगले वाटले. अर्थात तेव्हा आमचे लग्न झालेले नव्हते. ती लग्नाच्या वेळी घरगुती ड्रेसमध्ये होती. तिने हातात शेंदरी रंगाची फुले धरली होती. मी तसा आग्रह धरला होता.” ते मोठ्या अभिमानाने म्हणाले.

“आणि चोर?” तरुणाने भीतीत आनंद घ्यावा तसे मी विचारले.

मिस्टर डी लॅसे म्हणाले, “ओहो, तो कधीच सापडला नाही.” वरून काहीसा आवाज आला. “अँजेला फार कंटाळून गेली असणार. ती एक नवलपूर्ण बाई आहे.” तो उठला. “माझ्या प्रिय मुला, मी दोन मिनिटात आलोच.”

मी म्हणालो, “मला गाडी गाठली पाहिजे. पण मी तुमचा आभारी आहे, मिस्टर डी लॅसे. मी या गोष्टी खासगीच ठेवेन.”

तो गंभीरपणे मान हलवून म्हणाला, “हो. हो. कदाचित मी काही बोललो नसतो. पण ठीक आहे. प्रिय मुला, आयरिमधील तुझ्या भेटींमुळे आता आम्ही तुला चांगले ओळखतो व तुझा आदर करतो. आणि ती ओळख या पुस्तकाबरोबर संपता कामा नये. मी मिसेस पो ला या संभाषणात ओढले नाही कारण, तिला त्या जुन्या दिवसांच्या आठवणी नको वाटतात. मिस्टर वेड्ज खरच --- “ त्यांचे शब्द संपले. ते म्हणाले, “मिस्टर वेड्ज भावनाप्रधान नव्हते.”

मला सर्व काही समजले असल्याची ग्वाही देऊन, मी बाहेर पडलो. पण घरच्या रस्त्यावर, माझ्या मनात काही विचार घोळत राहिले. अज्ञात शक्तीने, भावनाशील नसलेल्या मिस्टर वेड्जना चोरीच्या निमित्ताने दूर करणे योग्य समजले! अँजेला पो च्या बाबतीत असे घडले खरे! पण मुळात तिने त्याच्याशी लग्न केलेच का? तिच्या खऱ्या खासगी आयुष्याला तोंड देतांना, पुस्तके लिहितांना, ती त्याला पूर्णपणे विसरू शकली? पण असले प्रश्न कुणाला विचारणार?

तरीही शेवटी मी जास्त आत्मविश्वासाने, त्यांना विचारले. मी विचारले, कारण मला ती आवडू लागली होती --- ते दोघेही आवडू लागले होते. आणि तुम्हाला कुणी आवडू लागते, तेव्हा तुम्ही त्यांच्याशी जास्त प्रामाणिक राहिले पाहिजे --- तोच त्रास आहे.

जेव्हा पुस्तक प्रकाशित झाले, तेव्हा आम्ही तिघांनी आनंद साजरा करण्यासाठी काही बेत आखला. तिच्या हातात पहिली प्रत ठेवणारा मी नव्हतो. पण मी एक प्रत आणि जॅकेट आणले. त्या विशिष्ट शनिवारी मिस्टर डी लॅसेंनी, त्यांची न्यूयॉर्कला क्वचित होणारी सहल आयोजित केली

होती. खरे तर ती एकटी भेटल्याने, मी खूष झालो. कारण मिस्टर डी लॅसेंमुळे आमच्यात काही अंशी दरी पडल्याचे, मला जाणवत होते. मला गुपित माहिती असल्यामुळे, मी जागरुक होतो --- पण मला माहिती आहे, हे तिला माहिती आहे का, असे मला नवल वाटत होते. वर्षभर आयरिच्या भेटींमुळे मला किती सुरक्षित आणि शांत वाटले, ते मी तिला प्रामाणिकपणे सांगणार होतो. मी चांगली सुरवात करण्यासाठी, थांबलो होतो. पण सहजपणे आम्ही प्रकाशनाबद्दल बोलायला सुरवात केली. तिची शेरेबाजी गर्विष्ठ होती. पण ती ऐकून मला मजा वाटली --- ताप येऊन गेल्याने, ती अशक्त दिसत होती. आणि मग अचानक ती मला विचारू लागली, की मला तिचे पुस्तक कसे वाटले.

सहा महिन्यांपूर्वी मी फक्त कॉलिन्स आणि कंपनीच्या भल्यासाठी तिची थोडी --- स्तुती केली होती. पण आता मला ती आवडू लागली होती. शेवटी प्रत्येकाला स्वतःची अशी काही मते असतात. ही फार स्तुती नव्हती आणि तिलाही ते माहिती होते. दडपणाखाली त्याच त्याच पद्धतीने ती तिच्या लहानशा सुखद आवाजात, तोच मुद्दा मांडत

राहिली. त्यामुळे मला सूचना मिळायला हवी होती. पण ती मिळाली नाही. जर लेखक मंडळी सत्तालोलुप नसती, तर पुस्तके कशी लिहिली गेली असती? पण मी प्रकाशनाचा तो पहिला नियम विसरलो आणि त्यामुळे गोंधळात पडलो.

“आणि तरीही मिस्टर रॉबिन्स, मला वाटते की तुमचा माझ्यावर विश्वास नाही --- तुमचा खरोखर अँजेला पो वर विश्वास नाही. “ ती सभ्यपणे पण वेड्यासारखे बोलली. शेवटी तारुण्याच्या जोशात मी धीर केला.

मी अडखळत बोललो, “मिस पो, ते तसे नाही. जर तुम्ही एकदाच लहान गावाकडील गोष्टी लिहिल्यात तर --- आणि का नाही? ते  तुमच्या वाचकांना खूष करणारे ठरेल. पण तुमच्यासारखी अनुभवी लेखिका --- तुमच्या आयुष्यातील --- “

ती प्रतिष्ठीतपणे म्हणाली, “माझ्या आयुष्यातील? तरुण माणसा, तुला माझ्या आयुष्याबद्दल काय माहिती आहे?”

वाईटातून अधिक वाईटाकडे जात, मी म्हणालो, “ओहो, काहीच नाही, पण मिस्टर डी लॅसे म्हणाले, की तुम्ही

दोघेही लहान गावातून आला आहत --- आता लहान अमेरिकन गावातील खरी कादंबरी --- “

अँजेला पो चमकदारपणे म्हणाली, “म्हणजे एव्हेरार्ड सगळ्या गोष्टी सांगत सुटला आहे. तो अवखळ आहे. त्याला ओरडले पाहिजे.” पण चमकदारपणा चेहऱ्यावर नव्हे, तर फक्त आवाजातच होता. एकाएकी माझे असे मत झाले, की ती मला कंटाळवाणा मूर्ख तरूण समजत असून, मी तिथून निघून जाण्याची इच्छा करते आहे. मी मिस्टर डी लॅसे परतून येण्याची वाट बघू लागलो. पण घराच्या कुठल्याही कोपऱ्यातून मला त्यांचा मोठा आवाज ऐकू येईना.

मी म्हणालो, “कृपया, असे समजू नका. त्या खूपच आनंददायक गोष्टी होत्या. त्यानी --- त्यांनी मला सांगितले की तुम्ही प्रवासातील कपड्यात लग्न केले.”

अँजेला पो म्हणाली, “प्रिय एव्हेरार्ड, त्याला सगळे आठवते. करडे रेशमी वस्त्र, शुभ्र कॉलर! मी त्यात फार सुंदर दिसत होते. आणि मिस्टर रॉबिन्स, तुम्हाला असे वाटते, की मी त्याची गोष्ट केली असेल.?

मी म्हणालो, “आम्ही नेहमी अशी आशा करतो --- तुमच्या आठवणी --- अँजेला पो यांचे वाचक --- “

ती ठामपणे मान हलवत म्हणाली, “मी कधीच माझ्या आठवणी लिहिणार नाही. तुम्हाला माहिती आहे, लेखकांच्या आठवणी कधीच विकल्या जात नाहीत --- खरेच विकल्या जात नाहीत. प्रकाशकांना असे वाटते, की त्या विकल्या जातील. पण तसे होत नाही. आणि मग त्या उघड्या होतात. तरुण माणसा, मी कोण आहे, हे तुला माहिती आहे का? देशाच्या सगळ्या भागातून रोज मला पत्रे येतात, हे तुला माहिती आहे का? ते मला त्यांच्या आयुष्याचे त्यांनी काय करावे, हे विचारतात आणि मी त्यांना सांगते.” ती सरळ बसत बोलली. “मी त्यांना सांगते, त्याप्रमाणे ते बऱ्याच वेळा वागतात. मी अँजेला पो आहे --- त्याना माझे चित्र व माझी पुस्तके माहिती आहेत. त्यामुळे ते इतरांना लिहितात, तसेच मलाही लिहितात.” तिने क्षणभर तिची मान खाली घातली. “मिस्टर रॉबिन्स, त्यामुळे तुम्हाला जे टाकून देण्यासारखे वाटते, ते एका बाईसाठी इतके टाकाऊ नाही. मला माहिती

आहे, की मी लिहू शकते. पण माझ्या कामात अडथळे आणले गेले.” एकदम ती थांबली.

माझ्या गाडीची वेळ झाली नव्हती. त्यामुळे मी इतक्यात निघू शकत नव्हतो. पण मला जास्त जास्त बेचैन वाटू लागले. त्या गोड, गुणगुणल्यासारखा बोलत रहाणाऱ्या आवाजात, मला काही वेगळे वाटले --- धर्माइतक्या प्रामाणिक आवाजात मला थोडे अहंमन्यतेचे वेड आल्यासारखे वाटले. मला लेखकांची अहंमन्यता माहिती होती. पण हे काहीतरी वेगळेच होते.

तिने क्षणभर तिच्या ओठांवरून रुमाल फिरवला. ती म्हणाली, “अरे बापरे, माझ्या आजारपणापासून, मी अनेक गोष्टी विसरते आहे. आपण कशाबद्दल बोलत होतो? ओहो, तुम्ही मला एक कल्पना सुचवत होतात, की एका लहानशा अमेरिकन गावाच्या गोष्टी, मी लिहाव्यात.  मिस्टर रॉबिन्स, तुम्हाला त्या माहिती आहेत का?

तिने इतक्या अचानक व भीतीदायकपणे प्रश्न विचारला, की मी हो म्हणायच्या ऐवजी नाही म्हणालो. मग तिने निःश्वास सोडला.

ती थोड्या नेमकेपणे म्हणाली, “पण अर्थात, तुम्हाला त्या माहिती आहेत. तुम्हाला माहिती आहे, की एखाद्याच्या सांस्कृतिक संधी किती त्रासदायक असतात. आणि कदाचित कसा एखादा, त्यांच्या मागे लागून फसवला जातो. किंवा कदाचित तुम्हाला हे माहिती नसेल.”

अर्थात तो परिणामकारक प्रश्न होता. मी मिस्टर डी लॅसेच्या आगमनाची आशा करत, मान डोलावली.

ती गोडपणे म्हणाली, “तू काही बाईमाणूस नाहीस. त्या पुरुषांपेक्षा जास्त सहजासहजी दुखावल्या जातात. एव्हेरार्डने सुद्धा मला अनेक वेळा दुखावलेले आहे --- मुद्दाम होऊन असे नव्हे व मी त्याला लगेच क्षमा केलेली आहे.” ती राजेशाही हावभावाने बोलली. “पण तरी त्याने दुखावले.” ती जास्त करून स्वतःशीच बोलत होती. पण यामुळे माझी बेचैनी कमी झाली नाही.

ती म्हणाली, “मी मार्व्हीनला बाकी सगळे माफ केले असते. त्याचे पिणे, त्याच्या बेलगाम इच्छा, त्याचे रटाळ विनोद! माफ करणे व शरण जाणे, हे बाईचे ब्रीद असते. तो माझ्या घर राखण्याविषयी देखील, विनोद करत असे. त्याला

माझ्या कविता छापायला फक्त ऐंशी डॉलर्स इतकाच खर्च आला असता. माझ्या पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठी मी खूप गोड अशी डेझीची फुले निवडली होती. मला वाटले त्याला दर्जेदार गोष्टी आवडत असतील. शेवटी लहान गावात एखाद्याला, अगदी कमी संधी असतात. ते गवत आणि पशुखाद्याचे दुकान आर्थिक दृष्ट्या चांगले चालले होते. पण माझा गैरसमज झाला होता.” तिने सुस्कारा टाकला. मी आता मिस्टर डी लॅसेच्या आगमनाची खूपच वाट बघत होतो. माझ्या गाडीने इथे येऊन शिट्टी द्यावी व मला घेऊन जावे, अशी इच्छा मी करत होतो. पण दुर्दैवाने अशा गोष्टी घडत नाहीत.

बारीक गुणगुणल्यासारख्या आवाजात ती बोलत राहिली, “मी काडीमोडाचा विचारही केला नव्हता. कधीच नाही. एकदा दोनदा तो विचार माझ्या मनाला स्पर्शून गेला, पण मी निग्रहाने तो बाजूला सारला. आणि त्याचा मला आनंद होता. मला नाही वाटत, की तो खरोखर माझी काळजी करत असे.” तिचे फुलासारखे डोळे पूर्ण उघडत, ती म्हणाली. “पण त्याने कदाचित एव्हेरार्डला वाईट रीत्या दुखावले असेल

--- तो फार दणकट मनुष्य होता. कधी कधी आमच्या लग्नाच्या सुरवातीच्या दिवसात, तो मला एका हातात उचलून खोलीत फिरवत असे. मला भीती वाटे. पण मी नेहमी शरण जाऊन, त्याला माफ करत असे. दुकानात नेहमी इतकी धूळ असे. त्यामुळे मला शिंका येत आणि मग तो हसत असे. जेव्हा एव्हेरार्ड मला शेक्सपिअर वाचून दाखवत असे, तेव्हाही तो हसे. मी छोट्या कुऱ्हाडीचा दांडा साफ करतांना त्या संध्याकाळी शिंकले, पण कुणी ते ऐकले नाही."

किरट्या आवाजात मी विचारले, "काय करतांना?"

ती विचारपूर्वक उत्तरली, "मला वाटते त्याची जरुरी नव्हती. आताही त्या कुऱ्हाडीवर बोटांचे ठसे असतील. पण ते अगदी मूर्ख लोक होते. आणि तेव्हा आम्हाला बोटांच्या ठशांबद्दल खूप कमी माहिती होती. पण मी कुऱ्हाडीचा दांडा खूपच नीटनेटका व स्वच्छ करून, ती जमिनीवर पडू दिली व त्यामुळे जमीन खराब झाली. ते दुकान कधी धूत नसत. तो माझ्याकडे पाठ करून माझ्या कविता वाचतांना, हसत बसला होता. मी माझ्या नवीन कविता लपवून ठेवल्या होत्या. पण त्याने त्या शोधून काढल्या. धसमुसळेपणे खण उघडा टाकला.

कुऱ्हाड जुनी होती --- ते गठ्ठ्याची दोरी त्याने कापत असत. तुम्हाला माहिती आहे का, तो काही बोलला नाही. तो अजून हसत होता व लोटपोट होऊन खुर्चीतून बाहेर पडत होता. मला त्याचा राग आला. तो चपळ नव्हता. मी मनाशी काही ठरवले आणि कार्यभाग उरकला. कुणीही मला ड्रेसबद्दल काही विचारले नाही. लिंबू व मिठाने रक्ताचे डाग लगेच गेले असते. जरी तो चांगला ड्रेस होता, तरी मी तसा प्रयत्न केला नाही."

मी मूर्खासारखे विचारले, "पण तुम्ही कधी --- त्यांनी कधी --- "

ती शांतपणे म्हणाली, "का मिस्टर रॉबिन्स, अर्थात तुम्हाला लहान गावातील टिंगल टवाळीची व कुचाळक्यांची माहिती नाही. पण जेव्हा ते दुकानातील चोरीबद्दल सांगायला आले, तेव्हा मी अंथरुणात होते --- फार थंडी पडली होती --- माझा तो वाईट दिवस होता. सगळ्यांना माहिती होते, की तो दुकानात तासनतास पीत व नास्तिकवादावरील कर्नल इंगरसोलची बेकार भीतीदायक पुस्तके वाचत बसलेला असतो. जुने जाणते लोक म्हणाले, तो घरी जायला घाबरतो. म्हणून असे करत बसतो. मला घाबरतो!" ती पूर्ण निरागसतेने

बोलली. “लोक काय बोलतील, त्याला काही मर्यादा नाही. एवढेच काय, ते एव्हेरार्डविषयी देखील बोलत होते. जरी त्यांना माहिती होते, की तो त्याच्या वडिलांबरोबर भाज्यांची गाडी बाजारात चालवत नेत असतो. मी दुकानात जाण्यापूर्वी असा विचार करत होते.”

मी म्हणालो, “आणि तरीही तुम्ही गोशेन मध्ये राहिलात --- तुम्ही नंतर एक वर्षभर मिस्टर डी लॅसेशी लग्न केले नाही --- “

तिने दुरुस्ती करत म्हटले, “एक वर्ष एक दिवस, हे जास्त बरोबर आहे. पण सहा महिन्यांनी मी अर्धवट शोकमग्न होते. हे जरा लवकर झाले, की मी एव्हेरार्डबरोबर लग्न ठरवले.” तिच्या गालावर लाली चढली. “मी त्याला म्हटले, मी दुःखात असेपर्यंत काही चर्चा करू शकत नाही. त्याने ते मान्य केले --- एव्हेरार्ड नेहमीच खूप समजून घेणारा होता. पहिल्यांदा मला वाटले, माझ्या बाजूने फार वेळ जातो आहे. पण खरे पाहता, तो भरभर गेला. तेव्हा मी माझी पहिली कादंबरी लिहित होते.” ती शांत आवाजात बोलली.

मी घरातून कसा बाहेर निघालो, ते मला समजले नाही --- ते सुद्धा सभ्यपणे, अशी मी आशा करतो. मी आयरि मागे टाकले. मी भानावर येण्यापूर्वी दोन मैल तुडवत स्टेशनजवळ आलो होतो. ते तिचे शेवटचे शब्द होते --- आणि त्यांनी माझ्यासमोर एक चित्र रेखाटले --- त्यामुळे माझ्या कण्यातून खरीखुरी थंड लहर दौडत गेली. मी रानटीपणे आश्चर्यात पडलो, की किती यशस्वी लेखक/लेखिका खुनी असतील आणि त्यांना पोलीस पकडत का नाहीत. मला अगदी सगळी गोष्ट, त्यातील बारीकसारीक तपशीलासह माहिती होती. अँजेला पो ची योग्य वागणूक लक्षात घेतल्यावरही, ते मरणांतिक शक्य वाटत होते. माझी अशीही खात्री पटत चालली, की दुर्दैवी मिस्टर वेड्जनी छपाईचे ऐंशी डॉलर्स दिले असते, तर ते जिवंत राहिले असते. कारण स्वतःत मग्न रहाणे, हे तुम्ही केलेत, तरी फसवण्यासाठी ते सुरक्षित नाही. ते तुम्ही केलेत, म्हणजे रानटी प्रेरणांचा स्फोट करण्याचा मोह तुम्हाला पडतो आहे. मग मी जेव्हा जवळजवळ स्टेशनवर पोचलो, तेव्हा मी एकाएकी हसू लागलो. मी बरा होऊन विचारी पद्धतीने वागू लागल्याचे, ते हसू होते. कारण सर्व गोष्ट फार फसवी व विचित्र होती. अँजेला पो ने बिनचूक पद्धतीने सूड

घेतला होता. मला तिच्या लिखाणाबद्दल काय वाटते, ते मी सांगितले --- आणि वर्णन करण्यास कठीण, अशा ठामपणे गुणगुणल्यासारखा आवाजात तिने मला वाट्टेल तसा गोंधळ पचवायला लावला. असे करतांना तिने गरज नसलेल्या हरकती टाळून, तिची गोष्ट सांगण्याची शक्ती सिद्ध केली. पण एकदा तिच्या एकसुरी आवाजाच्या मोहिनीतून बाहेर पडल्यावर, तिला खुनी समजण्याचा विचार करणे, अशक्य होते. आणि एव्हेरार्ड डी लॅसेला तसे समजणे, त्याहूनही अशक्य होते. तरी कदाचित, तो खुनी असला पाहिजे.

--- पण तेदेखील अशक्य वाटत होते --- खरे काय कुणास ठाऊक! किंवा तिने एवढी वर्षे सत्य त्याच्यापासून दडवून ठेवले असेल.

क्षणभर मी आयरिकडे पाठ फिरवायचा विचारही केला आणि नम्रपणे त्या घराच्या मालकिणीजवळ माझा मूर्खपणा व पराभव कबूल केला. शेवटी पंधरा मिनिटात माझी गाडी होती. आणि न्यूयॉर्कला मला रात्रीच्या जेवणाचे आमंत्रण होते. त्यापेक्षा मी तिला पत्र लिहिले असते. तिला पत्र आवडले असते. मी स्टेशनच्या फलाटावर फेऱ्या मारत

होतो. माझी छाप पडेल असे वाक्प्रचार इत्यादी कसे वापरावेत, याचा विचार करत होतो.

न्यूयॉर्कहून दुपारी उशीरा सुटणारी गाडी, इथे सहा मिनिटे लवकर आली आणि त्यातून आकर्षकपणे उंच व डौलदार एव्हेरार्ड डी लॅसे उतरला. त्याने माझ्याबरोबर हस्तांदोलन केले आणि घरी माझी भेट न झाल्याबद्दल, खंत व्यक्त केली. “मी पहाटेपासून बाहेर होतो. तू मिस पो ला एकटे कसे काय सोडलेस?”

गुप्तपणे हास्याची चकाकी दाखवत, मी म्हणालो, “तिला काही समस्या नव्हती --- मला तर ती नेहमीपेक्षा जास्त खुशाल वाटली. आम्ही खूप वेळ बोललो. ती तुम्हाला सांगेल.”

त्याचे डोळे न आलेल्या गाडीचा डबा शोधत असतांना तो बोलला, “छान. छान. माझ्या प्रिय माणसा, तू माझी काळजी दूर केलीस. आज गाडीला उशीर झाला. ती आजारी असतांना, आपण गप्पा मारल्या, त्याबद्दल तू काही बोलला नाहीस, ना?”

मी मोठ्या गंभीरपणे म्हणालो, बोललो? नाही. हो. खरच की!

तो चौकसपणे सुटका झाल्यासारखा वाटला. तो म्हणाला, “मी फार ऋणी आहे. म्हणजे असे तुला पण वाटते आहे, की मी तिला खरोखर मदत करत होतो? म्हणजे तिच्या पुस्तकांसाठी --- तिच्या लिखाणासाठी?”

त्याबद्दल मी खरे तर संभ्रमात होतो. पण तरी मी म्हणालो, “हो. खरच!”

तो ओरडला, “फार छान! जुन्या नटाच्या रुबाबात, त्याने मला खांद्याला धरून बाजूला नेले व म्हणाला, “असे बघ, मला माहिती आहे, तो माझा मूर्खपणा होता --- अर्थात, आता आम्ही म्हातारे झालो आहोत. पण एकसारखे असे वाटत असते, की मी कायम तिच्या गरजेचा नसलो पाहिजे. त्यामुळे मी चिंतेत पडतो.”

तो असे बोलल्याक्षणी, मला त्याच्या डोळ्यात भीती दिसली. ती त्याचे चारित्र्य मान देण्यासारखे नसल्याची भीती नव्हती. पण तो खूप जगल्यामुळे त्याला असे वाटत असावे.

मी त्यानंतर आयरिमध्ये गेलो नाही. मी नंतर थ्रशवूड कॉलिन्स आणि कंपनीकडेही गेलो नाही. कॉलिन्सकडे जायचे म्हणजे, आयरिमध्येही जावे लागले असते. नाहीतर मग, स्पष्टीकरण तरी द्यावे लागले असते. ते तर मला द्यायचे नव्हते. त्यामुळे मी माझे रहायचे ठिकाण बदलले व ॲल्युमिनियमची भांडी विकायचे काम करू लागलो. त्यानंतर सहा महिन्यांनी, मी सेन्ट्रल सिटीला जाऊन माझ्या वडीलांच्या सिमेंटच्या व्यवसायात काम करू लागलो. वडील त्याचीच वाट बघत होते. मी अशा निर्णयाला आलो, की न्यूयॉर्कमध्ये रहाणे, माझ्या आयुष्यासाठी मला जमणारे नव्हते. माझ्याकडे अँजेला पो सारखा आत्मविश्वास नव्हता.

सहा महिन्यात एकदा मला वाटते, मी मिस्टर डी लॅसेंना रस्त्यात पाहिले. पण त्यानी मला पाहिले नाही. मी त्यांना टाळले. मी अँजेला पो च्या शेवटच्या कादंबरीची जाहिरात पाहिली. मी सेन्ट्रल सिटीला जाऊन तीन महिने झाल्यावर ती वारली. मी असे वाचले, की तिला तिच्या नवऱ्याने, मिस्टर डी लॅसेंनी, तिची शुश्रुषा करून बराच काळ जगवले. तेव्हा मला माझ्या छातीवरचे ओझे उतरल्यासारखे

वाटले. त्यानंतर तोही फक्त काही महिने जगला. मला वाटते, काही बंध अतूट असतात. त्याला तिची उणीव खूप जाणवायची. मला त्याला एक प्रश्न विचारायला आवडला असता --- एकच --- आणि आता मला त्याचे उत्तर कधीच मिळणार नाही. त्याने नक्कीच शेक्सपिअरच्या भूमिका केल्या होत्या --- आणि त्यांनी गोशान सोडल्यावर असा एक काळ होता, की त्याने ऑथेल्लो व हॅम्लेटही साकारला होता. पण अजून एक भूमिका होती --- आणि मला आश्चर्य वाटते, की ती त्याने कधी केली तरी का, आणि केली असल्यास कशी केली. मला काय म्हणायचे आहे, ते तुमच्या लक्षात आले असेल.

Story Of The Physician And The Saratoga Trunk

By Robbrt Louis Stevenson

Scotland

# डॉक्टर आणि साराटोगा पेटीची गोष्ट



मिस्टर सिलास स्युडामोर, हे साध्या सरळ स्वभावाचे तरुण अमेरिकन मनुष्य होते. त्या गुणांसाठी प्रसिद्ध नसलेल्या न्यू इंग्लंड भागातून ते आलेले असल्याने, हे विशेष होते. जरी ते खूप श्रीमंत असले, तरी ते त्यांच्या खिशातील डायरीत, पै अन् पै चा हिशेब ठेवत. पॅरीसच्या लॅटीन भागातील दर्जेदार

हॉटेलातील सातव्या मजल्यावर राहून, ते पॅरीसमधील पहाण्यासारखी ठिकाणे बघण्याचा बेत करत होते. त्यांच्या मित्रांमध्ये विख्यात असलेल्या त्यांच्या, नम्रता किंवा बुजरेपणा आणि अंगभूत कंजूषपणा अशा गुणांवर आधारित, असा बेत ते करत होते.

त्यांच्या शेजारील खोलीत एक आकर्षक, नखरेल बाई रहात होती. ती त्यांना एखाद्या उमरावाची बायको वाटली. नंतर त्यांना तिचे नाव मॅडम झेफायरीन असल्याचे समजले आणि ती काही उमरावाची बायको वगैरे नव्हती. ती बहुधा या अमेरिकन तरुणाला भुलवण्याच्या नादात, कधी दोघे जिन्यावर भेटल्यास, तिच्या काळ्याभोर डोळ्यांनी कटाक्ष टाकत, काही शहरी रहाणीला साजेसे शब्द उच्चारून तिच्या रेशमी वस्त्रांची सळसळ करत, तिची कोपरे व घोटे दाखवत, अदृष्य होत असे. पण ही तिची कृत्ये, मिस्टर सिलास स्युडामोर यांना उत्तेजना न देता मनातून खजील व्हायला व अधिकाधिक लाजायला लावत. ती त्याच्याकडे अनेक वेळा येई. कधी दिव्यासाठी, (तेव्हा विजेचे दिवे नव्हते.) तर कधी कल्पनेतील नखरेल गोष्टींचा मारा

केल्याबद्दल, माफी मागायला! पण तिच्या प्रभावाने, त्यांच्या तोंडून शब्द फुटत नसे. त्यांचे फ्रेंचचे ज्ञान लुप्त होई व ती जाईपर्यंत, ते तिच्याकडे नुसतेच बघत रहात. जेव्हा ते त्याना आलेल्या मेल्स बघत एकटे असत, तेव्हा ते त्यांच्या चुटपुटत्या भेटींबद्दल वाईटसाईट विचार करण्यापासून, स्वतःला परावृत्त करू शकत नसत. हॉटेलच्या एका मजल्यावर तीन खोल्या होत्या. या दोन खोल्या सोडून तिसरी खोली, एका वयस्क व  फार प्रसिद्ध नसलेल्या इंग्लिश डॉक्टरची होती. त्या डॉक्टर नोएलला त्याची मोठी यशस्वी प्रॅक्टीस चाललेले लंडन, सोडावे लागले होते. असे कळण्यात आले होते, की पोलिसांमुळे त्याला हा बदल घडवून आणावा लागला. आधीच्या आयुष्यात चांगले नाव कमावलेला हा माणूस, आता पॅरीसच्या लॅटीन भागात खूप साधेपणे व एकांतवासात रहात होता. त्याचा बराचसा वेळ तो अभ्यासात घालवत असे. मिस्टर स्युडामोर यांनी, त्यांच्याशी ओळख करून घेतली. बरेच वेळा दोघे त्या रस्त्यापलीकडे असलेल्या साध्याशा ठिकाणी, एकत्र जेवायला जात.

मिस्टर सिलास स्युडामोर यांच्याकडे अजून काही मोठे मानाचे, असे लहानसे दुर्गुण होते. ते संशयास्पद पद्धतीने त्याचे प्रदर्शन करायला मागेपुढे बघत नसत. त्यातील मुख्य कुतूहल, हा होता. ते जन्मतः गप्पिष्ट व वावड्या उठवणारे होते. विशेषतः ज्यात त्यांना काही गती नाही, अशा विषयात तर त्याना अती रुची होती. तरुण स्त्रियांच्या बाबतीत त्यांना, अनेक नको ते प्रश्न पडत. ते ठामपणे काहीबाही चौकशा करत रहात. त्यांना त्यांच्या व मॅडम झेफायरीन यांच्या खोलीमध्ये एक छिद्र असल्याचे आढळले. तेव्हा ते बुजवून टाकण्याऐवजी त्यांनी अजून मोठे केले व तिच्यावर हेरगिरी करू लागले. ते एका पत्राचे वजन करून पोस्टात टाकायला निघाले असतांना व पत्ता परतपरत तपासून बघतांना, त्याना कुणी पहात होते.

मार्चच्या शेवटाकडील एका दिवशी, त्याची उत्सुकता वाढून, त्यांनी ते भोक अजून मोठे केले. त्यामुळे त्याना खोलीच्या कोपऱ्यातील काहीही दिसू शकले असते. त्यादिवशी ते नेहमीप्रमाणे मॅडम झेफायरीनच्या हालचालींवर लक्ष ठेऊन होते. तेव्हा त्याना दुसऱ्या बाजूने भोक मोठे केले

गेल्याचे बघून नवल वाटले. जेव्हा अचानक अडथळा दूर केला जाऊन, त्यांच्या कानावर दबलेले हसू पडले, तेव्हा त्यांना अजूनच नवल वाटले. त्यांच्या हेरगिरीचे गुपित तेथील प्लास्टर पडून, उघडे पडले होते व त्यांची शेजारीण त्यांना प्रत्युत्तर देत होती. मिस्टर स्युडामोर फार चिडले. त्यांनी मॅडम झेफायरीनजवळ निर्दयपणे नाराजी व्यक्त केली. त्यांनी स्वतःलाही दोष दिला. पण दुसऱ्या दिवशी त्याना असे दिसले, की तिने त्यांचे आवडते वेळ घालवण्याचे साधन बंद करायचे काही प्रयत्न केले नाहीत. तेव्हा तिचा निष्काळजीपणा बघून, त्यांनी त्यांचे आनंददायक काम चालू ठेवले.

दुसऱ्या दिवशी, मॅडम झेफायरीनने एका उंच, ओबडधोबड पन्नाशीच्या माणसाला, बराच वेळ खोलीत घेतलेले दिसले. सिलासने त्याला, आधी कधी पाहिले नव्हते. त्याचा ट्वीड सूट, रंगीत शर्ट व लांब जाड कल्ले, तो ब्रिटीश असल्याचे सांगत होते. त्याचे मंद करडे डोळे बघून सिलासला थंडीची भावना झाली. त्यांच्याकडे ते कुजबुजताना बघत असताना, सिलासने त्याचे तोंड गप्प ठेवले होते. त्या नवीन

इंग्लंडवासी तरुणाचे हावभाव एकापेक्षा जास्त वेळा, ती त्याचीच खोली असल्यासारखे होते. नीट लक्ष देऊन ऐकल्यावर, त्याचे उच्च आवाजातील बोलणे म्हणजे काही विरोध करणारे उत्तर वाटले.

"मी त्याच्या आवडीचा, अगदी नीटपणे अभ्यास केला आहे. मी तुला परतपरत सांगतो आहे, की माझ्या पद्धतीत बसणारी तू एकमेव बाई आहेस."

याला उत्तर म्हणून मॅडम झेफायरीनने एक सुस्कारा टाकला व तिला काही अधिकार नसल्याच्या थाटात, त्यातून बाहेर पडण्याचे हावभाव केले.

त्या दुपारी ते निरीक्षण करायचे भोक एक कपड्यांचे कपाट ठेऊन त्या बाजूने बुजवले गेले. सिलास त्याच्या दुर्दैवावर शोक प्रकट करत होता. कुण्या बाईच्या हस्ताक्षरातील एक पत्र हॉटेलच्या नोकराने त्याला आणून दिले. ही त्या ब्रिटीशाची पापी सूचना असल्याचे सिलासला वाटत होते. वेड्यावाकड्या फ्रेंचमध्ये लिहिलेले, त्यावर सही नसलेले ते पत्र, सिलासला रात्री अकरा वाजता असलेल्या नाचाच्या प्रसंगी बुलीयर बॉल, येथे उपस्थित रहाण्याबद्दल

आवाहन करत होते. सिलासच्या मनात उत्सुकता आणि भित्रेपणा यांच्यात युद्ध चालू होते. कधी तो भित्रट बने तर कधी धडाडी दाखवे. याची परिणती शेवटी मिस्टर सिलास स्युडामोर यांनी बऱ्यापैकी ड्रेस घालून, दहा वाजता नाचाच्या बुलीयर बॉलमध्ये उपस्थित रहाण्यात झाली. त्यांनी प्रवेशाचे पैसे भरून, त्यांचे मोहकपणा असलेले बेदरकार कुतूहलपूर्ण वर्तन दाखवले.

ती उत्सवाची वेळ होती. तिथे गर्दी व गडबड होती. आपल्या तरुण साहसी वीराला, प्रथम लाजेने गिळून टाकले होते. पण नंतर त्याला नशा चढून, त्याने पुरुषार्थ दाखवायला सुरवात केली. त्याच्यात राक्षस संचारला व तो त्या हॉलमध्ये, जोशात येऊन नाचू लागला. असे करतांना त्याला खांबामागे, मॅडम झेफायरीन व तिचा ब्रिटीश मित्र दिसले. त्याच्यातील उत्सुकतेने कळस गाठला. तो मागून त्या जोडीच्या जवळ जवळ जात इतका सरकला, की आता त्याला त्या दोघांचे संभाषण ऐकू आले असते.

तो ब्रिटीश माणूस म्हणत होता, “तोच तो माणूस आहे. तिथे --- लांब सोनेरी केस असलेला --- हिरव्या ड्रेसमधील मुलीशी बोलणारा.”

त्या वर्णनाशी मिळता जुळता मध्यम चणीचा एक खूप देखणा तरुण, सिलासने शोधून काढला.

मॅडम झेफायरीन म्हणाली, “ठीक आहे. माझ्याकडून मी आटोकाट प्रयत्न करते. पण लक्षात ठेव, असे करतांना, कदाचित आपली डाळ शिजणार नाही.”

तिचा मित्र उत्तरला, “छट्! मी योग्य परिणामाची अपेक्षा करतो. तुला मी तीसजणींमधून निवडले नाही का? जा. पण राजपुत्रापासून सावध रहा. मला समजत नाही, की कुठल्या शापित अपघाताने, तो इथे आला आहे. त्याच्या योग्यतेची पॅरीसमधील डझनावारी नृत्यालये सोडून, अशा विद्यार्थ्यांसाठी असलेल्या ठिकाणी, तो कसा काय आला आहे! सुट्टीवर आलेल्या राजपुत्रापेक्षा, तो राज्य करणाऱ्या सम्राटासारखा कसा बसला आहे, ते बघ.”

सिलास पुन्हा नशीबवान ठरला. त्याला एक दणकट, आश्चर्यकारक रीत्या देखणा, रुबाबदार व मान देण्याजोगा

बोलका माणूस, टेबलाशी दुसऱ्या एका देखण्या तरुणाबरोबर बसून, नम्रपणे कुजबुजतांना दिसला. त्या राजपुत्राचे नाव सिलासच्या लोकशाही मनावर मोठ्या रुबाबात आदळले. ते नाव ज्याच्याशी जोडले गेले होते, ते आठवून, त्याच्या मनावर नेहमीची मोहिनी पसरली. त्याने मॅडम झेफायरीन व तिचा मित्र याना सोडून, राजपुत्र व त्याच्याशी कुजबुजणारा देखणा माणूस, यांच्याकडे मोर्चा वळवला.

एकजण दुसऱ्याला म्हणत होता, “जेराल्डीन, मी तुला सांगतो, काही करणे हा मूर्खपणा आहे. तू ( हे आठवल्यामुळे, मी खूष आहे. ) तुझ्या भावाला या धोकादायक कामासाठी निवडलेस आणि त्याच्या वर्तनावर लक्ष ठेवण्याचे तुझे कर्तव्य तू पार पाडतो आहेस, हे चांगले आहे. तो पॅरीसमध्ये काही करण्यासाठी एवढे दिवस, खूप उशीरापर्यंत थांबलेला आहे. त्याला ज्याचा काटा काढायचा आहे त्याचे चारित्र्य लक्षात घेता, ही जरा घाई होते आहे. अजून त्याची जाण्याची वेळ लांब आहे. दोन तीन दिवसात, त्याची फसवी सुनावणी आहे. तेव्हा मी तुला विचारतो, की त्याची वेळ घालवायची ही जागा योग्य आहे का? त्याने सराव केला पाहिजे. त्याने भरपूर झोप

काढून थोडाफार व्यायाम केला पाहिजे. त्याने मद्य न घेता, खाण्यापिण्याचे कडक पथ्य पाळायला हवे. त्या मूर्खाला असे वाटते आहे का, की आपण काही विनोदी नाटक करत आहोत? जेराल्डीन, ही गोष्ट खूप गंभीर आहे.''

कर्नल जेराल्डीन म्हणाले, ''मला तो मुलगा माहिती आहे. तो काही नको ते करणार नाही. त्याला सूचना द्यायची काही गरज नाही. तुम्हाला वाटते त्यापेक्षा, तो जास्त काळजी घेणारा आहे. त्याचा उत्साह वादातीत आहे. त्याला ज्याचे काम तमाम करायचे आहे ती महिला असती, तर मी इतके काही बोललो नसतो. कारण महिलांच्या बाबतीत, तो जरा असातसा आहे. पण मी क्षणभर सुद्धा चिंता न करता, ( आत्महत्या क्लबच्या )

अध्यक्षांच्यासाठीच्या दोन अंगरक्षकांच्या बाबतीत, त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेऊ शकतो.''

राजपुत्राने उत्तर दिले, ''तुम्ही असे म्ह्टल्याबद्दल, मी तुमचा आभारी आहे. पण माझे मन शांत नाही. हे अंगरक्षक नोकर आपले प्रशिक्षित हेर आहेत आणि तरीही आतापर्यंत तीन वेळा, अनेक तास खर्च करूनही, खासगी धोकादायक

प्रकरणात ते अयशस्वी ठरले आहेत, नाही का? आतापर्यंत एखाद्या नवख्या माणसाचा तथाकथित अपघात झाला असता. पण रुडोल्फ आणि जेरोम यांना त्या अध्यक्षाने काही मागमूसही लागू दिला नाही. ज्याच्याकडे वैशिष्ट्यपूर्ण साधनसामग्री आहे व सुस्पष्ट कारण आहे, अशा कोणाकडून तरी हे मुद्दाम काही उद्देशाने केले गेले आहे."

आवाजातील शरणागतीच्या छटेने, जेराल्डीन म्हणाला, "आता हा माझ्या आणि माझ्या भावातला प्रश्न राहिला आहे."

राजपुत्र फ्लोरीझेल बोलला, "बहुधा तुम्ही सगळयांनी माझा सल्ला ऐकावा, यासाठीच, मी त्याला परवानगी देतो. आता पुरे. ती पिवळ्या ड्रेसमधील मुलगी छान नाचते आहे."

पॅरीसमधील त्या उत्सवातील सर्वसामान्य गप्पा सुरु झाल्या.

सिलास कुठे होता, ते त्याने आठवले. हातात वेळ थोडा होता. त्याला मिळालेल्या चिठ्ठीनुसार, तो गुप्त भेटीच्या ठिकाणी असायला हवा होता. तो जितका विचार करू लागला, तितका त्याला भविष्यकाळ आवडेनासा झाला. त्या

नाचाच्या गर्दीतील गोलगोल हालचाल, त्याला दाराकडे ओढू लागली. विरोध न होता, सिलास खेचला जाऊन गॅलरीखालील कोपऱ्यात गेला. तिथे त्याच्या कानावर मॅडम झेफायरीनचे शब्द पडले. अर्ध्या तासापूर्वी, त्या पाहुण्या ब्रिटीश माणसाने तिला दाखवून दिलेल्या सोनेरी केसांच्या तरुणाशी ती बोलत होती.

ती म्हणाली, “इथे माझे चारित्र्य पणाला लागले आहे आणि माझे हृदय मला, कुठलीही अट न घालण्याचे सुचवते आहे. पण तरीही तू हमालाला फक्त एवढेच सांग, की तुला कर्जाची वसुली करायची आहे. तो तुला एकही शब्द न बोलता जाऊ देईल.”

सोनेरी केसांच्या तरुणाने हरकत घेतली, “पण ही कर्जाची भाषा कशासाठी?”

ती बोलली, “अरे देवा, तुला असे वाटते का, की मला मी स्वतः रहात असलेल्या हॉटेलची माहिती नाही?”

आणि तिच्या मित्राच्या दंडाला प्रेमाने चिकटून, ती तिथून निघून गेली.

याने सिलासच्या मनात, त्याच्या हॉटेलातील खोलीचे विचार आले.

त्याने विचार केला, "चिठ्ठीत लिहिलेले खरे असेल, तर अजून दहा मिनिटात, बहुधा मी याहून सुंदर ड्रेस घातलेल्या, उमराव घराण्यातील सुंदर प्रतिष्ठीत बाईबरोबर चालत असेन."

मग त्याला चिठ्ठीतील चुकीचे स्पेलिंग आठवून, त्याने मान खाली घातली.

त्याने कल्पना केली, की ते कदाचित तिच्या नोकराणीने लिहिले असेल. घड्याळात तास उलटायला फक्त काही मिनिटे उरली होती. या लगेच होणाऱ्या संभाव्य जवळीकेमुळे, त्याचे हृदय फार वेगाने धडधडू लागले. त्याला जावे लागेलच असे नसल्याने, त्याने निःश्वास सोडला. काही गुण आणि बुजरेपणा दोन्ही एकत्र होते. यावेळेस त्याच्या मर्जीने, लोकांच्या उलट्या गर्दीतून वाट काढत, तो पुन्हा दाराशी गेला. खूप वेळ चाललेल्या या झगड्याने, तो दमला. काही मिनिटे तसेच रेटत रहायचे व वेगळ्या उद्देशाने प्रतिसाद मिळवायचा, असे त्याने ठरवले. खात्रीने, निदान तिसऱ्यांदा

त्याने वाट काढली व मग जिथे भेटायचे ठरले होते, तेथून काही यार्डावर त्याला लपून बसायला योग्य अशी जागा मिळाली.

इथे त्याच्या आत्म्याला भयंकर क्लेश झाले. तेव्हा त्याने खूप वेळा, मदतीसाठी देवाची प्रार्थना केली. सिलास बिचारा मनापासून भोळा होता. त्याला आता तिला (कोण?) भेटायची जराही इच्छा नव्हती. त्याने निदान वेगळा विचार केला असता, तर वेगळीच मूर्खासारखी भीती त्याला पळून जाण्यापासून रोखत होती. पण ती इतकी शक्तिमान होती की इतर सर्व इच्छा, त्यापुढे फिक्या पडत होत्या. ती त्याला पाऊल पुढे टाकून देत नव्हती. पळण्यापासून परावृत्त करत होती. शेवटी अशी तासाच्यावर दहा मिनिटे गेली. तरुण स्युडामोरची इच्छाशक्ती वाढत चालली. त्याने कोपऱ्यातून आजूबाजूला पाहिले पण कोणी दिसले नाही. निःसंशय त्याची अनोळखी साथीदार, दमून निघून गेली असावी. सिलास आधी जितका भित्रा होता, तितकाच तो आता धीट बनला. त्याला वाटले, की उशीरा का होईना, पण तो ठरल्या जागी आता आलाच आहे, तर त्याच्या भित्रेपणावरील कलंक तरी

पुसला जावा. आता त्याला हसऱ्या फसवणुकीचा, संशय येऊ लागला. त्याने स्वतःला शाबासकी दिली, कारण अचूक अंदाज करून त्याने, त्याला गोंधळात पाडणाऱ्यांवर, कुरघोडी केली होती. तरुणाचे मन किती आळशी असते!

मनाशी असा विचार करत, तो कोपऱ्यातून पुढे आला. पण तो थोडी पाऊले टाकतो तोच, त्याच्या हातावर एक हात पडला. तो वळला व खानदानी चेहरा असलेल्या दणकट बाईला त्याने जवळ घेतले. तिच्या नजरेत काही कडक विरोधी भाव आले नाहीत.

ती म्हणाली, “मला वाटते, तू बायकांना भुलवणारा व फारच आत्मविश्वास असलेला आहेस. मला तू येणार असल्याचा, अंदाज दिलास. पण मी तुला भेटायचे ठरवलेच होते. जेव्हा बाई स्वतःला विसरून पुढाकार घेते, तेव्हा तिने तिचा सर्व अभिमान मागे टाकलेला असतो.”

ज्या आकर्षकतेने अचानक ती त्याला भेटायला आली, ते बघून सिलासला फार आनंद झाला. तिने त्याला थोड्याच वेळात स्वस्थ केले. ती अपेक्षेपेक्षा जास्त दयाळू व सहनशील होती. तिने त्याला सुखावले आणि मग टाळ्या

पिटत राहिली. थोड्याच वेळात, उदारपणे दिलेल्या उबदार ब्रँडीने त्याच्यावर मोहिनी टाकून, त्याला मोठ्या भावनामयतेने त्याचे प्रेम व्यक्त करायला लावले.

ती बोलली, “अरेरे! तू तुझ्या शब्दांनी मला इतका आनंद दिला आहेस, की या क्षणाबद्दलचा निषेध मी व्यक्त करावा की नाही, हे मला कळत नाही. इतके दिवस मी एकटीने सगळे सहन केले. गरीब माणसा, आता आपण दोघे असू. आता माझ्यावर माझी मालकी नाही. माझा हेवा करणारे लोक, माझ्यावर नजर ठेऊन असतात. त्यामुळे तू माझ्या घरी ये, असे म्हणण्याचे धाडस मी करू शकत नाही. बघू या. मी तुझ्याहून मोठी असले, तरी तुझ्यापेक्षा अशक्त आहे. मी तुझ्या धैर्यावर आणि निग्रहावर विश्वास ठेवते. एकमेकांच्या भल्यासाठी, मला माझे जगाबद्दलचे ज्ञान वापरले पाहिजे. तू कुठे रहातोस?”

त्याने तो एका उत्तम हॉटेलात रहात असल्याचे सांगितले व त्याचा पत्ता व नंबर दिला.

ती थोडा वेळ मनाचा हिय्या करून, काही विचार करत राहिली.

शेवटी ती म्हणाली, "मला वाटते, तू विश्वासू व माझे ऐकणारा असशील. असशील ना?"

सिलासने उत्सुकतेने, तसे वचन दिले.

ती पुष्टी देणारे हसू हसत, बोलत राहिली, "मग, उद्या रात्री. तू संध्याकाळभर घरी रहा. कोणी मित्र तुला भेटायला आले तर कुठलेही कारण सांगून, त्यांना कटव. बहुधा तुझे दार दहाला बंद होत असेल ना?" तिने विचारले.

सिलास उत्तरला, "अकराला."

ती म्हणाली, "पावणे बाराला हॉटेल सोड. दार उघडे टाक आणि ह्मालाशी बोलत बसू नकोस. कारण त्यामुळे सर्व बेत फिसकटेल. जिथे लक्झेनबोर्ग बाग रस्त्याला मिळते, त्या कोपऱ्यावर जा. तिथे तू मला पाहशील. मी समजते, की तू नक्की मी सांगितल्याप्रमाणे करशील. आणि लक्षात ठेव, यातील एकही गोष्ट चुकली, तर तू तुझ्या प्रेमात पडलेल्या स्त्रीला, गोत्यात आणशील."

सिलास म्हणाला, "या सर्व सूचनांचा काही उपयोग आहे, असे मला वाटत नाही."

तिच्या हातातील पंख्याने त्याला ढोसत ती ओरडली, ”तू मालक असल्यासारखी वागणूक मला आधीच द्यायला सुरवात केली आहेस.”

“धीर धर. थोडा दम ठेव. ते योग्य वेळी होईलच. पहिल्यांदा स्त्रीला, तिच्या आज्ञेत राहिलेले आवडते. पण नंतर तिच्या लक्षात येते, की आज्ञा पाळण्यात जास्त सुख मिळते. कृपया, मी म्हणतो तसे कर. नाहीतर मी काही उत्तर देणार नाही. खरच, मी आता हा विचार केला,”

पुढे येणाऱ्या अडचणींचा विचार करून ती म्हणाली, “मला त्रासदायक पाहुणे मंडळींना लांब ठेवायचा चांगला नवीन उपाय सापडला आहे. हमालाला सांग, की त्या रात्री कर्जाचे पैसे वसूल करायला येणाऱ्या माणसाव्यतिरिक्त, कुणालाही आत सोडू नकोस. आणि अशा तऱ्हेने बोल, की त्याला असे वाटले पाहिजे, की तू येणाऱ्या लोकांना घाबरतो आहेस. म्हणजे तो तुझे सांगणे ऐकेल.”

थोडे चिडून त्याने म्हटले, “मला वाटते माझ्याकडे येणाऱ्या उपटसुंभांपासून मी स्वतःला कसे वाचवावे, हे तू माझ्यावर सोडलेले बरे!”

ती थंडपणे बोलली, “अशा गोष्टी झालेल्या मला आवडेल. मला तुम्ही पुरुष माणसे माहिती आहात. तुम्हाला महिलांच्या कीर्तीचे काहीच पडलेले नसते.”

सिलास लाजला. कारण त्यांची ओळख होण्यापूर्वी, त्याच्या डोक्यात स्त्रियांची उगीचच स्तुती करायची, अशी योजना होती.

तिने चालू ठेवले, “मुख्य म्हणजे हमाल बाहेर आला, की त्याच्याशी बोलू नकोस.”

तो म्हणाला, “का? तुझ्या सर्व सूचनांमध्ये मला ही सर्वात कमी महत्वाची वाटते.”

ती उत्तरली, “तुला पहिल्यांदा नेहमी दुसऱ्यांच्या शहाणपणाबद्दल शंका येते. पण तुला आता कळले असेल, की ती जरुरीची असते. माझ्यावर विश्वास ठेव. कधीकधी त्याचाही काही उपयोग आहे. यथावकाश, तुला कळेल. आणि तू पहिल्याच भेटीत जर मला, क्षुल्लक कारणांवरून झिडकारलेस, तर मी तुझ्या प्रेमाबद्दल काय विचार करणार?”

या सगळ्यात, स्पष्टीकरण देत व माफी मागत सिलासने स्वतःलाच आश्चर्यात बुडवले. तिने घड्याळात बघितले व हाताने टाळी वाजवत एक अस्फुट किंकाळी मारली.

ती ओरडली, "बापरे! इतका उशीर झाला आहे? आता मला एकही मिनिट थांबायला नको. गरीब बिचाऱ्या आम्ही महिला, म्हणजे गुलामच आहोत! मी तुला आधीच अशा धोक्यात टाकले आहे, नाही का?"

मोठ्या कलात्मकतेने तिने प्रेमात गुंफून, परत त्याच सूचना दिल्या आणि अगदी दुर्लक्ष करण्यासारखा दृष्टीक्षेप टाकत, तिने त्याचा निरोप घेतला व गर्दीत दिसेनाशी झाली.

दुसरा दिवसभर सिलासला, स्वतः खूप महत्वाचे आहोत असे वाटत होते. आता त्याची खात्री पटली, की ती खानदानी असणार. संध्याकाळी तिची प्रत्येक सूचना पाळत, तो ठरलेल्या वेळी, लक्झेनबोर्ग बाग रस्त्याच्या कोपऱ्याला जाऊन उभा राहिला. तिथे कुणीच नव्हते. त्या जागी आलेल्या किंवा रेंगाळणाऱ्या प्रत्येकीकडे बघत, तो अर्धा तास तिथे थांबला. त्याने रस्त्याच्या दुसऱ्या कोपऱ्यावर जाऊन देखील

पाहिले. बागेला एक फेरी मारली. पण त्याच्या बाहूत शिरणारी स्त्री तिथे नव्हती. शेवटी नाईलाजाने तो हॉटेलकडे परतू लागला. वाटेत त्याला मॅडम झेफायरीन व सोनेरी केसांचा तरुण यांच्यातील त्याने ऐकलेले बोलणे आठवले. त्यामुळे तो अस्वस्थ झाला.

त्याने विचार केला, “असे वाटते, की प्रत्येकाला हमालाला काही असत्य सांगायचे आहे.”

त्याने घंटी वाजवली. हमालाने झोपायच्या कपड्यात बाहेर येऊन, त्याला दिवा दिला.

हमालाने चौकशी केली, “तो गेला का?”

सिलासची तिच्याशी भेट न झाल्याने चिडलेल्या त्याने रागाने विचारले, “कोण? तुला कोण म्हणायचे आहे?”

हमालाने पुढे चालू ठेवले, “मला तो परत गेलेला कळला नाही. पण मला विश्वास वाटतो, तुम्ही त्याला पैसे दिले असतील. आम्ही इथे लोकांचे कर्जाचे पैसे बुडवणाऱ्या लोकांना थारा देत नाही.”

सिलासने रागावून विचारले, “तू म्हणतो आहेस तरी काय? या गोंधळातील एक अक्षरही मला समजत नाही.”

हमाल बोलला, “तो बुटका, सोनेरी केसांचा माणूस कर्जवसुलीसाठी आला होता. हो. मला वाटते, तो त्यासाठीच आला होता. तो तसे म्हणाला, म्हणून मी फक्त त्याला वर जाऊ दिले. तुम्ही सांगून गेला होतात, की कुणाला येऊ देऊ नकोस, मग मी अजून कुणाला जाऊ देणार?”

सिलास कडवटपणे म्हणाला, “काय सांगतो आहेस? अरे देवा, अर्थात असे कोणीच कधी आले नसणार.”

गालाला जीभ लावत हमाल लबाडीने बोलला, “मी विश्वास ठेवला, म्हणजे ठेवला.”

सिलास ओरडला, “तू उद्धट मवाली आहेस.” मग त्याला वाटले, आपण फार कठोर बोललो. त्याच वेळेस त्याला अनेक प्रकारची भीती वाटू लागली. तो वळून वरती जाण्यासाठी धावू लागला. हमाल ओरडला, “तुम्हाला दिवा नको का?”

पण सिलास अजूनच जोरात जाऊ लागला. आणि सातव्या मजल्यावरील त्याच्या खोलीच्या दारासमोर उभा राहेपर्यंत, थांबला नाही. तिथे श्वास घेण्यासाठी क्षणभर थांबला. तो खोलीत शिरायला घाबरत होता.

शेवटी एकदाचा आत शिरल्यावर, त्याला सर्वत्र काळोख दिसला आणि तिथे कुणीही नव्हते. त्याने एक खोल श्वास घेतला. शेवटी तो एकदाचा सुरक्षितपणे घरात होता.

हा त्याचा शेवटचा आणि पहिलाच मूर्खपणा असावा. पलंगाशेजारील टेबलावर काडेपेटी पडली होती. तो त्या दिशेने जाऊ लागला. तो जाऊ लागल्यावर परत भीती त्याच्यावर चालून आली. त्याच्या पायाला एक अडथळा लागला, तेव्हा तो खूष झाला. कारण ती फक्त एक खुर्ची होती. शेवटी त्याने पडद्यांना हात लावला. खिडक्यांच्या उजेडामुळे ते त्याला थोडेफार दिसत होते. त्यावरून त्याला समजले की तो पलंगाजवळ उभा होता. त्यामुळे तो टेबलाच्या जवळच आल्याचे त्याच्या लक्षात आले.

त्याने हात पुढे केला आणि त्याच्या हाताला काही लागले. ती नुसती चादर नव्हती, तर त्याखाली मानवी

पायासारखे काही होते. सिलासने हात मागे घेतला. त्याचा पुतळा झाला.

त्याने विचार केला, “हे काय आहे? हे काय दर्शवते आहे?”

त्याने लक्ष देऊन ऐकले. पण शासोच्छवासाचा आवाज येत नव्हता. पुन्हा त्याने हात पुढे करून बघितले आणि यावेळी तो अर्धा यार्ड मागे उडाला. तो भीतीने थरथर कापत उभा राहिला. त्याच्या पलंगावर काहीतरी होते. काय होते, ते त्याला माहिती नव्हते. पण काहीतरी होते.

तो हलण्यापूर्वी काही सेकंद गेले. नंतर काही जाणवून, त्याने काडेपेटी हातात घेतली व पलंगाकडे पाठ करून, मेणबत्ती पेटवली. ज्योत पेटल्यावर तो सावकाश वळला आणि त्याला कसली भीती वाटली, ते त्याने बघितले. खात्रीने त्याला कल्पनातीत असे काही दिसले. उशीपर्यंत काळजीपूर्वक रीत्या चादर घातलेली होती. त्याखाली न हलणाऱ्या मानवी शरीराचा आकार दिसत होता. त्याने पुढे होऊन चादर ओढून काढली. तिथे त्याने आदल्या दिवशी नाचाच्या ठिकाणी पाहिलेला, सोनेरी केसांचा तरुण पडलेला

होता. त्याचे जीव नसलेले डोळे उघडे होते. त्याचा चेहरा फुगून काळा पडला होता. आणि नाकपुड्यांतून बारीक रक्तप्रवाह वहात होता.

सिलासने थरथरत्या उच्च आवाजात, एक किंकाळी मारली आणि पलंगाशेजारी पडला.

त्या भयानक दृष्याने सिलासला आलेल्या बेशुद्धावस्थेतून तो जागा झाला, तेव्हा त्याने खूप वेळ दारावर हलकेच वाजवलेल्या थापा ऐकल्या. त्याला काय झाले आहे, हे आठवायला काही सेकंद लागले. त्याने कोणाला खोलीत शिरायला अटकाव करायचा प्रयत्न केला, तेव्हा त्याला फार उशीर झाला होता. रात्रीची उंच टोपी घातलेले डॉ नोएल त्यांचा लांब, पांढऱ्या चेहऱ्यावर उजेड पडणारा दिवा हातात घेऊन, वेडीवाकडी हालचाल करत, एखाद्या पक्ष्यासारखे त्यांचे डोके विशिष्ट दिशेने वळवत, हळूच दार ढकलून खोलीत आत आले.

त्यांनी सुरवात केली, “मला वाटते, मी किंकाळी ऐकली. मला भीती वाटली, की तुम्हाला बरे नसावे. त्यामुळे मी इथे आलो.”

पडलेल्या चेहऱ्याने, भीतीने हृदय धडधडत असतांना सिलास, डॉक्टर आणि पलंग यांच्यामध्ये उभा राहिला. पण त्याच्या तोंडून शब्द फुटेना.

डॉक्टर पुढे बोलले, “तुम्ही अंधारात होतात आणि अजून झोपला नव्हतात. तुम्ही मला माझ्या दृष्टीपासून, सहजासहजी परावृत्त करू शकणार नाही. तुमचा चेहरा ठळकपणे सांगतो आहे, की तुम्हाला एखाद्या मित्राची किंवा डॉक्टरची गरज आहे. --- खरे ना? मला तुमची नाडी बघू दे. कारण त्यावरून हृदयाची परीक्षा होते.”

त्यांच्याकडे पाठ केलेल्या सिलासकडे, ते पुढे येऊ लागले. सिलासने त्यांचे मनगट धरायचा प्रयत्न केला. पण त्या अमेरिकन तरुणाला तो जोर सहन होईना. क्षीणपणे तो डॉक्टरांना टाळू लागला. जमिनीवर धाडकन कोसळून तो जोरजोरात शोक करू लागला.

जेव्हा डॉ नोएलनी पलंगावरील मृत मनुष्य पाहिला, तेव्हा त्यांचा चेहरा काळवंडला. ते घाईने थोड्या उघड्या दरवाज्याकडे गेले व त्यांनी घाईने तो पूर्णपणे बंद केला.

मोठ्या कठोर आवाजात ते सिलासला म्हणाले, “उठ! ही रडायची वेळ नाही. तू काय केलेस? हे प्रेत तुझ्या खोलीत कसे आले? तुला मदत होऊ शकेल, अशा माणसाशी मोकळेपणे बोल. मी तुला आयुष्यातून उठवू शकतो, याची तुला कल्पना आहे का? हा मेलेल्या मासाचा देह, तू माझ्यात यापूर्वी निर्माण केलेली सारी सहानुभूती नाहीशी करू शकतो. विश्वासू तरुणा, आंधळा आणि क्रूर कायदा, प्रेमाची भाषा जाणत नाही. जर माझ्या जिवलग मित्राचे हात मी रक्ताने रंगलेले पाहिले, तरी माझे त्याच्याबद्दलचे प्रेम कधीही कमी होणार नाही. उठ. चांगले आणि वाईट हे चिमेरा ( ग्रीक देवता ) देवतेसारखा भ्रम आहे. आयुष्यात नियतीशिवाय दुसरे काही नाही. आणि तरीही कोणीतरी नेहमी शेवटपर्यंत, तुमच्या बाजूला मदतीसाठी उभे असते.”

या शब्दांनी धीर येऊन, सिलास भानावर आला व तोडक्यामोडक्या आवाजात बोलू लागला. डॉक्टरांनी खुबीने केलेल्या प्रयत्नांना यश येऊन व त्यांच्या प्रश्न विचारण्यातून, शेवटी सिलासला काय घडले, ते सांगता आले. पण राजपुत्र आणि जेराल्डीन यांच्यात झालेले संभाषण त्याने ऐकल्याचे,

त्याने सांगितले नाही. कारण त्याला नीटपणे काही कळले नव्हते. शिवाय ते त्याचे चुकीचे धाडस होते.

डॉक्टर नोएल ओरडले, “अरेरे! मला वाटते, तू नकळत युरोपमधील खतरनाक टोळीच्या हातात पडलेला दिसतोस. बिचारा! तुझ्यासारख्या साध्या माणसासाठी, हा काय खड्डा खणून ठेवला आहे! कसल्या मरणप्राय गंभीर प्रकरणात, तुझा निरपराध पाय अडकला आहे! तू दोनदा ज्याला पाहिलेस, तो ब्रिटीश माणूस! त्याचाच यात हात असल्याचा मला संशय आहे. तू त्याचे वर्णन करू शकशील का? तो तरूण होता की वयस्क? उंच होता की बुटका?”

पण सिलासला निरीक्षणशक्ती नव्हती. फक्त कुतूहल होते. त्यामुळे तो थातुरमातुर माहितीशिवाय, काही सांगू शकत नव्हता.

डॉक्टर रागाने जोरात ओरडले, “सर्व शाळांमध्ये आपल्याला हे किरकोळ शिक्षण मिळतेच. जर माणसाला पाहिलेले व ऐकलेले काही आठवत नसेल, तर त्याचे डोळे व कान काय कामाचे आहेत? मला युरोपमधील सर्व टोळ्या माहिती आहेत. मी त्या गुंडांना नक्की ओळखले असते.

आणि तुझ्या संरक्षणासाठी नवीन शस्त्रे आणली असती. आता यापुढे हे सर्व करत चल. त्यामुळे बिचाऱ्या तुलाच भविष्यात फायदा होईल.”

सिलास बोलला, “भविष्य? मला आता फाशीशिवाय काय भविष्य उरले आहे?”

डॉक्टर उत्तरले, “धोके झेलायला तारुण्य, फार भित्रे असते. माणसाला स्वतःचे त्रास अजूनच त्रासदायक वाटतात. मी वयस्क आहे. पण मी कधी दुःख केले नाही.”

सिलासने विचारले, “मी पोलिसांना ही गोष्ट सांगू शकतो का?”

डॉक्टर म्हणाले, “नाही. मला वाटते तू ज्या प्रकारच्या केसमध्ये अडकला आहेस, ती फारच निराशाजनक आहे. अधिकाऱ्यांच्या संकुचित दृष्टीने, तूच गुन्हेगार आहेस. आणि आपल्याला त्या कटाचा फक्त एक भाग माहिती आहे. पोलिसांच्या चौकशीत, तुझी निरागसता सिद्ध होणार नाही. त्या कुप्रसिद्ध टोळीने, नक्कीच अजूनही काही परिस्थितीजन्य पुरावे पेरून ठेवले असणार. त्यामुळे तुझ्यावर गुन्ह्याचा शिक्का बसायला सोपे जाईल.”

सिलास किंचाळला, “म्हणजे मी पूर्ण बुडालोच.”

डॉक्टर नोएल म्हणाले, “मी असे म्हणालो नाही. मी काळजी घेणारा मनुष्य आहे.”

पण प्रेताकडे निर्देश करत, हरकत घेत सिलास बोलला, “पण हे बघा. इथे माझ्या पलंगावर हे पडले आहे. मी त्याचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही. मी ते नष्ट करू शकत नाही. आणि त्याची मला भीती वाटल्याशिवाय रहात नाही.”

डॉक्टर उत्तरले, “भीती! जेव्हां असे प्रकार होतात, तेव्हा हा काही हुशारीचा कारभार आहे. आमच्या लांब, वाकड्या पात्याच्या धारदार अशा शस्त्रक्रियेच्या चाकूने त्याचा शोध घ्यायला हवा. जेव्हा रक्त थंड पडून थिजते, तेव्हा मग ते मानवी रक्त उरत नाही. एकदा मास मेले, की आपण प्रेमाने ज्याची इच्छा करतो आणि आपल्या मित्राला ज्यामुळे मान देतो, ते ते शरीर उरत नाही. डौलदारपणा, आकर्षण, भीती ही प्राण्यांची जिवंतपणाची सर्व लक्षणे, त्यातून निघून गेलेली असतात. त्याच्याकडे दम ठेऊन, शांतपणे बघायला शिक. कारण माझा बेत जर व्यवहार्य ठरला, तर काही दिवस

तुला आता ज्या भीतीने ग्रासून टाकले आहे, त्यात रहावे लागेल.”

सिलास ओरडला, “तुमचा बेत? तो काय आहे? डॉक्टर, लवकर सांगा. मला जगायचे पुरेसे धैर्य उरलेले नाही.”

काही न बोलता डॉक्टर नोएल प्रेताकडे वळून, ते तपासू लागले.

ते पुटपुटले, “ठार मेला आहे. हो. मला वाटले होते, त्याप्रमाणे खिसे रिकामे आहेत. हो. आणि शर्टावरून नाव कापले आहे. हे काम मोठे हुशारीने केले गेले आहे. सुदैवाने तो लहानखुरा आहे.”

सिलासने हे शब्द काळजीपूर्वक ऐकले. शेवटी डॉक्टरांची तपासणी संपली. ते खुर्ची घेऊन बसले व तरुण अमेरिकनाकडे हसून बघत बोलू लागले.

“तुझ्या खोलीत आल्यापासून, जरी माझे कान आणि जीभ कामात असली, तरी माझे डोळे काही गप्प बसलेले नाहीत. थोड्या वेळापूर्वी माझ्या लक्षात आले आहे, तुझ्या येथील कोपऱ्यात, तुझ्या देशातील लोकांनी जगभरातून वाहून

आणलेल्या सामानाची  --- थोडक्यात, साराटोगा पेटी पडली आहे. आतापर्यंत त्याची उपयुक्तता माझ्या लक्षात आली नव्हती. पण मग माझ्या मनात एक कल्पना चमकली. गुलामांच्या व्यापारात, ती सोयीस्कर असली, तरी पण एक गोष्ट सरळ आहे --- अशी पेटी मानवी शरीरासाठी योग्य आहे.”

सिलास ओरडला, “नक्कीच, ही काही विनोद करायची वेळ नाही.”

डॉक्टर उत्तरले, “जरी मी काही अंशी आल्हादकपणे शब्द उच्चारले असले, तरी ते पूर्णपणे गंभीर आहेत. तरुण माणसा, आपल्याला पहिली काय गोष्ट केली पाहिजे, तर ती म्हणजे तुझा पलंग रिकामा करणे.”

डॉक्टर नोएल यांचा अधिकार मान्य करून, सिलासने साराटोगा पेटीतील सामान जमिनीवर काढून, ती रिकामी करायला सुरवात केली. मग --- सिलासने पायाकडून व डॉक्टरांनी खांद्याकडून ते धूड पलंगावरून उचलले आणि मोठ्या प्रयत्नाने ते साराटोगा पेटीत कोंबले. त्या कोंबलेल्या प्रेतावर दाबून झाकण बसवले. डॉक्टरांनी स्वतःच्या हातांनी

त्याला कुलूप लावून दोरी बांधली. सिलासने जमिनीवर विखुरलेले सामान कपाटात व खणांमध्ये भरले.

डॉक्टर म्हणाले, “आता तुझ्या सुटकेच्या दिशेने, आपण पहिली पायरी तर घेतली. उद्या किंवा आजच तू पाहिजे तितके पैसे देऊन, त्या हमालाचा संशय दूर केला पाहिजेस. सुरक्षितपणे प्रेताची विल्हेवाट कशी लावायची, यासाठी मी काय ते करतो. माझ्यावर विश्वास ठेव. आता माझ्याबरोबर माझ्या खोलीत ये. मी तुला असे औषध देतो, की तुला झोप येऊन विश्रांती मिळेल.”

दुसरा दिवस सिलासच्या आयुष्यातील सर्वात लांबलचक दिवस होता. असे वाटत होते, की तो कधी संपणारच नाही. सगळ्या मित्रांना त्याने घालवून लावले व एकटाच साराटोगा पेटीकडे उदास नजर लावून बसून राहिला. एक प्रकारे, त्याचे आधीचे वाईट कृत्य, त्याच्यावर उलटले होते. मॅडम झेफायरीनच्या आणि त्याच्या खोलीमधील भोक पुन्हा एकदा उघडे झाले होते. त्यामुळे तो त्रासून गेला. त्याने त्याच्या बाजूने, ते भोक बुजवायचे ठरवले. अशा तऱ्हेने

सुरक्षित झाल्यावर, नंतर तो बराचसा वेळ रडत व प्रार्थना करत बसला.

संध्याकाळी उशीरा डॉक्टर नोएल, त्याच्या खोलीत आले. त्यांच्या हातात सील केलेली पत्ता न लिहिलेली पाकिटे होती. एक थोडे जड होते आणि दुसरे त्यात काही नसल्यासारखे पातळ होते.

टेबलाशी बसत, ते म्हणाले, “सिलास, तुझ्या मुक्तीचा माझा बेत, मी आता तुला सांगतो. बोहेमियाचा राजपुत्र फ्लोरीझेल, पर्शियन समारंभात काही दिवस घालवून, उद्या सकाळी लवकर लंडनला परततो आहे. माझ्या नशीबाने थोड्या वेळापूर्वी कर्नल जेराल्डीनच्या घोड्याच्या चालकाने त्याच्या मालकाने माझी आठवण काढल्याचे मला सांगितले. दोन्ही बाजूंनी कधीही न विसरणाऱ्या, माझ्या डॉक्टरी व्यवसायातील सतत केलेल्या सेवेमुळे त्याचे व माझे चांगले संबंध आहेत. मी तुला हे स्पष्टीकरण द्यायची गरज नाही, की तो कुठल्या कायदेशीर बाबीत अडकला आहे, व त्यामुळे तो मला कुठल्याही बाबतीत मदत करायला तयार आहे. तुला तुझी पेटी न उघडता, लंडनला जाणे भाग आहे. पण

कस्टममधून ती तशी नेणे अवघड आहे. पण मी असा विचार केला, की राजपुत्राचे खासगी सामान हे कस्टम मधून न जाता पुढे जाऊ शकते. मी कर्नल जेराल्डीनला विनंती केली व ती त्याने मान्य केली आहे. उद्या सकाळी सहापूर्वी तू राजपुत्राच्या हॉटेलवर गेलास, तर तुझे सामान त्यांच्या बरोबर लंडनला जाऊन पडेल आणि तू देखील त्याच्या ताफ्यात सामील होऊ शकशील."

मला असे वाटते आहे, की मी यापूर्वी कर्नल जेराल्डीन व राजपुत्राला पाहिले आहे. मी नाचाच्या हॉलमध्ये त्यांचे संभाषणही ऐकले आहे."

डॉक्टर उत्तरले, "शक्य आहे. राजपुत्राला समाजात मिसळण्याची हौस आहे. एकदा तू लंडनला पोचलास, की तुझे काम जवळ जवळजवळ संपले आहे. मी तुला हे पत्ता लिहिण्याचे धाडस नसलेले, जड पाकिट दिले आहे. पण दुसरे पाकीट मी तुला ती साराटोगा पेटी जिथे पोचवायला सांगतो आहे, तिथे तू तुझ्याबरोबर पोचवले पाहिजेस. मग ते ती पेटी घेतील व तू मोकळा होशील."

सिलास म्हणाला, “माझा तुमच्यावर विश्वास आहे. पण असे कसे शक्य आहे? तुम्ही माझ्यासमोर उज्वल भविष्य ठेवले आहे. पण मी तुम्हाला विचारतो, कारण माझे मन इतके सोपे काही मानायला तयार नाही. थोडी दया दाखवून मला काय ते स्पष्ट करा.”

डॉक्टर दुःखाने भारावले गेले.

ते उत्तरले, “मुला, तुला कळत नाही आहे, की तू मला किती अवघड प्रश्न विचारतो आहेस. पण असू दे. आता मी नको ती, काही लाजलावणी गोष्ट करतो आहे. तुझ्यासाठी इतके केल्यावर, तुला हे न सांगणे बरोबर नाही. ऐक तर मग. मी आता इतके साधे सरळ, एकाकी व अभ्यासाला वाहून घेतलेले आयुष्य जगतो आहे. पण मी तरुण असतांना, माझे नाव लंडनमधील लबाड व धोकादायक लोकांमध्ये अग्रक्रमाने घेतले जात असे. बाहेरून जरी मला मानमरातब मिळत असला, तरी माझी खरी शक्ती गुप्त, भयानक व गुन्हेगारी स्वरूपाची होती. तुला तुझ्या ओझ्यातून मुक्त करण्यासाठी, मी एका माणसाला वापरले, जो तेव्हा माझ्या आज्ञेत होता. ते वेगवेगळ्या देशांचे व वेगवेगळ्या हुशारीचे

लोक होते. ते एकाच उद्देशासाठी काम करणारे, एका शक्तिशाली शपथेने एकत्र बांधलेले लोक होते. खुनाशी संबंधित अशी ती टोळी होती. तुझ्याशी निष्पापपणे बोलणारा मी, या संशयास्पद टोळीचा प्रमुख होतो.''

सिलास ओरडला, ''काय? खुनी? आणि ज्या टोळीचा खून करणे हा व्यापार होता, अशा टोळीचा प्रमुख? मी तुमची मदत का घेऊ? मी तुमची सेवा का कबूल करू? काळ्याकुट्ट गुन्हेगार माणसा, तू माझ्या तारुण्याचा आणि दुःखाचा फायदा घेऊन मला गुन्ह्यात ओढतो आहेस?''

डॉक्टर कटूपणे हसले.

ते म्हणाले, ''मिस्टर स्युडामोर, तुम्हाला खूष करणे अवघड आहे. पण आता मी तुम्हाला खून करणारा व खून झालेला यांच्यामधील माणसाबरोबर जाण्याची संधी देतो आहे. जर तुम्ही काळजी घेणारे असाल, तर माझी मदत घेणे चांगले ठरेल. मला सांगा. मी तुमची ताबडतोब सुटका करू शकतो. नंतर तुमच्या सद्सदविवेकबुद्धीला पटेल, त्याप्रमाणे तुम्ही तुमच्या पेटीचे काय ते करू शकता.

सिलास म्हणाला, "तुम्ही किती उदारपणे मला पाठीशी घालायला तयार झालात, हे मला तेव्हा समजायला हवे होते. मी चुकलो. मी निरपराध आहे, हे मी तुम्हाला सांगण्यापूर्वीच, तुम्ही मला मदत करत आहात आणि मी एखाद्या ऋणाईतासारखा तुमचा आज्ञा पाळतो आहे."

डॉक्टर बोलले, "ठीक आहे मी असे समजतो, की या अनुभवातून तू काही शिकशील."

सिलास बोलला, "आता तुम्ही तुमचा गुन्हेगारी व्यवहार उघड केलाच आहे आणि मला तुम्ही तुमच्या त्या वाईट व्यवसायातील माणसांची मदत मला घेण्यास सांगत आहात, तर मग तुम्हीच ही पेटी घेऊन का जात नाही आणि मला यातून मोकळे करत नाही?"

डॉक्टर उत्तरले, "तुझ्या प्रामाणिक दयाबुद्धीचे मी कौतुक करतो. मी तुझ्यासाठी आधीच, बरेच काही केले आहे. माझ्यावर विश्वास ठेव. मी मनापासून, उलटा विचार करतो. माझी सेवा तू घे किंवा घेऊ नको. मला आता उपकाराच्या शब्दांनी त्रास देऊ नकोस. कारण तुझ्या बुद्धीपेक्षा, मी तुझे मत जास्त क्षुल्लक समजतो. अनेक वर्षानंतर मनाच्या आरोग्याचे

तुझ्या लक्षात येईल, तेव्हा तू या सगळ्याचा वेगळा विचार करशील. आणि तुझ्या आज रात्रीच्या वर्तनाबद्दल पश्चात्ताप करशील.”

असे बोलून डॉक्टर खुर्चीवरून उठले. त्यांचे म्हणणे थोडक्यात व स्पष्टपणे सांगून, सिलासला काही उत्तर देण्यास अवधी न देता, खोलीबाहेर चालू पडले.

दुसऱ्या दिवशी त्याला सांगितल्याप्रमाणे, सिलास हॉटेलवर गेला. कर्नल जेराल्डीनने त्याचे नम्रपणे स्वागत केले. त्या क्षणापासून तो ती पेटी व त्यातील उबग आणणाऱ्या भयानक गोष्टीपासून मुक्त झाला. राजपुत्राचे जास्त जड सामान बघून खलाशी व रेल्वेतील हमाल तक्रार करतील, अशी भीती सिलास मनात बाळगून होता. पण प्रवास सुखरूप पार पडला. राजपुत्र फ्लोरीझेलने त्याच्या घोड्याच्या चालकाबरोबर प्रवास करण्याचे ठरवल्याने, सिलासने राजपुत्राच्या खासगी नोकराबरोबर प्रवास केला. बोटीवर सामानाच्या ढीगाकडे काही कारण नसतांना उदासीनतेने बघून, सिलासने राजपुत्राचे लक्ष वेधून घेतले. कारण तो अजूनही त्याच्या भविष्याच्या काळजीत होता.

राजपुत्राने बघितले, “तिथे फार काळजीत असलेला एक तरुण मनुष्य दिसतो आहे.”

जेराल्डीन उत्तरला, “तुझ्या ताफ्याबरोबर प्रवास करायला परवानगी दिलेला, तोच तो अमेरीकन मनुष्य आहे.”

राजपुत्र फ्लोरीझेलने म्हटले, “मी माझे सौजन्य विसरत होतो. तुम्ही मला बरी आठवण केली” एवढे बोलून तो सिलासकडे चालत येऊन, मनापासून मोठेपणा दाखवत, म्हणाला, “कर्नल जेराल्डीनकडून मला तुमच्याबद्दल समजले. सर, मी तुमचा आभारी आहे. कृपया तुम्ही लक्षात ठेवा, की कधीही भविष्यकाळात मी तुम्हाला एखादे गंभीर कर्तव्य बजावण्यासाठी सांगेन.”

मग त्याने अमेरिकेच्या राजकीय स्थितीसंबधी काही प्रश्न विचारले. सिलासने त्याची विचारपूर्वक व सभ्यपणे उत्तरे दिली.

राजपुत्र म्हणाला, “अजून तू तरुण आहेस. पण तू फार गंभीर दिसतोस. कदाचित तू तुझे लक्ष, फारच खोलवर अभ्यासात बुडवले आहेस. पण दुसरीकडे मी स्वतः, खासगी दुःखदायक विषय शोधून हाताळण्यात माहीर आहे.”

सिलास बोलला, “मी खरच फार गांगरून गेलो आहे. एखाद्या निरागस माणसाला असे वाईट रीत्या कधीच वागवले गेले नसेल.”

राजपुत्र फ्लोरीझेल म्हणाला, ”मी तुला तुझी खासगी गोष्ट विचारणार नाही. पण कर्नल जेराल्डीन यांची शिफारस म्हणजे खात्रीशीर पासपोर्ट आहे. मी इतर कुणाहीपेक्षा, तुला काहीही मदत करायला तयार आहे.”

अशा मोठ्या माणसाचे मित्रत्वाचे बोलणे ऐकून, सिलास आनंदित झाला. पण आधी घडलेले अंधकारमय प्रसंग आठवून त्याला असे वाटले, की एखाद्या प्रजासत्ताक नागरिकावरची राजपुत्राची कृपादृष्टी सुद्धा, त्याच्यावरील कलंक पुसू शकणार नाही.

चेरिंग क्रॉसला गाडी पोचल्यावर, नेहमीच्या पद्धतीने राजपुत्राचे सामान तपासले गेले. घोडे जोडलेले टांगे थांबलेले होते. सर्वांबरोबर सिलासलासुद्धा राजपुत्राच्या निवासस्थानी नेले गेले. तिथे कर्नल जेराल्डीनने डॉक्टर नोएल यांच्याबद्दल मोठा आदर प्रकट करून, त्याच्या मित्राला, म्हणजे सिलासला काही सेवेची गरज आहे का, असे विचारले.

तो पुढे म्हणाला, “मला आशा आहे की तुमचे सर्व सामान सुखरूप आले आहे. राजपुत्राचा आज्ञेवरून सर्व सामानाची व्यवस्थित काळजी घेतली गेली आहे.”

नंतर नोकरांना आज्ञा देऊन, तरुण माणसाला एका गाडीत बसवण्यात आले व साराटोगा पेटी डिकीत ठेवण्यात आली. कर्नलने त्याच्याशी हातमिळवणी करत राजपुत्राच्या ताफ्याबरोबर त्याने प्रवास केल्याबद्दल, त्याला धन्यवाद दिले. सिलासने त्यावर पत्ता लिहिलेले पाकीट फोडले आणि नोकराला त्याला त्यात लिहिलेल्या  बॉक्स कोर्टच्या पत्त्यावर नेण्यास सांगितले. त्या माणसाला ती जागा माहिती असल्याचे दिसले. कारण तो चमकला व त्याने ते नाव, परत सांगायला सांगितले. सिलास त्या आरामशीर वाहनात हृदयात धडधड घेऊन बसला. त्याला त्याने सांगितलेल्या ठिकाणी पोचवण्यात आले. तिथे आत शिरायची जागा, गाडी आत नेण्यासाठी फार लहान होती. तो पायी चालायचा रस्ता होता. दोन्ही बाजूंना खांब व मध्ये कठडे होते. त्यापैकी एका खांबाजवळ एक माणूस बसला होता. त्याने चालकाला मित्रत्वाची खूण केली. चालकाने सिलासला विचारले की

साराटोगा पेटी उतरवायची आहे का आणि ती कुठल्या नंबरवर न्यायची आहे.

सिलास म्हणाला, “कृपया तीन नंबरवर न्या. चालकाने व त्या खांबावर बसलेल्या माणसाच्या व सिलासच्या मदतीने ती जड पेटी उचलण्याचे काम करत, ती तीन नंबरच्या दाराशी आणली. पण तिथे फिरणाऱ्या माणसांना पाहून सिलास घाबरून गेला. पण जितका चांगला चेहरा ठेवता येईल, तितका ठेवत, त्याने दुसरे पाकीट तेथील माणसाच्या हातात दिले. त्याने ते उघडले.

तो म्हणाला, “तो घरी नाही. पण तुम्ही तुमचे पत्र ठेऊन उद्या सकाळी लवकर आलात, तर मी तुम्हाला सांगू शकेन, की तो तुम्हाला केव्हा भेटू शकेल. तुम्हाला तुमची पेटी इथे ठेवायची आहे का?”

सिलास ओरडला, “नक्कीच.” आणि पुढच्याच क्षणी तो घामाने डवरुन गेला व त्याला पश्चात्ताप होऊन तो बोलला, की तो ती पेटी त्याच्या हॉटेलवर घेऊन जाईल.

त्याच्या या बोलण्याने, जोरजोरात अपमानकारक शब्द उच्चारत, ती गर्दी त्याच्या मागोमाग गाडीपर्यंत आली.

सिलास भीतीने व लाजेने चूर होत त्याना म्हणाला, “मला जवळपासच्या कुठल्यातरी शांत व आरामशीर हॉटेलात घेऊन चला.”

राजपुत्राच्या ताफ्याने त्याला क्रॅव्हेन हॉटेलमध्ये नेले व लगेच ते निघून गेले. दोन जिने चढून, मागील बाजूस फक्त एक लहानशी खोली रिकामी होती. दोन दणकट हमालांनी कुरकुर करत, कशीबशी साराटोगा पेटी खोलीत आणली. ती चढवतांना सिलास सतत त्यांच्या मागेमागे होता, हे काही सांगायला नको. आणि जिन्याच्या प्रत्येक वळणावर तो धास्तावत होता. कोपऱ्यावर एखादी पायरी चुकली तरी, पेटीतील मरणप्राय गोष्ट उघडकीला आली असती आणि सिलासचे गुपित फुटले असते.

खोलीत आल्यावर तो आतापर्यंत सहन केलेल्या काळजीतून बाहेर येण्यासाठी, पलंगाच्या कडेला बसतो न बसतो तोच, पेटीच्या बाजूला एकजण ओणवा होऊन पेटी उघडायला बघत असल्याचे त्याच्या लक्षात आले.

सिलास ओरडला, “असू दे. मला त्यातले काहीही आता लागणार नाही आहे.”

"मग तुम्ही ती खाली हॉलमध्ये ठेवायला हवी होती. ती एखाद्या चर्चसारखी, जड आणि मोठी आहे. आत काय असेल, त्याचा मी तर्क करू शकत नाही. जर आत पैसे असतील, तर तुम्ही भलतेच श्रीमंत मनुष्य दिसता." तो मनुष्य गुरगुरला.

सिलासने पुनरुच्चार करत काळजीने म्हटले, "पैसे? तुला काय म्हणायचे आहे? त्यात पैसे वगैरे काही नाही. तू मूर्खासारखे काहीही बोलतो आहेस."

तो मनुष्य उत्तरला, "ठीक आहे. तुमच्या पैशाला कोणी हात लावणार नाही. मी बँकेइतका सुरक्षित आहे. पण पेटी जड असल्यामुळे, तुम्हाला मला चहासाठी पैसे द्यावे लागतील."

सिलासने त्याचे आभार मानत त्याला परदेशी चलनाचे दोन नेपोलिअन दिले. तो मनुष्य तोंडाने काही पुटपुटत, रागाने त्याच्या हातातील पैशांपासून साराटोगा पेटीपर्यंत, बघत बघत निघून गेला.

दोन दिवस ते प्रेत त्या पेटीत पडून होते. सिलास आता खोलीत एकटा राहिल्यावर त्याने पेटीच्या फटींकडे व

झाकणाकडे लक्षपूर्वक बघितले. हवा थंड असल्याने अजून तरी त्याचे धक्कादायक गुपित पेटीत सुरक्षित होते.

त्याने पेटीजवळ खुर्ची ओढून घेतली आणि स्वतःचा चेहरा हाताने झाकून घेतला. त्याचे मन काळजीने भरून गेले. त्याने झटपट त्या पेटीचा निकाल लावला नसता, तर कदाचित त्याचे गुपित उघडकीला आले असते. परक्या शहरात तो कुणी मित्रांशिवाय एकटा होता. जर डॉक्टरांच्या ओळखीने काम झाले नाही, तर तो निःसंशय पूर्णपणे पराभूत इंग्लडवासी ठरला असता. तो दयनीय रीतीने त्याच्या भविष्यातील महत्वाकांक्षी योजनांवर, विचार करू लागला. तो त्याचा अमेरिकेतील मूळ देश, बँगॉर मेन येथील नायक व वक्ता राहिला नसता. कार्यालयांमधून मानाने फिरू शकला नसता. अमेरिकेच्या प्रधानमंत्र्याने जाहीरपणे केलेल्या त्याच्या स्तुतीला तो पारखा झाला असता व त्याच्यामागे त्याचा सर्वात वाईट पुतळा बनवला जाऊन, त्यामुळे राजधानीचे वॉशिंग्टन शहर अधिक सुंदर झाले असते. इथे तो एका मृत इंग्लिश माणसाबरोबर साराटोगा पेटीत जखडून पडला होता.

त्यातून त्याच्या सुटकेची इच्छा तो करत होता. नाहीतर मग देशाचे नाव बद्दू झाले असते.

डॉक्टर, खून झालेला माणूस, मॅडम झेफायरीन, पेटीवर डोकावून बघणारा माणूस, राजपुत्राचे नोकर, म्हणजे थोडक्यात त्याच्या भयंकर दुर्दैवाशी वेळोवेळी संबंध आलेल्या सर्व लोकांशी, तो कायकाय बोलला ते आठवून, त्याला घाबरायला झाले. संध्याकाळी सातला तो जेवणासाठी खाली उतरला. पण पिवळ्या कॉफी विभागाने त्याला घाबरवले. जेवणाऱ्या सर्व लोकांचे डोळे संशयाने त्याच्याकडे बघत असल्याचे, त्याला वाटू लागले. त्याचे मन वरती खोलीत असलेल्या साराटोगा पेटीकडे लागलेले राहिले. जेव्हा वेटर त्याला चीज वाढायला आला, तेव्हा तो इतका टोकाचा घाबरलेला होता, की तो खुर्चीतून अर्धवट उठला व पेल्यातील पेय टेबलाच्या आच्छादनावर सांडले.

त्याचे जेवण झाल्यावर, त्याला सिगरेट ओढायची खोली दाखवण्यात आली.  त्याला ताबडतोब त्याच्या धोकादायक खजिन्याकडे निघून यायचे होते. पण त्याला नकार देण्याचे धैर्य झाले नाही. त्याला क्रॅव्हेन हॉटेलच्या

काळ्या, झगमगीत स्वागतकक्षात आणण्यात आले. वरती रहाणारे लोक तिथे बिलियर्डस वगैरे खेळ खेळत होते. लांबच्या एका कोपऱ्यात डोळे खाली करून सिगरेट ओढणाऱ्या नम्र माणसाकडे त्याचे लक्ष गेले. त्याला लगेच समजले की हा चेहरा आपण पूर्वी पाहिलेला आहे. तो त्या बॉक्स कोर्टच्या खांबाशी बसलेला माणूस होता. त्याने गाडीतून साराटोगा पेटी आणायला व परत न्यायला मदत केली होती. तो जो पळत सुटला, तो वर येऊन त्याच्या खोलीला आतून कडी घालेपर्यंत थांबला नाही.

तिथे रात्रभर तो त्या मेलेला माणूस कोंबलेल्या भयानक पेटीबद्दल, नाही नाही ते तर्क लढवत बसला. त्या पेटीवर वाकलेल्या नोकराची जी कल्पना होती, की पेटीत सोने भरलेले आहे, त्यामुळे त्याला अजून वेगळ्या प्रकारची इतकी भीती वाटू लागली, की त्याने डोळेच मिटून घेतले. बॉक्स कोर्टातील माणसाचा, वेषांतर केलेला क्रॅव्हेन हॉटेलच्या स्वागतकक्षातील वावर बघून त्याची खात्री पटली, की तो अजून पकडला न गेलेला ड्रग विकणारा असावा.

मध्यरात्र झाली. अनेक संशयांनी पछाडल्या गेलेल्या सिलासने, त्याच्या खोलीचे दार उघडले व पॅसेजमध्ये डोकावून पाहिले. तिथे एक मिणमिणता दिवा होता. लांब अंतरावर एक खालच्या दर्जाचा नोकर फरशीवर झोपलेला होता. तो चोरपावलांनी त्याच्याजवळ गेला. तो अर्धवट पाठीवर व अर्धवट कुशीवर झोपला होता. त्याच्या उजव्या हातामुळे, त्याचा चेहरा नीट दिसत नव्हता. तो अमेरिकन त्याच्यावर वाकलेला असतांना अचानक, त्या झोपलेल्या माणसाने चेहऱ्यावरील हात बाजूला करून, डोळे उघडले आणि सिलास परत एकदा बॉक्स कोर्टातील माणसाच्या समोरासमोर आला.

तो माणूस आनंदाने बोलला, ‘‘सर, शुभ रात्र’’

पण सिलास जोराने पळत त्याच्या खोलीत आल्यामुळे, त्याला त्याचे उत्तर काही ऐकू आले नाही.

सकाळपर्यंत काळजीने पोखरला जाऊन तो खुर्चीत बसल्याबसल्या, त्याचे डोके पुढे लटकलेल्या अवस्थेत झोपी गेला. अवघडलेल्या स्थितीत व उबग आणणाऱ्या उशीने

देखील त्याला इतकी गाढ झोप लागली, की शेवटी दारावर केलेल्या टकटक आवाजाने त्याला उशीरा जाग आली.

त्याने घाईने दार उघडले. कालचा पेटीवर वाकणारा माणूस उभा होता.

त्याने विचारले, “काल बॉक्स कोर्टात आलेले तुम्हीच का?

थरथर कापत, सिलास हो म्हणाला.

“मग ही चिठ्ठी तुमच्यासाठी आहे.” एक बंद पाकीट त्याच्या हातात देत नोकर बोलला.

सिलासने ते उघडले. आत लिहिले होतेः “बारा वाजता.”

तो वेळाच्या बाबतीत काटेकोर होता. दणकट नोकरांनी, पेटी त्याच्यासमोर उचलून खाली आणली. त्याला बॉक्स कोर्टच्या एका खोलीत नेले. तिथे दाराकडे पाठ करून, शेकोटीसमोर एक माणूस शेकत बसला होता. खूप लोकांचा आवाज येत होता. रिकाम्या फळीवर ठेवलेली पेटी उघडल्याचा आवाज येत होता. पण तेथील माणसाला त्याचे

काही पडलेले नव्हते. सिलास भानावर येईपर्यंत, भीतीने तिथे थांबून राहिला.

पाच मिनिटाने सावकाशीने त्या माणसाने वळून पाहिले आणि बोहेमियाच्या राजपुत्र फ्लोरीझेलचे बिंग फुटले.

राजपुत्र कडकपणे म्हणाला, “सर, अशा पद्धतीने तुम्ही माझ्या नम्रपणाचा दुरुपयोग केला आहे. माझ्या माहितीप्रमाणे तुम्ही तुम्हाला या लोकांच्या हवाली केले, कारण तुम्हाला गुन्ह्यामधून सहीसलामत सुटायचे होते. आणि मी काल तुम्हाला पाहिले, तेव्हा तुमची शरम मी समजू शकतो.”

“खरे तर, माझा यात काहीही गुन्हा नसून, मी केवळ दुर्दैवाने यात अडकलो आहे.”

पराकोटीच्या निरागसपणे, त्याने त्याच्यावर कोसळलेल्या संकटाची सर्व हकीगत घाईघाईने राजपुत्राला सांगितली.

त्याचे म्हणणे शेवटपर्यंत ऐकून घेतल्यावर, राजपुत्र म्हणाला, “अस्स! मला काही चुकीचे वाटत होते. म्हणजे

तुझा, यात फुकट बळी घेतला गेला. मी तुला काही शिक्षा करणार नाही. तुला शक्य ती सर्व मदत करायचा प्रयत्न करेन, याची खात्री बाळग. आणि आता, व्यवहार. तुझी पेटी लगेच उघड. आणि आत काय आहे, ते मला बघू.”

सिलास पांढरा पडला.

तो ओरडला, “मला ती उघडायची भीती वाटते.”

राजपुत्र उत्तरला, “तू आधीच आत काय आहे, ते पाहिलेले नाहीस का? विरोध करण्यासारखी भावनाशीलता दाखवायचा हा प्रकार दिसतो. मेलेला मनुष्य मदत करण्याच्या, प्रेम करण्याच्या, द्वेष करण्याच्या वा त्रास देण्याच्या पलीकडे गेलेला असतो. पण तू विनवणी केलीस, तर तुझ्यासारख्या आजारी दिसणाऱ्या माणसाला, आम्ही अजूनही मदत करू शकतो. मिस्टर स्युडामोर, धीर धरा.” आणि मग सिलास अजून का कू करतांना बघून, तो बोलला, “मी माझ्या सांगण्याला अजून ताणू शकत नाही.”

तरुण अमेरिकन जणू स्वप्नातून जागा झाला. उबग येणारी थरथर दाखवत, त्याने पेटीच्या भोवती बांधलेली दोरी सोडून, साराटोगा पेटीचे कुलूप उघडले.

राजपुत्र त्याचे हात मागे बांधून, संयमित चेहऱ्याने बघत शेजारी उभा राहिला. प्रेत कडक झाले होते. आणि सिलासला शारीरिक आणि नैतिक अशा दोन्ही प्रयत्नांनी प्रेताचा चेहरा उघडा करावा लागला.

राजपुत्र फ्लोरीझेल दुःखाचा व आश्चर्याचा धक्का बसून मागे झाला.

तो ओरडला, “अरेरे! मिस्टर स्युडामोर, तुम्हाला फारच कमी माहिती आहे. तुम्ही माझ्यासाठी काय दुष्ट भेट आणली आहे. हा माझ्या बरोबरीचा तरुण माणूस आहे. माझ्या विश्वासू मित्राचा भाऊ आहे. माझ्या सेवेतील काही गोष्टींमुळेच तो, घातपाती व लबाड माणसांकडून मारला गेला आहे. बिचारा जेराल्डीन,” तो जणू स्वतःशी बोलल्यासारखा बोलत राहिला. “तुझ्या भावाचे वाईट नशीब, मी तुला कुठल्या शब्दात सांगू? तुझ्या दृष्टीतून किंवा देवाच्या दृष्टीतून, मी मला कसे माफ करू? माझ्या दृष्टीने योग्य अशा योजनांमुळे त्याला रक्तरंजित, अनैसर्गिक असे मरण कसे काय आले? ओहो, फ्लोरीझेल! फ्लोरीझेल! मर्त्य जीवनाला योग्य असे बेकायदेशीर पण गुप्त माहिती राखून वागायला, तू कधी

शिकणार? तुझ्या हाती असलेली सत्ता आंधळेपणाने न वापरांयला, तू कधी शिकणार? सत्ता! कोण अधिक सत्ताहीन आहे? मिस्टर स्युडामोर, मी मरण दिलेल्या या तरुण माणसाकडे मी अशा तऱ्हेने बघतो, की राजपुत्र असणे ही किती किरकोळ गोष्ट आहे.” तो ओरडून बोलला.

त्याची प्रक्षुब्ध भावना बघून, सिलास हेलावून गेला. त्याने काही सांत्वनपर शब्द बोलायचा प्रयत्न केला आणि त्याला रडू फुटले. त्याची अवस्था बघून राजपुत्र त्याच्याकडे आला व त्याचा हात हातात घेतला.

तो म्हणाला, “स्वतःला आवर. आपल्या दोघांनाही खूप काही शिकायचे आहे. आपल्या आजच्या भेटीपासून, आपण जास्त चांगली माणसे होऊ.”

सिलासने नुसत्या प्रेमळ दृष्टीक्षेपाने त्याचे आभार मानले.

सिलासला टेबलाकडे नेत, राजपुत्र पुढे म्हणाला, “मला या कागदावर डॉक्टर नोएल यांचा पत्ता लिहून दे. आणि तू पॅरीसला परत जाशील, तेव्हा त्या धोकादायक माणसापासून लांब रहा. त्याने या प्रकरणात, उदारपणा

दाखवला आहे, हे मी कबूल करतो. पण तरूण जेराल्डीनला मारण्याच्या कटात तो गुप्तपणे सामील असला पाहिजे. त्याने ते प्रेत खऱ्या गुन्हेगाराच्या ताब्यात कधीच दिले नसते.”

सिलास नवल वाटून उद्गारला, “खरा गुन्हेगार!”

राजपुत्र उत्तरला, “हो. तेच. सर्वशक्तिमान परमेश्वराने माझ्या हाती इतक्या विचित्रपणे हे जे सोपवले आहे, ते खरे तर ज्याच्या बाबतीत धडायचे होते, तो गुन्हेगारापेक्षा काही कमी नाही. तो आत्महत्या क्लबचा कुप्रसिद्ध अध्यक्ष आहे! तू या धोकादायक भानगडीत पडू नकोस. तुझ्या जादूसारख्या झालेल्या सुटकेत, तू समाधान मान आणि ताबडतोब हे हॉटेल सोडून जा. माझ्यावर दबाव आणणारी पुष्कळ प्रकरणे आहेत. या प्रेताची मला काय ती विल्हेवाट लावली पाहिजे, तो अजूनपर्यंत किती देखणा आणि शूर तरुण होता.

सिलासने शरणार्थी व ऋणाईत भावनेने, राजपुत्र फ्लोरीझेलचा निरोप घेतला. परंतु तेथे आलेल्या पोलीस कर्नल हेंडरसनबरोबर राजपुत्र त्याच्या शानदार गाडीत बसून जाईपर्यंत काही वेळ सिलास, बॉक्स कोर्टमध्ये रेंगाळत राहिला. तो तरुण अमेरिकन लोकसत्ताक नागरिक असल्याने,

त्याने कर्नलला, टोपी काढून भक्तीभावनेने अभिवादन केले. त्याच रात्री तो रेल्वेने पॅरीससाठी निघाला.

पाश्चिमात्य रुचीला थोडी भावणारी, डॉक्टर आणि साराटोगा पेटीच्या इतिहासाची गोष्ट इथे संपली. मी फक्त एवढेच अधिक सांगतो, की मिस्टर स्युडामोर राजकीय प्रसिद्धीच्या शिड्या चढू लागले आहेत आणि ताज्या बातमीप्रमाणे ते त्यांच्या मूळ गावाचे शेरीफ झाले आहेत.

वरील गोष्टीच्या बाबतीत काही स्पष्टीकरण आवश्यक वाटल्याने, ते देत आहे.

रॉबर्ट लुई स्टीव्हन्सने एकोणीसाव्या शतकात लिहिलेल्या आत्महत्या क्लब ( The Suicide Club ) या १८७८ मध्ये लंडन येथे प्रकाशित झालेल्या या पुस्तकात तीन साखळी स्वरूपाच्या गोष्टींचा संग्रह आहे. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१. क्रीमच्या गोळ्या वाटणाऱ्या तरुण माणसाची गोष्ट (the Story of a Young Man with the Cream Tarts )

२. डॉक्टर आणि साराटोगा पेटीची गोष्ट ( Story Of The Physician And The Saratoga Trunk )

३. घोडागाडीचे साहस ( The Adventure of the Hansom Cab )

यातील २ नंबरच्या गोष्टीचे भाषांतर वर केले आहे. पण समजण्याच्या दृष्टीने व आत्महत्या क्लब याविषयी काही माहिती मिळण्यासाठी, १ नंबरची गोष्ट, क्रीमच्या गोळ्या वाटणाऱ्या तरुण माणसाची गोष्ट ( the Story of a Young Man with the Cream Tarts ) यातील काही भाग अगदी थोडक्यात सारांशरूपाने खाली देत आहे. तो वाचून मग वरील गोष्ट वाचल्यास चांगली समजेल.

व्हिक्टोरियन काळात लंडनमध्ये, बोहेमियन राजपुत्र फ्लोरीझेल व कर्नल जेराल्डीन या साहसाच्या शोधात असलेल्या द्वयीची गाठ, आत्महत्या क्लबचा अध्यक्षाशी

पडते. तेव्हा ते असला क्लब अस्तित्वात असल्याचे ऐकून, अचंब्यात पडतात. ज्या लोकांना मरायचे आहे, पण तसे करता येत नाही, असे लोक या क्लबचे सभासद असतात. हे दोघे आम्हाला मरायचे आहे, असे खोटेच सांगून क्लबचे सभासद होतात. या क्लबमध्ये यादृच्छिक पद्धतीने जोड्या निवडल्या जातात. त्यातील एकाला दुसऱ्याने ठार मारायचे असते. क्लबचा अध्यक्ष याबाबतीत खून करणाऱ्याला तो कसा व कुठे करायचा, याचे अशा तऱ्हेने मार्गदर्शन करतो, की तो अपघात वाटला पाहिजे. नंतर अध्यक्ष फ्लोरीझेलला मारायचा बेत आखतो. पण जेराल्डीन तो उधळून लावतो. क्लबच्या लोकांचे प्रबोधन करून, त्यांना आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त करायचे, असे राजपुत्र फ्लोरीझेल ठरवतो. तो क्लबच्या अध्यक्षांची रवानगी जेराल्डीनच्या भावाच्या तुरुंगात करतो. परंतु तेथून पळून जाऊन, तो अध्यक्ष जेराल्डीनच्या भावाच्या खुनाचा कट कसा रचतो, ती नंबर २ ची गोष्ट वर भाषांतरीत स्वरूपात दिली आहे.

# The Black Mate

By Joseph Conrad, England

# काळा मित्र



खूप खूप वर्षांपूर्वी लंडनच्या गोदीतील जेट्टीवर, बऱ्याच जहाजांमध्ये माल भरला जात होता. मागच्या शतकातील ऐंशीच्या दशकाबद्दल, मी सांगतो आहे. तेव्हा लंडनच्या रस्त्यांवर फार चांगल्या इमारती नसल्या तरी, गोदीत खूप चांगली जहाजे होती.

जेट्टीवरची चांगली जहाजे, एकामागोमाग एक अशी उभी होती. शेवटून तिसरे सफायर देखील तेवढेच चांगले होते. प्रत्येक जहाजाचा मुख्य ऑफिसर होता.

गेटवरील पोलिसाला त्या सगळयांची तोंडओळख होती. विचार न करता तो सांगू शके, की कुठल्या जहाजाचा कोण मुख्य ऑफिसर आहे. खरे पहाता, लंडनच्या गोदीतील जेट्टीवर असणाऱ्या सर्व जहाजांमधील हे ऑफिसर्स, व्यापारी सेवा देणाऱ्या जहाजांवरील होते. ती स्थिर, प्रामाणिक, कामाला वाहून घेतलेली, निरनिराळ्या सामाजिक स्तरातील साधी माणसे होती. त्यांच्यात मुळातच फार टोकेरी नसलेले स्वभावाचे व्यक्तिगत पैलू, या व्यावसायिक कामाने पार नाहीसे झाले होते.

वरील विधान सफायरवरील मुख्य ऑफिसर सोडून, सर्व जहाजांच्या बाबतीत खरे होते. त्याला पोलीस संशयातीतपणे ओळखत. हे वैशिष्ट्यपूर्ण होते.

रस्त्यावर लांब अंतरावरूनही ते त्याला ओळखत. सकाळी गोदीवर येऊन तो जेव्हा त्याच्या जहाजावर जाऊ लागे, तेव्हा गोदीतील सामान हातगाडीवर वाहून नेणारे कामगार आपापसात शेरे मारत, ‘‘काळा ऑफिसर इथे येतो आहे.’’

ते त्यांनी त्याला दिलेले नाव होते. ते सर्वसामान्य लोक होते. माणसाच्या डौलदारपणाचे, त्यांना काही कौतुक नव्हते. त्याला काळा म्हणणे, हे त्या अज्ञानी माणसांच्या गमतीचा भाग होता.

अर्थात, सफायरवरील मुख्य ऑफिसर मिस्टर बंटर काही काळे नव्हते. लंडनच्या बंदरावरील कोणाही मुख्य ऑफिसरइतकेच ते गोरे होते. उन्हाने ते सहजपणे काळवंडत नसत. मला माहिती होते की सफायरवर नेमणूक होण्यापूर्वी, महिनाभर ते आजारी होते.

यावरून तुम्हाला असे वाटेल, की मी मिस्टर बंटरना ओळखतो. अर्थात मला ते माहिती आहेत आणि अजून काय तर मला, त्यांचे पूर्वीचे गुपित माहिती आहे. हे गुपित -- पण जाऊदे. आपण ते कसे दिसत असत, त्याकडे वळू. मुकादम स्टीव्हेन्डोर अज्ञानी असल्यामुळे, त्याचा काही पूर्वग्रह होता. तो असे म्हणाल्याचे मी ऐकले, "मिस्टर बंटर नक्की कुठल्यातरी परक्या देशाचा आहे. स्पॅनिश, पोर्तुगीज किंवा इटालियन नसूनही, माणसाचे केस काळे असू शकतात. मला भेटलेल्या बोटीवरील कुठल्याही स्पॅनिश माणसापेक्षा जास्त

स्पॅनिश दिसणारे, पश्चिमेकडील देशांचे चांगल्या जहाजावरील खलाशी व ऑफिसर मला माहिती आहेत.” तो चित्रातल्या स्पॅनिश माणसासारखा दिसे. काळे केस आणि तपकिरी डोळे असलेल्यांचे वंशज या पृथ्वीवर पसरलेले असल्याचे, त्या विषयातील जाणकार मंडळी सांगतात. असे दिसते, की आधीच जगातील सर्व लोकांपैकी खूपसे लोक केसांच्या काळया रंगाच्या विविध छटा असलेले आहेत. पण अगदी काळे कुळकुळीत केस असलेले कुणी भेटते, तेव्हा जाणवते की असे अगदी थोडे लोक आहेत. मिस्टर बंटरचे केस, अगदी कावळयाच्या पंखासारखे काळे कुळकुळीत होते. त्याची दाढी ( टोकदार व लांब ) आणि भुवया केसाळ व दाट होत्या. त्याशिवाय त्याचे डोळे चकचकीत निळे होते. छान केस असणाऱ्यांचे तसे असतातच. पण त्या गडदपणात, एक उल्लेखनीय विरोधाभासात्मक भाव होता. त्यामुळे मिस्टर बंटर उठून दिसत असत. त्याच्या हालचाली शांत होत्या. वरवरची वागणूक गंभीर होती. त्यामुळे कोणीही त्याला खूप भावनाशील स्वभावाचा समजले असते.

अर्थात तो काही तितकासा तरुण नव्हता. पण ‘तारुण्याच्या जोशात’ याला काही अर्थ असेल तर, ते त्याच्या बाबतीत खरे होते. तो बारीकसा व उंच होता. सफायरच्या लगेच पुढे असलेल्या एल्सिनोर जहाजाचा कॅप्टन ॲशटॉनने, त्याला जहाजावरील सर्वात उंच जागी न दमता कामात व्यग्र असलेले बघून, त्याच्या मित्राला म्हटले, “जहाजाची सर्व कामे वेगाने पुढे रेटायला जोन्सला एक चांगला माणूस मिळाला आहे.”

अनेक वर्षे सफायरचा मालक असलेला प्रसिध्द कॅप्टन जोन्स, फारसा मान देण्यासारखा नव्हता व लोकांना तो आवडत नसे. त्याच्याबरोबरची माणसे त्याच्याकडे दुर्लक्ष करत किंवा त्याला कःपदार्थ समजत. माणसाच्या चांगुलपणावर विश्वास नसलेल्या व चेष्टेखोर स्वभावाच्या कॅप्टन ॲशटॉनने, या नको त्या गोष्टी सुरु केल्या होत्या. त्याने जोन्सबद्दल असा वाईट विनोद पसरवला होता, “जोन्सचे असे मत आहे की चाळीसपेक्षा जास्त वय असलेल्या खलाशाला, विष द्यायला हवे -- जहाजाच्या प्रत्यक्ष मालकाची तशी आज्ञा होती.”

शहरातील एका रेस्टॉरंटमध्ये नामांकित जहाजमालक, दुपारचे जेवण बरोबर घेत होते. तिथे बटनात पिवळा गुलाब लावलेला मोठा पांढरा कोट घातलेला, लाल चेहऱ्याचा आनंदी कॅप्टन ॲशटॉन होता. मोठा कोट घातलेला, बारीक फिकट दिसणारा, कानामागे त्याचे काळे करडे केस चापून चोपून बसवलेला, चष्मा न घातलेला कॅप्टन सेलर होता. फसव्या समुद्रठग असलेला, निळा शर्ट घातलेला, केसाळ बोटे असलेला, किरमिजी कपाळावरुन खूपच मागे गेलेली काळी टोपी घातलेला, कॅप्टन बेल होता. तिथे छोट्याशा मिशा असलेला, गंभीर डोळे असलेला तरुण जहाजमालकही होता. तो काहीच बोलला नाही. पण मधूनमधून फक्त मंदपणे हसत होता.

चकित झालेला व गोंधळलेला कॅप्टन जोन्स, अविश्वासाने व सुरकुतलेल्या सरळ भुवईने फार बौद्धिक कटाक्ष टाकत नव्हता. त्याच्या टक्कल असलेल्या थोड्या टोकेरी डोक्याने, या भावनेमध्ये काही फरक पडत नव्हता.

प्रत्येकजण हसत सुटला. कॅप्टन जोन्स आंबटपणे हसला व स्वतःचा बचाव करायचा प्रयत्न करू लागला. नुसते

विनोद म्हणून हे ठीक होते. पण अलीकडे बंदरावर जहाजे, कशीबशी चालवली जात होती. वयाने मोठ्या लोकांसाठी, समुद्र ही चांगली जागा नव्हती. घाईगर्दीच्या हल्लीच्या अवस्थेला, तरुण व तारुण्याच्या जोशात असलेले लोकच फक्त योग्य होते. मोठमोठ्या कंपन्यांमधूनही वयाची लक्षणे दिसू लागलेल्या लोकांना काढून टाकत होते. त्यालाही त्याच्या जहाजावर वयस्क लोक नको होते.

आणि या मतामुळे कॅप्टन जोन्स निर्विवादपणे फार चांगला नव्हता. पुष्कळसे खलाशी तसे बरे होते. पण त्यांचे केस काळेपांढरे झाले होते. त्यांच्या बुटांचे तळवे झिजले होते. ते शहरामध्ये हृदयद्रावक पद्धतीने आसरा शोधत होते.

कॅप्टन जोन्स वाईट विनोदावर निरागसपणे म्हणाला होता, की चाळीसच्या पुढील लोकांना विष देण्याच्या मताचा विचार करणे, ही फार लांबची गोष्ट आहे.”

हे नक्की झाल्याचे वाटले. पण कॅप्टन अॅशटॉनने त्या विनोदाकडे दुर्लक्ष केले नाही.

“मला खात्री वाटते, की तू नक्की तसे करशील. परंतु त्याचा काही उपयोग नसल्याचे, तू स्पष्टपणे म्हणालास. ज्या

लोकांचा काही उपयोग नाही, त्यांचे काय करायचे?" जोन्स मित्रा, तू दयाळू आहेस. माझी खात्री आहे की जर तू काळजीपूर्वक विचार केलास, तर त्यांना वेदना होणार नाहीत असा विषप्रयोग करायला तू राजी होशील.

कॅप्टन सेलरने त्याचे पातळ, सुरकुतलेले ओठ दाबले.

तो टोकदारपणे म्हणाला, "त्यांची भुते करा."

भुतांच्या उल्लेखामुळे कॅप्टन जोन्स त्याच्या वाईट, गोंधळलेल्या व लबाड पद्धतीने लाजला.

कॅप्टन अॅशटॉनने डोळे फडफडवले.

"हो. आणि मग कदाचित तुला आत्म्यांच्या जगाशी संवाद साधायची संधी मिळेल. खलाशांची भुते नक्कीच जहाजे पछाडून टाकतील. त्यातील कुणीतरी नक्की जहाजावरील जुन्या मित्राला बोलावेल."

कॅप्टन सेलरने विनोदीपणे शेरा मारला,

"अशा तऱ्हेने त्याची आशा उंचावू नकोस. त्याला काही दिसणार नाही. तुला माहिती आहे का जोन्स, कोणी कधीही भूत पाहिलेले नाही."

या असह्य डिवचण्यामुळे कॅप्टन जोन्स मोकळेपणे बोलू लागला. अजिबात न गोंधळता, त्याच्या लहानशा, मलूल डोळयात क्षणिक सकारात्मक आशा घेऊन, त्याने बरेचसे खरेखुरे प्रसंग सांगितले. अशा घटना सांगणारी पुस्तकेच्या पुस्तके होती. भुताखेतांसारख्या अतींद्रिय शक्ती नाकारणे, हे केवळ अज्ञान होते. एका विशेष वर्तमानपत्रात दर महिन्याला अशा केसेस प्रकाशित केल्या जात. प्रोफेसर क्रँकला रोज भुते दिसत असत. आणि तो काही अडाणी नव्हता, तर महान शास्त्रज्ञ होता. आणि तो वर्तमानपत्राचा माणूस! त्याचे नाव काय बरे? त्याला एक मुलगी भूत भेटत असे. ती त्याला काय म्हणाली, ते तो छापत असे. आणि तरीही तुम्ही म्हणता की भुते नाहीत!

“का, त्यांचे फोटो काढलेले आहेत की! अजून काय पुरावा तुम्हाला पाहिजे?”

कॅप्टन जोन्सला राग आला होता. कॅप्टन बेलचे ओठ वाकडे झाले. कॅप्टन ॲशटॉनने निषेध नोंदवत म्हटले,

“कृपया त्याला आता अजून काही बोलू देऊ नका. आणि तसेही जोन्स, तुझा नवीन मित्र म्हणून तू कुठल्या

केसाळ चोराला आणले आहेस? गोदीतील कुणीच त्याला यापूर्वी पाहिलेले नाही.”

विषय बदलल्यामुळे कॅप्टन जोन्स शांत झाला व साधेपणे उत्तरला, की फेनचर्च रस्त्याच्या कोपऱ्यावरील सिगरेटच्या दुकानदाराने त्याला पाठवले आहे.

मला वाटते, फेनचर्च रस्त्यावरील विलीचे दुकान व घरही आता गेले आहे. त्याच्या चालू काळात त्याच्या खादाड, निष्काळजी, व विसरभोळया चेहऱ्याने विली लंडनच्या बंदरातून दक्षिणेकडे जाणाऱ्या जहाजांना सिगरेटी पुरवत असे. दिवसातील ठराविक वेळ त्याचे दुकान, जहाजांवरील ऑफिसर्सनी भरलेले असे. ते खोक्यांवर बसत आणि काऊंटरवर रेलून उभे रहात.

बरेचसे तरुण, त्यांच्या आयुष्यातील पहिला झुरका तेथे घेत. बऱ्याच लोकांना हवीशी असणारी जहाजावरील सर्वात उंच जागा, एखाद्या खास क्षणी, फक्त चार पेनीच्या बदल्यात त्यांना मिळून जाई. काही रुची नसलेला, लाल डोक्याचा, नाजूकसा दिसणारा विलीचा तरुण मदतनीस देखील तुम्हाला, सिगरेटच्या पाकीटाबरोबर ओठ हलले न

ह्ललेसे करत कुजबुजून, तुम्हाला काहीसा महत्वाचा निरोप सांगे, जसे की, ‘‘दक्षिण गोदीतील बेलोनाला दुसरा ऑफिसर भरती करायचा आहे. तुम्ही घाई केलीत, तर त्या जागेसाठी वेळेवर पोचू शकता.’’

पण एखादा उडून तर जाऊ शकत नव्हता.

कॅप्टन अॅशटॉन म्हणे, “ओहो, तुला विलीने पाठवले आहे. तो अगदी आकर्षक व वेगळाच मनुष्य आहे. जर तुम्ही त्याच्या कंबरेभोवती लाल पट्टा गुंडाळलात आणि डोक्याभोवती लाल रुमाल गुंडाळलात तर तो बायकांना खिळवून ठेवणाऱ्या व पुरुषांना पातळ प्लायवूडवरून चालायला लावणाऱ्या साहसी वीरासारखा दिसेल. जोन्स, इकडे लक्ष दे की, तो तुझा गळा कापून सफायरवरून पळून जाणार नाही. शेवटी तो कुठल्या जहाजावरून आला होता?’’

नेहमीसारखे त्याच्या आठ्या पडलेल्या भुवयांनी विश्वासाने वर बघत कॅप्टन जोन्स नाराज न होता म्हणाला, की त्या माणसाने बरे दिवस पाहिले आहेत व त्याचे नाव बंटर आहे.

“काही वर्षांपूर्वी, लिव्हरपूलच्या समारीया नावाच्या जहाजाचे अधिकार त्याच्याकडे होते. ते जहाज हिंदी महासागरात नाहीसे झाले आणि त्याला एक वर्षासाठी, नोकरीतून रद्दबातल करण्यात आले. तेव्हापासून त्याला, दुसरी नोकरी मिळाली नाही. तो पश्चिमेकडील महासागरातील, व्यापारी बोटींवर प्रयत्न करत होता.”

ते टेबलावरून उठता उठता कॅप्टन ॲशटॉनने विषय संपवत म्हटले, “त्यामुळे गोदीतील प्रत्येकाला तो परका वाटतो.”

जेवणानंतर कप्तान जोन्स खाली गोदीवर उतरला. त्याची उंची कमी होती आणि पाय बाहेरील बाजूस थोडेसे फाकलेले होते. त्याला बघून सर्वसाधारण माणसाचा स्वाभिमान जागृत होत नसे. पण त्याच्या हाताखालील लोकांच्या बाबतीत नेमके उलटे होत असे. तो एक अस्वस्थ करणारा कप्तान होता. किरकोळ बाबतीत त्याचे कडक धोरण असे. तो सारखा सर्वांवर पहारा ठेऊन असे व खऱ्याखोट्या कारणाने सारख्या चुका काढून, सतत त्रास देत असे. नुसते आरडाओरडा करून स्वस्थ बसणाऱ्यांपैकी तो नव्हता. तो

जोरजोरात काहीबाही बोलत राही. जर एखाद्या ऑफिसरवर त्याची गैरमर्जी झाली, तर तो त्याचे आयुष्य पुरते बरबाद करू शकत होता.

त्याच संध्याकाळी मी बंटरला भेटायला बोटीवर गेलो. सफरीसाठी त्याच्यापुढे कायकाय चांगल्या संधी आहेत, ते त्याच्याबरोबर सहानुभूती दाखवत बोललो. तो थोडा नाराज वाटला. मला वाटते, स्वतःच्या छातीत गुपित कोंडून ठेवलेला माणूस, आशावादी दृष्टीकोन हरवून बसतो. शिवाय बंटरने उत्साहामध्ये कमीजास्तपणा दाखवण्याचे, अजून एक कारण होते. अलीकडे एका गोष्टीसाठी, तो फार दुष्कीर्ती बाळगून होता -- पण त्याबद्दल नंतर कधीतरी.

त्या दुपारी कप्तान जोन्स बोटीवर होता. तो त्याच्या मुख्य सहकाऱ्याबद्दल, काहीही बोलत सुटला होता. त्यामुळे बंटर फार रागावला.

त्याने शांतपणे त्याला विचारले, “याचा अर्थ काय? एखाद्याला संशय येईल, की मी काही चोरले आहे व मी कुठल्या खिशात ते लपवून ठेवले आहे, हे तुम्हाला शोधायचे आहे. किंवा कुणीतरी तुम्हाला सांगितले आहे, की मला शेपूट

आहे व मी ती कशी लपवतो, हे तुम्हाला शोधून काढायचे आहे. एकाच दुपारी माझ्या पाठीवर माझ्याबद्दल वळणावळणाने एकसारखे बोललेले व नंतर अचानक माझ्यासमोर अवतीर्ण झालेले, मला आवडत नाही. हा काय नवीन लपाछपीचा खेळ आहे का? मी काही लहान मूल नाही. याने माझे काही मनोरंजन होत नाही.”

मी असे धरून चाललो, की जर कुणी कप्तान जोन्सला असे सांगितले, की बंटरला --- शेपूट आहे, तर काही गूढ पद्धतीने जोन्स, त्या गोष्टीवर विश्वास ठेवेल. नक्की ठेवेल. तो फारच संशयी व भोळा आहे. तो कुठल्याही गोष्टीवर विश्वास ठेऊ शकेल. कुणाचाही, कुठल्याही कारणावरून, संशय घेईल. तेच खरे धरून चालेल. गोंधळलेल्या रानटी पद्धतीने, मनात सतत त्याचे चर्वितचर्वण करत बसेल. शेवटी त्याच्या नैसर्गिक हुशारीने, शक्य असेल तेवढा काटकसरीचा दृष्टीकोन घेऊन चिक्कूपणाचा कळस असलेली कार्यवाही करेल.

बंटर मला म्हाला, की तो चिक्कू प्राणी, त्याच्या वाकड्या पायांनी जहाजभर फिरत असतो व काही क्षुल्लक कारणाने, सगळ्यांवर जोरजोराने केकाटत असतो. डेकवर

एखाद्या गरीब किटकासारखा, झुरळासारखा, मागेपुढे सरकत असतो.

मोठ्या उद्वेगाने पण संयम राखून, बंटरने त्याचे मन मोकळे केले. मग त्याच्या भारदस्तपणे काळजीपूर्वक केलेल्या दीर्घ चर्चेनंतर, काळ्याशार भुवयांनी नापसंती दर्शवत तो बोलला,

“तो थोडा वेडाच आहे. तो काही अंशी मिळून मिसळून वागण्याचा प्रयत्न करतो. पण त्यातून माझ्यावर डोळे वटारण्याशिवाय व माझा मृत्यूपश्चातच्या आत्म्याशी संपर्क साधण्यावर विश्वास आहे का, असे विचारण्याशिवाय काहीच साध्य होत नाही.  त्याला काय म्हणायचे आहे, हेच मला प्रथम कळले नाही. त्याला काय उत्तर द्यावे, हे देखील मला कळले नाही. तो म्हणाला, की हा एकदम गंभीर व रोखठोक विषय आहे. मी याचा खूप अभ्यास केलेला आहे.”

जर जोन्स बोटीवर काम न करता जमिनीवर राहिला असता तर, किंवा सागर सफरींच्यामध्ये, नक्कीच गुन्हेगारी ठगांचे भक्ष्य झाला असता. सुदैवाने तो इंग्लंडमध्ये असताना, त्याच्यापेक्षा दहा वर्षांनी मोठ्या असणाऱ्या, त्याच्या दुप्पट

जाडीच्या आगाऊ, आक्रमक स्वभावाच्या बहिणीबरोबर लांब लेटनस्टोनमध्ये रहातो. तिच्यासमोर तो थरथर कापतो. असे बोलले जाते, की सर्वसाधारणपणे ती त्याला त्रास देते आणि काही विशिष्ट प्रसंगी त्याच्या आत्म्याविषयीच्या मतांबद्दल, तिचे स्वतःचे ठाम दृष्टीकोन आहेत.

तिच्या दृष्टीने, त्याची मते निव्वळ सैतानी मते आहेत, तिने त्याला असे सांगितले असल्याचे बोलले जाते. "देवदयेने मी तुझ्यासारख्या मूर्खाला सैतानाच्या तावडीतून सोडवू शकते." जर त्याच्या बहिणीने परवानगी दिली तर -- मृतात्म्यांशी व्यक्तिगत रीत्या संभाषण करण्याची जोन्सची सुप्त महत्वाकांक्षा आहे. पण ती परवानगी द्यायला अजिबात तयार नाही. मी असे ऐकले, की लंडनमध्ये असतांना त्याने सकाळी त्याच्याबरोबर नेलेल्या प्रत्येक पेनीचा हिशोब त्याला, तिला द्यायला लागतो व प्रत्येक तासाचाही. ती त्याचे बँकेचे पुस्तकदेखील स्वतःजवळ ठेऊन घेते.

बंटर! (तो म्हणे रानटी तरुण होता व त्याच्या मूळ गावी असलेल्या पूर्वजांशी  बांधला गेलेला होता.) बंटरला कोणी वाईट वागवले, तर त्याला राग येई. कदाचित त्याच्या

पूर्वजांमुळे तो चिडलेला होता. त्याच्या काळया दाढी असलेल्या चेहऱ्याआडून, त्याचे निळे डोळे पूर्ण दुष्टपणे चकाकत. त्याच्या सावकाशीने दर्शवलेल्या बेफिकिरीतून इतकी काळी इच्छाशक्ती प्रगट होई, की मी त्यामुळे प्रभावित होत असे.

जोन्सचे गाल --- लाल होते.. चिक्कू लबाड माणूस! दुसऱ्यांना अजिबात महत्व न देऊन, तो सगळयांचा नावडता होई –-- हे काय होते? सामाजिक दृष्ट्या उच्च स्तरावरील लोकांनाच फक्त महत्व देण्याचा, नवीन प्रकारचा सामाजिक दृष्टीकोन? नाहीतर मग काय?

जोन्सच्या या मृतात्म्यांशी संवाद साधायच्या मूलगामी दृष्टीकोनाला अथवा भुतांच्या ओढीला म्हणा, मी भरपूर हसत असे. बंटर देखील स्वतःचेच बरोबर असल्याचे दाखवून हसे. पण ते जेमतेम हसणे असे व ते लगेच नाहीसे होई. मी असे म्हणू शकतो, की त्याच्याहून जास्त दुःखी अवस्थेत असलेल्या माणसाची, मी कल्पना करू शकत नाही --- तुम्ही समजून घ्याल. तो खरच दुःखी होता. सफरीमध्ये प्रसंगानुरूप, कोणतीही घाणेरडी युक्ती योजायला तो तयार असे. जोन्सने

आपल्याकडे लक्ष द्यावे, अशी अपेक्षा त्याच्या हाताखालील लोक करू शकत नसत. दुर्दैव हे दुर्दैव असते, पण त्याला अंत असतो. कलकत्त्याला जाऊन परत येण्याच्या प्रवासात जोन्सने त्याच्या पद्धतीने सांगितलेल्या अर्थहीन, स्वारस्य न वाटणाऱ्या गोष्टी ऐकणे, असहनीय रीत्या कंटाळा आणणारे असे. मृतात्मे हा खरे तर, औपचारिक व गंभीर विचार करण्याचा विषय आहे. पण जोन्सकडून तो ऐकणे, भीतीदायक होते.

गरीब बिचारा! आम्ही दोघांनी थोडा विचार केला. त्याने स्वतःला काही करून घेण्यापूर्वी --- तरी मी त्याला दिलासा देऊ शकलो नाही. मीच भयभीत झालो होतो.

त्या दिवशी बंटरला अजून एक त्रास झाला. जहाजावर सामान चढणे उतरवणे करणारा अधिकारी, काहीतरी कारण काढून त्या दिवशी अचानक तिथे आला. बंटरच्या मते तो, खरे तर केवळ काही नको त्या कुतुहलाने आला होता –--, बंटरसाठी त्रासदायक अशा काही कुतुहलाने! काही निरर्थक चर्चेनंतर तो अधिकारी बोलला,

“मित्रा, मी तुला यापूर्वी कुठेतरी पाहिले आहे. मला तुझे नाव सांगितलेस, तर कदाचित- “

बंटर चमकला –-- त्याचा गूढ भूतकाळ, त्याच्या आयुष्यातील सर्वात वाईट काळ होता. त्या माणसाने बंटरला, पूर्वी पाहिले असण्याची शक्यता होती. त्याची उत्तम स्मरणशक्ती, हे बंटरच्या दृष्टीने वाईट नशीब होते. बंटरला त्याने पूर्वी बोटीवर पाहिलेला प्रत्येक माणूस त्याला आठवला नसता. बंटर लाज सोडून कणखर बनला व त्याच्या क्वचित आढळणाऱ्या रात्रीसारख्या काळ्या उठावदार भक्कम केसांसारखा घट्ट आविर्भाव दाखवत, त्याच्याकडे वळून म्हणाला,

“माझे नाव बंटर आहे. यामुळे तुझ्या बुद्धीला काही खाद्य मिळते आहे का? आणि तुझे नाव काय आहे, हे मी विचारत नाही. मला ते माहिती करून घ्यायचे नाही. सर, त्याचा मला काही उपयोग नाही. माझ्या तोंडावर शांतपणे मला जो सांगतो, की त्याने मला पूर्वी पाहिले आहे की नाही, ते तो ठामपणे सांगू शकत नाही, तो एकतर उद्धट तरी आहे किंवा कीडामुंगीपेक्षा अधिक काही नाही आहे. हो मी किडा म्हणालो -- आंधळा किडा!”

शूर बंटर. असे बोलण्याचे धाडस त्याने केले व त्याचा प्रत्येक शब्द म्हणजे एकेक गुद्दा असल्यासारखे, हुशारीने त्याने त्या भिकाऱ्याला जहाजाबाहेर हाकलून दिले. पण त्या कणखर प्राण्याची चिकटून बसण्याची क्षमता आश्चर्यकारक होती. बंटरच्या रागावण्याने अर्थात तो काही न बोलता लाळघोटे हसू हसत, जहाजाबाहेर गेला. पण एकदा जेट्टीवर उतरल्यावर, त्याने मुद्दाम मागे वळून जहाजावरील मरणप्राय गुन्हेगाराकडे पाहिले. तो तिथे अजिबात हालचाल न करता, एखाद्या खांबासारखा खिळून राहिला आणि जहाजाच्या छोट्या खिडकीसारखे त्याचे डोळे चकाकत राहिले.

बंटर काय करू शकत होता?

त्याला चोरट्यासारखे झाले. तो जाऊन खाण्यात गुंग होऊ शकत नव्हता. उंच शिडाच्या दोऱ्यांपुढे अधिकार दाखवत व शिस्तीचा पुरस्कार करत, तो उभा राहीला व पापणी न लवता, त्या माणसाकडे बघत राहिला. असे ते उभे राहिले आणि मला माहिती नाही, की कोण पहिल्यांदा दमला. पण जेट्टीवरच्या मनुष्याला जहाजावरील कुणाला नजरेने पकडून ठेवण्याचा फायदा नसल्याने, तो लवकरच दमला,

त्याने हात वर करून ताणले व शेवटी निघून गेला. विरोधभासात्मक रीत्या, जहाजांमधील हिरा असलेल्या सफायरवर तो खूष असल्याचे बंटर मला म्हणाला. दुसऱ्या दिवशी तो समुद्रसफरीवर निघणार होता. तो जमिनीवर खूप दिवस राहिल्याने, समुद्र सफरीवर जाण्यासाठी अधीर झाल्याचे, मला समजत होते. सफरीमध्ये येणाऱ्या संभाव्य संकटांची तयारी, त्याने केली होती. पण आतापर्यंत हे स्पष्ट झाले होते, की जगाच्या दुसऱ्या भागातील हिंदी महासागरात, त्याच्यासाठी दबा धरून बसलेल्या असामान्य अनुभवासाठी तो तयार नव्हता. तिथेच, जिथे त्याचे जहाज हरवून त्याचे नशीब फुटले होते. पण ते सर्व चांगल्या साठीच झाले होते का?

त्याच्या आयुष्यातील गुप्त प्रकाराबद्दल, त्याला पश्चात्ताप होत होता. बंटर हा शुध्द चारित्र्याचा माणूस असल्याचे मला माहिती असल्याने, त्याला थोडा सुद्धा त्रास सहन करायला लागणार नव्हता. तरीही आमच्या आमच्यात आमची थोडीसुद्धा इच्छा नसताना, आम्ही सापडले जाऊ, अशी थोडीतरी भीती आमच्यात शिरली होती.

काहीतरी नको ते हातून घडल्याची, ती खंत होती. मी इतक्या विस्ताराने बंटरला काही बोललो नाही. पण तो गरीब बिचारा त्याबद्दल पुन्हा पुन्हा विचारू लागला, तेव्हा मी त्याला सांगितले, की त्याच्या स्वतःच्या अपराधीपणामुळे, त्याला बाहेर फुटू नये असे वाटणारे गुपित, प्रत्येकाला त्याच्या चेहऱ्यावर दिसेल इतके काही मोठे नव्हते. त्यामुळे त्याने फार काळजी करू नये. शिवाय आता बारा तासांनी तो समुद्रसफरीवर जाणारच होता.

तो म्हणाला की या विचाराने, त्याला दिलासा मिळाला. आता बरेच महिने जहाजावरून परत येणार नसल्याने, त्याच्या बायकोबरोबर त्याची यावेळेची शेवटची संध्याकाळ घालवण्यासाठी, तो चालू पडला. त्याच्या या सर्व रानटीपणात, बंटरने लग्न करून काही चूक केली नव्हती. त्याने अगदी सुयोग्य बाईबरोबर लग्न केले होते. ती छान छोटीशी बाई होती. ज्या अवस्थेतून त्याना जावे लागले, ते तिने कसे धैर्याने घेतले हे मला माहिती असल्यामुळे, तिचे कौतुक करावे तेवढे थोडेच होते. दिवसेंदिवस तिने कठोरपणे

ते सहन केले. एवढे दुःख, एखादी शूर बाईच पचवू शकते. ती दुःख उगाळत बसणारी नव्हती.

गेल्या काही वर्षातील वाईट नशीबामुळे, माझ्या काळया मित्राला बायकोला सोडून जाणे, फार जाणवत होते. पण ती फार दुःख करत बसली नव्हती. सफायरवरील माझ्या काळे केसवाल्या, साहसी चोरासारख्या पण प्रतिष्ठीत मित्रापेक्षा, तिने ते जास्त सहजतेने घेतले होते व ते तिच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित होत होते. किंवा असेही असेल, की तिच्यापेक्षा तिच्या नवऱ्याच्या सद्सदविवेकबुद्धीला जास्त धक्का पोचला होता. अर्थात त्याच्या आयुष्यात तिच्यापासून लपवण्यासारखे काहीच नव्हते. पण चांगली, पटतील अशी कारणे शोधणे, हे स्त्रियांच्या सद्सदविवेकबुद्धीला जास्त चांगले जमत असावे. जास्त करून व्यक्तीला कसली गरज आहे, यावरदेखील ते अवलंबून असावे.

त्यांनी ठरवले, की त्याला निरोप द्यायला तिने गोदीवर येऊ नये. भावनाशील मनुष्य म्हणाला, “तू माझ्याकडे बघशील तरी की नाही, याची मला काळजी आहे.” आणि ती हसली नाही.

बंटर फारच भावनाप्रधान होता. त्याने शेवटी घाईघाईने, तिचा निरोप घेतला. तो वेळेवर पोचला व सफायर चिखलातून बाहेर पाण्यात घालणाऱ्या, तुटक्या स्ट्राँची टोपी घातलेल्या अधिकाऱ्याला नेहमीच्या रुबाबात भेटला. विचित्र दिसणाऱ्या पण प्रतिष्ठीत अशा मुख्य मित्राशी, बंटरशी, नदीचा माणूस अगदी नम्र होता.

जहाजांचा हिरा असलेली सफायर पाण्यात सोडणारा तो म्हणाला, “मिस्टर बंटर, (फ़िलिपाइन्सची राजधानी) मनिलाला जायला निघण्यासाठी जहाज सुसज्ज आहे. चला मिस्टर बंटर, मी तुमचा आभारी आहे.” डोव्हरच्या खाडीतून जहाज सुखरूपपणे बाहेर काढणारा पायलट परत येऊन बंदरावर उतरल्यावर, त्याच्या मित्रांना म्हणाला, की या सफरीमध्ये, सफायरला छान आनंदी दिसणारा मुख्य ऑफिसर मिळाला आहे व म्हाताऱ्या जोन्सपेक्षा तो नक्कीच चांगला आहे. त्याचे नाव बंटर आहे. मला नवल वाटते, की तो एकदम कुठून उगवला! गेल्या काही वर्षात मी कप्तान असलेल्या जहाजांवर किंवा इतरत्र, मी त्याला कुठेच पाहिलेले नाही. तो काही विसरण्यासारखा  मनुष्य नाही. तसे होणे शक्य नाही. तो

चांगला खलाशी देखील आहे. म्हातारा जोन्स तर कसलीच फार काळजी करत नसे. त्या म्हाताऱ्या मूर्खाला स्वतःची भीती वाटत असेल तरच -- कारण त्याला तुझ्याबद्दल काय वाटते हे तुला सांगितल्याशिवाय, त्याने सुखासुखी तुझ्याकडून स्वतःला त्रास होऊन दिला नसता. इतर कशाहीपेक्षा म्हाताऱ्या जोन्सला, त्याचीच जास्त भीती वाटली असणार."

कॅप्टन जोन्सला स्वतःला आलेला हा आत्मिक अनुभव असेल किंवा त्याच्या जहाजाला आलेला असेल. तरी इतर घटनांचे वर्णन करून काही उपयोग नाही.

ती एक सर्वसामान्य सफर होती. सर्वसामान्य ताफा होता आणि हवाही नेहमीसारखीच होती. काळ्या मित्राच्या काम करायच्या शांत, आनंदी पद्धतीने जहाजाच्या आयुष्याला योग्य अशी दिशा दिली होती. जोराच्या वाऱ्यातही कसे माहिती नाही, पण सर्व काही शांतपणे चालू होते. मात्र पुढील चोवीस तासात एक असा काही जोरदार धक्का बसला, की सगळेजण खडबडून जागे झाले. आफ्रिकेचे दक्षिण टोक, केप ऑफ गुड होप, ओलांडल्यावर ते झाले. जहाजाच्या उंचीपर्यंत खूप मोठ्या राक्षसी लाटा आल्या गंभीर असे काही झाले

नाही, पण पण छोट्या स्वयंपाकघरातील व खोल्यांमधील काचेच्या वगैरे वस्तू फुटल्या. जहाजावर खूप मान मिळणाऱ्या मिस्टर बंटरला, दक्षिण समुद्राने फार त्रास दिला. एखाद्या बेदरकार चोरासारखे त्याच्या खोलीचे दार ढकलून पाणी आत शिरले. अनेक उपयोगी वस्तू त्याबरोबर वाहून गेल्या व त्याने इतरांना खूप भिजवले.

त्याच दिवशी नंतर दक्षिण समुद्राने सफायरला आवरण्यास कठीण असा, जोराचा तडाखा मारला की मिस्टर बंटरच्या झोपायच्या जागेखालील दोन खण त्यातील सामानासकट वाहून गेले. ते कुलुपबंद होते. डेकवर जाण्यापूर्वी त्याने ते बंद केले होते, त्यामुळे त्याने देवाचे आभार मानले.

या अचानक आलेल्या संकटाने, मिस्टर बंटर फार काळजीत पडला. पाणी आत येऊ नये म्हणून बोटीवरील सर्वांची काळजी घेणारा माणूस, सर्व वेळ बोळे कोंबत होता व पाणी निपटून टाकायचा प्रयत्न करत होता. तेव्हा मध्येच त्याने, 'हॅलो' असा दुःखी आवाज ऐकला. त्याच्या कामामध्ये आलेल्या त्या आवाजाने त्याला बंटरची व्यथा कळली.

कप्तान जोन्सला जेव्हा नुकसानीचे कळले, तेव्हा तो आतून आनंदी झाला. कारण समुद्रात जहाज चालवणाऱ्याने असे होईल, असे भविष्य सांगायचे धाडस केले होते. आणि त्यासाठीच तो त्याच्या मुख्य ऑफिसर मित्राला, बंटरला, खरेच घाबरून होता.

काळा मित्र कुठल्यातरी तऱ्हेने त्याच्या दयेवर अवलंबून असणे, कप्तान जोन्सला अभिमानास्पद वाटत होते. पण तो टीकेच्या पलीकडे होता आणि जेवढा बरोबर असू शकेल, तेवढा होता. कप्तान जोन्स फार रागावला होता आणि त्याच वेळेस त्याच्या मुख्य ऑफिसरच्या कामाच्या झपाट्याने, स्वतःला धन्य समजत होता.

तो त्याच्याबरोबर मोठ्या सहिष्णुतेने रहाण्याचा आव आणत होता. जितके जास्त तुम्ही एखाद्याशी मित्रत्वाने वागाल, तितके त्याच्या पायात आडकाठी घालायला सोपे जाते, या तत्वावर त्याचा विश्वास होता. त्याचा भुताखेतांबद्दलच्या गप्पा, अजाण अमूर्त गोष्टी, आणि अजून काही मूर्खपणाचे बरळणे, कान देऊन ऐकेल, असा कोणीतरी त्याला हवा होता. हे सर्व अगदी त्याच्या जिभेच्या टोकावर

सतत होते. तो त्याच्या एकसुरी आवाजात त्या भुताखेतांच्या निरुपयोगी गोष्टी, त्याच्या विशिष्ट पद्धतीने सांगत राही.

तो म्हणत असे, “मला माझ्या हाताखालच्या ऑफिसर लोकांबरोबर बोलायला आवडते.” सफरीच्या सुरवातीपासून शेवटपर्यंत ते बिचारे प्रतिष्ठेच्या कारणाने, त्यांचे तोंड गप्प ठेवत. ते काय होते, तर शेवटी माणसाचे असलेले पद होते.”

संध्याकाळच्या वेळी तो जास्त उत्साही होऊन, त्याची सामाजिकता वाढत जाई. आणि ते उंचावरील डेक सोडून जाणे, तेथील ऑफिसर लोकांना अशक्य होई. कॅप्टन जोन्स अचानक एखाद्या सहकाऱ्याला पकडे व गरीब बिचारा बंटर इकडे तिकडे फिरत असतांना, त्याला कोपऱ्यात गाठून, त्याच्या न संपणाऱ्या पद्धतीने, आत्म्यासंबंधी काही गूढ विधाने करत राही. जसे कीः

“पुरुष किंवा स्त्री दोघांचेही आत्मे सामान्यपणे हळूहळू जास्त चांगले होत जातात. नाही का?”

मिस्टर बंटर त्याच्या काळ्या केसांचे डोके उचलून पुटपुटत, “मला माहिती नाही.”

"कारण तुला, ते माहिती करून घेण्याची इच्छाच नाही. मला आत्तापर्यंत भेटलेल्या माणसांमध्ये, तू सर्वात हट्टी व पूर्वग्रह असलेला माणूस आहेस. मी तुला सांगितले आहे, की तू सरळ माझ्या खोलीत जा व माझ्या पुस्तकांमधून कुठलेही पुस्तक बाहेर काढ."

आता मी फार दमलो आहे, असे म्हणून बंटर स्वतःची सुटका करू बघे. पण कॅप्टन जोन्स त्याच्या पाठीवर भिकार पद्धतीने हसे व म्हणे काही लोकांना जोमाने काम करण्यासाठी जास्त झोप लागते. रात्रीचे काम करायची पाळी असतांना, मिस्टर बंटर पाय मागे घेत असते, तर गोष्ट वेगळी होती.

कॅप्टन जोन्स उसासत म्हणाला, "पण मला वाटते त्या दिवशी दुसऱ्या ऑफिसरकडून वाचण्यासाठी, तू एक कादंबरी आणली होतीस --- फेकून देण्याच्या लायकीचा खोटा मजकूर! मिस्टर बंटर, आत्मिक शक्तीत रस नसलेला असा तू असल्याचे बघून, मला दुःख होते. एकंदरीत असे आहे."

कधीकधी मध्यरात्री तो डेकवर अवतीर्ण होई. त्याच्या झोपायच्या पोषाखात, तो पाय बाहेर फाकलेला माणूस कुरूप दिसे. तेव्हा छळ केला गेल्याप्रमाणे बंटर, त्याचे हात

काळजीपूर्वक हलवत राही आणि घामाने डवरून जाई. तो अस्वस्थपणे जहाजाच्या सुकाणूशी झोपाळूपणे उभा रही व मग कॅप्टन जोन्स त्याच्या नेहमीच्या विषयावर काहीतरी बोलणे सुरु करे.

उदाहरणार्थ, सर्वसाधारण लोकांच्या नैतिकतेत सुधारणा होण्याची अपेक्षा करणे व मृतात्म्यांशी जवळीक साधणे, अशा गोष्टींवर विश्वास नसलेल्या बहुतांश मनुष्यमात्रांबरोबर तो वाद घाले. मनुष्यमात्रासाठी आत्मिक शक्ती महत्वाची आहे व ती जिवंत माणसांबरोबर संवाद साधायला उत्सुक असते, असा विचार कॅप्टन जोन्स करे. पण आत्मिक शक्तीवर विश्वासच नसेल, तर मग काय? अशा लोकांशी कप्तान जोन्सला काही देणेघेणे नव्हते. पण तो स्वतःची मते दुसऱ्यावर लादू बघे. हे अती होते.

तो सुकाणूजवळ जाऊन जोरजोराने श्वास घेऊ लागला. त्याच्या उखळीच्या सांध्यातून हालचाल करायचा प्रयत्न करू लागला. मग दाट झोपेच्या अंमलाखाली पण कडकपणे त्याने जाहीर केले,

“विश्वास बसत नाही, पण कलियुग सुरु झाले असावे.”

त्यामुळे प्रोफेसर क्रँकचा व पत्रकार चॅपचा पुरावा खोडला गेला. त्यामुळे आत्म्याचे फोटो काढण्यावर गदा आली.

कारण कॅप्टन जोन्सचा ठाम विश्वास होता, की आत्मिक शक्तींचा फोटो काढता येतो. त्याने त्यासंबधी काही संशोधन पेपरमध्ये वाचले होते. त्याचे मन शंका घेणारे नसल्याने, त्या कल्पनेने त्याच्यावर प्रचंड प्रभाव पडला होता. नंतर बंटर म्हणाला की या छोट्या माणसापेक्षा अजून जास्त विचित्र काही असू शकत नाही. त्याला फारच ढगळ होणारा झोपायचा पोषाख घालून चंद्रप्रकाशात सुकाणूच्या चाकाजवळ उभे राहून पाय घासत कप्तान जोन्स, सुंदर समुद्राकडे बघून मूठ हलवत होता.

गंजलेल्या बिजागरीप्रमाणे चिरक्या आवाजात तो ओरडला, “फोटो! फोटो!”

म्हातारा आसपासच्या लोकांना नक्की काय सांगतो आहे, ते न कळल्याने, त्याच्यामागे उभा असलेला बोटीचे चाक ताब्यात असलेला अधिकारी अस्वस्थ झाला.

मग जोन्स शांत झाला व परत त्याने सुरु केले,

“भारलेली चकती खोटे बोलणार नाही. नाही, सर.”

त्याची मते ती खरी असल्याच्या आविर्भावात बोलणाऱ्या या माणसाच्या खात्रीइतके, काहीच विनोदी नव्हते. उंच डेकवर उभा राहून, बंटर स्वतःहून मोठ्या डौलाने एखाद्या लंबकासारखा वरखाली झुलत होता. तो एकही शब्द बोलला नाही. पण तुम्हाला माहिती आहे, की त्या गरीब माणसाचा स्वतःच्या सद्सदविवेकबुद्धीवर जराही विश्वास नव्हता. मूर्ख भूत त्याच्या घशावर त्याला वेडे बनवणाऱ्या काळजीप्रमाणे बसले होते. त्याला माहिती होते की अनेक प्रसंगी, तो वेडेपणाच्या काठावर होता. कॅप्टन जोन्सची मानगूट पकडून त्याला जहाजाच्या मागील भागावर आदळायचे, असा विचार कुठल्याही शहाण्या खलाशाने मांजराच्या किंवा इतर कुठल्या प्राण्याच्याही बाबतीतही केला नसता. पण अर्धवट जागृतावस्थेत त्याच्या मनात सारखे तसेच

येत होते. चंद्रप्रकाश पडलेल्या समुद्रातून लहानसा काळा ठिपका वरती येत असलेल्या जागी त्याने स्वतःची कल्पना केली.

मला नाही वाटत, की अगदी वाईटातील वाईट क्षणीदेखील बंटरने, कधी खरेच कॅप्टन जोन्सला पाण्यात बुडवायचा विचार केला असेल. त्याचे हे सर्व वेडेवाकडे स्वप्नरंजन, कॅप्टन जोन्सची भुतासारखी बडबड थांबवण्यासाठी होते.

पण तरीही तो स्व आनंदाचा एक धोकादायक प्रकार होता. स्वच्छ शांत रात्री हिंदी महासागरात, शीड पूर्णपणे उभारलेले स्थिर जहाज नजरेसमोर आणा. त्याच्या उंच डेकवर चंद्रप्रकाश पसरलेला आहे. त्यावर काळा मित्र डौलाने, संयमितपणे मुकाट्याने खालीवर चालतो आहे आणि ती विनोदी, कुरुप, छोटी पट्टेवाल्या कपड्यातील मूर्ती 'मृत व्यक्तींशी जवळीक' असे मध्येच किंचाळत व मध्येच गुणगुणत फिरते आहे.

मला भीती वाटते आहे व ती मला विचार करायला भाग पाडते आहे. कधीकधी विचित्र पण उपयुक्त कपडे

घालून, कॅप्टन जोन्सचा मूर्खपणा चाललेला दिसतो. मृतात्म्यांची शक्ती जिवंत व्यक्तींच्या प्रत्यक्ष कामी आली, तर ते खरे उपयुक्त असल्याचे म्हणता येईल. उदाहरणार्थ पोलिसांना गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी त्याचा उपयोग झाला, तर ती खरी मदत ठरेल. त्याने शहाणपणाने तर्क केला, कदाचित खुनांची संख्या कमी होईल. मग तो त्या विनोदी, कुरूप माणसाला उत्तेजन देईल.

विश्वास नसलेल्या माणसांबद्दल वार्तालाप करून, काय उपयोग होता? त्या माहितीचा काही उपयोग नसेल, तर त्याचे काही महत्वच नव्हते. मृतात्म्यांना भावना असतात. त्या सगळ्या नुसत्या भावना असतात. परंतु बळी गेलेल्यांनी मारणाऱ्यांबद्दल दाखवलेल्या सहनशीलतेमुळे तो आश्चर्यचकित झाला. म्हणजे ते भूत असे होते, की अपराधी माणसाला धिक्कारणेही शक्य नव्हते. आणि कदाचित उजेडात न आलेले खुनी -- विश्वास असो वा नसो -- पण पछाडलेले होते. त्याबद्दल ते बढाया मारत नसावेत, नाही का?

त्याने सूडबुद्धीने, दुसऱ्याचे वाईट चिंतणाऱ्या भावाने ओरडत, स्वतःचे मन वळवत, पुढे चालू ठेवले, “जर माझा

कुणी खून केला, तर मी त्याला ते विसरु देणार नाही. मी त्याचा नाश करेन. तो मरेपर्यंत त्याला घाबरवेन.”

त्याच्या बोटीच्या कप्तानाचे दुसऱ्यांना घाबरवणारे भूत इतके मूर्खपणाचे होते, की काळ्या मित्राचे मनोरंजन झाले व तो दमून, हसत सुटला. हे त्याचे मनापासून केलेले वर्तन बघून, कप्तान जोन्स चिडला.

त्याने चिडून विचारले, “मिस्टर बंटर, यात एवढे गर्विष्ठपणे हसण्यासारखे काय आहे? दैवी आत्म्याने तुझ्याहून चांगल्या लोकांना घाबरवले आहे. तू मला त्या आत्म्यांचे भूत करण्याची संधी देणार नाहीस का?

त्याचा फार वाईट स्वर ऐकून, बंटर थोडा वेळ थांबून निघून गेला.

त्या रागावलेल्या, वेडया, आत्म्याने पछाडलेल्या माणसाने पुढे चालू ठेवले, “मला आश्चर्य वाटणार नाही, कारण मी जे सांगतो आहे, त्याची दखल एखाद्या पशूनेही घेतली असती. पण ती न घेणाऱ्यांपैकी तू आहेस. तू तुझ्या स्वतःच्या वडिलांच्या आत्म्यावर देखील संशय घेशील, यात काही संशय नाही.”

हे सर्व बंटरच्या सहनशक्तीपलीकडे जाऊन तो कंटाळल्याने आणि काही खासगी दुःखाने निराश झाल्याने, त्याचा स्वतःवरील ताबा सुटला.

तो अचानक कप्तान जोन्सकडे चालत गेला आणि त्याच्या चेहऱ्याकडे जवळून वाकून बघत राहिला. तो खालच्या आवाजात म्हणाला,

“तुम्हाला माहिती नाही, माझ्यासारखा माणूस काय करू शकतो.”

कप्तान जोन्सने त्याचे डोके मागे टाकले. पण थोडीही हालचाल करायला, तो फारच आश्चर्यचकित झाला होता. बंटर पुन्हा चालू लागला. बराच वेळ त्याची ठराविक पाऊले व बाजूच्या पाण्याचा लहानसा प्रवाह एवढे दोनच आवाज त्या समुद्राच्या शांत लाटांवर येत होते. कप्तान जोन्सने अस्वस्थपणे त्याचा घसा खाखरून साफ केला व मोठ्या अधिकाराने, सुरक्षिततेसाठी घाबरत, जहाजाच्या कडेकडेने चालायला सुरवात केली.

“मिस्टर बंटर, मुख्य शिडाचा उजवीकडील खालील कोपरा वरती ओढा. वारा उजवीकडून जवळून वहात असल्याचे, तुम्हाला दिसत नाही का?”

बंटरने ताबडतोब उत्तर दिले, “हो, सर.” याची खरे तर काही गरज नव्हती आणि वारा ठीक वहात होता. तो कप्तानाची आज्ञा पाळत होता, तेव्हा कप्तान जोन्स स्वतःशीच बडबडत आला, “जेव्हा शीड गुंडाळायची गरज आहे, तेव्हा तू डेकवर कप्तानाच्या थाटात चालत आहेस.” बोट चालवणाऱ्याला ऐकू जाईल, इतक्या जोरात तो ओरडला. मग तो माणसाच्या नजरेच्या टप्प्याच्या बाहेर जाईल, इतका मागे रेलला. जेव्हा तो पायऱ्यांच्या तळाशी पोचला, तेव्हा तो स्थिर उभा राहून विचार करू लागला.

“तो एखाद्या सभ्य माणसाच्या आविर्भावात असलेली, भयानक आक्रमक व्यक्ती आहे. मला अजून कोणी चांगले मित्र नाहीत.”

दोन रात्रींनंतर तो शांतपणे त्याच्या अंथरुणावर पडला होता, तेव्हा त्याच्या डोक्यावर सतत जड ठोके पडू लागले. (

त्याची डेकवर जरुरी असल्याची खूण ) त्यामुळे तो पूर्णपणे जागा होऊन, अंथरुणावरून उडी मारून उठला.

पायात काही न घालता, तो “काय झाले?” असे पुटपुटत, धावला. केबिनमधून बाहेर पडतांना त्याने घड्याळात पाहिले. मध्यरात्र होती. ”आता माझ्या मित्राला, माझी काय गरज पडली?” असा विचार त्याने केला.

बाहेर स्वच्छ चंद्रप्रकाशात, दंव पडलेली रात्र होती आणि जोरदार पण स्थिर झुळूक होती. त्याने रानटीपणे आजूबाजूला बघितले. तिथे जहाज चालवणाऱ्याव्यतिरिक्त कुणीच नव्हते. तो चालक त्याला घाईने म्हणाला,

“मी तुम्हाला बोलावले, सर. मी तुम्हाला आवाजाची खूण करण्यासाठी, जहाजाचे चाक क्षणभर थांबवले. मला वाटते, आपल्या मित्राला काहीतरी झाले आहे.”

कप्तानाने धारदार आवाजात विचारले, “तो कुठे आहे?”

तो मनुष्य थोडा उदास होऊन म्हणाला, “मी त्याला शेवटचे पाहिले, तेव्हा तो डेकवरील शिडीवरून पडला.”

“डेकवरील शिडीवरून पडला? तो तिथे काय करत होता? तो तिथे कशासाठी गेला होता?”

“मला माहिती नाही, सर तो बंदराच्या बाजूने चालत होता. नंतर तो माझ्या बाजूला येण्यासाठी वळला, तेव्हा --- “

कप्तान ओरडला, “तू त्याला पाहिलेस?”

“हो. मी त्याला पहात होतो. आणि मी काही आवाज ऐकला –-- काहीतरी भयानक असा आवाज. शिडाची मुख्य काठी तुटल्यासारखा --- काहीतरी त्याच्या अंगावर पडल्यासारखा.”

कप्तान जोन्स एकदम चमकला व अस्वस्थ झाला.

तो म्हणाला, “इकडे ये. कुणी त्याला पाडले का” तू काय पाहिलेस?”

“काही नाही सर, मला मदत करा. मी काही बघितले नाही. त्याने पुसटशी हाक मारली. हात पसरले. आणि मग तो --- दणका झाला. मी अजून काही ऐकले नाही. त्यामुळे मी तुम्हाला आवाजाची खूण करण्यासाठी, जहाजाचे चाक क्षणभर थांबवले.

कप्तान जोन्स बोलला, “तू घाबरलेला दिसतोस.”

“हो सर, मी खूपच घाबरलो आहे.”

कप्तानाने त्याच्याकडे रोखून पाहिले. जहाजाचा चाललेला प्रवास एक धोकादायक गूढ झाले. शांत व स्तब्ध अशा मुख्य डेकवर स्वतः जाऊन, बंटरचा शोध घेण्याचा त्याचा विचार दिसला नाही. त्याने काय केले, तर तिथे जाऊन हाका मारल्या. झोपेतून उठून लोक आले, तेव्हा तो त्यांच्या अंगावर ओरडला.

“तुमच्यापैकी काहीजणांनी डेकच्या बंदराच्या बाजूच्या शिडीवर खालील बाजूस, बंटर दिसतो आहे का ते बघा.”

त्यांच्या चक्रावलेल्या चेहऱ्यांनी त्याला ताबडतोब सांगितले, की तो तिथे पडलेला आहे. कोणीतरी घाबरुन ओरडले, “तो मेला आहे.”

मिस्टर बंटरला त्याच्या खोलीत झोपवले व दिवा लावला, तेव्हा तो खरच मेल्यासारखा दिसत होता. पण अजून त्याचा श्वास चालू असावा. उपकप्तानाला बोलावून डेकवर

जहाजाकडे बघण्यासाठी पाठवण्यात आले. व्यवस्थापकाला बंटरजवळ बोलावण्यात आले. सुमारे तासभर कप्तान जोन्स, त्याला शुद्धीवर आणायचा प्रयत्न करत होता. शेवटी मिस्टर बंटरने डोळे उघडले. पण तो बोलू शकत नव्हता. तो धक्का बसल्याने, बधीर झाला होता. कप्तान जोन्सने दिव्याचा उजेड पाडला व व्यवस्थापकाने बंटरच्या मोठ्या जखमेला मलमपट्टी केली. त्याना त्यासाठी बंटरचे बरेच काळेभोर केस कापावे लागले. हे केल्यावर थोडा वेळ त्याच्याकडे बघून, ते दोघे केबिनबाहेर गेले. जातांना कप्तान जोन्स म्हणाला, “हा रम घेतल्याचा परिणाम असावा.”

“हो सर.”

“पूर्णपणे शुद्धीत असणारा माणूस, असा शिडीवरून बटाट्याच्या पोत्यासारखा पडणार नाही. जहाज तर एखाद्या चर्चइतके स्थिर आहे.”

“सर, मला वाटते, त्याला चक्कर आली असावी.”

“असेल. पण त्याला भोवळ येऊन पडायचा, त्रास नव्हता. हा मनुष्य तरुण नसला, तरी पण ‘तारुण्याच्या जोशात’ होता. मला तरी त्याच्याइतका उत्साही, कोणी

माहिती नाही. त्याच्याकडे त्याचा दारूचा खासगी साठा होता का? तुला असे वाटत नाही का, की त्याने काही उत्तेजक पेय घेतले असेल? मला अलीकडे तो अनेक वेळा, विचित्रपणे वागतांना दिसला. मला जाणवले, की तो अन्न कमी घ्यायचा.

"सर, त्याच्या केबिनमध्ये रमची एखादी बाटली सापडली, तरी ती खूप जुनी असू शकेल. आपल्याला लागलेल्या मागील वादळानंतर, मी त्याला एक काचेचा पेला फेकताना पाहिले होते. पण त्याने काही सिध्द होत नाही. काही झाले तरी तुम्ही त्याला, दारुडा म्हणू शकणार नाही."

कप्तानने उत्तरादाखल शेवटी ते कबूल केले. पुन्हा दिवसभराच्या कामांना जुंपून घेण्यापूर्वी निदान तासभर तरी झोप मिळेल, या विचाराने, व्यवस्थापकाने पॅसेजमधून पळ काढायचा प्रयत्न केला.

कप्तान जोन्सने डोके हलवले.

"काहीतरी गूढ आहे."

“सर, आत्मिक शक्तीमुळे डेकवर आपटलेले त्याचे अंड्याच्या कवच्यासारखे डोके फुटले नाही. त्या माणसांनी मला सांगितले, की इंचभराच्या फरकाने तो बचावला.”

व्यवस्थापकाने युक्तीने पळ काढला.

कप्तान जोन्सने उरलेली रात्र व त्यानंतरचा सबंध दिवस त्याच्या व काळ्या मित्राच्या खोलीत घालवला. त्याच्या खोलीत तो त्याचे दोन्ही हात गुडघ्यांवर ठेऊन, ओठ घट्ट मिटून व कपाळावर क्षितीजसमांतर ठळक आठी घेऊन बसला. त्याच्या केस नसलेल्या डोक्यापर्यंत, सतत त्याचे हात सावकाश हलवत राहिला. काळ्या मित्राच्या खोलीत, तो अर्धवट शुद्धीत असलेला बघत, ओठांवर बोट ठेऊन बराच वेळ उभा राहिला.

तीन दिवस मिस्टर बंटर काही बोलले नाहीत. लोकांकडे ते ओळखीचे कटाक्ष टाकत होते. पण त्यांना विचारलेले प्रश्न, बहुधा त्यांना ऐकू येत नव्हते. त्यांचे अजून थोडे केस कापले गेले आणि ओल्या पट्टीने त्यांचे डोके बांधले गेले. त्याना त्यांच्या कलाने, थोडे थोडे अन्न देऊन, स्वस्थ

केले गेले. तिसऱ्या दिवशी रात्रीच्या जेवणाच्या वेळी, व्यवस्थापकाने कप्तानाला म्हटले,

"डेकच्या शिडीवरील या अर्धगोलाकार ब्रासच्या पट्ट्या फारच धोकादायक आहेत."

कप्तान जोन्स खवचटपणे म्हणाला, "खरे की काय? एखाद्या धडधाकट माणसाला बैलासारखे पडायला, त्याहून वेगळे काही कारण असणार."

व्यवस्थापक तो दृष्टीकोन ऐकून, प्रभावित झाला. हे काहीसे खरे असले पाहिजे, असा विचार त्याने केला.

कप्तान घोगऱ्या आवाजात बोलला. "आणि हवा चांगली होती, सर्व काही कोरडे होते. आणि जहाज स्थिर होते."

कप्तान जोन्स कावेबाजपणे बघत होता. व्यवस्थापकाने जेवण करतांना, अजिबात तोंड उघडले नाही. पण त्याने केलेल्या निरागस शेरेबाजीने, कप्तान जोन्स चिडला. कारण त्या ब्रासच्या पट्ट्या त्याच्या शिफारसीनुसार, डेकची

शोभा वाढवण्यासाठी सफरीवर निघण्यापूर्वी बसवल्या गेल्या होत्या.

चौथ्या दिवशी मिस्टर बंटर, बरेच बरे दिसू लागले. अर्थात अजून हालचाल करायला, राजी दिसत नव्हते. पण त्यांच्याशी बोललेले, त्यांना समजत होते. क्षीण आवाजात ते थोडे बोलू शकत होते.

कप्तान जोन्स आत येत जागरूकपणे त्याच्याकडे बराच वेळ बघत, फारशी सहानुभूती न दाखवता म्हणाला, “मिस्टर बंटर, तुम्ही तुमच्या या अपघाताचा वृतांत आम्हाला देऊ शकाल का?

मिस्टर बंटरने त्याचे गुंडाळलेले डोके थोडे हलवले आणि त्याचे निळे थंड डोळे कप्तान जोन्सच्या गोंधळलेल्या चेहऱ्यावर स्थिर केले --- आठ्या असलेले कपाळ, कशावरही विश्वास ठेवणारे डोळे व मूर्खासारखे खाली लटकलेले तोंड असलेल्या कप्तान जोन्सच्या चेहऱ्यावर --- स्थिर केले. जसे काही बंटर या सर्व गोष्टींचा आढावा घ्यायला बघत होता. कप्तानाच्या चेहऱ्याचा बारकाईने ठाव घ्यायला बघत होता.

विशिष्ट आवाजात मिस्टर बंटर शास रोधून बोलले, “तो अपघात नव्हता.”

कप्तान जोन्सने विचारले, “म्हणजे तुम्हाला पडण्याचा आजार नाही, असे तुम्हाला म्हणायचे आहे का? असे घडल्यावर तुम्ही स्वतःला जहाजाचा मुख्य अधिकारी, असे म्हणवू शकता?”

काहीतरी वाईट घडणार आहे, अशा दृष्टीने बंटर, उत्तर न देता, फक्त बघत राहिला. त्याच्या पायाखालचे जहाज थोडे हलले.

“मग कशामुळे तुम्ही पडलात?”

बंटरने स्वतःला थोडे उंच केले आणि सरळ कप्तान जोन्सच्या नजरेला नजर देत अगदी कुजबुजत्या स्वरात बोलला,

“तुम्ही --- बरोबर --- होतात.”

त्याने मागे पडून डोळे मिटले. कप्तान जोन्स त्याला अजून बोलके करू शकला नाही. व्यवस्थापक केबिनमध्ये आला, तेव्हा तो गप्प होता.

पण त्याच रात्री, निरीक्षण न करता, कप्तान जोन्स हळूच दार उघडून बंटरच्या केबिनमध्ये आला. तो फार थांबू शकला नाही. तो खूप उत्सुक व उद्दीपित झालेला दिसत होता. बंटर उदास, घाबरलेल्या अवस्थेत शांतपणे त्याच्या पलंगावर पडलेला होता. पण जागाच होता.

बंटर न हलता, खूप ताणाखाली असलेल्या अवस्थेत बोलला,

“मला वाटते तुम्ही येथे, माझे वाईट नशीब बघायला व तुमचे यश झळकवायला येता.”

वरवर सांत्वन करायचा आव आणत, पण चमकून कप्तान जोन्स उद्गारला, “शांत व्हा. मला काही सांगायचे आहे.”

“तुमचे चालू दे. तुम्ही आणि तुमची भुते! एका जिवंत माणसावर तुम्ही कुरघोडी केली आहे.”

बंटरने हे हळू आवाजात, त्यात फार भावना न ओतता, म्हटले.

कप्तान जोन्सने आश्चर्यचकित होत, कुजबुजत्या स्वरात विचारले, "तुम्हाला त्या रात्री काही अद्वितीय अनुभव आला का? तुम्ही माझ्या जहाजावर भूत आलेले पाहिले का?"

बिचाऱ्या बंटरचा बराचसा चेहरा बांधला गेला नसता, तर त्याच्या चेहऱ्यावर, विरोधाचे, लाजेचे व उबग आल्याचे भाव दिसू शकले असते. वाईट होण्याची चाहूल लागलेल्या त्याच्या चॉकलेटी भुवया, पांढऱ्या कापडावर उठून दिसतांना, त्याने मोठ्या  प्रयत्नाने तोंडातून शब्द काढले,

"हो, मी बघितले."

कप्तान जोन्स सोडून इतर कुणालाही, त्याच्या डोळ्यातील दुर्दैवी, उदास भाव पाहून, दया आली असती. पण कप्तान जोन्स विजयाने उद्दीपित होऊन, फार उत्सुक झाला होता. थोडासा घाबरलेलाही होता. तो त्या भुताखेतावर व आत्मिक शक्तीवर विश्वास न ठेवणाऱ्या माणसाकडे, त्याच्या खोल लाजिरवाण्या दुःखाकडे, जराही लक्ष न देता, ते टाकाऊ असल्यासारखा पाहू लागला. तो साधारणपणे त्याच्या आसपासच्या माणसांच्या रागालोभाची कधीच पर्वा करत नसे. यावेळी तर काय झाले, हे जाणून घ्यायला तो फारच

उत्सुक होता. त्या डोके बांधलेल्या माणसाकडे उत्सुक नजर टाकत, थोडे थरथरत त्याने विचारले,

“आणि त्याने, --- त्या भुताने, तुला खाली पाडले का?”

बंटर जोशपूर्ण आवाजात म्हणाला, “काय? मी तुम्हाला भुताने पाडण्यासारखा मनुष्य वाटतो का? मी तुम्हाला त्या दिवशी रात्री काय म्हणालो, ते आठवत नाही का? माझ्यापेक्षा बरी माणसे --- ओहो! तुमच्या जहाजासाठी माझ्याहून चांगला माणूस शोधण्यासाठी, तुम्हाला फारच काळ शोध घ्यावा लागेल.”

कप्तान जोन्सने बंटरच्या अंथरुणाकडे त्याचे ठाम बोट दाखवले.

तो म्हणाला, “तू घाबरलेला आहेस. हेच खरे आहे. तू घाबरलेला आहेस. एवढेच काय, त्याला काही भूत वगैरे दिसले नाही, तरी जहाज चालवणारा माणूसदेखील घाबरला होता. त्याला काही अमानवी असे वाटले. मिस्टर बंटर, तुम्हाला तुमच्या अविश्वास दाखवण्याची शिक्षा मिळाली आहे. तुम्ही घाबरला आहात.”

बंटर म्हणाला, “समजा, मी घाबरलो असतो, तर तुम्हाला काय वाटते, मी काय पाहिले असेल? मला पछाडेल अशा भुताची, तुम्ही कल्पना करू शकता का? तुम्ही नेहमी त्या प्राध्यापक क्रँकची व त्या पत्रकाराची गोष्ट सांगत असता, की कसे त्याला दुपारचा चहा आणून देणारे बाईचे भूत दिसले, तसे माझ्या बाबतीत शक्य नाही. नाही. मला जे दिसले, ते कसे होते, ते मी तुम्हाला सांगू शकत नाही. प्रत्येक माणसाची भुते वेगळी असतात. तुम्हाला कल्पना करता येणार नाही --- “

दम लागल्याने बंटर थांबला. कप्तान जोन्सने त्याच्या आवाजातील अंतस्थ समाधानाने शेरा मारला,

“मला नेहमी असे वाटत आले आहे, की तू म्हणजे कशासाठीही तयार असलेला मनुष्य आहेस. छापा काटा खेळण्यापासून ते खुषीने खून करेपर्यंत, कशालाही! ठीक आहे. ठीक आहे, तू घाबरला होतास, एवढे नक्की.”

बंटर अहंमन्यतेने म्ह्ााला, “मी मागे झालो. बाकी काही मला आठवत नाही.”

“जहाजाचा चालक मला म्हणाला, की काहीतरी अंगावर येत असल्यासारखा, तू मागे झालास.”

बंटरने स्पष्ट केले, “तो काहीतरी आतून बसलेला धक्का होता. कप्तान जोन्स, हे फार अवघड असल्याने, तुम्हाला समजणार नाही. तुमचे व माझे आयुष्य सारखे नाही. मी बदललो आहे हे पाहून, तुमचे समाधान झाले नाही का? कप्तान जोन्स उत्सुकतेने म्हणाला, “आणि तुम्ही अजून काही मला सांगू शकत नाही?”

“नाही. मी सांगू शकत नाही. मी सांगणारही नाही. मी सांगितले, तरी त्याचा काही उपयोग नाही. तो अनुभव ज्याचा त्यानेच घ्यावा. तुम्ही असे म्हणू शकता, की मला शिक्षा मिळाली. पण मला असे वाटत नाही.”

कप्तान जोन्स म्हणाला, “फार छान! तुम्हाला असे नाहीच वाटणार. पण लक्षात ठेवा, मी माझे निष्कर्ष काढू शकतो.”

“सर, तुम्हाला पाहिजे ते करा. पण तुम्ही जे काही बोलाल, त्याने मी मुळीच घाबरणार नाही. तुम्ही भूत नाही आहात.”

"अजून एकच. तुम्ही त्या दिवशी रात्री आत्मिक शक्तीबद्दल जे काही म्हणालात, त्याचा याच्याशी काही संबंध आहे का?"

बंटर त्रासलेला व कोड्यात पडलेला दिसला.

"मी काय म्हणालो?"

"तुम्ही मला म्हणालात की तुमच्यासारखा माणूस काय करू शकतो, याची मला कल्पना नाही."

"हं. आठवले."

कप्तान जोन्स म्हणाला, "फार छान! माझी आता खात्री झाली. मला आनंद आहे, की मी तुमच्यासारखा नाही. आत्म्यांशी माझा संवाद होऊ शकतो, ही माझी खासियत असल्याबद्दल, मी अजूनही ठासून सांगेन. हो सर, पण त्या पद्धतीने नाही."

गरीब बिचाऱ्या बंटरने हताश होऊन काही आवाज काढला.

"यामुळे मला वीस वर्षांनी म्हातारा झाल्यासारखे वाटते आहे."

कप्तान जोन्स मुकाट्याने निघून गेला. आत्मिक शक्तीच्या जाणीवेने तो जादापणा करणारा उद्धट माणूस नम्रतेने वाकला, यामुळे तो खूष झाला. ही पूर्ण घटना ही त्याच्या दृष्टीने, अभिमानास्पद व समाधान देणारी होती. त्याला काळ्या मित्राबद्दल काहीसा आदर वाटू लागला. हे खरे होते, की पुढील भेटींमध्ये बंटर फार नम्र व त्याच्यात फरक पडलेला, दिसू लागला. आत्मिक शक्तीपासून संरक्षणाच्या बाबतीत, तो कप्तानावर अवलंबून राहू लागला. तो त्याला असे निरोप पाठवू लागला, "मला फार उदास वाटते आहे." मग कप्तान जोन्स बंटरच्या गरम खोलीत येऊन तासनतास बसे. त्याला बंटरने असे बोलावल्याबद्दल अभिमान वाटे.

कारण मिस्टर बंटर आजारी होता. आणि खूप दिवस त्याचे अंथरूण सोडू शकत नव्हता आत्मिक शक्ती जिवंत माणसाशी संवाद साधू शकते, यावर तो विश्वास ठेऊ लागला --- फार मनापासून नव्हे --- तशी अपेक्षा त्याच्याकडून करणे चुकीचेच होते --- थोड्या गंभीरपणे का होईना, पण ठामपणे, असे म्हणता येईल. आपल्या पृथ्वीत पुरल्या गेलेल्यांशी संपर्क साधणाऱ्या कप्तान जोन्सप्रमाणे, मात्र नव्हे. अगदी पूर्णपणे

नव्हे, पण काही अंशी तरी तो आत्मिक शक्तीचा पुरस्कर्ता झाला. एका दुपारी जहाज आधीच बंगालच्या खाडीच्या उत्तरेस शिरले होते, व्यवस्थापकाने कप्तानाच्या केबिनचे दार ठोठावले. आणि ते न उघडता, म्हटले,

“सर, मिस्टर बंटर, तुम्हाला क्षणभर बोलावत आहेत. ते काही वेगळ्या अवस्थेत असावेत.”

कप्तान जोन्स ताबडतोप उडी मारून उठला.

“हो. त्याना सांगा, मी येतो आहे.”

त्याने विचार केला, ’त्याला अजून काही आत्मिक साक्षात्कार झाला की काय --- ते सुद्धा दिवसा उजेडी?’

तशी आशा वाटून तो खूष झाला. अगदी तसेच झाले असेल, असे नाही. तरीही त्याने बंटरला खुर्चीत बसून, रेलून पडलेले पाहिले. बरेच दिवस त्याची तब्येत चांगली होती. पण तो अजून डेकवर आला नव्हता --- गरीब बिचाऱ्या बंटरला काहीतरी पुरेसे विचित्र सांगायचे होते. त्याने त्याचा चेहरा हाताने झाकून घेतला होता. दुःखी झाल्यासारखे त्याचे पाय सरळ ताणले गेले होते.

"आता काय झाले?" कप्तान जोन्स दयाळूपणे ओरडला. कारण एखाद्या गरीब पाळीव प्राण्यासारख्या झालेल्या बंटरला बघायला, त्याला खरे तर आनंद होत होता.

आजाराने ग्रस्त माणूस हातवारे करून ओरडला,

"बातमी? खरे तर बातमीच, कप्तान जोन्स. घबराट व सच्चेपणा कोण नाकारू  शकेल? दुसरा कोणी असता, तर मेलाच असता. तुम्हाला जाणून घ्यायचे आहे का, मी काय पाहिले? मी तुम्हाला एवढेच सांगू शकतो, की ते बघितल्यापासून माझे केस पांढरे होऊ लागले आहेत."

बंटरने चेहऱ्यावरून त्याचे हात काढले. आणि खुर्चीच्या दोन्ही बाजूला ते मृत असल्यासारखे लोंबकळू लागले. अंधार होत आलेल्या केबिनमध्ये, तो मोडून पडल्यासारखा दिसत होता.

कप्तान जोन्स अडखळत बोलला, "तू काही बोलू नकोस. केस पांढरे होऊ लागले आहेत? मी दिवा लावतो."

जेव्हा दिवा लागला, तेव्हा ते चमत्कारिक दृष्य सरळ पुढे आले. त्याच्या अंगाच्या भोकांमधून भयानक भीतीदायक,

रागीट आत्मिक शक्ती जणू बाहेर पडत होती. त्याच्या गालांजवळ व डोक्याजवळ जणु चंदेरी धुके तरळत होते. त्याची छोटीशी दाढी, पिकासारखे उगवलेले, काळे नसून करडे असलेले, जवळजवळ पांढरे केस!

थरथरणारे, चेहरा उतरलेले मिस्टर बंटर कामासाठी डेकवर आले, तेव्हा त्यांनी स्वच्छ दाढी केलेली होती. पण त्यांचे डोके पांढरे होते. हात आश्चर्याने गुंतलेले होते. सगळे आपापसात कुजबुजू लागले, "दुसरा मनुष्य" सर्वसाधारणपणे चमत्कारीकपणे असे ठरले, की काळ्या मित्राने 'काही पाहिलेले आहे.' फक्त जहाजाचा चालक म्हणत होता, तो 'कशाने तरी दचकला आहे.'

या दोन्हीत फारसा फरक नव्हता. दुसऱ्या बाजूला प्रत्येकाने कबूल केले, की त्याला थोडी शक्ती आल्यावर त्याचा हालचाली, पूर्वीपेक्षा झटपट झाल्या आहेत.

एक दिवस, कलकत्त्यात कप्तान जोन्सने एका पाहुण्याला पांढऱ्या केसांच्या काळ्या मित्राकडे निर्देश करून जाहीरपणे सांगतांना ऐकले,

"तो मनुष्य आयुष्याच्या महत्वाच्या टप्प्यावर आहे."

अर्थात जेव्हा मिस्टर बंटर लांब होते, तेव्हा मी मिसेस बंटरला माझी काही कामासाठी गरज आहे का, हे विचारायला, दर शनिवारी बोलावत असे. असे समजले जाई, की मी ते काम करेन. तिला त्याच्याकडून खर्चासाठी अर्धा पगार मिळत असे. तो आठवड्याला साधारण एक पौंड इतका असे. तिने पूर्वेच्या टोकाला एका शांत जागी, एक खोली घेतली होती.

मग मी असे ऐकले, हे पुष्कळसे खरे होते, की बंटरला पश्चिम समुद्री व्यापार सोडून द्यायला लागल्यावर, म्हणजेच त्याचे जहाज व नशीब बुडाल्यावर, तो सर्व कठीण सफरींवर मुख्य ऑफिसर म्हणून जाऊ लागला --- त्या काळी बंटर सकाळी सात वाजता एक पेलाभर गरम पाणी व कोरडा पाव खाऊन बाहेर पडे.

विशेषतः ते विचारात पडणार नाहीत, ज्यांना मिसेस बंटर माहिती आहेत. मी त्या वेळी त्यांचे असे काहीतरी पाहिले होते, की ते पाहिल्यावर माझ्या अंगावर शहारा आल्याचे मला आठवत होते. त्या शूर बाईने तेव्हा कसे दिवस

काढले असतील, याची आपण कल्पनाही करू शकणार नाही.

सफायरने कलकत्ता सोडल्यावर, ती खूप काळजी करत असे. ती मला म्हणत असे, “बिचाऱ्या विन्स्टनसाठी हे इतके भयानक आहे” --- विन्स्टन हे बंटरचे नाव आहे --- मी तिला हर प्रकारे समजवण्याचा प्रयत्न केला. नंतर तिला एका कुटुंबातील लहान मुलांना शिकवण्याचे काम मिळाले. तिचा अर्धा दिवस तिथे जाऊ लागला. हा व्यवसाय तिच्यासाठी चांगला ठरला.

कलकत्त्याला तिला आलेल्या पहिल्या पत्रात बंटरने तिला सांगितले, की तो डेकवरील शिडीवरून पडला आणि डोक्याला लागले. पण देवाच्या दयेने हाडे मोडली नाहीत, एवढेच. अर्थात तिला त्याच्याकडून, दुसरी पत्रेही आली पण त्या भटक्या बंटरने अकरा महिन्याच्या दीर्घ काळात मला एकही ओळ लिहिली नाही. त्यामुळे मी सहज असे समजलो, की सर्व काही ठीक चालले आहे. काय चालले आहे, याची कोणाला कल्पना होती?

नंतर एक दिवस मिसेस बंटरला शहरातील वकिलाच्या कार्यालयातून पत्र आले. त्यात तिचे काका वारल्याचे लिहिले होते --- तिचे वयस्क वाईट स्वभावाचे काका --- निवृत्त शेअर दलाल, निष्ठुर, जुन्यापुराण्या वस्तूसारखा, वर्षानुवर्षे जगलेला --- मला वाटते तो जवळजवळ नव्वदीचा होता. मला जर या मिनिटाला या म्हातारड्या भुताला भेटायची वेळ आली असती, तर मी त्याचा गळा आवळून, त्याला ठारच केले असते.

बंटरशी लग्न केल्याबद्दल त्याच्या पुतणीला, या नरपशूने कधीच माफ केले नाही. जेव्हा लोकांनी त्याला सांगितले, की त्याची चाळीस वर्षाची पुतणी लंडनमध्ये विपन्नावस्थेत आहे, तेव्हा तो फक्त म्हणाला, “त्या मूर्ख मुलीला चांगला धडा मिळाला.”

मला वाटते त्याला तिला उपाशी अवस्थेत, तसेच ठेवायचे होते. आणि लगेच तो पशू मृत्युपत्र न करता, वारला. त्याला ती पुतणी सोडून कुणी नातेवाईक नव्हते. पण आता बंटर श्रीमंत असामी झाले होते.

तरीही मिसेस बंटर हृदयद्रावक पद्धतीने खूप रडली. इतर कुठल्याही बाईच्या बाबतीत ते ढोंग ठरले असते. तिला अर्थात नवऱ्याला कलकत्त्याला हे कळवायचे होते. पण मी तिला हातातील ‘नियतकालिक’ दाखवले. त्यात असे लिहिले होते, की जहाज आठवड्यापूर्वीच घरी यायच्या मार्गाला लागले  आहे. त्यामुळे आम्ही थांबून बसून राहिलो आणि रोज प्रिय विन्स्टनबद्दल बोलत राहिलो. एका खाडीच्या मुखाकडून येणाऱ्या डाकबोटीवरील निरोपानुसार सफायर सुखरूप असल्याचे शंभर दिवसांपूर्वीच समजले होते.

ती म्हणाली, ‘‘मी त्याला भेटण्यासाठी डंकीर्कला जाते आहे. डंकीर्कला सफायरमधून ज्यूटची खोकी उतरवायची होती. तेव्हा त्या बाईचा ‘हुशार मित्र’ म्हणून मला, तिचा मार्गदर्शक बनून जायचे होते. ती देखील मला आजपर्यंत, तिचा ‘हुशार मित्र’ म्हणते. पण मी काही लोकांना माझ्याकडे, मी फसव्या व लबाड असल्या सारख्या, विचित्र नजरेने बघतांना पाहिले आहे.

डंकीर्कला मिसेस बंटरला एका हॉटेलमध्ये स्थिरस्थावर केल्यावर, मी गोदीकडे निघालो --- ती उतरती

दुपार होती --- आणि आश्चर्य म्हणजे जहाज तिथे आलेले होते. जोन्स किंवा बंटर किंवा दोघांनीही ते मोठ्या कष्टाने, खाडीतून इथे आणले असावे. ते परवाच इथे येऊन दाखल झाले होते आणि ताफ्यातील लोकांचे पगारवाटप आधीच झाले होते. मी त्यावरील, रजेवर घरी जाणाऱ्या दोन मुलांना भेटलो. एका फ्रेंच माणसाच्या हातगाडीवर सामान लादून ते एखाद्या मुक्त पक्ष्याच्या आनंदात चालले होते. मी त्याना जहाजावर बंटर आहे का, ते विचारले.

त्यातील एकजण म्हणाला, “ते जेट्टीवर जहाजाच्या नांगरणीकडे लक्ष देत आहेत.” मी त्याचे पांढरे डोके पाहिले, तेव्हा मला किती धक्का बसला असेल, याची तुम्ही कल्पना करू शकता. मी त्याला फक्त एवढेच सांगू शकलो, की त्याची बायको शहरातील हॉटेलमध्ये आहे. तो मला सोडून ताबडतोब त्याची टोपी आणण्यासाठी गेला. त्याच्या चपळ हालचाली बघून, मला नवल वाटले.

आयुष्याच्या महत्वाच्या टप्प्यावर असलेल्या काळ्या मित्राची, मुद्दाम रुबाबात डौलदारपणे चालण्याची ऐट बघून, लोकांना आश्चर्य वाटे. सर्व वयस्क माणसांमध्ये हा पांढरे

केसवाला नवलपूर्ण रीत्या चपळ म्हणून उठून दिसे. मला तो पूर्वीपेक्षा जास्त चपळ वाटला नाही. केसांच्या रंगामुळे काहीसा फरक पडणे, घडून आले होते. डोळयांचेही तसेच. काळे केसवाला लबाड माणूस, थंडपणे, भीतीदायकपणे, झुडुपाआडून आकर्षक नजर टाकत असे. तोच आता पांढऱ्या भुवयांखालून, निरागस मुलासारखी स्वच्छ चकाकीत नजर टाकू लागला होता.

अधिक उशीर न लावता, मी त्याला मिसेस बंटरच्या खासगी खोलीत घेऊन गेलो. तिने तिच्या मेलेल्या राक्षसी काकांबद्दल, डोळ्यातून एक अश्रू ढाळला व नंतर ती तिच्या विन्स्टनला आलिंगन देऊन भेटली. तिने त्याला सांगितले, की त्याने परत मिशा वाढवल्या पाहिजेत. त्या बाईने सोफ्यावर बसकण मारली व मी बंटरच्या वाटेतून बाजूला झालो. त्याने त्याचे मोठे हात हलवत, खोलीत फेऱ्या मारायला सुरवात केली. त्याने त्या संध्याकाळी भावनातिरेकाने, खूप वेळा जोन्सला या हातापासून त्या हातापर्यंत फाडून काढले.

“मी पडलो? अर्थात मी पडलो. त्या मूर्खाने बसवलेल्या ब्रासच्या पट्टीला अडखळून, मागे तोल जाऊन मी

पडलो. माझा शब्द लक्षात ठेव. मी जहाजावर देखरेख करत, डेकवरील ती शिडी चढत होतो. मला समजेना की मी हिंदी महासागरात आहे, की चंद्रावर. मी वेडा झालो होतो. माझे डोके काळजी करून, चक्रावून गेले होते. मी तू दिलेली औषधाची आश्चर्यकारक पुडी काढली. ( हे तो मला म्हणाला. ) मागच्या वादळात, तू मला दिलेल्या सर्व बाटल्या खणातून बाहेर पडून फुटून गेल्या. मी जेव्हा आरडाओरडा ऐकला, तेव्हा मला स्वतःला बदलण्यासाठी काही कोरड्या वस्तू मिळाल्या. जेव्हा मी कप्तान जोन्सचा आरडाओरडा ऐकला, की सगळयांनी इकडे या, तेव्हा मी चक्कर येण्यासाठी तयार झालो.

“नाही. इकडे बघ ---- फसवणे चांगले नाही. पण एखाद्याला तसे करण्यावाचून, काही इलाजच नसेल तर काय! तुला माहिती आहे, जेव्हापासून मी पश्चिमी समुद्री व्यापारी बोटींवरील तरुण लोकांकडून हाकलला गेलो, फक्त माझ्या काळया पांढऱ्या केसांमुळे! तेव्हापासून मला नवीन जहाजावर नोकरी मिळणे किती दुरापास्त झाले होते, याची तुला कल्पना आहे. माझ्याकडे काही तरणोपाय उरला नव्हता. आम्ही दोघे

नवरा बायको एकाकी झालो होतो --- तिने माझ्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला --- तिची गरज म्हणजे कोरड्या पावाचा तुकडा, एवढीच उरली --- “

त्याने हॉटेलमधील फ्रेंच टेबलावर बंद मुठीने जोरात दणका दिला.

“मी तिच्यासाठी, रक्तपात करणारा लुटारू चाचाही झालो असतो. जेव्हा मला तू दिलेले नवलपूर्ण औषध सापडले --- तेव्हा मी गुपचूप माझे केस पांढरे रंगवले.

त्याने स्वतःला तपासले.

“आणि तसेही त्या मला मिळालेल्या संधीचा फायदा मी घेतला. ते औषध जालीम होते. समुद्राच्या खारट पाण्यानेही तो पांढरा रंग जात नव्हता. तुमचे केस असेपर्यंत तो तसाच राहिला असता.”

मी म्हणालो, “ठीक आहे. पुढे सांगत रहा.”

त्यानंतर तो जोन्सबद्दल इतक्या रागारागाने बोलू लागला, की त्याची बायको घाबरून गेली. आणि मी डोळ्यात पाणी येईपर्यंत हसलो.

“अत्यंत कद्रू अशा कप्तानाच्या मर्जीस उतरायचे, म्हणजे काय दिव्य होते, याचा तू विचार कर. तू कल्पना करू शकतोस, की त्या लंगड्या जोन्सने माझ्यावर काय पाळी आणली. मला माहिती होते, की एखाद्या आठवड्यात केस पांढरे होतील. आणि जहाजावरील ताफा? त्यांच्याबद्दल तू काही कल्पना करू शकतोस?

मी सगळ्यांसमोर नाटक सुरु ठेवले. आम्ही कलकत्त्याला येईपर्यंत काय माझे आयुष्य होते! आणि एकदा तिथे पोचल्यावर, मी ते भिरकावून दिले. अर्धपगार बंद झाला. ॲनी इथे एकटी, पैशांशिवाय कशीबशी जगणारी --- आणि मी पृथ्वीच्या दुसऱ्या टोकाला, काय समजलास?”

मी दिवसातून दोनदा दाढी करायचा विचार केला. पण मी माझे डोके भादरू शकत होतो का? काही उपाय नव्हता --- काहीच उपाय नव्हता. मी जोन्सच्या जहाजावरून उतरल्याशिवाय, आणि नंतरही --- असे सगळे विचार माझ्या डोक्यात खदखदत असतांना, मी तिथे रात्री कसा काय झोपत असेन, याचे तुला नवल वाटेल. मी स्वतःला पडतांना पाहिले --- मग दणका --- आणि पूर्ण अंधार.

जेव्हा मी शुद्धीवर आलो, तेव्हा ती डोक्याची जखम माझा शहाणपणा दाखवत होती. मला सगळ्याचा इतका उबग आला होता, की मी दोन दिवस कुणाशी काही बोललो नाही. त्याना वाटले, की माझ्या मेंदूला धक्का बसला आहे. मग माझ्यासारख्या मूर्खावर, भुताने परिणाम केला असल्याची अफवा उठली. मी विचार केला, “ओहो, जोन्सला भुते आवडतात. ठीक आहे. आता तुला स्मशानाच्या पलीकडील नाट्य खेळावे लागेल.”

“मी गोष्ट शोधून काढायचा, त्रासही घेतला नाही. मला हवे असते, तरी मी भुताची कल्पना करू शकलो नसतो. मी प्रयत्न केला असता, तरी सतत झोपून राहू शकलो नसतो. त्यासाठी मी त्यालाच कामाला लावले. तुला माहिती आहे का, तो स्वतहून शांतपणे, त्या कामाला लागला. असा समज, ज्यासाठी मी कधी काळी त्याला मरणांतिक छळले होते आणि --- “

मिसेस बंटर सोफ्यावरून म्हणाली, “बापरे, भयानक माणूस!” मग तिथे सामसूम झाले.

थकलेल्या आवाजात बंटर परत बोलला, “मग घराच्या वाटेला लागल्यावर, त्याने माझे डोके खाल्ले नाही. तो माझ्यावर प्रेम करू लागला. त्याला माझा अभिमान वाटू लागला. मी बदललो. मला साक्षात्कार झाला. तुला माहिती आहे का, नंतर तो कसा झाला? त्याला असे हवे होते, की त्याने व मी मिळून भुतांशी संवाद साधावा, ( मला ज्याने बळी बनवले, त्या माझे केस पांढरे केलेल्या भुताशी. ) तो म्हणाला की ते भूत, त्याच्याशी मित्रत्वाने बोलले.

तो म्हणाला, “बंटर, नाहीतर काही कल्पना नसतांना तुला, परत साक्षात्कार होईल. हे अचानक डोक्यावर किंवा इतर कशावर होईल. त्या आत्म्यांच्या जगाला आपण शांत केल्याशिवाय, तू सुरक्षित असणार नाहीस.”

“एखाद्या वेड्याला तुम्ही असे करू शकाल? नाही ना? --- ”

मी काहीच बोललो नाही पण मिसेस बंटर, अगदी ठाम आवाजात म्हणाली,

“विन्स्टन, मला वाटते, तू परत त्या जहाजावर मुळीच जाऊ नयेस.”

मी म्हणालो,

“ते तसले काही तू करू नयेस. त्या जहाजाच्या जवळदेखील जाऊ नकोस.

तो शांतपणे त्याचे डोळे खाली करून हसत उभा राहिला व बोलला,

“पछाडलेले जहाज!”

मी पुस्ती जोडली, “आणि तुझे शेवटचे”

त्याला आम्ही रात्रीच्या गाडीने परत घेऊन गेलो. तो अगदी स्तब्ध होता. पण खाडी ओलांडल्यावर, आम्ही दोघे डेकवर सिगरेट ओढतांना, तो अचानक माझ्याकडे वळला त्याचे दात दाखवत बोलला,

”त्याला हे कधीच कळणार नाही, की तो डेकवरून पाण्यात फेकला जाण्याच्या किती जवळ होता!”

त्याला कप्तान जोन्स, असे म्हणायचे होते. मी काही बोललो नाही.

पण मला समजल्याप्रमाणे कप्तान जोन्सने, त्याच्या काळ्या मित्राच्या नाहीसे होण्याबद्दल, खूपच हवा निर्माण

केली. त्याने फ्रेंच पोलिसांना देशभर त्याच्या प्रेताचा शोध घेण्यास सांगितले. मला वाटते, शेवटी त्याला त्याच्या मालकाच्या कार्यालयाकडून, हे सर्व थांबवण्याबद्दल तंबी देण्यात आली. ते ठीक झाले. त्याला त्या चमत्कारिक घटनेबद्दल कधी काही समजले असेल, असे मला वाटत नाही. आजपर्यंत, तो प्रयत्न करतो आहे. (आता तो निवृत्त झाला आहे. आणि त्याचे संभाषण तार्किक व मुद्देसूद राहिले नाही.) तो एके काळी असलेल्या त्याच्या काळया मित्राची, गोष्ट सांगायचा प्रयत्न करतो. धोकेबाज, सभ्यपणे गुन्हेगार असलेला, काळेभोर केस असलेला, पण ते भूतबाधेने पांढरे झालेला, असा तो काळा मित्र! आत्मिक साक्षात्कार झालेला व स्वतःला जखमी करून घेतलेला, काळया पांढऱ्या केसांचे व डेकवरील शिडीचे काय? त्याच्या स्वतःच्या भावनांचे व दृष्टीकोनांचे काय? या सर्वांचा अर्थ लावणे कठीण आहे. जर त्याची बहीण (ती अजूनही तशीच कडक आहे.) असती, तर तिने हे सगळे हुकुमशहाच्या थाटात, संपवले असते. "तो काय म्हणतो, ते तुम्ही मनावर घेऊ नका. त्याच्या डोक्यात सैतान आहेत."

Pomegranate Seed

By Edith Wharton

Amerika

# डाळींब बी



शार्लोट अ‍ॅशबॉय दाराशी थांबली. मार्चमधील उन्हावर अंधाराने कब्जा करायला सुरवात केली आणि शहरातील रस्ते, गर्दीच्या कोलाहलाने ओसंडून वाहू लागले. ती त्याकडे पाठ करून, क्षणभर जुन्या पद्धतीच्या संगममरवरी हॉलसमोर उभी राहिली. तिने कुलुपात किल्ली घातली. आतील दारांच्या चौकटीवर लावलेल्या लांबलचक पडद्यांनी

आतील उजेड मंद केल्याने, त्यातून आतील दृष्य ठळकपणे दिसत नव्हते. केनेथ अ‍ॅशबॉयशी लग्न केल्यानंतरच्या पहिल्या महिन्यात, व्यापार आणि फॅशनच्या गजबजलेल्या रस्त्यापासून दूर, शांत घराकडे परतायला, तिला फार आवडत होते. आत्माहीन गर्दीचे न्यूयॉर्क, तेथील झगमगते दिवे, दबलेली बेसुमार गर्दी, दाटीवाटीची घरे, तेथील आयुष्य आणि मने यांच्याशी तुलना करता, येथील निवांत घरे तिला आतून हलवत असत. ऐन वादळात तिला तिचे छोटेसे बेट मिळाले होते --- किंवा तिला असे वाटत तरी होते. आता गेल्या काही महिन्यात सारे काही बदलले होते. ती नेहमी दाराशी थबकत असे. ती मोठ्या प्रयत्नाने आत शिरे.

ती तिथे उभी राहून, आतले दृष्य मनात साठवू लागली. जुनी चित्रे लावलेला हॉल, शिडीसारखे जिने, डावीकडे तिच्या नवऱ्याचे गबाळे वाचनालय. पुस्तके, पाईप व ध्यान करण्यासाठी खुणावणाऱ्या जुन्या हातांच्या खुर्च्या. तिला ती खोली किती आवडत असे! मग वरती तिची स्वतःची उठाबसायची खोली होती. तेथील फर्निचर किंवा शोभेच्या वस्तू, केनिथची पहिली बायको वारल्यापासून,

बदलले नव्हते. कारण तेवढे पैसे नव्हते. पण शार्लोटने फर्निचर हलवून, काही पुस्तकांची भर घालून, नवीन दिवा व टेबल आणून, स्वतःचा असा वेगळा ठसा उमटवला होता. काही अंतरावर स्वतंत्र रहाणाऱ्या व ती थोडीफार ओळखत असलेल्या, केनिथच्या आईला ती पहिल्यांदा भेटली, तेव्हा तिने तिच्याकडे निरागस द्वेषाने पाहिले. कारण तिची खोली, बरोबर तिला जशी हवी होती, तशी होती. आणि आता एक वर्षाहून जास्त वेळ, ती तिची झाल्यासारखेच तिला वाटत होते --- तिथे हिवाळ्यातील संध्याकाळी, मावळतीच्या वेळी, ती घाईने परतून येत असे व शेकोटीशेजारी वाचत बसत असे. तिच्या नवऱ्याचा पदरव ऐकेपर्यंत, ती तिथे छान खोलीतील टेबलावर बसून, चिठ्ठ्यांना उत्तरे देत असे व तिच्या सावत्र मुलांच्या वह्या तपासत असे.

कधीकधी मित्रमंडळी टपकत. कधीकधीच --- नेहमी ती एकटीच असे. ते तिला आवडे. सकाळी त्यांची तातातूट झाली, तेव्हा तो काय म्हणाला, जेव्हा तो जिना चढून येईल, तेव्हा तो काय म्हणेल, तिला एकटीला बघून, तिला पटकन

मिठीत घेईल, असा विचार करत तिला ती केनिथबरोबर असल्यासारखेच वाटे.

तिला हॉलमधील टेबलावर, जे पत्र सापडेल किंवा सापडणार नाही, --- या एकाच गोष्टीचा ती विचार करत होती. आता तिथे ते आहे की नाही, हे बघितल्याशिवाय तिच्या डोक्यात दुसरा विचार येऊ शकत नव्हता. नेहमी पत्र तसेच असे --- चौकोनी, करडे पाकीट व त्यावर ‘केनिथ ॲशबॉय एसक्वीर’ असे मोठ्या पण पुसट अक्षरात लिहिलेले! पहिल्यापासून शार्लोटला याचे नवल वाटे, की जो कुणी ही पत्रे लिहितो, तो इतके पुसट का लिहितो! पत्ता नेहमी असा लिहिलेला असे, की पेनातील शाई संपत आलेली आहे. किंवा ते लिहिणाऱ्याचे मनगट दुखते आहे. आणखी नवलपूर्ण गोष्ट अशी होती, की अक्षरांचे वळण पुरुषी असूनही त्यात ठळक बायकीपणा दिसत असे. काही हातांचे वळण पहिल्यांदा पुरुषी वाटते, तर काही पुरुषी किंवा बायकी दोन्ही वाटत नाहीत. त्या करड्या पाकिटावरील अक्षर नक्की एखाद्या बाईचेच वाटते. पाकिटावर नाव सोडून काही नसे. तिकीट नाही, पत्ता नाही. बहुतेक ते आणून टाकले जाई. पण

कोणाकडून? पत्रपेटीत ते टाकले जाई. नोकराणी जेव्हा दारे बंद करून दिवे लावी, तेव्हा ते काढत असे. पण ते नेहमी संध्याकाळीच येत असे. शार्लोटला ते पडलेले दिसे. तिचे लग्न झाल्यापासून असली अनेक पत्रे आली, तरी तिला ते विशेष खास असे वाटे. कारण --- नेमके सांगायचे, तर ती सात आली असली --- तरी ती इतकी एकसारखी असत, की ती एकमेकात मिसळून जात आणि त्यांचे एकच पत्र तयार होई.

पहिले त्यांच्या मधुचंद्रानंतर आले --- वेस्ट इंडीजचा तो लांबलेला प्रवास --- त्यानंतर दोन महिन्यांनी ते न्यूयॉर्कला आले, तेव्हा तिच्या नवऱ्याबरोबर संध्याकाळी उशीरा घरात शिरतांना, ते त्याच्या आईकडून जेऊन आले होते. तिने एकटीनेच हॉलमधील टेबलावर ते करड्या रंगाचे पाकीट पडलेले पाहिले. केनिथने बघण्यापूर्वीच, तिची नजर त्यावर पडली आणि तिच्या मनात पहिला विचार आला, “हे अक्षर मी यापूर्वी कुठेतरी पाहिलेले आहे. पण कुठे ते तिला आठवेना. फक्त अक्षराचे वळण तिला आठवत होते. पण नंतर तिने त्याबद्दल काही विचार केला नाही. जेव्हा तिच्या

नवऱ्याची नजर त्यावर पडली, तेव्हा ती त्याच्याकडे बघत नव्हती. ते क्षणार्धात घडले --- त्याचे पत्राकडे बघणे, ते उचलून ते पुसट अक्षर वाचण्यासाठी डोळयांजवळ नेणे आणि अचानक शार्लोटच्या गळयातील हात काढून घेणे, तिच्याकडे पाठ करून लांब दिव्याजवळ निघून जाणे. ती आवाजाची, काही उद्गाराची वाट बघत राहिली. त्याने पत्र फोडायची वाट बघत राहिली. पण त्याने काही न बोलता, ते खिशात टाकले. तो तिच्या मागोमाग वाचनालयात गेला. तिथे ते शेकोटीजवळ बसले व त्यांच्या सिगरेटी पेटवल्या. तो खुर्चीत डोके मागे टाकून गप्प राहिला. त्याचे डोळे शेकोटीजवळील जमिनीवर खिळलेले राहिले. कपाळावर हात ठेऊन तो बोलला, "माझ्या आईकडे आज फार उकडत होते, नाही का? माझे डोके दुखते आहे. मी झोपायला गेलो, तर तू समजून घे."

ती पहिलीच वेळ होती. खरे तर त्याला जेव्हा पत्र येई, तेव्हा ती तिथे हजर रहात नसे. बहुधा, ते तो कार्यालयातून घरी येण्यापूर्वी येई. तिला वर जाऊन, ते तिथे ठेऊन यावे लागे. तिने जरी ते कधी पाहिले नाही, तरी ते पाहिल्यावर त्याचा चेहरा बदललेला तिच्या लक्षात येई. त्यादिवशी तो जेवणापूर्वी

तिला क्वचितच भेटे. पत्रात काहीही असो, त्याला फक्त ते स्वतःच वाचायचे असे. त्यानंतर तो काही वर्षांनी म्हातारा झाल्यासारखा दिसे. त्याची जीवनेच्छा व धैर्य गळून पडल्यासारखे वाटे. तिचे अस्तित्वही विसरल्यासारखे होई. काही वेळा तो, संध्याकाळचा उरलेला वेळ शांत होई. आणि बोललाच, तर ते तिच्या काही घरगुती व्यवस्थेवर टीका करणारे असे. तो त्यात काही बदल सुचवे. उदाहरणार्थ, तो थोड्या उदासीनतेने, जॉयसेची बालवर्गाची शिक्षिका फार लहान व बेजबाबदार असल्याचे म्हणे किंवा पीटरचा घसा नाजूक असल्याने, --- तो नीट झाकलेला आहे की नाही, ते तो बघे. अशा वेळी शार्लोटला, तिच्या मैत्रिणीने दिलेला सल्ला आठवे. तिचे लग्न विधुर केनिथ ॲशबॉय एसक्वीरबरोबर ठरले, तेव्हा तिची मैत्रिण म्हणाली होती, हृदयभग्न झालेल्या विधुराशी लग्न? हे जरा धोकादायक नाही का? तुला माहिती आहे का, की एल्सीमुळे तो पूर्ण दबलेला होता.” आणि तिने कसे हसत उत्तर दिले होते, “त्याला स्वातंत्र्याचा बदल नक्की आवडेल.” पण या बाबतीत तिचे म्हणणे खरे ठरले होते. पहिले काही महिने तिला, हे कुणी सांगायची गरज नव्हती, की तिचा नवरा तिच्याबरोबर अगदी

खूष होता. जेव्हा ते त्यांच्या लांबलचक मधुचंद्राहून परत आले, तेव्हा तीच मैत्रिण म्हणाली, “तू केनिथला काय केलेस? तो वीस वर्षांनी तरूण दिसतो आहे.” आणि यावेळेस तिने निष्काळजीपणे, आनंदाने उत्तर दिले, “मला वाटते मी त्याला, त्याच्या उदासीनतेतून बाहेर काढले आहे.”

पण करडी पाकिटे यायला लागल्यापासून, किंवा त्यापेक्षाही त्याने मनापासून न उच्चारलेले, तिचे दोष काढणारे शब्द, तिला जास्त टोचणारे वाटू लागले. पहिले पत्र आल्यानंतर, त्याच्या डोळयातील भाव तिला जास्त व्यथित करून गेले. ते भाव प्रेमाचे नव्हते, असे नाही. ते दुरावा दाखवणारेही नव्हते. इतके दिवस सर्वसामान्य घटनांपासून लांब असणाऱ्या माणसाने, कौटुंबिक गोष्टीत लक्ष घालणे, विचित्र वाटत होते. तिचे दोष काढण्यापेक्षा ते तिला जास्त लागले.

तिला पहिल्यापासून जरी असे वाटत होते, की त्या करड्या रंगाच्या पाकीटावरील  अक्षर बाईचे आहे, तरी तिला त्यात काही भावनिक गूढ आहे, असे वाटत नव्हते. तिच्या नवऱ्याच्या प्रेमाच्या बाबतीत असे काही घडेल, अशी अपेक्षा

तिने केली नव्हती. तिची अशी खात्री होती, की ती पत्रे त्याला भावनिक दृष्ट्या काही आनंद देत नाही आहेत --- ती पत्रे खासगी नसून, एका व्यग्र वकिलाला आलेली कामाची पत्रे आहेत. बहुधा तो कुण्या त्रासलेल्या, दमलेल्या स्त्री अशीलाकडून आलेली असणार. त्या स्त्रीला ती पत्रे त्याच्या सचिवाने उघडलेली नको असल्याने, ती घरी येत असावीत. पण मग त्यांचा परिणाम बघता, ती अनोळखी महिला नक्की फार त्रासदायक असणार. त्याची व्यावसायिक कीर्ती खूप चांगली होती. तर मग हे थोडे विचित्र होते, की तो कधी त्याबद्दल अधीरपणे काही बोलला नाही. कधी बोलता बोलता, शार्लोटजवळ त्याचा काही उल्लेख केला नाही. तिच्या विरुद्ध केस गेल्याबद्दल ती स्त्री सतत त्रास देत असल्याने, तो वैतागलेला आहे, असेही तो कधी बोलला नाही. या गूढ पत्रव्यवहाराबद्दल, त्याचे ओठ शिवलेले होते. तिचे नाव किंवा इतर काहीही माहिती न देऊन, त्याने त्याबद्दल जणू गुप्तता पाळलेली होती.

अजून एक शक्यता होती. हावभावांनी किंवा पर्यायाने सुचवून, जुने पकडले जाणे. शार्लोट ॲशबॉय रीतीरिवाज

पाळणारी सभ्य स्त्री होती. मानवी मनाच्या गुंतागुंतीबद्दल तिला काही भास होत असत. तिला माहिती होते, की नेहमी जुने काही धागेदोरे असतात. पण जेव्हा तिने केनिथशी लग्न केले, तेव्हा तिच्या मैत्रिणींनी अशा शक्यतेची सूचना देण्याऐवजी, त्या म्हणाल्या, ‘‘तू स्वतःच तुझे काम सोडून दिले आहेस. रंगेल माणसाशी लग्न करणे, हे तेच आहे. केनिथने प्रथम एल्सी कोर्डरला पाहिले, त्यानंतर त्याने कधी एकाही स्त्रीकडे पाहिले नाही. त्यांच्या सर्व आयुष्यात तो समाधानी नवरा होता. तो तुला कधीही एखाद्या खुर्चीची वा दिव्याची जागा बदलू देणार नाही. तुला काही करावेसे वाटले, तर नेहमी त्याच्या डोक्यात पहिला विचार हा येईल की एल्सीने यावेळी काय केले असते.’’

मुलांना तिच्या क्षमतेप्रमाणे, व्यवस्थित वागवण्यासंबंधी, प्रासंगिक अविश्वास सोडला, तर --- असले तर्क कधी खरे ठरले नाहीत. तसा अविश्वास, तिच्या खेळकर स्वभावामुळे आणि मुलांना ती आवडू लागल्यामुळे --- हळूहळू नाहीसा झाला. त्या उदास, एकट्या विधुराला, त्याचे जवळचे मित्र म्हणाले, की त्याच्या बायकोच्या मृत्यूनंतर

केवळ त्याच्या व्यावसायिक कामातील रुचीमुळे, तो आत्महत्येपासून दूर राहिला. त्यानंतर दोन वर्षांनी तो शार्लोट गोर्सच्या प्रेमात पडला. अविचारी पद्धतीने लग्न केल्यावर आणि तिला उष्णकटिबंधीय प्रदेशात मधुचंद्रासाठी नेल्यावर, पहिल्या काही चमकत्या आठवड्यांपासून, तो कोवळा प्रेमिकच झाला. तिला लग्नाबद्दल विचारण्यापूर्वी, तो तिच्याशी त्याच्या पहिल्या बायकोबद्दल, त्याच्या मनात असलेल्या गाढ प्रेमाबद्दल व तिच्या अचानक मरणानंतर, त्याला झालेल्या दुःखाबद्दल मोकळेपणे बोलला होता. तरीही त्याने, धक्का बसलेले वर्तन गृहीत धरले नाही. तसेच नवीन जीवनाची शक्यताही गृहीत धरली नाही. तो अगदी साधा व नैसर्गिकपणे वागणारा होता. त्याने शार्लोटला कबुली दिली, की सुरवातीपासून त्याला अशी आशा आहे, की भविष्यकाळाने त्यांच्यासाठी नवीन भेटी आणल्या आहेत. लग्नानंतर, ते जेव्हा घरी परतले, तेव्हा त्याचा पहिल्या बायकोपासूनचा बारा वर्षांचा मुलगा घरी होता. केनिथने ताबडतोब शार्लोटला सांगितले की तिच्यासाठी वेगळी खोली तो देऊ शकणार नाही. पण त्याला माहिती होते, की पुरुषाच्या कधी डोक्यातही येणार नाही, अशी गोष्ट स्त्रीला नेहमी वाटत

असते, की घरातील फर्निचर व वस्तू आपण आपल्या मनाप्रमाणे सजवाव्यात. त्यामुळे तिने तिला पाहिजे तशी हलवाहलवी करावी, असे त्याने सुचवले. त्यामुळे, तिने थोडेफार बदल केले व आणि सर्व त्याच जुन्या सामानासहीत तिचे नवे आयुष्य, मोकळेपणे व सहजपणे सुरु झाले. वाचनालयात एल्सी ॲशबॉयचे चित्र टांगलेले होते, ते बघून तिने दोन्ही मुले घरी नसतांना नाईलाजाने, ते मुलाच्या खोलीत हलवले. असे केल्यामुळे, तिला थोडेफार अपराधी वाटत होते. ते तिने नवऱ्याजवळ बोलून दाखवले. पण तो म्हणाला, “ओहो, मला असे वाटते, की मुलांनी तिच्या नजरेखालीच वाढले पाहिजे. त्याने शार्लोटचे समाधान झाले. ती आतून हलली. जसजसा काळ जाऊ लागला, तसतसे ते घर तिला आपले वाटू लागले. ती नवऱ्याबरोबर जास्त आत्मविश्वासाने व सहजतेने  वावरू लागली. वाचनालयातील तो लांब, थंड असलेला सुंदर चेहरा, तिच्यावर नजरेने जरब बसवायचा बंद झाला. केनिथच्या प्रेमाने तिच्या हृदयात हळूवारपणे शिरकाव केला. त्याच्या पूर्वायुष्याबद्दलही तिला तिच्यातील उमललेल्या प्रेमाने, स्वतःची एकाधिकारशाही असल्यासारखे वाटू लागले.

मनातील या आनंदाच्या ठेव्यामुळे, ती तगून राहिली. पण अलीकडे तिला उदासीनतेने घेरून टाकले. उदासीनता होतीच, पण आज दुपारी, जास्त दमल्यामुळे असेल, नवीन स्वयंपाक्यामुळे असेल किंवा काही अगदी फालतू कारणाने, नैतिक वा शारीरिक, असेल. पण तिला स्वतःच्या भावना अनावर झाल्या. हातात किल्ली घेऊन ती रस्त्याकडे बघत राहिली. खाली गोंधळ गडबडीचे मोठे आभासी जग व वरती रस्त्यावरील झगमगाटानेदेखील न उजळलेले आकाश! तिने विचार केला, "बाहेरील उंच इमारती, जाहिराती, फोन, तारांचे जाळे, विमाने, सिनेमे, मोटारी आणि सर्व विसावे शतक आणि दाराच्या दुसऱ्या बाजूला त्यांच्याशी काही देणेघेणे नसलेले, मला स्पष्ट करता न येणारे असे काही. जगाइतकेच जुने असलेले गूढ असे आयुष्य --- हे बेकार आहे. मी कसली काळजी करते आहे? आता गेल्या तीन महिन्यात पत्र आले नाही --- ख्रिसमसनंतर गावाहून आल्यापासून आले नाही --- हे जरा विचित्रच आहे --- सुट्टीनंतर नेहमी येत असे! --- मला असे का वाटते आहे, की आज रात्री ते येईल!"

कारण काही नाही. पण तेच ते वाईट आहे. सर्वात वाईट! असेही दिवस होते, जेव्हा स्पष्ट करता येणार नाही, अशा काही भीतीने ती थंडीने थरथरत उभी असे. खिडकीच्या पडद्यापलीकडे काही आहे, असे वाटत असतांना, ती जेव्हा दार उघडून आत जाई, तेव्हा तिथे काहीच नसे. दुसऱ्या दिवशी तिला जेव्हा तसेच काही भय वाटे, तेव्हा ते त्या करड्या रंगाच्या पाकिटाचे असे. त्यामुळे शेवटचे पत्र आल्यापासून, तिला दर संध्याकाळी काहीतरी अशुभ घडणार, असे वाटे. पत्र आले असणार, असे मनात घेऊनच ती दार उघडत असे.

तिच्या दृष्टीने हे फार झाले. काहीतरी पाणी मुरत होते, हे नक्की. आता स्वस्थ रहाणे तिला शक्य नव्हते. पत्र येई त्यादिवशी तिच्या नवऱ्याचे डोके दुखून, तो पांढरा फटक पडे व नंतर बरा होई. पण ती तशीच धास्तावलेली राही. तिचे ताण घेणे, जुने दुखणे असल्यासारखेच झाले होते. कारण शोधणे काही अवघड नव्हते. तिच्या नवऱ्याला माहिती होते, की कुणाकडून पत्र येत आहे व त्यात काय आहे. त्यासाठी तोंड द्यायची त्याची तयारी होती. पण ती अज्ञानाच्या अंधारात कोंडली गेली होती.

कुलुपात किल्ली घालत, ती मोठ्याने ओरडली, “मला हे सहन होत नाही. आता मी अजून एक दिवसदेखील, हे निभावून नेऊ शकणार नाही. किल्ली फिरवून, ती आत गेली. आत टेबलावर पत्र पडले होते.

II

तिला ते बघून आनंद झाला. आता सगळ्या गोष्टींना न्याय मिळाला असता. अंधारात चाचपडणे बंद झाले असते. तिच्या नवऱ्यासाठीचे पत्र --- एका बाईकडून आलेले --- नक्कीच, जुनी पकडले जाण्याची, भंगार केस! संशय घेणारी ती, किती मूर्ख होती. इतक्या साध्या स्पष्टीकरणासाठी, तिने एवढे डोके लढवायचे काहीच कारण नव्हते. तिने घट्ट हाताने पाकीटावरील पुसट अक्षराकडे पाहिले. तिथे पत्राची दुमड ओळखून ते पाकीट तिने कापले. आता आतील पत्र वाचल्याशिवाय, तिला चैन पडणार नव्हते.

तिचा नवरा आला नव्हता. तो साडेसहा ते साडेसातशिवाय सहसा येत नसे. अजून तर सहाही वाजले नव्हते. तिला ते पत्र हॉलमध्ये घेऊन जायला वेळ होता. ती

रोज यावेळेस परतत असल्याने, चहाची किटली उकळत होती. त्या वाफेवर धरून पत्र उघडावे व वाचून परत होते, तसे ठेऊन द्यावे. कोणालाही कळणार नाही. तिची घालमेलही जाईल. याला पर्याय म्हणजे नवऱ्याला विचारणे. पण ते तिला अवघड वाटत होते. तिने चिमटीत पत्र धरले --- आणि पाय मागे घेऊन परत टेबलावर ठेऊन दिले.

तिने निराश होऊन स्वतःशीच म्हटले, "नाही. मी हे करणे बरोबर नाही."

मग तिने काय करावे? खाली टेबलावर पत्र पडले आहे. थोड्याच वेळात नवरा येणार --- ते पत्र घेऊन वाचनालयात जाणार --- दर वेळेस करडे पाकीट आले, की तो असेच करे. अशा वेळेस वर एकटीनेच खोलीत जाऊन चहा घेणे, तिची काही पत्रे आली आहेत का ते बघणे, एखादे पुस्तक चाळणे, याशिवाय ती काय करणार?

अचानक तिने ठरवले, की ती वाचनालयात थांबेल आणि स्वतः बघेल. त्याच्यात आणि पत्रात जे काही होते आहे, ते कुणी बघत नाही आहे, असे त्याला वाटते आहे. आधी तिला हे कसे सुचले नाही, याचे तिला नवल वाटते. दार

थोडेसे उघडे ठेऊन, त्यामागील कोपऱ्यात ती बसली. त्याला न दिसता, तिला तो दिसू शकला असता. तिने खुर्ची कोपऱ्यात ओढून घेतली, ती दाराकडे लक्ष ठेवून बसली.

तिला आठवते आहे, त्याप्रमाणे, तिने पहिल्यांदाच दुसऱ्याचे गुपित जाणण्यासाठी, प्रयत्न केला होता. पण तिला अपराधी वाटत नव्हते. तिला फक्त असे वाटत होते, की ती गुदमरवणाऱ्या धुक्यातून मार्ग शोधण्यासाठी, धडपडते आहे आणि काही करून तिला, त्यातून बाहेर पडायचे आहे.

बऱ्याच वेळाने तिला केनिथने दारात घालून फिरवलेल्या किल्लीचा आवाज आला. तिने उडी मारली. धावत जाऊन त्याला भेटायची ऊर्मी, तिने काय ठरवले आहे, ते विसरायला लावत होती. पण वेळेवर तिला ते आठवले व ती खाली बसली. तिथून तिला त्याच्या सर्व हालचाली दिसत होत्या --- तिने त्याला आत शिरतांना पाहिले, दारातून किल्ली काढून घेऊन, कोट आणि टोपी काढतांना पाहिले. नंतर त्याने मोजे टेबलावर फेकले. आणि त्याच वेळी पत्र पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर भरपूर उजेड होता. शार्लोटने पहिल्यांदा त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव पाहिले. त्याला

पत्राची अपेक्षा नसल्याचे दिसले --- आज ते आले असेल, असे त्याला वाटले नव्हते. पण जरी त्याने त्याची अपेक्षा केली नसली, तरी ते पाहिल्यावर, त्याला त्यात काय असणार ते समजले. त्याने ते लगेच फोडले नाही पण स्तब्ध उभा राहिला. त्याच्या चेहऱ्याचा रंग उतरला होता. पत्राला हात लावावा की नाही, हे त्याला कळत नव्हते. पण शेवटी त्याने ते उघडले आणि ते घेऊन तो उजेडात गेला. असे करतांना त्याने शार्लोटकडे पाठ केली. आता तिला फक्त त्याचे वाकलेले डोके व उतरते खांदे दिसत होते. पत्राचा एकच कागद होता, कारण त्याने तो उलटल्याचे दिसले नाही. पण त्या कागदाकडे तो बराच वेळ बघत बसला. ते त्याने निदान डझनभर वेळा तरी वाचले --- असे श्वास रोधून त्याच्याकडे बघणाऱ्या तिला तरी वाटले. शेवटी तो हलला. त्याने पत्र अजून डोळयांजवळ धरले, जसे काही तो, ते परत समजून घेत होता. मग त्याने डोके खाली केले. त्याने पत्राला ओठांनी स्पर्श केला.

“केनिथ” असे ओरडत, ती हॉलमध्ये गेली.

हातात पत्र घेऊन त्याने तिच्याकडे पाहिले. झोपेतून उठवलेल्या माणसाप्रमाणे, तो घाबरलेल्या आवाजात हळू बोलला, “तू कुठे होतीस?”

ती आवाजात शांतता आणत म्हणाली, “मी वाचनालयात तुझ्यासाठी थांबले होते. काय झाले? पत्रात काय आहे? तू घाबरलेला दिसतोस.”

तिच्या काळजीने त्याला शांत केले असावे. त्याने थोडे हसत, लगेच ते पाकीट खिशात टाकले. “घाबरलेला? मी दिलगीर आहे. माझा आजचा कार्यालयातील दिवस फार दगदगीचा गेला --- एकदोन गुंतागुंतीच्या केसेस! मला वाटते, मी फार दमलेला दिसत असणार.”

“तू आत आलास, तेव्हा दमलेला दिसत नव्हतास. ते पत्र उघडल्यावर ते झाले --- “

तो तिच्या मागे वाचनालयात गेला. तिथे ते दोघे एकमेकांकडे बघत उभे राहिले. शार्लोटने पाहिले, किती झटपट त्याने स्वतःवर विजय मिळवला. त्याच्या व्यवसायाने त्याला चेहरा व आवाजावर, झटपट हुकमत मिळवायला शिकवले होते.

त्याचे गुपित फोडायचा तिचा प्रयत्न अयशस्वी झाल्याचे, तिला लगेच कळले. त्याला जे लपवून ठेवायचे होते, ते उघडे पाडायची तिची इच्छाच संपून गेली. अजून तिला गूढ उकलायची इच्छा होती. पण त्याला जे ओझे वहावे लागत होते, ते हलके करून! तिने विचार केला, "ती दुसरी बाई असली तरीही!"

तिचे हृदय धडधडतांना ती बोलली, "मी इथे तू येण्याची वाट बघत थांबले होते. मला तुला पत्र उघडतांना, बघायचे होते."

त्याचा उतरलेला चेहरा, गडद लाल झाला. ते पत्र? तेच पत्र का?"

"कारण ते पत्र आले, की तुझ्यावर काही विचित्र परिणाम होतो." मग ती स्वतःशीच म्हणाली, "त्याच्या चेहऱ्याचा वरचा भाग खूप अरुंद असल्याचे मी आजच बघते आहे."

त्याने त्याच्या विरोधाभासात्मक शांत व हळू आवाजात, निष्णात वकीलाप्रमाणे त्याची केस मांडायला

सुरवात केल्याचे, तिने ऐकले, “ओहो, म्हणजे तुला लोकांनी पत्र उघडताना, त्यांच्या नकळत बघायची सवय आहे का?”

“सवय आहे असे नाही. मी पूर्वी असे कधीच केलेले नाही. पण तुला त्या करड्या पाकिटातून काही दिवसांनी, कोण सतत काय लिहित असते, ते मला शोधून काढायचे होते.”

तो काही वेळ थांबला. मग बोलला, “पण दोन पत्रातले अंतर समान नसते.”

त्याचा शांत आवाज ऐकून, तिची उदारता नाहीशी झाली. ती चिडून म्हणाली, “माझ्यापेक्षा तू त्याची जास्त चांगली नोंद ठेवलेली दिसतेस. मला एवढेच माहिती आहे, की प्रत्येक वेळी ती बाई तुला लिहिते, तेव्हा --- “

“ती बाई असल्याचे तू कसे काय गृहीत धरलेस?”

“हे बाईचे अक्षर आहे. तू ते उडवून लावतोस का?”

तो हसला. “नाही मी ते नाकारत नाही. मी विचारले, कारण अक्षर तर एखाद्या पुरुषासारखे दिसते आहे.”

शार्लोट अधीरपणे बोलली, “आणि ही बाई --- ती तुला कशाबद्दल लिहिते?”

पुन्हा क्षणभर थांबून तो म्हणाला, “व्यवसायासंबंधी”

“कायदेशीर व्यवसाय?”

“एका प्रकारे तसेच. सर्वसामान्य व्यवहार.”

“तू तिच्यासाठी काम करतोस?”

“हो.”

“तू हे काम, खूप काळ करतो आहेस का?”

“हो. खूप काळ.”

“केनिथ, डार्लिंग, ती कोण आहे, ते तू मला सांगणार नाहीस का?”

“नाही. मी सांगू शकत नाही.” तो थांबला व थोडे हो नाही करत बोलला, “व्यावसायिक गुप्तता.”

शार्लोटचे रक्त हृदयापासून कानशीलांपर्यंत उसळले. “काही सांगू नकोस. अजिबात सांगू नकोस!”

“का नको?”

“कारण मी तुला पत्राचे चुंबन घेतांना पाहिले.”

त्या शब्दांचा परिणाम एवढा हादरवून टाकणारा होता, की तिला ते शब्द उच्चारल्याचा पश्चात्ताप झाला. एखाद्या लहान मुलाला हसावे, तसे तिच्या उलटतपासणीला, शांत राहून तो नगण्यपणे तोंड देत होता. त्याने तिच्याकडे दुःखी भीतीदायक चेहऱ्याने बघितले. क्षणभर असे वाटले, की तो बोलू शकत नाही आहे. मग मोठ्या प्रयत्नांनी स्वतःला सावरून, चाचरत म्हणाला, “पत्रातील अक्षर फार पुसट आहे. तू मला ते उजेडात धरून वाचतांना पाहिले असशील.”

“नाही. मी तुला पत्राचे चुंबन घेतांना पाहिले.” तो शांत होता. “मी तुला तसे करतांना पाहिले, नाही का?”

तो पुन्हा त्या गावचा नसल्यासारखा झाला. “असेलही.”

“केनिथ, तू? तू मला हे सांगतो आहेस?”

“त्याने तुला काय फरक पडतो? मी तुला सांगितले आहे, की ते कामाचे पत्र आहे. मी काय खोटे बोलतो आहे?

ते लिहिणारी माझी जुनी मैत्रिण आहे. तिला मी खूप दिवसात भेटलो नाही.''

''जरी ती जुनी मैत्रिण असली, तरी माणसे कामाच्या पत्रांचे चुंबन घेत नाहीत. आता ते जर प्रेमिक असतील, तर गोष्ट वेगळी आहे. तरीही मला त्याचा खेद आहे.''

जसे काही चर्चा संपली, अशा थाटात त्याने खांदे उडवले व तेथून निघून गेला. बोलताना त्याने झालेल्या प्रकाराबद्दल, उबग आल्याचे दाखवले.

शार्लोटने पुढे होऊन त्याचा दंड पकडत म्हटले, ''केनिथ!

त्याने दमलेला दृष्टीक्षेप टाकत, त्याचा हात तिच्या हातावर ठेवत म्हटले, ''तुझा माझ्यावर विश्वास नाही का?

''मी कसा विश्वास ठेऊ? अनेक महिने मी, ही पत्रे येतांना बघते आहे. आपण वेस्ट इंडीजहून आल्यापासून ती येत आहेत. त्यांनीच माझे स्वागत केले. ते आल्यानंतर प्रत्येक वेळी मी, तुझ्यावर चमत्कारिक परिणाम झालेला बघितला

आहे. मी तुला दुःखी, त्रासलेले पाहिले आहे. ती पत्रे जणू तुला माझ्यापासून हिरावून घेत आहेत.”

“नाही, प्रिये,  तसे काही नाही. अजिबात नाही.”

तिने मागे होऊन त्याच्याकडे, भावनामयतेने पाहिले.

“मग डार्लिंग, मला ते सिद्ध करून दाखव. ते सोपे आहे.”

तो बळेबळे हसला.

“कुठल्याही स्त्रीने एकदा तसे डोक्यात घेतले, की तिला असे सिद्ध करून दाखवणे सोपे नाही.”

“तू मला फक्त पत्र दाखव.”

त्याने तिच्या हातातून, त्याचा हात काढून घेतला आणि डोके हलवले.”

“तू दाखवणार नाहीस?”

“मी दाखवू शकत नाही.”

“मग पत्र लिहिणारी तुझी बायको आहे.”

“नाही, डार्लिंग, नाही.”

“कदाचित आता नसेल. मला वाटते, ती तुला परत मिळवायचा प्रयत्न करत आहे. आणि तू माझ्यावरील दयेपोटी झगडतो आहेस. बिचारा माझा केनिथ!”

“मी तुला शपथेवर सांगतो, ती कधीच माझी बायको नव्हती.”

शार्लोटच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले. “हे वाईट आहे. निराशादायक आहे. ती काळजीचे नाटक करणारी असून तुझ्यावर तिचा वचक ठेऊ इच्छिते. आपल्याला सर्वांना ते माहिती आहे.” तिने तिच्या हातात तिचा चेहरा लपवला.

तिचा नवरा गप्प राहिला. त्याने तिचे सांत्वन केले नाही किंवा काही नाकारलेही नाही. बऱ्याच वेळाने तिने तिचे अश्रू पुसले व घाबरून त्याच्याकडे पाहिले.

“केनिथ, विचार कर. आपल्याला लग्न करून फार दिवस झाले नाहीत. तू मला काय सहन करायला लावतो आहेस, याची कल्पना कर. तू म्हणतोस, तू मला पत्र दाखवणार नाहीस. तू काही स्पष्टीकरण देखील देत नाहीस.”

“मी तुला सांगितले आहे, की ते कामाचे पत्र आहे. मी शपथेवर तेच सांगेन.”

“एका बाईची कृत्ये झाकायला, माणूस काहीही शपथा घेईल. जर माझा तुझ्यावर विश्वास बसायला हवा असेल, तर तर मला तिचे नाव तरी सांग. जर तू तेवढे केलेस, मी तुला वचन देते, की मी ते पत्र बघायला मागणार नाही.”

खूप वेळ तिथे संशय पसरला होता. तेव्हा तिचे हृदय धडधडत असलेले तिला जाणवले. जणू तिला वाटणारा धोकाच त्यातून तिला जाणवत होता.

खूप वेळाने तो बोलला, “मी सांगू शकत नाही.”

“तिचे नावसुद्धा नाही?”

“नाही.”

“तू मला अजून कहीही सांगणार नाही आहेस?’

“नाही.”

परत शांतता. आता त्यांच्या वादावादीचा शेवट झाल्यासारखे वाटत होते. फुकटच्या असमंजसपणाने गोंधळून, ते एकमेकांसमोर उभे होते.

छातीवर हात धरून, शार्लोट धापा टाकत होती. तिला असे वाटत होते, की एक अवघड शर्यत ती हरली आहे. तिला तिच्या नवऱ्याला हरवायचे होते आणि ती तर फक्त त्याला चिडचिडे बनवण्यात यशस्वी झाली. या फसलेल्या चुकीमुळे गूढ, अनाकलनीय रीत्या तो परका बनला. तिची विनंती किंवा वादंग, त्याच्यापर्यंत पोचलेच नाही. त्यातील वाईट भाग म्हणजे, त्याच्यातले मित्रत्व, अधीरपणा संपून, ज्याच्यापर्यंत पोचता येणार नाही, असा कुणी परका मनुष्य तो बनला. तिला तिच्याकडे दुर्लक्ष केल्यासारखे, वगळल्यासारखे, आयुष्यातून हद्दपार केल्यासारखे वाटू लागले. पण एकदोन क्षणांनंतर, त्याच्याकडे अजून शांतपणे बघताना, तिला असे दिसले की त्यालाही तिच्याइतकाच त्रास होतो आहे. त्याचा लांब झालेला चेहरा, दुःखाने पिळवटला होता. करडे पाकीट आल्यावर, तो नेहमीच काळवंडत असे. पण आता त्याच्या बायकोबरोबर झालेल्या वादावादीइतका, तो काळवंडलेला नसे.

शार्लोटला त्याची दया आली. कदाचित, शेवटी अजून तिने तिचे निरुपाय झाल्यांनतरचे हत्यार वापरले नव्हते.

तिने त्याच्याजवळ सरकून, त्याच्या दंडावर परत हात ठेवला. ''बिचारा केनिथ, मला तुझ्याबद्दल किती वाईट वाटते आहे --- "

तिला वाटले अशा सहानुभूती दाखवण्याने, तो थोडासा आखडला. पण त्याने तिचा हात घेऊन दाबला.

ती बोलत राहिली, "तुझ्या प्रेमात खंड पडण्याने, मला फार वाईट वाटते. खऱ्या प्रेमाचे सौदर्य अनुभवणे व त्याचे ओझे न पेलवणे, हे मी अनुभवले."

शहाण्या नजरेने तिच्याकडे बघत तो बोलला, "ओहो, असे काही म्हणू नकोस."

शेवटी ती ताळयावर आली. उद्दीपित झाल्याने तिचा आवाज थरथरू लागला. ती बोलली, "मग माझे व त्या बाईचे काय? आधीच तू वर्षभरात एल्सीला विसरला नाहीस का?"

ती त्याच्या पहिल्या बायकोचे नाव क्वचितच घेई. ते काही सहजतेने तिच्या  ओठांवर आले नाही. एखादा बॉम्ब फोडावा, तसे त्यांच्यामधील मोकळया जागी तिने एल्सीचे

नाव घेतले आणि एक पाऊल मागे येऊन, स्फोट व्हायची वाट बघू लागली.

तिचा नवरा हलला नाही. त्याचा चेहरा अधिकाधिक दुःखी दिसू लागला पण त्यावर काही पश्चात्ताप दिसत नव्हता. तो म्हणाला, "मी एल्सीला कधीच विसरलो नाही."

शार्लोटला हसू आवरेना. "मग तर तू बिचारा आता आमच्या तिघींमध्ये --- "

त्याने सुरवात केली, "ते तसे नाही --- " थांबून त्याने कपाळाला हात लावला.

"तसे नाही?"

"मी दिलगीर आहे. मी काय म्हणतो आहे, त्यावर तू विश्वास ठेवणार नाहीस. माझे डोके दृष्टीदोषामुळे दुखते आहे." त्याचे म्हणणे खरे असण्यासाठी, तो फिकट व खचलेला दिसत होता. ती त्याचे थातुरमातुर उत्तर ऐकून, चिडली.

"हो, बरोबर करड्या पाकिटाची डोकेदुखी!"

तिला त्याच्या डोळ्यात आश्चर्य दिसले. तो थंडपणे म्हणाला, "मी विसरलोच, की माझ्यावर किती जवळून नजर

ठेवली जात होती. माझे डोके दुखत असल्याने, मी वर जाऊन तासभर, पडतो. मला वाटते, तू समजून घेशील.”

ती शहारली व ठामपणे म्हणाली, “तुझे डोके दुखते आहे, त्याबद्दल मला वाईट वाटते. पण तू जाण्यापूर्वी मला तुला हे सांगायचे आहे, की आपल्यातील हा प्रश्न आज ना उद्या सोडवावाच लागणार आहे. कोणीतरी आपली ताटातूट करायला बघते आहे. ते कोण, हे मला समजले, तर मग त्याची काही खैर नाही.” तिने शांतपणे त्याच्या डोळ्यात पाहिले. “त्यासाठी मला तुझे प्रेम गमवावे लागले, तरी मला त्याची काही पर्वा नाही. जर माझ्यावर तुझा विश्वास नसेल, तर मग मला तुझ्याकडून अजून काहीही नको.”

अजूनही तो शहाणपणे तिच्याकडे बघत होता. “मला वेळ दे.”

“वेळ कशासाठी? एक शब्द तर बोलायचा आहे.”

“तू माझे प्रेम किंवा विश्वास गमावलेला नाहीस, हे तुला दाखवण्यासाठी.”

“ठीक आहे. मी थांबते.”

तो दाराकडे वळून, हो नाही करत थांबला. “ओहो, माझ्या प्रिये, नक्की थांब” एवढे बोलून, खोलीतून निघून गेला. तिने जिन्यावर त्याचा थकलेला पदरव ऐकला व खोलीचे दार लावलेले ऐकले. मग ती खुर्चीत बसली व तिचे तोंड हातात लपवले. तिची पहिली प्रतिक्रिया अपराधीपणाची होती. आपण फार कडकपणे, अमानवीपणे व कल्पनातीतपणे वागलो, असे तिला वाटले. पण तिच्या मनातला विचार असा होता, “त्याला असे सांगायला देखील कचरू नकोस, की या हट्टापायी ती प्रेमावर पाणी सोडायलाही तयार आहे. खोटी कटू गोष्ट!” ती काही निरर्थक शब्द मागे घेण्यासाठी, वर जाऊ लागली. पण अचानक थांबली. शेवटी त्याने त्याचा काय तो मार्ग अनुसरला होता. त्याच्या गुपितावरचे सर्व हल्ले परतवून लावले होते. आणि आता त्या दुसऱ्या बाईचे पत्र वाचण्यासाठी, एकट्याला खोलीत कोंडून घेतले होते.

## III

जेव्हा चकित झालेल्या नोकराणीला ती घरातील तिच्या पार्लरमध्ये सापडली, तेव्हा ती अजूनही विचारात बुडालेली होती. “नाही” शार्लोट म्हणाली, “ती जेवणासाठी कपडे करणार नाही. मिस्टर ॲशबॉयला जेवायचे नाही. तो फार दमल्यामुळे, त्याच्या खोलीत आराम करतो आहे. नंतर ती थोडेफार काही हॉलमध्ये आणून खाईल.” ती जिना चढून तिच्या झोपायच्या खोलीत गेली. तिचा जेवायच्या वेळी घालायचा ड्रेस अंथरुणावर पडला होता. त्याकडे बघून तिला, तिचा रोजचा शांत दिनक्रम आठवला. तिचे आता तिच्या नवऱ्याबरोबर झालेले बोलणे नक्कीच, दुसऱ्या जगात घडलेले होते. ते मुळी शार्लोट गोर्स व केनिथ ॲशबॉय नव्हतेच. तर ते बेकार कल्पनेने रचलेले दोन वेताळ होते, तिने लग्नापासूनची नवऱ्याची सततची एकनिष्ठा आठवून पाहिली. त्याची कायमची उद्येगून दाखवलेली कोवळीक, अनेक वेळा तो तिच्यावर अवलंबून असल्याचे त्याचे सांगणे, तिच्याशी जवळीक साधणे, जसे काही तिच्या व त्याच्या आत्म्यामध्ये हवादेखील नाही आहे, हे सर्व आठवून तिला विचित्र वाटत होते. काही वेळापूर्वी ती त्याला दुसऱ्या एका बाईवरून, शिव्या देत होती. पण मग काय ---

परत वरती जायच्या विचाराने उचल खाल्ली. त्याची माफी मागून, हसून, त्याचा गैरसमज दूर करावा. पण त्याचा खासगीपणा घालवायला, तिला भीती वाटू लागली. तो त्रासलेला व दुःखी होता. कुठल्यातरी दबावाखाली होता. पण त्याने सांगितले होते, की त्याची लढाई तो एकटा लढेल. त्याच्या इच्छेला मान देण्यात, शहाणपणा होता व औदार्यही होते. पण त्याच्या शेजारील खोलीत असे एकटीने असणे, किती असह्य व विचित्र होते. तिला असे वाटत होते, की ती जगाच्या दुसऱ्या टोकाला आहे. तिच्या या रागाच्या व उदास मनस्थितीत, तिला असे वाटत होते, आपण ते पत्र फोडून, वाचून, परत होते तसे ठेऊन द्यायचे धैर्य दाखवायला हवे होते. ते पाप ठरले असते, तरी निदान गुपित काय आहे, हे तरी तिला कळले असते. तो काही सजग, वाईट, असा गुप्त छळ असावा. त्यापुढे तो थरथर कापत होता. पण त्यापासून, स्वतःची सुटका करून घेऊ शकत नव्हता. एकदोनदा त्याच्या डोळ्यात तिला, कुणी मदत करावी असे भाव दिसले होते. कबुलीजबाब देण्याची उर्मी दिसली होती. जर तिला माहिती असते, तर ती मदत करू शकली असती, असे त्याला वाटत होते की काय? पण तो तिला काही सांगू शकत नव्हता.

तिच्या डोक्यात अशी कल्पना आली, की त्याच्या आईकडे जावे. त्या ठाम  निर्धाराच्या, स्वच्छ डोळयांच्या, समोरच्याशी थेटपणे बोलणाऱ्या, रोखठोक, वयस्क मिसेस ॲशबॉयची ती चाहती होती. त्या दोघींमध्ये न बोलता येणारा, काही बंध होता. जेव्हा वयस्क मिसेस ॲशबॉय तिच्या नवीन सुनेकडे, शार्लोटकडे पहिल्यांदा जेवायला आली, त्या दिवसापासूनच तो तयार झाला होता. शार्लोटने तिचे वाचनालयात स्वागत केले, तेव्हा तिने तिच्या मुलाच्या टेबलावरील एल्सीच्या फोटोची जागा रिकामी पाहून म्हटले, “हे काय? एल्सी गेली?” तेव्हा शार्लोटने हळूवारपणे स्पष्टीकरण दिले होते. त्यावर तिने थोडक्या शब्दात, खूप काही सांगून जाणारा शेरा मारला होता, “तो मूर्खपणा होता. तिला परत आणू नकोस. दोघांमध्ये तिसरे कोणी कशाला?” स्वतःचे विचार तिने ओळखलेले बघून, शार्लोटने तिच्या सासूकडे बघून हास्य केले होते. त्यामुळे तिला असे वाटले की या नव्या समस्येबद्दल --- तात्विक दृष्ट्या बरोबर नसलेल्या समस्येबद्दल, ही आपली सासू, समस्येच्या गाभ्यावरच सरळ हल्ला चढवेल. पण परत तिने कच खाल्ली. ते ठीक वाटत नव्हते. तिचा नवरा तिच्यापासून दूर ठेवत असलेले गुपित,

सासूचे नाते जवळचे असले, तरी सासूला सांगण्याचा हक्क तिला नव्हता. तिने विचार केला, “त्याला पहिजे असेल, तर तो सवडीने त्याच्या आईशी बोलेल. पण हा आमच्या दोघांमधील प्रश्न आहे व तो आम्हीच सोडवला पाहिजे.”

ती अजूनही समस्येवर विचार करत होती, तेव्हा दारावर टकटक करून तिचा नवरा आत आला. तो जेवायच्या वेळचे कपडे करून आला होता. ती तशीच कपडे न बदलता बसलेली व तिचा ड्रेस अंथरुणावर पडलेला बघून, त्याला नवल वाटले.

“तू खाली येत नाही आहेस?”

ती घाईघाईने म्हणाली, “मला वाटले, तुला बरे नाही व तू झोपला आहेस.”

तो कसेबसे हसला. “मी फारसा बरा नाही. पण आपण खाली जाऊ.” त्याचा चेहरा अजूनही ओढलेला दिसत होता. पण तासाभरापूर्वी तो वर गेला त्यापेक्षा आता शांत वाटत होता.

तिने विचार केला, “असे आहे तर, मी अजून अंधारात असले, तरी तो पत्र वाचून, त्याची लढाई लढून आलेला आहे. मग त्यात काहीही लिहिलेले असो. तिने घंटी वाजवून निरोप दिला, की लवकरात लवकर जेवणाची तयारी करावी --- थोडेसे जेवण --- पटकन तयार होईल असे. कारण ते दोघेही दमले होते आणि त्यांना फार भूक नव्हती.

जेवण तयार झाल्याचे कळताच, ते दोघेही जेवायला बसले. पहिल्यांदा कुणालाच बोलायला काही शब्द सापडेनात. नंतर केनिथने असे गृहीत धरून संभाषण सुरु केले, की शांततेमुळे जास्त छळ होतो आहे. तो नगरपालिकेच्या विमानोड्डाणाच्य राजकारणाबद्दल, आधुनिक फ्रेंच चित्रप्रदर्शनाबद्दल, वयस्क आत्याच्या तब्येतीबद्दल आणि स्वयंचलित फोन बसवण्याबद्दल, बोलत राहिला. शार्लोट स्वतःशीच विचार करत बोलली, “तो किती दमला आहे! फारच जास्त काम झाले आहे. अरे देवा, तो फार दमला आहे.”

जेव्हा ते एकेकटे जेवत, तेव्हा सहसा ते नंतर वाचनालयात जात. शार्लोट तिचे विणकामाचे साहित्य घेऊन

दिवाणावर आडवी होई तर तो दिव्याखालील खुर्चीवर बसून पाईप ओढे. पण आज संध्याकाळी जणू ठरून गेल्यासारखे, त्यांनी त्यांचे विचित्र संभाषण जिथे झाले होते, तिथे जायचे टाळले. ते शार्लोटच्या उठाबसायच्या खोलीत गेले.

ते शेकोटीजवळ बसल्यावर त्याने कॉफीचा एखादा घोट घेऊन, ती खाली ठेवल्यावर शार्लोट बोलली, "तुझा पाईप?"

त्याने मान हलवून म्हटले, "नाही. आज नको."

"तू आज लवकर झोपले पाहिजेस. तू खूप दमलेला दिसतो आहेस. आज कार्यालयात तुला फार काम पडलेले दिसते."

"आपल्या सर्वांना, कधीकधी जास्त काम करावेच लागते."

ती काही निश्चयाने उठून त्याच्यासमोर उभी राहिली. "ठीक आहे. मी तुझी शक्ती अशीतशी फुकट घालवणार नाही. त्याचा काही उपयोग नाही. मला दिसते आहे, की तुला बरे नाही." तिने वाकून तिचा हात त्याच्या कपाळावर ठेवला.

“बिचारा माझा केनिथ! लवकरच तू मोठ्या सुट्टीवर जायचा विचार कर.”

त्याने चमकून तिच्याकडे बघत विचारले, “सुट्टीवर?”

“नक्कीच. मी इस्टरला तुला घेऊन, जाणार होते, तुला माहिती नाही का? एका पंधरवड्यात आपण एक महिन्यासाठी कुठेतरी सफरीवर जायचे आहे. एखाद्या बोटीने प्रवासाला.” ती वाकून त्याच्या अजून जवळ गेली. त्याच्या कपाळाचे चुंबन घेत बोलली, “केनिथ, मी पण दमले आहे.” तिच्या शेवटच्या शब्दांकडे त्याने काही लक्ष दिले नाही. पण तो त्याच्या गुडघ्यांवर हात ठेऊन व डोके मागे करून तिच्याकडे थोडे काळजीने, घाबरून पाहू लागला. “परत? नाही, प्रिये. आता लगेच नाही जाता येणार. मला असे काम सोडून येता येणार नाही.”

“केनिथ, मला ठाऊक नाही, तू परत असे का म्हणतो आहेस. या वर्षी आपण खरी सुट्टी घेतलीच नाही.”

“ख्रिसमसमध्ये आपण मुलांना घेऊन एक आठवडा नाही का गेलो?”

"पण यावेळेस मी मुलांशिवाय, म्हणते आहे. या घरापासून, नोकरांपासून कुठेतरी लांब. ओळखीच्या व दमवणाऱ्या सर्वांपासून दूर. तुमच्या आईला पीटर व जोयस बरोबर रहायला आवडेल."

त्याने हसून मान हलवली. "नाही प्रिये, मी त्यांना आईजवळ ठेऊ शकत नाही."

"का नाही, केनिथ?"

हे सगळे इतके विचित्र आहे. ती त्यांच्यावर मनापासून प्रेम करते. आपण वेस्ट इंडीजला गेलो, तेव्हा दोन महिन्यांपेक्षा जास्त काळ, त्यांना तू तिच्याजवळ ठेवायला काही हरकत घेतली नाहीस."

एक मोठा श्वास घेऊन, तो अस्वस्थपणे उभा राहिला. "ते वेगळे होते."

"वेगळे? का?"

"म्हणजे त्यावेळेस माझ्या लक्षात आले नाही --- "जणू शब्द जुळवण्यासाठी तो थांबला व नंतर बोलला, "तू म्हणतेस त्याप्रमाणे, माझी आई मुलांवर प्रेम करते. पण ती

नेहमीच तसे करेल, असे नाही. आज्या नेहमी नातवंडाना बिघडवतात. काही वेळेस ती त्यांच्यासमोर विचार न करता बोलते." त्याने बायकोकडे मोठ्या दयनीय दृष्टीने, विनंती करत पाहिले. प्रिये, मला हे करायला लाऊ नकोस."

शार्लोटने विचार केला. हे खरे होते, की वयस्क आजीची जीभ तिखट होती. काळजी घेणारे जागरुक पालक हरकत घेतील, असे नातवंडांसमोर ती काहीही बोलू शके. शार्लोटने तिच्या नवऱ्याकडे गोंधळून बघितले.

"मला समजत नाही."

त्याने तिच्याकडे तसेच त्रासिकपणे व विनवणी करण्याच्या थाटात बघितले. तो बोलला, "असा प्रयत्न करू नकोस --- "

"कसा?"

"आता नाही --- अजून नाही. त्याने कानशीलांवर हात ठेऊन दाबले. "अट्टाहास करून काही उपयोग नाही, हे तुला कळत नाही का? मला कितीही जायचे असले, तरी मी आता बाहेर प्रवासाला जाऊ शकत नाही."

शार्लोट अजूनही थंडपणे त्याच्या आरपार बघत होती. “प्रश्न असा आहे, की तुझ्या मनात आहे की नाही?”

त्याने क्षणभर तिच्या नजरेला नजर दिली. मग त्याचे ओठ कापू लागले. तो उसासा टाकून बोलला, “तुला पाहिजे असेल --- ते सगळे मलादेखील पाहिजे असते.”

“आणि तरीही --- “

“मला विचारू नकोस. मला रजा घेता येणार नाही --- नाहीच.”

“म्हणजे तुला त्या पत्रांपासून दूर जायचे नाही?”

तिचा नवरा तिच्यासमोर संभ्रमावस्थेत अस्वस्थपणे उभा होता. आता तो वळला व एकदोनदा खोलीला फेऱ्या मारल्या. त्याचे डोके गालीच्याकडे बघत, खाली वाकलेले होते.

शार्लोटच्या मनात भीतीबरोबर पश्चात्तापाची भावनादेखील वाढू लागली. “ते तेच आहे. तू ते कबूल का करत नाहीस? तू त्या पत्रांशिवाय जगू शकत नाहीस.”

त्याने त्रासिकपणे खोलीत फेऱ्या मारणे चालू ठेवले. मग तो थांबला व खुर्चीत बसून हातांनी चेहरा झाकून घेतला. त्याचे खांदे हलत होते. त्यावरून शार्लोटला समजले, की तो मुसमुसत होता. फक्त ती लहान असतांना, आईच्या मृत्यूनंतर वडिलांना सोडून, तिने कधी पुरुष माणसाला रडतांना पाहिले नव्हते. अजूनही तिला आठवत होते की ते बघून, ती किती घाबरली होती. आताही ती घाबरली. तिला वाटले की तिचा नवरा तिच्यापासून दूर दूर, कुठल्यातरी गूढ बंधनात अडकत चालला आहे आणि तिने तिच्या अंगातील शक्तीच्या शेवटच्या कणापर्यंत, त्याच्या सुटकेसाठी प्रयत्न करायला हवेत.

त्याच्यासेजारी गुडघे टेकून ती ओरडली, "केनिथ --- केनिथ! तू माझे ऐकणार नाहीस का? मला किती त्रास होतो आहे, हे तुला दिसत नाही का? डार्लिंग, मी खरच काही अतार्किक बोलत नाही आहे. त्या पत्रातील मजकुराचा तुझ्यावर होत असलेला परिणाम, मला कधी समजायलाच नको होता. दुसऱ्या कुणाच्या भानगडीत पडायचा माझा स्वभाव नाही. आणि असा परिणाम नसता --- तरी मग गोष्ट

वेगळी होती --- हो. हो. माझे ऐक. जर पत्रे बघितल्याने तुला आनंद झाला असता तर --- तू त्यांची मनापासून वाट बघितली असतीस तर --- तू त्यासाठी दिवस मोजत बसला असतास तर --- त्यातून तुला असे काही मिळत असते तर, की जे मी तुला देऊ शकत नाही, तर गोष्ट वेगळी होती. तर मग मी माझ्या भावना, लपवून ठेवल्या असत्या. मी अशा आशेवर राहिले असते, की तुला त्या पत्रांमधून जितका आनंद मिळतो, तितका कधीतरी मीही तुला देईन. पण उलट तुला त्यामुळे फार त्रास होतो, हे मला बघवत नाही. तरीही तू त्यापासून दूर जाऊ शकत नाहीस, याने मी मोडून पडते. तू दूर गेलास आणि पत्र आले तर, ही भीती तुला आहे. किंवा कदाचित --- "

शिव्याशाप देणारा तिचा रडका आवाज थरथरत होता --- "कदाचित तिने तुला कुठे जायला बंदी केली असेल. केनिथ, तू उत्तर दे. ते कारण आहे का? तू माझ्याबरोबर येथून कुठे जाऊ नयेस, असे तिने ठरवले आहे का?"

ती त्याच्याशेजारी हात वर करून, गुडघे टेकून बसली होती. तिला तिच्या चिकाटीची लाज वाटत होती. त्या उदास पडलेल्या चेहरावरील बुरखा फाडायचे काम करण्याची, तिला

लाज वाटत होती. तरी त्या संशयाने तिला पछाडलेले होते. त्याची नजर खाली होती. चेहऱ्याचे स्नायू फडफडत होते. तिला जितका त्रास होत होता, त्यापेक्षा जास्त त्रास, ती त्याला देत होती. तरीही ती स्वतःला थांबवत नव्हती.

"केनिथ, ते असे आहे का, की ती आपल्याला दोघांना बरोबर जाऊन देत नाही आहे?"

तो काही बोलला नाही किंवा तिच्याकडे डोळेही वळवले नाहीत. तिच्यावर पराभवाची छाया तरळून गेली. तिने विचार केला, शेवटी ती तिचा झगडा हरत होती. ती बोलली, "तू मला उत्तर देऊ नकोस. पण माझे बरोबर आहे."

ती उठली, तेव्हा अचानक तो वळला व त्याने तिला परत खाली बसवले. त्याने तिचे हात धरून इतक्या जोरात दाबले, की तिला वाटले अंगठी रुतून मासात जाऊन बसेल. त्याच्या धरण्यात काहीतरी भीतीदायक, झटका आल्यासारखे वाटत होते. उंच सुळक्यावरून घसरणाऱ्या माणसाला जसे वाटेल, तसे त्याला वाटत असावे. तो मोक्षप्राप्ती झालेल्या माणसासारख्या चेहऱ्याने तिच्याकडे निरखून बघत होता. त्याने तिच्या हातावर हात ठेऊन, म्हटले, "अर्थात आपण

बरोबर जाऊ. तुला कुठे जायचे आहे, तिकडे जाऊ. त्याने तिला जवळ ओढून, तिच्या ओठांवर स्वतःचे ओठ दाबले.

## IV

शार्लोट स्वतःशीच बोलली, “मी आज झोपेन. पण ती तिच्या नवऱ्याच्या खोलीतून येणारे आवाज ऐकत, शेकोटीशेजारी बसून राहिली. तोही संध्याकाळच्या वादावादीनंतर, विश्रांती घेत असल्यासारखा दिसत होता. त्याच्या उघड्या खिडकीतून, रस्त्यावरील उजेड येत होता. तिथे व त्याच्या खोलीच्या दाराशी, ती एकदोनदा डोकावली. अशक्तपणामुळे व दमून, तिने त्याला गाढ झोपलेले पाहिले. तिने विचार केला, “तो आजारी आहे. नक्कीच, तो आजारी आहे. हे जास्त कामाने नव्हे, तर त्या गूढ वाईट पत्रांमुळे आहे.

तिने एक सुटकेचा निःश्वास सोडला. ती एक लढाई लढली होती. तिचा विजय झाला होता --- निदान आता तरी. जर त्यांनी ते सुरु केलेच होते, तर ते कुठूनही, कसेही परत सुरु होऊ शकले असते. सुट्टीसाठी त्याला विचारण्यात काही अर्थ नसल्याचे, ती जाणून होती --- मध्यंतरीच्या काळात, ती

पूर्णपणे अंधारात असलेल्या, त्या गूढाचा परिणाम, तिच्याविरुद्ध कारवाई करतच होता. त्यांनी प्रवास सुरु करेपर्यंत तिचा झगडा दिवसागणिक चालू राहिला. पण त्यानंतर सर्व काही वेगळे झाले असते. एकदा तिचा नवरा मोकळ्यावर बाहेर पडला असता व फक्त तिच्याबरोबर राहिला असता, तर मग तिने चुटकीसरशी त्याला, त्या वाईट छायेतून बाहेर काढले असते. विचारांमध्ये गुंग होऊन, शेवटी, ती झोपली.

ती उठली, तेव्हा तिला नेहमीपेक्षा उशीर झाला होता. ती नवल वाटून घेत व जास्त झोपल्याबद्दल स्वतःवर चिडचिड करत, अंथरुणावर उठून बसली. तिला नेहमी वाचनालयात शेकोटीशेजारी बसून, नवऱ्याबरोबर न्याहारी करायला आवडे. पण घड्याळाकडे नजर टाकल्यावर तिला कळले, की तो न्याहारी उरकून कधीच कार्यालयात गेलेला आहे. खात्री करण्यासाठी ती पलंगावरून उडी मारून उठली व त्याच्या खोलीत गेली. पण ती रिकामी होती. त्याने जाण्यापूर्वी, तिच्या खोलीत डोकावून बघितले असणार. आणि ती झोपलेली बघून तिला जागे न करता, खाली गेला

असणार. त्यांचे नाते प्रेमिकांसारखे होते. त्यामुळे तिला त्याचा सकाळचा सहवास चुकवल्याची खंत वाटली.

तिने नोकराणीला फोन करून विचारले, की तो गेला का, तर ती म्हणाली, की तासाभरापूर्वीच तो गेला. त्याने नोकराणीला सांगितले होते, की तिला उठवू नको व तिने सांगितल्याशिवाय, मुलांनादेखील तिच्या खोलीत जाऊ नये अशी मुलांसाठी सूचना होती --- त्यासाठी तो स्वतः मुलांच्या खोलीत गेला होता. हे सर्व नेहमीसारखेच होते. तरी तिने असे का विचारले, ते तिलाही कळले नाही, "मिस्टर ॲशबॉयने काही निरोप ठेवला आहे का."

नोकरांणी हो म्हणाली. तिने तो निरोप विसरल्याबद्दल दिलगिरी प्रगट केली. त्याने निघता निघता मिसेस ॲशबॉयला सांगायला सांगितले होते, की तो त्यांच्या प्रवासाबद्दल काही बेत आखणार आहे. व ती उद्या नौकाविहारासाठी जायला तयार आहे का."

शार्लोटने तिचा उद्या शब्द परत उच्चारला आणि तिच्याकडे अविश्वासाने बघत राहिली. "उ --- द्या --- , तुझी

खात्री आहे का की तो उद्या नौकाविहारासाठी जायचे म्हणाला?"

"हो, बाईसाहेब. अगदी खात्रीने. मी कशी काय विसरले, कुणास ठाऊक?"

"ठीक आहे. माझी अंघोळीची तयारी कर."

शार्लोट उडी मारून उठली. गात गात, आरशात स्वतःला निरखत, केस विंचरू लागली. असा विजय मिळवून, तिला तरुण झाल्यासारखे वाटू लागले. दुसरी बाई क्षितिजावरील ठिपक्यासारखी नाहीशी झाली. तिच्या डोळ्यांवर, ओठांवर तो विजय चमकू लागला. तो तिच्यावर प्रेम करत होता तर --- तो तिच्यावर नेहमीसारखेच भरभरून प्रेम करत होता. तिने जो त्रास सहन केला होता, तो त्याने खुषीने भरून काढला होता. त्यांनी ताबडतोब दूर निघून जाण्यात त्यांचे सुख दडलेले असल्याचे, त्याला समजले होते. कालच्या वादावादीनंतर, पुन्हा एकमेकांना समजून घेणे, गरजेचे होते. आता शार्लोटला कालचा परिणाम फारसा जाणवेना. तिने राक्षसाला तोंड देऊन नेस्तनाबूत केले होते. "धैर्य --- हेच गुपित आहे! प्रेम करणाऱ्या लोकांनी नुसते

डोळ्यात बघून, धोक्याने घाबरून जाऊ नये." तिचे हलकेसे भरघोस केस विंचरल्यावर, त्यातून विजयाचा हातांसारखी तिच्या डोक्यावर वीज निर्माण झाली. पुरुषांना ताळ्यावर आणण्यासाठीचे उपाय काही स्त्रियांना माहिती असतात व काहींना नाही --- फक्त सुंदर स्त्रियांना --- तिने आनंदाने स्पष्टीकरण दिले. शूरपणाची तिची पात्रता होती. नक्कीच ती खूप सुंदर दिसत असणार.

झगमगीत समुद्रावर सकाळ एखाद्या शिंपल्यासारखी नाचत होती. असा समुद्र ज्यावर ते लवकरच नौकाविहार करणार होते. तिने छान जेवणाची आज्ञा दिली. शाळेत निघालेल्या मुलांचा निरोप घेतला. तिची बॅग खाली आणली. नोकराणीला उन्हाळ्याचे कपडे काढण्यास सांगितले. कारण अर्थातच ते उन्ह आणि गरम हवेचा आस्वाद घ्यायला चालले होते. केनिथचे फ्लॅनेलचे कापरात ठेवलेले कपडे बाहेर काढावेत की काय, असा विचार तिने केला. पण तिला वाटले, "अजून कुठे जायचे ते माहिती नाही आणि आपण काय करतो आहोत! तिने घड्याळाकडे पाहिले. दुपार होत आली होती. तिने कार्यालयात त्याला फोन करायचे ठरवले. थोडा वेळ

लागला. मग त्याच्या सचिवाचा आवाज ऐकू आला की मिस्टर अॅशबॉयनी मगाशी फोन केला होता. त्यानंतर ते लगेच इथून बाहेर पडले --- वा, फारच छान! शार्लोट नंतर फोन करेल. तो किती लवकर परत येईल, असे विचारल्यावर सचिव ते सांगू शकत नव्हती. तो बाहेर पडला, तेव्हा तो घाईत होता. तिने एवढेच सांगितले, की तो शहराबाहेर चालला आहे.

शहराबाहेर! शार्लोटच्या हातात फोन तसाच राहिला. ती नवीन अंधारात चाचपडू लागली. तो शहराबाहेर का गेला आहे? त्यांच्या गावाला जायच्या आदल्या दिवशी, त्याने हे काय नवीन नाटक काढले आहे! काळजीने तिच्या अंगावर किंचित शहारा आला. तो नक्कीच त्या बाईला भेटायला गेला आहे. प्रवासाला जाण्यासाठी तिची परवानगी मागायला. त्यांचे तेवढे लागेबांधे नक्कीच आहेत. आणि शार्लोटला इकडे तिच्या कपाळावर विजयाच्या रेषा दिसत होत्या. ती हसत सुटली. खोलीभर फिरून, पुन्हा आरशासमोर बसली. तिला किती वेगळा चेहरा दिसला! दुसऱ्या शार्लोटच्या चेहऱ्यावरचे गुलाबी भाव, या शार्लोटच्या फिकट ओठांना

चिडवून दाखवत होते. शेवटी तिला विजयावर हक्क सांगायचा अधिकार होता. कारण तिचा नवरा त्या दुसऱ्या बाईचे न ऐकता तिला पाहिजे ते करत होता. ते नैसर्गिक होते पण दुसऱ्या दिवशी तो शहराबाहेर गेला होता, ते जरा विचित्र वाटत होते. त्याला काही तरतुदी करून ठेवायच्या असतील. काम आटपायचे असेल. पण तो त्या पत्रलेखिकेला भेटायला गेला होता, असे समजण्याची काही गरज नव्हती. तो शहराबाहेर रहाणाऱ्या कुणा अशीलाला भेटायला गेला असेल. अर्थात कार्यालयातील लोकांनी तिला काही सांगितले नाही. मिस्टर ॲशबॉय बाहेर गेले आहेत, एवढी साधी गोष्ट सांगायला सुद्धा ती सचिव खळखळ करत होती. मध्यंतरीच्या काळात, तिने आनंदाने तयारी चालू ठेवली. ते नेमके कुठे चालले आहेत, ते तिला नंतर समजले असते.

उत्सुकतेने तयारी करण्यात, वेळ भराभर गेला. शेवटी पडदे बंद करायला आलेल्या नोकराणीने शार्लोटचे श्रम संपवले. पाच वाजलेले पाहून, तिला आश्चर्य वाटले. अजूनही तिला माहिती नव्हते की ते दुसऱ्या दिवशी कुठे जाणार आहेत! तिने कार्यालयात फोन केला, तेव्हा तिला मिस्टर

ॲशबॉय सकाळपासून तिथे नसल्याचे सांगण्यात आले. तिने त्याच्या भागीदाराला विचारले. पण तोही काही सांगू शकला नाही. कारण त्याची गाडी उशिरा आल्याने, तो यायच्या आत मिस्टर ॲशबॉय येऊन परत बाहेर पडला होता. शार्लोट गोंधळून गेली. मग तिने तिच्या सासूला फोन करायचे ठरवले. अर्थात एक महीन्यानंतर केनिथ, त्याच्या आईला भेटायलाही गेलेला असू शकत होता. त्याच्या स्वतःच्याच विरोधाला न जुमानता, मुलांना आजीजवळ ठेवावे लागणार होते, पण हे सर्व त्याने तिला विचारून ठरवणे, अपेक्षित होते. इतर वेळी शार्लोट, यामुळे थोडी दुखावली गेली असती. पण आता ती जिंकल्यामुळे तिला त्याचे विशेष काही वाटले नाही. आता तिचा नवरा दुसऱ्या बाईचा नसून तिचा होता. तिने आनंदाने सासूला फोन केला. सासूचा मैत्रीपूर्ण आवाज ऐकून तिने सुरवात केली, “केनिथची बातमी ऐकून तुम्हाला नवल वाटले का? आम्ही अचानक केलेल्या या बेताबद्दल तुम्हाला काय वाटते?”

सासूने काही उत्तर देण्यापूर्वीच, शार्लोटला माहिती होते की ते उत्तर काय असणार आहे. पण तिच्याकडे केनिथ

गेलेलाच नव्हता. त्यामुळे सून काय म्हणते आहे, ते तिला कळेना. शार्लोट पण आश्चर्यचकित झाली. "पण मग तो गेला तरी कुठे?" असा विचार तिने केला. मग स्वतःला सावरून तिने सासूला सांगितले, की कसा त्यांनी अचानक निर्णय घेतला. हे सांगताना, केनिथ आणि तिच्यामध्ये कुणीही नसल्याचा तिचा आत्मविश्वास, तिला परत गवसला. तिच्या सासूने ती बातमी शांतपणे ऐकून घेतली. तिलाही केनिथबद्दल असेच वाटत होते, की तो हल्ली जास्त काम केल्याने थकलेला दिसतो. अशा वेळी कुठेतरी बाहेर जाणे, हा चांगला उपाय असल्याच्या सुनेच्या मताला, तिने अनुमोदन दिले. "तो कुठे बाहेर गेला, की मला बरे वाटते. एल्सीला प्रवास आवडत नसे. ती त्याच्या प्रवासाच्या बेताला, नेहमी हरकत घेत असे. तुझे वेगळे आहे, हे नशीबच म्हणायचे." केनिथने तो कुठे जातो आहे, याबद्दल तिला काही सांगितले नाही. तरी तिच्या सासूला त्याचे फार काही वाटले नाही. बाहेर जायचे ठरवल्यापासून तो घाईत असणार. पण जेवणापूर्वी तो येईलच. त्याना खरे तर पाच मिनिटे बोलायची गरज होती. "मला वाटते केनिथशी बोलून तू त्याला बाहेर पडायची गरज असल्याचे, पटवून त्याच्या डोक्यावरचे कामाचे भूत

उतरवशील. तो असा पूर्वी कधीच नव्हता. त्याच्या व्यावसायिक कामात तो असे करत राहिला, तर तो त्याचे सर्व पक्षकार गमावून बसेल --- प्रिय मुली, तुला वेळ असेल तर नक्की येऊन जा. कदाचित तू इथे असतांना, तो देखील येईल. तिच्या सासूचा धीरोदात्त आवाज खोलीत घुमत होता. शार्लोटने तिची तयारी चालू ठेवली.

सातच्या सुमारास फोन खणखणला. तिने तो घेतला. तो त्याच्या कार्यालयातून होता, सचिव म्हणत होती की मिस्टर ॲशबॉय आलेले नाहीत किंवा त्यांचा  काहीही फोन आलेला नाही. कार्यालय बंद करण्यापूर्वी, तिने जरुरीचे वाटल्याने हे कळवले. “ठीक आहे कळवल्याबद्दल आभारी आहे.” शार्लोट म्हणाली पण तिचा हात थरथरत होता. पण यावेळेपर्यंत, तो कदाचित त्याच्या आईकडे गेला असेल. तिने कपाटे, खण वगैरे लावले व कोट टोपी घालून ती मुलांच्या खोलीत गेली. ती त्यांच्या आजीकडे चालल्याचे तिने त्यांना सांगितले.

तिची सासू जवळच रहात होती. वसंत ऋतुतील संधीप्रकाशाच्या गार वेळी, तिच्याकडे येणारी प्रत्येक

आकृती, तिला तिच्या नवऱ्याचीच वाटत होती. पण तिला वाटेत तो भेटला नाही. ती सासूच्या घरात शिरली, तेव्हाही तिथे तो नव्हता. केनिथने फोन केला नाही व तो आलाही नाही. तिची वयस्क सासू शेकोटीजवळ बसली होती. तिचा म्हाताऱ्या पण चपळ हातातील विणकामाच्या सुया, भरभर फिरत होत्या. तिच्या तिथे असण्याने शार्लोटला धीर मिळाला. कुणालाही न सांगता केनिथ दिवसभर बाहेर गेला होता, हे जरा विचित्रच होते. शेवटी हे अपेक्षित होतेच. एका व्यग्र वकिलाच्या हातात, खूप केसेस होत्या. अचानक काही कारणामुळे, त्याला काही जुळवून घ्यावे लागले असेल. तो उपनगरातील काही पक्षकारांना, भेटायला गेला असेल. तिथे अडकला असेल. त्याच्या आईला आठवत होते, की एकदा न्यू जर्सीला एका म्हाताऱ्या, विचित्र, माणूसघाण्याची केस होती. तो श्रीमंत असून इतका चिक्कू होता, की त्याच्याकडे फोन नव्हता. तेव्हा केनिथ तिथे असाच अडकला होता.

शार्लोट अधिकाधिक उदास होऊ लागली. जेव्हा तिच्या सासूने तिला विचारले, की ते उद्या प्रवासासाठी केव्हा निघणार आहेत. तेव्हा तिला काय उत्तर द्यायचे, ते माहिती

नव्हते. आपण उद्या जायचे आहे, एवढाच निरोप तिला फक्त मिळाला होता. तिची परिस्थिती विचित्र होती. तिच्या सासूला पण तसेच वाटले. पण ती म्हणाली की तो खूपच घाईत असणार.

“आई, पण आता आठ वाजायला आले. त्याला हे समजायला पाहिजे, की आम्ही उद्या केव्हा निघणार आहोत, ते त्याने मला सांगायला पाहिजे.”

“मला वाटते बोट संध्याकाळशिवाय सुटत नाही. भरतीच्या वेळी कधीकधी मध्यरात्रीपर्यंत देखील थांबायला लागते. केनिथने असाच विचार केला असेल. तो शांत व धीराचा माणूस आहे.”

शार्लोट उभी राहिली. “असे नाही. त्याला काहीतरी झाले असणार.”

तिच्या सासूने चष्मा बाजूला काढून ठेवला व विणकामही बाजूला सारले.

“जर तू अशा काही कल्पना करू लागलीस, तर मग गोष्टी --- “

“तुम्हाला काळजी वाटत नाही का?”

“मला शक्य आहे, तोपर्यंत मी काळजीत नसते. प्रिय मुली, तू आता घरी जेवणासाठी फोन कर. तू इथे जेवशील का? तो घरी जातांना, नक्की इथे येईल.”

शार्लोटने घरी फोन केला. तो घरी आला नसल्याचे नोकराणी म्हणाली. शार्लोट तिच्या सासूबरोबर जेवायच्या खोलीत गेली. सुकलेल्या घशाने रिकाम्या ताटासमोर बसली. तिच्या सासूने शांतपणे, पण चटपटीतपणे तयार केलेले जेवण वाढले. “मुली, तू काहीतरी खाऊन घे. नाहीतर तुझी अवस्थाही केनिथसारखी होईल. --- हो. जेन थोडेसे शतावरीचे कोंब वाढ.”

तिने शार्लोटला पेलाभर शेरी प्यायला लावली आणि टोस्ट सुद्धा खायला लावला. मग त्या हॉलमधील शेकोटीजवळ आल्या. तिच्या सासूच्या खुर्चीतील गादी हलवून नीट केली गेली. रात्रीच्या अनिश्चिततेत व गूढ वातावरणात, सर्व किती ओळखीचे आणि सुरक्षित वाटत होते. त्या दोन स्त्रियांची अर्धवट माहितीवर आधारलेली उत्तरे, काठावरील अनोळखी आकृतीसारखी वाटत होती.

शेवटी शार्लोट उठून बोलली, “आता मी घरी गेलेले बरे. इतक्या उशिरा, केनिथ घरीच जाईल.”

तिची सासू अनुमोदनपर, हसली. “प्रिय मुली, फार उशीर झालेला नाही. दोन चिमण्यांना जेवायला फार वेळ लागत नाही.”

“नऊ वाजून गेले. खरी गोष्ट अशी आहे, की मी स्वस्थ बसू शकत नाही.” शार्लोट तिच्या सासूला अभिवादन करायला खाली वाकली.

तिच्या सासूने तिचे दोन्ही हात, खुर्चीच्या हातांवर ठेवले. स्वतःला सावरत ती बोलली, “मी पण तुझ्याबरोबर येते.

शार्लोट बचावाचा प्रयत्न करत म्हणाली, की फार उशीर झाला आहे व तशी काही गरज नाही. केनिथ आल्याबरोबर, ती फोन करेल. पण तिच्या सासूने आधीच घंटी वाजवून नोकराणीला बोलावले होते. ती पायाने थोडी अधू होती. तिने कोट वगैरे आणला व ती काठीला टेकून उभी राहिली. तिने नोकराणीला सूचना दिली, “जर मिस्टर केनिथ इथे आले, तर त्यांना सांग की मी त्याच्याकडे गेले आहे.”

टॅक्सी बोलावली गेली व त्यात बसून दोघीजणी गेल्या. शार्लोट एकटी घरी परतत नसल्याने, तिने सासूचे आभार मानले. तिच्या सासूच्या ताज्या ठाम कांतीने, नितळ डोळ्यांनी व जवळीकीने, तिला पूरक व उबदार असे वाटत होते. टॅक्सी थांबल्यावर, तिने धीर देत शार्लोटच्या खांद्यावर हात ठेवला व म्हणाली, “तू बघशील, काही निरोप आला असेल.”

शार्लोटच्या घंटीमुळे दार उघडले गेले. दोघी आत शिरल्या. शार्लोटचे हृदय धडधडू लागले. तिच्या सासूच्या विश्वासामुळे, तिच्याही धमन्यांमधून विश्वास वाहू लागला.

तिची सासू म्हणत होती, “तू बघशील. तू बघशील.”

दार उघडणारी नोकराणी म्हणाली, “नाही. मिस्टर अ‍ॅशबॉय अजून आलेले नाहीत. काही निरोपही नाही.”

सासूने सुचवले, “तुझा फोन नीट चालतो आहे ना?” नोकरांणी म्हणाली की अर्ध्या तासापूर्वी तरी चालत होता. पण ती जाऊन फोन करून बघेल. ती गेली. शार्लोटने टोपी काढली. तिची नजर टेबलावर गेली. तिथे तिच्या नवऱ्याचे पुसट नाव वर लिहिलेले, करडे पाकीट पडले होते. ती

ओरडली, “ओहो!” अनेक महिने ती करडे पाकीट घरी आले असेल, असे आश्चर्य वाटून न घेता आत शिरली होती.

तिच्या सासूने नवल वाटून विचारले, “अग मुली, काय आहे?”

शार्लोटने उत्तर दिले नाही. तिने ते पाकीट घेतले व त्याकडे बघत राहिली. जणू काही तिची नजर आत पोचून, काय लिहिले आहे ते तिला कळणार होते. नंतर तिला एक कल्पना सुचली. तिने ते पाकीट सासूला दिले.

“तुम्हाला हे अक्षर माहिती आहे का?”

तिच्या सासूने ते हातात घेतले. चष्मा घातला व पाकीट उजेडात धरले. तिचा नेहमीचा ठाम, घट्ट हात थरथरत होता. ती हळू आवाजात ओरडली, “का? हे तर केनिथला आलेले आहे.” तिला तिच्या सुनेचा प्रश्न अयोग्य वाटत असल्याचे, तिच्या आवाजावरून जाणवत होते.

शार्लोट म्हणाली, “हो, तरीही मला जाणून घ्यायला आवडेल, की हे अक्षर तुमच्या ओळखीचे आहे का?”

तिच्या सासूने पत्र परत दिले व ठामपणे म्हणाली, "नाही"

दोघी स्त्रिया वाचनालयात गेल्या. शार्लोटने दिवा लाऊन दार बंद केले. अजून ते पत्र तिच्या हातात होते.

तिने जाहीर केले, "मी हे पत्र फोडणार आहे,"

तिच्या सासूने तिच्याकडे चक्रावून बघितले. "पण प्रिय मुली, तुला न आलेले पत्र ---अग मुली, तू असे करू शकत नाहीस."

तिने सासूकडे रोखून बघणे चालू ठेवले. "आता जर मी अशी काळजी करत बसले तर --- केनिथ कुठे आहे, ते हे पत्र मला सांगेल.'

तिच्या सासूच्या चेहऱ्यावरची चकाकी जाऊन, तो फिका पडला. गाल ओढलेले व सुरकुतल्यासारखे दिसू लागले. "असे कसे? --- तुला असा विश्वास का वाटतो? --- असे कसे शक्य आहे?"

त्या बदललेल्या चेहऱ्याकडे शार्लोट स्थिर डोळयांनी बघत राहिली. “ओहो, म्हणजे तुम्हाला ते हस्ताक्षर माहिती आहे?” तिने टोमणा मारला.

“ते हस्ताक्षर माहिती आहे? मला कसे काय माहिती असेल? माझ्या मुलाच्या सगळ्या पक्षकारांपैकी --- मला काय माहिती असेल तर -“ तिची सासू तिच्याकडे घाबरून विनवणी करत काही म्हणता म्हणता, मोडून पडली.

शार्लोटने तिच्या कंबरेला धरले. “आई, तुम्हाला काय माहिती आहे? मला सांगा. तुम्ही मला सांगितलेच पाहिजे.”

“एवढेच की नवऱ्याच्या अपरोक्ष बायकोने त्याचे पत्र फोडण्याने, काही चांगले होईल, यावर माझा विश्वास नाही.”

नीतीशास्त्राच्या पुस्तकातील वचन ऐकावे, त्याप्रमाणे शार्लोटच्या चिडलेल्या कानांना ते शब्द, मुळमुळीत वाटले. ती अधीरपणे हसली व तिच्या सासूची कंबर सोडून दिली. “एवढेच? हे पत्र फोडले तरी किंवा नाही फोडले तरी, त्यातून काही चांगले निघणार नाही. ते मला चांगले माहिती आहे. पण जे काही वाईट निघेल, ते काय आहे, ते मला जाणून घ्यायचे आहे.” तिचे पत्र धरलेले हात थरथरत होते. पण आता

ती थरथर थांबली व तिचा आवाजही. ती अजूनही सासूकडे टक लाऊन बघत होती. “आमचे लग्न झाल्यापासून केनिथला आलेले, या अक्षरातील हे नववे पत्र आहे. नेहमी अशाच करड्या पाकीटातून ती येतात, याची मी त्यांची नोंद ठेवली आहे. कारण प्रत्येक वेळी ते आल्यावर केनिथची अवस्था, भयंकर धक्का बसल्यासारखी होते. त्याच्यावर तो परिणाम खूप काळ रहातो. मी त्याला हे सांगितले आहे. मी त्याला म्हणाले आहे, की ती कुणाकडून येतात, ते मला समजले पाहिजे. कारण मला दिसते आहे, की ती त्याला मारत आहेत. तो माझ्या प्रश्नांना उत्तर देत नाही. तो म्हणतो की तो मला त्याबद्दल काही सांगू शकत नाही. पण काल रात्री तो माझ्याबरोबर प्रवासाला यायला --- त्या पत्रांपासून दूर जायला --- तयार झाला.”

तिची सासू मान खाली घालून, एका खुर्चीत जाऊन, बसली होती. ती पुटपुटली, “ओहो!”

“म्हणजे आता तुम्हाला समजले तर!”

“तो तुला असे म्हणाला का, की ते त्या पत्रांपासून दूर पळण्यासाठी होते?”

“तो म्हणाला, दूर पळण्यासाठी --- दूर पळण्यासाठी! तो मुसमुसत असल्याने, त्याला बोलवत नव्हते. पण मी त्याला सांगितले, ते का होते आहे, मला माहिती आहे.”

‘मग तो काय बोलला?”

“त्याने मला जवळ घेतले व म्हणाला की तुला पाहिजे आहे, तिकडे आपण जाऊ.”

तिची सासू म्हणाली. “अरे देवा, आभारी आहे.” मग तिथे शांतता पसरली. सासू तशीच मान खाली घालून बसली होती. ती सुनेकडे बघत नव्हती. शेवटी ती वर बघून म्हणाली, “तुझी खात्री आहे का, की तशी नऊ पत्रे आली?”

“खात्रीने. हे नववे आहे. मी ती मोजदाद ठेवली आहे.”

“आणि त्याने स्पष्टीकरण द्यायला पूर्णपणे नकार दिला?”

“अगदी पूर्णपणे.”

तिची सासू फिक्या सुरकुतलेल्या ओठांनी बोलली, “ही पत्रे केव्हा येऊ लागली? तुला आठवते आहे का?’

शार्लोट परत हसली. “आठवते का? आम्ही मधुचंद्राहून परत आलो, तेव्हा पहिले आले.”

तिच्या सासूने डोके वर करून जोराने विचारले, “अशा वेळी? मग --- हो. ते उघड.”

ते शब्द इतके अनपेक्षित होते की शार्लोटची कानशीले गरम झाली. हात परत थरथरू लागले. तिने तिची बोटे पाकीटाच्या फटीत घालून, ते उघडायचा प्रयत्न केला. पण ते इतके घट्ट चिकटवलेले होते, की ती नवऱ्याच्या टेबलाशी जाऊन, पत्र उघडायचा कटर शोधू लागली. तिच्या नवऱ्याने अलीकडेच हात लावलेल्या वस्तू वरखाली करतांना, तिच्या अंगातून जणू कुणा नुकत्यातच वारलेल्या माणसाच्या खासगीपणाची एक थंड लहर दौडत गेली. खोलीतील नीरव शांततेत, पत्र कटर वापरून उघडल्याचा आवाज माणसाच्या ओरडण्यासारखा भासला. तिने आतील कागद काढून दिव्याजवळ नेला.

तिच्या सासूने श्वास रोधून विचारले, “काय ग!”

शार्लोट हलली नाही. तिने उत्तरही दिले नाही. भुवया ताणून, ती पत्रावर वाकली होती. ती ते दिव्याच्या जवळ

जवळ नेत होती. तिची नजर नादुरुस्त असली पाहिजे. किंवा गुळगुळीत कागदावर दिव्याचे उजेड पडून तो चकाकत होता. डोळे  फाडूनही तिला फक्त काही पुसट अक्षरांचे फरांटे दिसत होते. ते अक्षर इतके पुसट होते,  की वाचून त्याचा अर्थ लावणे कठीण होते.

ती म्हणाली, “मला काही कळत नाही आहे.”

“म्हणजे काय, मुली?”

ती टेबलाकडे परत गेली आणि केनिथच्या वाचायच्या दिव्याजवळ बसून म्हणाली, “अक्षर फार पुसट आहे --- थांबा.” व पत्राचा कागद मोठे दिसणाऱ्या भिंगाखाली धरला. हा सर्व वेळ तिची सासू तिच्याकडे लक्ष देऊन बघत असल्याचे, तिला कळत होते.

“छान!”

“पण हे मोठे व ठळक होत नाही आहे. मला हे वाचता येत नाही.”

“म्हणजे तुला असे म्हणायचे आहे का, की कागद पूर्णपणे कोरा आहे?”

“नाही पूर्ण कोरा नाही. त्यावर काही लिहिलेले आहे. मला काहीतरी ‘माझे’ व ‘येते आहे’ असे दिसते आहे. ते तसे असावे.”

तिची सासू एकदम उठून उभी राहिली. तिचा चेहरा आणखीनच उतरला होता. ती टेबलाकडे सरकली आणि त्यावर तिचे दोन हात टेकत, एक दीर्घ श्वास घेत, निकराचा प्रयत्न करत ती म्हणाली, “मला बघू.”

शार्लोटला तिच्या सासूच्या चेहऱ्याही केनिथप्रमाणे, पांढरा पडल्यासारखे वाटले. तिने विचार केला, ‘आपल्या सासूला माहिती आहे.’ तिने टेबलावरून पत्र सरकवले. तिच्या सासूने शांतपणे, तिचे सुरकुतलेले हात त्याला न लावता, त्यात डोके घातले. शार्लोट वाचायचा प्रयत्न करत असतांना, तिची सासू तिला जसे बघत होती, तशी आता ती सासूकडे बघत राहिली. तिची सासू अवघडल्यासारखी चष्मा मागेपुढे करत व त्यावर अजून वाकत, तो कागद डोळयांजवळ नेत होती. दिव्याचा उजेड तिच्या वयस्क चेहऱ्यावर पडला होता. तिच्या स्वच्छ व पारदर्शक चेहऱ्यावर, गूढ उकललेले भाव येत आहेत का, ते शार्लोट बघत होती. तिने तिच्या

सासूच्या चेहऱ्यावर आजपर्यंत साधेसुधे व प्रामाणिक भावच पाहिले होते. पण आता त्यावर रागाची छटा दिसत होती. आता त्यावर भीती, द्वेष व अविश्वासपूर्ण दुःख दिसू लागले. काळजीचे व उघडपणे विरोधाचे भाव दिसू लागले. तिच्या जणू आतील भावनांचा उद्रेक तिचा चेहरा विद्रूप करत होता. तिने बऱ्याच वेळाने वर पाहिले. “मला कळत नाही. मला शक्य नाही.” ती एखाद्या मुलासारखे, हताश होऊन म्हणाली.

“तुम्हालाही काही कळत नाही?”

तिने डोके हलवले. तिच्या डोळयातून दोन अश्रू ओघळले.

शार्लोट ओठ वेडेवाकडे करत म्हणाली, ”तुम्हाला अक्षर ओळखीचे वाटते आहे का?”

तिच्या सासूने दुर्लक्ष केले. “मला काहीच कळत नाही --- काहीच नाही.”

“पण अक्षर तुमच्या ओळखीचे आहे ना?”

तिच्या सासूने घाबरून डोके वर केले. शांत, ओळखीच्या खोलीवरून तिची काळजीची, उत्सुक नजर फिरू लागली. “मी कसे सांगू? प्रथम मी घाबरून गेले -- “

“सारखेपणाने भीती वाटली का?’

“खरे तर, मला वाटले --- “

“आई, काय वाटले ते सांगून मोकळ्या व्हा. नक्की तुम्हाला लगेचच कळले, की ते ‘तिचे’ अक्षर आहे?”

“ओहो, प्रिय मुली, थांब --- जरा थांब.”

“कशासाठी थांबू?”

तिच्या सासूने वर बघितले. तिचे डोळे फिरत फिरत शार्लोटच्या डोळ्यांशी भिडले. नंतर ते तिच्या मुलाच्या टेबलाच्या मागील भिंतीवर खिळले.

शार्लोट सासूच्या नजरेवरून समजली. तिने शिव्याशापांने भरलेली हास्यकिंकाळी मारली. “आता मला समजले. मला आता थांबायची गरज नाही. तुम्ही मला उत्तर दिले आहे. तिचे चित्र जिथे लटकवलेले होते, त्या जागी भिंतीवर तुम्ही बघत आहात.”

तिच्या सासूने धमकीवजा पुटपुटत हात वर केला. “हळू --- हळू!”

शार्लोट ओरडली, “ओहो, तुम्ही अशी कल्पना करू नका, की मला काहीही घाबरवू शकेल.”

तिची सासू अजून टेबलावर वाकलेली होती. तिचे ओठ अजून शोकाने थरथरत होते.

“आपण वेड्या होऊ. आपण दोघीही वेड्या होऊ. आपल्याला माहिती आहे, अशा गोष्टी होणे शक्य नाही.”

शार्लोटने सासूकडे कीव येईल, अशी नजर टाकली. “मला खूप काळ वाटत होते, की आता काहीही होणे शक्य आहे.”

“हे सुद्धा?”

“हो. हेच.”

“पण ते पत्र --- शेवटी त्यात तर काहीच नाही”

“कदाचित त्याच्यासाठी त्यात काही असेल. मी कसे सांगणार? तो मला एकदा म्हणाल्याचे आठवते आहे, तुम्हाला एखादे अक्षर परिचित असेल, तर त्याचे पुसट फरांटेही

तुम्हाला वाचता येतात. तो काय म्हणत होता, ते मला समजते आहे. तो त्या अक्षराशी ‘परिचित होता’.”

“काही फरांटे मला ओळखीचे वाटले, तरी ते इतके पुसट आहेत, की कुणीच ते पत्र वाचू शकणार नाही.”

शार्लोट परत हसली व जोरात म्हणाली, “मला वाटते भुतांच्या बाबतीत सगळे पुसट असावे.”

“अग माझ्या मुली, प्रिय मुली, असे म्हणू नकोस.”

“का म्हणू नको? जर रिकाम्या भिंतीही तिच्यासाठी रडत असतील तर? तुम्हाला आणि मला तिचे अक्षर वाचता येत नसेल, तरी त्याने काय फरक पडतो?” जर तुम्हाला तिचा चेहरा रिकाम्या भिंतीवर दिसू शकतो, तर त्याला या कोऱ्या कागदावरील तिची अक्षरे का दिसू नयेत? तुम्हाला हे दिसत नाही का, की ती घरात जिकडे तिकडे आहे. आणि त्याच्या जवळ आहे. बाकी कुणाला ती दिसत नाही म्हणून काय झाले?” शार्लोट धपकन खुर्चीत बसली व चेहरा हातात झाकून घेतला. ती हुंदके देत, नखशिखांत थरथरू लागली. बऱ्याच वेळाने तिच्या खांद्याला कुणीतरी स्पर्श केला. तेव्हा तिने वर बघितले. तेव्हा तिची सासू तिच्यावर वाकलेली

दिसली. सासूचा चेहरा अजून लहान झाला होता. पण आता तो नेहमीप्रमाणे शांत दिसत होता. तिच्या ठुसठुसणाऱ्या वेदनेतून, शार्लोटला भक्कम दिलासा मिळाल्याचा, प्रत्यय आला.

"उद्या --- उद्या, तू पाहशील. उद्या तुला काही स्पष्टीकरण मिळेल."

तिला मध्येच थांबवत, शार्लोट बोलली, "स्पष्टीकरण? ते कोण देणार?"

तिच्या सासूने एखाद्या नायकाच्या थाटात, सुनेच्या पाठीवरील हात काढून घेतला. ती सरळ झाली.

ती मोठ्या आवाजात ओरडली, "केनिथ स्वतः देईल."

शार्लोट काही बोलली नाही. सासू पुढे बोलत राहिली, "पण मध्यंतरीच्या काळात आपण काही केले पाहिजे. आता क्षणाचाही उशीर न करता, आपण पोलिसांना, केनिथ अजून घरी आला नसल्याचे कळवू. आपण सर्व काही केले पाहिजे --- सर्व काही."

शार्लोट सावकाशीने उठून ठामपणे उभी राहिली. म्हाताऱ्या बाईप्रमाणे तिचे सांधे आखडून दुखत होते. “

न घाबरता तिची सासू म्हणाली, “हो.” शार्लोट वर जाऊन फोन करू लागली.

Simonsen

By Sigrid Undset

Norway

# सिमोन्सेन




गेटमधून आत शिरायच्या जागी, सिमोन्सन क्षणभर थांबला. त्याच्या हातात असलेले प्रशंसापत्र ठेवण्यासाठी, त्याने त्याचे जुने फाटू लागलेले पाकीट बाहेर काढले. पण असे करण्यापूर्वी, जरी त्याला मजकूर पाठ होता, तरी त्याने तो कागद बाहेर काढून नीट वाचला.

“अंतोन सिमोन्सन गेली तीन वर्षे आमच्या गोदामात कारकून म्हणून काम करत असून, तो आपण होऊन काम करणारा, उद्योगी व निर्व्यसनी माणूस आहे.

हर्क्युलस मशीन दुकान

एन निल्सेन”

ते प्रशंसापत्र --- अरेरे! त्याचा त्याला फार उपयोग नव्हता. ते प्रशंसापत्र म्हणजे, व्यवस्थापकाच्या हातचा मळ होता. एखाद्या दुसऱ्या गोष्टीबद्दल त्याच्या गिऱ्हाईकाशी वा तत्सम लोकांशी खोटे बोलायला, त्याचा सर्वसामान्यपणे विरोध नव्हता. जहाजाच्या तारखा वगैरे. पण जेव्हा एखाद्या गरीबाला त्याचे आयुष्य सुकर करेल व काही काम मिळवून देईल, असे प्रशंसापत्र द्यायची वेळ येते, तेव्हा ती गोष्ट वेगळी असते. व्यवस्थापक म्हणाला, “तुझे काम पूर्णपणे समाधानकारक होते”, असे मी लिहू शकणार नाही. पण निर्व्यसनी हा शब्द सिमोन्सनने त्याला घालायला लावला. पहिल्या कच्च्या प्रशंसापत्रात, तो नव्हता. पण व्यवस्थापक म्हणाला, “सिमोन्सन, दिवसा केव्हाही तुझ्या तोंडाला दारूचा वास येत असतो.” पण यावर सिमोन्सन म्हणाला, “मिस्टर

व्यवस्थापक, मी आता व परत दारू घेतली आहे, हे खरे आहे. पण तुम्हाला दिवसभर जर ओलसर, चिकचिकाट असलेल्या घाणेरड्या गोदामात खणायचे काम करावे लागले असते, तर तुम्ही देखील नक्कीच दारू घेतली असती. पण अंतोन सिमोन्सन, कामावर असतांना नेहमी प्यायलेला असतो, असे कोणी म्हणू शकणार नाही. अगदी काठावर सुद्धा नाही." तेव्हा त्या व्यवस्थापकाला ते मान्य करावेच लागले. मग टंकलेखन करणाऱ्या मुलीला ते प्रशंसापत्र, निर्व्यसनी हा शब्द घालून परत टंकलिखित करावे लागले. तर असे ते पत्र इथे होते. ते फार बदलावे लागले नाही, हे खरे आहे. पण त्यातील वाईट भाग म्हणजे सिमोन्सनकडे दाखवायला अजून काहीच नव्हते.

"अरे मूर्खा, तिकडे बघ."

सिमोन्सनने भिंतीच्या एका बाजूला उडी मारली. लोखंडी सळयांनी भरलेली गाडी गेटमधून आवाज करत आत आली. गेटमध्ये शिरायच्या जागी, दगडी पुलावर ते सामान टाकण्यासाठी, महाकाय घोडे त्यांच्या सर्व शक्तीनिशी घाम गाळत होते. गाडीचा चालक ओरडून काही बोलला. पण तो

काय बोलला, ते सिमोन्सनला ऐकू आले नाही. कारण लोखंडी सळयांच्या आवाजात, तो आवाज विरून गेला.

त्याने प्रशंसापत्र दूर ठेवले व त्याच्या छातीजवळील खिशात पाकीट मिटवून ठेवले. त्याने त्याची नावड दर्शवणारे डोळे, रागाने गाडीकडे वळवले. ती गोदामाशी जाऊन एका मोठ्या यारीसमोर थांबली. त्या यारीच्या अंधारी भोकातून, धुरकट लाल विटांच्या भिंतीतून, गजांच्या खिडकीतून, साखळी व पुली बाहेर आले. घोड्यांचा पार्श्वभाग शुभ्र होता. आणि दोन्ही बाजूंच्या केसांचा झुबका किंचित ओलसर होता. चालकाने तो झाकला नव्हता. तो एका दुसऱ्या माणसाशी बोलत उभा होता.

सिमोन्सनने त्याच्या कोटाची बटने लावली. तो तसा नवा असून, चांगल्या अवस्थेत होता. त्याने तो सरळ करून, पोट पुढे काढले. त्याच्यात मध्यमवर्गीय ऐट उसळून आली. जरी चालक त्याच्या अंगावर रागाने ओरडत होता, तरी त्या चालकापेक्षा तो स्वतःला, समाजाचा चांगला नागरिक समजत होता. या स्वतःच्या स्थानाच्या जाणीवेबरोबर, तिथे दोन घोड्यांची घामाने निथळणाऱ्या स्नायूंची फुरफुर बघून,

त्याच्यात दुसरी एक पुसटशी भावना उमलली होती. त्याने गेटमधून आत पाऊल टाकले.

“मला वाटते, तुम्ही तुमच्या घोड्यांना झाकायला पाहिजे. अशा तऱ्हेने त्यांना थंडीत घाम गाळत, उभे करणे बरोबर नाही.”

उंच, बारीक, बेकार चालकाने, वळून त्याच्याकडे तोंड केले.

“काय रे जाड्या, तू तुझे काय ते बघ.”

“मी वर कार्यालयात जाऊन, तू घोड्यांना कसे वागवतो आहेस, हे सांगितले तर काय होईल?”

“तुला काय करायचे आहे? तू इथून चालू पड. तुला यात नाक खुपसायची, काही गरज नाही.” एवढे बोलून चालक त्याच्या दिशेने पुढे येऊ लागला.

सिमोन्सन थोडासा मागे झाला. पण त्याने आव असा आणला होता, की त्याला हात लावल्यास तो चालकाच्या ढेरपोटावर चांगले हाणेल.

“मला तुम्हाला एवढेच लक्षात आणून द्यायचे होते, की वरून कार्यालयातून ते तुम्हाला बघू शकतात --- तुम्ही कंपनीच्या घोड्यांना कसे वागवत आहात.”

एवढे बोलून त्याने तोंड वळवले. त्यानंतर लगेचच त्याची मध्यमवर्गीय ऐट संपली. तो गेटमधून बाहेर पडतांना, एक लाल चेहऱ्याचा, सोनेरी हलक्या केसांचा माणूस --- जिन्याने भरभर खाली आला. त्याने कोट व फरची टोपी घातली होती. तो त्याच्या हातात चंदेरी मुठीची छडी फिरवत होता. सिमोन्सनची मुलाखत घेणारा, तोच तो माणूस होता.

आता बाहेर काळोख होऊ लागला. चार वाजायला आले होते. घरी जेवण्यासाठी इतक्या उशीरा आल्याबद्दल, ओल्गा नक्कीच त्याला ओरडली असती. ठीक आहे. त्याला फक्त सांगावे लागले असते, की त्याला गोदामात जास्त वेळ थांबावे लागले.

सिमोन्सन जड पाऊले टाकत, भरभर टॉरव्हगटेनकडे चालू लागला. तो भरभरही चालत होता व त्याच वेळेस पाऊले ओढतही चालत होता. त्याचे ढेरपोट आणि वाकलेल्या हातांमुळे, रबरी चेंडू सरपटत, उसळ्या मारत

चालल्यासारखे वाटत होते. बुटक्या मानेचा, जाड थुलथुलीत चेहऱ्याचा, निस्तेज व भुवयांखाली खोल गेलेल्या डोळ्यांचा, लालसर गालांचा, करड्या पिवळसर मिशांवर असलेले निळसर नाक, असलेला असा तो होता.

ती सरत्या डिसेंबरमधील शनिवारची उदास दुपार होती. करडे धुके पडले होते. त्यामुळे धुरकट वाटत होते. अर्धवट जळालेल्या कसले तरी, काळे कण पसरले होते. बाहेर रस्त्यावर अर्धवट घट्ट व अर्धवट वितळलेल्या बर्फात, टांगा घसरत उभा होता. पाण्याचे थेंब साचलेल्या दुकानाच्या खिडक्या, उजळलेल्या होत्या व रस्त्यावर वाहत्या माणसांचा काळा लोंढा होता. स्वतःच्या विचारात गुंग होऊन, तो चाललेला असतांना, त्याच्या वाटेत कुणीतरी रागाने येऊन धडकले.

त्याच्या विचारांमध्ये त्यामुळे फार बाधा आली, असे नाही. कारण त्याने त्या विचारांना मनातून ढकलून दिले. त्यावेळी त्याला उशीराचे काहीतरी कारण नक्की सापडले असते. त्यामुळे ओल्गाला हे कळले नसते, की शेवटी त्याला

वर्षाच्या सुरवातीला, काढले गेले. अरेरे, आयुष्य म्हणजे एक झुंज होती.

वर्षाच्या सुरवातीपूर्वी, महिन्याचा बराचसा चांगला काळ शिल्लक होता. त्याला काही घाई नव्हती. अगदी वाईटातील वाईट परिस्थिती आली असती, तर त्याला सिगर्डला लिहावे लागले असते. सिगर्डने त्याला दुसरे काम सहज मिळवून दिले असते. सिगर्ड इतक्या स्थिरस्थावर झालेल्या त्याच्या मुलाला, त्याने असे विचारणे, काही गैर नव्हते. हा नक्कीच काही विनोद नव्हता. पण हे चौथ्यांदा होत होते. आठ वर्षात फक्त चार वेळा. आठ वर्षांपूर्वी असेच नवीन वर्षाच्या आधी, सिगर्डने त्याला या कार्यालयात लावून दिले होते --- केवळ त्या साध्या, सुंदर सुनेसाठी --- त्या भांडखोर बाईसाठी. तिला वाटत होते की तिच्या घराच्या आसपास फ्रेडरिकस्टॅडमध्ये रहाण्याइतका तो अजून फुगलेला नाही. हे दुर्दैवी होते. पण नक्की होते, की त्याने तिन्ही ठिकाणी गोंधळ करून ठेवला होता. पण तो त्याचा दोष नव्हता. कार्यालयातील बायका --- जळाऊ कोंबड्या --- त्यांनी घोटाळा केला. जसे काही ते त्यांचे काम होते. तो बिचारा जोपर्यंत त्याचे काम करत होता,

तोपर्यंत त्यांना मध्ये लुडबुड करायची काही गरज नव्हती. त्याचे वागणे रास्त होते. त्यांना काळजी करायची काही गरज नव्हती. उठवळ, टोकेरी स्वभावाच्या अशा त्या चहाटळ बायका होत्या. आणि ते हळूहळू विचित्र तऱ्हेने वावड्या उठवणारे गोदाम होते. तो प्रत्येक बाबतीत योग्य प्रकारे सरळ मार्गाने काम करत होता. त्यावेळी नुकतीच ओल्गाशी त्याची ओळख झाली होती.

त्याला तशा प्रकारच्या कामाची सवय नव्हती, हे खरे होते. पण त्याने फोरमनला त्रास दिला नसता, तर त्याची नोकरी कधीच गेली नसती. त्यानंतर तो मशीनच्या दुकानात लागला. साठीकडे आलेल्या माणसासाठी, अवघड, विचित्र, नवीन गोष्टी शिकून घेणे, हे सोपे नव्हते. विक्री, जहाज भरणे, साठवण आणि बरेच काही. गोदामाचा फोरमन आळशी मनुष्य होता. आणि नेहमी चूक सिमोन्सनच्या पदरात येई. सुरवातीपासून दोघांचे पटत नसे. व्यवस्थापकापासून मुख्य कारकूनापर्यंत, सगळे त्याला आठवण करून देत होते, की तो तिथे हंगामी आहे. त्याने इतर कुठे जायचे ठरवले आहे का, असे ते विचारत. कधीही त्याने आगाऊ पैसे मागितले, की

इतर फोरमन, सहकारी, रोखपाल बाई व इतर सर्वजण देखील, खूप चिडचिड आणि खवचटपणा करत.

अस्वस्थपणाची व निराशेची करडी छाया, त्याच्यावर पडली होती. तो घरी जाईल तेव्हा, ओल्गा कशी आरडाओरडा करून आपली खरडपट्टी काढेल, असा विचार तो करत होता. सिगर्ड आणि त्याची बायको, यांनाही हे मुळीच पटणार नाही, की त्याला कामावरून काढून टाकले आहे. आणि आता तो वेगळ्या ठिकाणी घाबरत व त्याच्या शहाणपणाचे टोक गाठत,  काही न समजता व जे बहुधा कधीच समजणार नाही, असे नवीन काम सुरु करणार आहे. अनोळखी लोकांमध्ये, दुसऱ्या गोदामात किंवा कार्यालयात, न आवडणारे, भीतीच्या दबावाखाली, सतत नावड दाखवत व कुरकुर करत, पुन्हा डच्चू मिळायची वाट बघत, काम करणार आहे. त्याच्या इतर सगळ्या कामांप्रमाणेच स्वतःला कमी लेखत, रडतखडत व मूर्खासारखे घाईघाईने, काम करणार आहे.

असे असले तरीही सिमोन्सन, दुःखदायक विचारांपासून चार हात लांब असे. त्याला असेच आयुष्य घालवायची,

सवय झाली होती. त्याने स्वतःला नम्र बनवले होते. अपशब्द ऐकायला लागणे, कामावरून काढून टाकणे व निराश होणे, हे अटळ असल्याचे, तो धरून चालला होता. मग तो समुद्रावर वा गोदीवर इसॅचसेन बरोबर असो किंवा घरी बायकोबरोबर असो. बायको म्हणजे अर्थात, ती जोपर्यंत त्याच्याबरोबर रहाते आहे, तोपर्यंत. चिडचिडी, कडक, न पटणारी, अशी त्याची सून पूर्णपणे चांगल्या बायकोसारखी नव्हती. कॅप्टन मायहरेच्या यशस्वी वाटचाल करणाऱ्या मुलीशी लग्नाची इच्छा प्रकट केल्याबद्दल, सिगर्डला लवकरच धडा मिळाला. त्याची बायको, लॉरा वारल्यानंतर, लगेचच्या वर्षांमध्ये त्यांचे घर किती आरामशीर झाले होते! सिगर्डची चांगली सुरवात झाली. तो वडिलांच्या बाबतीत नेहमीच दयाळू होता. तो त्याना उदरनिर्वाहासाठी पुरेसे पैसे देत असे. सुरवातीला विधुर असतांना, सिमोन्सन इथे फार दुःखी नव्हता. तो गावचा माणूस होता --- तो सतत कशा ना कशात गुंतलेला असे. भरपूर मजा मारत, भटकत असे. पण नंतर ओल्गाबरोबर रहायला लागल्यावर --- तो खराखुरा जगू लागला. तो फार आरामात होता --- खरे तर बऱ्याच वेळा तो समाधानी असल्याचे, नाकारू शकत नव्हता. त्याने लग्न करायला होकार दिल्यावर,

ओल्गाला दिवस गेले. तिने त्याबद्दल कुरकुर केली व त्याने ते मान्य करून तिच्याशी लग्न करावे, असा आग्रह धरला. तो कधीकधी त्यासाठी तयारही होई --- हे त्याने पूर्वीच करायला हवे होते. पण सिगर्ड व त्याच्या बायकोचे ओल्गाशी न पटण्याच्या अटकळीने, तो ते करत नव्हता. कधीतरी त्याला मानाचे काम मिळाले असते. ओल्गा देखील तिच्या शिलाईकामात स्थिरस्थावर झाली असती. तिचा मुलगा, हेन्री थातुरमातुर काम करण्यापेक्षा, कुठल्यातरी कार्यालयात चिकटला असता. तो तसा कामाला बरा होता. त्यांना शेवटी लहानशी जागा मिळून, मग ते सुखी झाले असते. तो हातात पेला व सिगरेट घेऊन सोफ्यावर बसला असता व ओल्गा फावल्या वेळात तिचे काम करू शकली असती. स्वानहिल्डने त्याच्याशेजारी बसून तिचा अभ्यास केला असता. कारण ओल्गा एक चांगली बाई होती. त्यामुळे तिला वाटे, की जेव्हा स्वानहिल्डला शाळेत घालायची वेळ येईल, तेव्हा कुणी असे म्हणायला नको, की ती त्यांची कायदेशीर मुलगी नाही.

सिमोन्सन आतापर्यंत रूसेलोकव्हेनला पोचला होता. अरुंद रस्त्यावर धुक्याचा थर पसरला होता. दुकानाच्या

खिडक्यांमधून गोठलेला पिवळसर हिरवा प्रकाश येत होता. प्रकाशाच्या उष्णतेने धुके वितळलेल्या खिडकीतून, ख्रिसमसच्या झाडावर लटकवलेल्या वस्तू दिसत होत्या. मग ते तंबाखूचे दुकान असो, इतर मालाचे असो, की खाद्यपदार्थांचे असो. दोन मजली बाजारातील मोठ्या प्रदर्शनातून, रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला लालसर प्रकाशाची तिरीप येत होती. रस्त्याची दुसरी बाजू धुक्यात लपेटलेली होती. गच्चीवरील गॅसचे दिवे अगदी मिणमिण होते. पण पलीकडील खासगी घरे पूर्णपणे नाहीशी झालेली वाटत होती. त्यांच्यातून एकही प्रकाशकिरण रस्त्यावर येत नव्हता. परंतु त्यांच्या भिंती धुक्यातून थोड्याशा दिसत होत्या.

सिमोन्सन छोटी पाऊले टाकत चालत होता. बर्फ बाजूला न केलेले रस्ते घसरडे झाले होते. रस्त्यावर, गाड्यांमधून सगळीकडे मुले नाचत होती. घट्ट बर्फावरून घसरायचा प्रयत्न करत होती.

“स्वानहिल्ड!”

सिमोन्सनने मळकी पांढरी टोपी घातलेल्या मुलीला, जोरात हाक मारली. ती रस्त्याच्या कडेला साचलेल्या बर्फावर

कडेकडेने चढून, छोट्याशा बुटांनी घसरत होती. ते बूट काळे कण चिकटलेले व घाणेरड्या बर्फापेक्षाही काळे होते व त्याला काही बाक उरला नव्हता.

हाक ऐकून ती मुलगी सिमोन्सनकडे बघत, रस्त्याच्या मधोमध उभी राहिली. सिमोन्सन बर्फ बाजूला करत, तिच्याजवळ गेला. तिचे स्वर्गीय निळे डोळे, आपण काही अपराध केला आहे की काय अशा जाणीवेने बघत, टोपीखालील हलकेसे केस सारखे करु लागले व लाल हातमोजे घातलेल्या हातांनी, लहानसे नाक पुसू लागले.

“स्वानहिल्ड, तुला किती वेळा सांगितले आहे, की रस्त्याच्या मध्ये खेळायचे नाही. तू शहाण्या मुलीसारखे अंगणात का खेळत नाहीस?

स्वानहिल्डने घाबरून बघितले.

“पण मला अंगणात नीट घसरता येत नाही -- कारण तिथे उंचवटा नाही आणि -- “

जर एखादी गाडी येऊन, तुझ्या अंगावरून गेली, किंवा एखादा दारुडा तुझ्या अंगावर पडला --- तर मग पपा आणि ममा काय म्हणतील?"

स्वानहिल्ड वरमली व काही बोलली नाही. सिमोन्सनने तिला चालायला मदत केली. ते हातात हात घालून, चालू लागले तिचे छोटेसे बूट, बर्फ नसलेल्या रस्त्यावर वाजत होते.

"तुला असे वाटते का, की आज रात्री पपा तुला फिरायला घेऊन जातील? तू सांगितलेले ऐकत नाहीस. तू चांगली मुलगी नाहीस --- मला वाटते, तुमचे जेवण आधीच झाले असेल."

"हो. हो. ममा, मी आणि हेन्रीने जेऊन खूप वेळ झाला"

"हं!" सिमोन्सनने गेटशी असलेली पांढऱ्या धातूची पाटी वाचलीः मिसेस ओल्गा मार्टीन्सेन, मुलांचे कपडे शिवायचे दुकान, तिसरा मजला, मागील बाजूस. सिमोन्सनने अंगण तिरपे ओलांडले आणि वर उजळलेल्या खिडकीकडे पाहिले. त्यावर एक फॅशनचे मासिक लटकलेले होते. मग त्याने स्वानहिल्डचे बूट काखेखाली धरले. मुलीला घेऊन तो मागील अरुंद जिन्याकडे गेला.

ओल्गाच्या हॉलच्या बाहेरील दाराशी, काही तरुण स्वयंपाकघरातून लोंबणाऱ्या दिव्याच्या उजेडाच्या तिरीपीत एक पुस्तक वाचत उभे होते. सिमोन्सन त्याच्या खोलीत गेला. तिथे अंधार होता --- आणि थंडीही. तिने शेकोटी विझवून टाकली होती. त्याने दिवा लावला.

"स्वानहिल्ड, धावत जाऊन ममाला सांग, मी आलो आहे."

त्याने शेजारील खोलीचे दार उघडले. तिथे अर्धवट कापलेली कापडे, अस्तरे व अर्धवट शिवलेल्या कपड्यांचा ढीग पडला होता. मिस अब्राहमसेन तिच्या शिवणावर वाकून बसली होती. तिने दिव्याच्या एका बाजूला कागद लावला होता. सर्व उजेड तिथे बसलेल्या प्रौढ स्त्रीच्या लहानशा पिवळ्या चेहऱ्यावर व लहानशा चॉकलेटी हातांवर पडला होता. दोन शिवणयंत्रांवरुन व ओल्गा आणि स्वानहिल्ड यांच्या पलंगावरून प्रकाश परावर्तित होत होता.

"मिस अब्राहमसेन, तुझे नेहमीपेक्षा, फारच जास्त काम चालले आहे."

"हो. एखाद्याला करावेच लागते."

“हा ख्रिसमसचा काळ म्हणजे, व्यवसायासाठी फारच आनंदाचा काळ आहे, नाही का? --- जणू काही जगाचा शेवट जवळ आला आहे.”

स्वानहिल्ड तेथे आली.

“ममा म्हणते आहे, की तुमचे जेवण ओव्हन मध्ये गरम असेल.”

“ठीक आहे. मला वाटते, मिस अब्राहमसेन, मी इथेच थांबतो. कारण माझी खोली फारच गार आहे आणि मला तुमचा सहवास पण मिळेल.”

मिस अब्राहमसेनने निमूटपणे टेबलाचा एक कोपरा मोकळा केला. सिमोन्सनने जेवण आणले. कोबीचे सूप आणि मांस.

“हं. फार वाईट नाही. पण जर अजून --- “सिमोन्सन उठला आणि उठाबसायच्या  खोलीचे दार वाजवले.

“अग ओल्गा --- “

“काय झाले? शुभ संध्याकाळ, सिमोन्सन. तुम्ही कसे आहात?”

तो दारातून आत डोकावला.

“तुम्ही मिस हेलम नाही का? परत तुम्ही नवीन ड्रेस घातला आहे.

ओल्गाने तोंडात पिना धरलेल्या होत्या. ती आरशासमोर उभी राहून मिस  हेलमसाठीच्या ड्रेसच्या कापडावरील तिच्या छातीवरील चुण्या घालून बघत होती.

“ठीक आहे?”

ओल्गाने भिंतीवरील दिवा बाजूला केला.

“ठीक वाटते आहे. मिसेस मार्टीन्सेन, तुमची खात्री आहे का, की मागून कापड  वाकडे झालेले नाही?”

संधीप्रकाशात दोन मुली आरामशीर सोफ्यावर बसल्या होत्या. त्यांनी फॅशनचे मासिक बाजूला ठेवले. त्या दोघी एकमेकींकडे बघून हसल्या. मिस हेलमकडे बघितले व परत एकमेकींकडे बघून हसल्या. दोघींपैकी एकजण ऐकू येईल इतपत आवाजात बोलली, “अरे देवा!” त्या जवळजवळ जुळ्या असल्यासारख्याच दिसत होत्या. त्यांचे कपडे, छोटी जाकिटे, फरचा गळपट्टा आणि पिसे लावलेली छानशी टोपी

आणि इतर सर्व काही एकसारखे होते. सिमोन्सन अजून दाराशी होता. आतील दृष्याने त्याला थोडे लाजल्यासारखे झाले.

“सिमोन्सन, तुम्हाला काय वाटते? हे चांगले दिसेल का?”

“ओहो, मिस हेलम, तो रंग तुम्हाला शोभून दिसतो आहे. त्या म्हणीप्रमाणे --- जातीच्या सुंदराला काहीही शोभते.”

“ओहो, तुम्ही म्हणजे --- ! मिसेस हेलम गालातल्या गालात हसली.

छान मुलगी --- ही मिस हेलम. ओल्गाने तिच्या मानेभोवतीचे कापड कापले. मिस हेलमने तिचे डोके वाकवले. गार कात्रीच्या स्पर्शाने, ती शहारली. सुंदर मान, खाली लोंबणारे सोनेरी कुरळे केस व मऊसर गोल दंड.

ओल्गा बाहीवर काम करत असतांना, सिमोन्सनने मिस हेलमच्या हाताला व रेशमी कापडाला स्पर्श केला. “मला वाटते, हे महाग असावे.” त्याने शेरा मारला.

मिस हेलमने हसत म्हटले, “सिमोन्सन, हे लाजिरवाणे आहे.” ओल्गाने रागावून बघितले. तिने त्याला बाजूला ढकलून, बाहीवर काम करणे सुरु ठेवले.

“हं. मला आठवले, हेन्री पटकन जवळून बिअरच्या एकदोन बाटल्या आणू शकेल का?”

हेन्रीला परत कार्यालयात जायचे आहे. बिचारा! त्याला अंदाजपत्रकाची नक्कल करायची आहे, असे तो म्हणाला.”

“बिचारा! त्याला आता परत जावे लागेल, नाही का? मला वाटते, हे दर शनिवारी दुपारी होते आहे. बरोबर आहे. आयुष्य हे सोपे नाही. मी गोदामातून बाहेर पडायला चार तरी वाजत असत. ओहो. मिस हेलम, जर कोणी फक्त तरुण आणि सुंदर असते, तर किती छान झाले असते.”

स्वानहिल्ड आत डोकावली.

“स्वानहिल्ड, आत ये. तुला माझे नाव आठवते का?”

स्वानहिल्ड नम्रपणे हसत बोलली, “मिस हेलम”

“मला वाटते, तुला गोळ्या आवडतील. नाही का?” मिस हेलमने तिची पर्स उघडून, त्यातून एक लहानशी पिशवी काढली.

“आता काय म्हणतेस, स्वानहिल्ड? तुझा हात पुढे कर, स्वानहिल्ड? घे. गोळ्या घे.”

स्वानहिल्डने तिचे आभार मानले. तिला हात दिला आणि अभिवादन केले. तिने चिकटलेल्या गोळ्या सुट्या केल्या.

तिचा नवीन ड्रेस घालून बघतांना, मिस हेलम हसून बोलत होती.

“ठीक आहे पुढच्या मंगळवारी साधारण या वेळेला माझा ड्रेस तयार असेल, अशी मी आशा करते. मिसेस मार्टीन्सेन, तुम्ही मला निराश करणार नाही. अच्छा, स्वानहिल्ड. अच्छा, सिमोन्सन.”

सिमोन्सनने दार उघडून धरले व मिस हेलम बाहेर पडली. तिच्या टोपीवरील पिसे हलत होती. तिच्या मानेवरील फरचा गळपट्टा ओघळून तिच्या खांद्यांवर आला होता.

“उई! फार वाईट नाही. काय -- “ सोफ्यावरील एक मुलगी हसत म्हणाली.

“अग, ती नेहमीचीच आहे --- “

सिमोन्सन पुन्हा अब्राहमसेनकडे आणि गार जेवणाकडे वळला. थोड्या वेळाने ओल्गा कॉफी घेऊन आली व तिने ती ओतली.

“अंतोन, हे खरच, अती होते आहे --- हे तुझे वागणे, पूर्णपणे चुकीचे आहे. जेव्हा आजूबाजूचे सर्वजण ऐकत असतात, तेव्हा तू असा कसा काय विचार करू शकतोस?”

“त्या हसणाऱ्या मूर्ख मुली कोण होत्या?

मंत्रीणबाईंच्या मैत्रिणी असलेल्या, कामाला ठेवलेल्या मुली. तू माझ्यासाठी सगळे अवघड करून ठेवलेस --- त्या हेलमबरोबर तू कसा वागलास? त्या मुलींना अजून काही कुजबुज करायची असेल --- झाली तेवढी पुरेशी नाही.”

“गप्प बस. मी इतका काही वाईट वागलेलो नाही.”

दाराची घंटी वाजली. मिस अब्राहमसेन बघायला गेली.

“मिसेस लार्सेन आली आहे.”

ओल्गाने तिचा कप बाजूला ठेवला व एक ड्रेस काढून तिच्या हातावर फेकला.

“एका क्षणाचीही विश्रांती नाही!”

मिस अब्राहमसेनने परत तिचे शिवणकाम सुरु केले.

मिसेस मार्टीन्सेन व मिस अब्राहमसेन यांनी रविवारचा दिवसभर शिवणकाम केले. अंधार पडेपर्यंत त्यांनी जेवण बाजूला ठेऊन, काम केले व ते झाल्यावर दिवा लावून परत काम सुरु केले.

“मिस ओल्सेनच्या कॉलरवर तू काम करत नव्हतीस का, मिस अब्राहमसेन, ती कुठे आहे?”

मिस अब्राहमसेनने मशीन सुरु केले.

“मी ती टेबलावर ठेवली.”

ओल्गाने त्यासाठी टेबल शोधले --- आणि मग जमीन.

“स्वानहिल्ड, तू लेसचे छोटे रीळ बघितलेस का?”

खिडकीच्या कोपऱ्यातून स्वानहिल्ड बोलली. “नाही ममी, नाही पाहिले. तिने उडी मारली व बाहुलीसाठी जागा

शोधू लागली. पाळणा असल्यासारखे समजून, तिने बाहुलीला स्टुलावर ठेवले व तिला नीट झाकले.

ती म्हणाली, "ॲस्ट्री झोपते आहे. तिला ताप आला आहे व घटसर्प झाला आहे. बाहुलीच्या कपड्यांच्या ढीगामधून तिची आई काही शोधत होती. पांढऱ्या, चुणीदार लेसच्या कापडात बाहुलीला गुंडाळले होते व काळजीपूर्वक सेफ्टी पिना लावल्या होत्या.

"मुली, तू वेडी आहेस का? तिने पिनेने त्यात भोक पाडले आहे. मस्तीखोर मुलगी!"

स्वानहिल्डला एक कानफटात बसली. "ओहो, मी आता काय करू? ही मिस ओल्सेनची महागाईची लेस होती."

स्वानहिल्ड किंचाळली. "पण ममा, मला वाटले त्या फुकट गेलेल्या चिंध्या आहेत."

"तुला सांगितले आहे ना, की कशाला हात लावायचा नाही. जमिनीवरील देखील कशाला नाही. किती खोडकर मुलगी आहेस तू!"

मिस अब्राहमसेनने कॉलर तपासली.

“मला वाटते, मी चुण्या घेऊ शकेन. मग त्या दाबून परत तसेच करायचे. मग ओढून त्या पट्टीच्या आतल्या बाजूला आणायच्या --- मला नाही वाटत की काही  वाईट दिसेल”

स्वानहिल्ड किंचाळत राहिली.

“आता काय झाले, स्वानहिल्ड, आता पपा डुलकी काढत आहेत, माहिती नाही का?”

ओल्गाने रागावून तिचा त्रास स्पष्ट केला.

“स्वानहिल्ड, तू किती मस्तीखोर मुलगी आहेस! ममाला असे फसवतेस का? हे लाजिरवाणे आहे. ही माझी छोटीशी स्वानहिल्ड नाही आहे!”

“अंतोन, मला वाटते, तू तिला बाहेर घेऊन जा. दिवसभर इकडेतिकडे करणे व झोपणे, हे काही तुझ्यासाठी चांगले नाही.”

सिमोन्सन मुलीला ओरडला व तिला घेऊन बाहेर गेला. हॉलमध्ये गेल्यावर त्याने तिला चुचकारले व तिला शालीत गुंडाळले.

“चल. आता रडू नकोस. असे रडणे म्हणजे नामुष्कीची गोष्ट आहे. आपण बागेत जाऊन घसरगुंडीवरून घसरू. असे रडणे चांगले नाही. आता नाक पूस --- चल, पपा तुला घसरायला नेत आहेत. अग गोडुली, पपा तुला घसरायला - “

ओल्गा कधीकधी स्वानहिल्डशी जास्त कडकपणे वागे. मुलांना शिक्षा करू नये, असे नाही --- ती चुकली, तर जरूर करावी. पण स्वानहिल्डदेखील इतके मनाला लाऊन घेई --- ती घसरगुंडीवर अजून खोकत होती. बिचारी!

गच्चीवरील मनोऱ्यांवर संध्याकाळ हळूहळू गडद जांभळी होत गेली. हवा सुधारली. रस्त्यावरील दिव्यांभोवती, धुक्याचा फक्त पातळसर थर राहिला. जिकडेतिकडे मुलांची गर्दी दिसू लागली. प्रत्येकाला बागडायचे होते आणि घसरायचे होते. मुख्य घसरगुंडी भरून वहात होती. मोठी खोडकर मुले, बर्फाच्या घसरगुंडीवरून एका वेळेस पाचसहाजण, आरडओरडा करत घसरत होती. त्यांच्या मागे उंदराच्या शेपटीसारख्या अरुंद घसरफळीला, झोके देत होती. पण सिमोन्सनला पुढे असलेली एक शांत छोटीशी टेकडी माहिती होती. तिथे संध्याकाळी तो स्वानहिल्डला घसरायला

घेऊन जात असे. तिथे स्वानहिल्डला मजा येत असे. पपा टेकाडावर उभे राहून तिला हळू धक्का देत आणि स्वानहिल्ड इतक्या जोराने "ओय! ओय!", असे ओरडे, की तिचा बारकासा आवाज फाटत असे. मग सिमोन्सनही ओरडे, "तिकडे बघ" त्यांच्याशिवाय तिथे पायात घसरायचे बूट घातलेली व डोक्यावर विणलेल्या टोप्या घातलेली फक्त दोन मुले असत. सिमोन्सनने आपण होऊन त्यांची ओळख करून घेतली". ते अल्फ आणि जोहान्स होते. त्यांचे वडील कार्यालयात व्यवस्थापक होते. ते पार्कव्हेईनमध्ये रहात होते. सिमोन्सन तिघांनाही घसरवू लागला. त्यांच्यापैकी कोण जास्त जोरात खाली येते, हे ते बघू लागले. पण तो स्वानहिल्डला जास्त जोरात धक्का देत होता. नाहीतर ती बर्फात रुतून बसली असती.

पण काही वेळाने स्वानहिल्ड घाबरू लागली.

"पपा, माझे पाय खूप गार पडले आहेत."

"मग तुला धावले पाहिजे --- आपण रस्त्यावर जाऊ आणि थोडे धाऊ."

स्वानहिल्ड धावली व ओरडली --- तिच्या चवड्याला लागले.

“ओहो, स्वानहिल्ड, तू जोरात धावायला पाहिजेस. बघू या, तू पपांना पकडू शकतेस का.”

एखाद्या रबरी चेंडूसारखी स्वानहिल्ड, पाय दुखत असतानाही लहान पाऊले टाकत राहिली. त्याच्यामागे जितके जोरात पळता येईल, तितके पळत राहिली व त्याला पकडले. ती परत आनंदी व उबदार झाली.

पण तोपर्यंत ते त्यांचा घसरायचा मार्ग सोडून भरकटले. घसरफळी कुठे दिसेना. सिमोन्सनने त्यासाठी टेकाडावर, खाली व झुडूपांमध्ये शोधले --- पण तो मार्ग कुठेच सापडेना. काही वेळापूर्वी अल्फ आणि जोहान्स रस्त्यावरील मोठ्या झाडाशी उभे असलेले दिसले होते. पण आता काहीच मागमूस लागत नव्हता. आणि --- हो --- काही मोठी खोडकर मुले तिथून गेली होती, हे सिमोन्सनला आठवले. अशी शक्यता होती, की त्यांनी ती पळवली असावी.

स्वानहिल्डचा धीर सुटून, ती रडू लागली --- एखाद्याला ते बघून फार वाईट वाटले असते. सिमोन्सनला ओल्गा

आठवली. हल्ली ती फार गोड व स्पर्शोत्सुख झाली होती. तशी ती आता रहाणार नाही. ती मुले किती खोडकर होती! त्यांनी गरीब बिचाऱ्या मुलीची घसरफळी चोरली होती. ती इतकी वाईट होती का?

“स्वानहिल्ड, लाडके, रडू नको. आपण तुझी घसरफळी शोधून काढू.”

सिमोन्सन इकडे तिकडे, ती शोधत फिरत राहिला. स्वानहिल्ड त्याच्यामागे रडत फिरत होती. त्यांच्यामागून अल्फ आणि जोहान्स, त्यांच्या घसरफळीची दोरी हातात घट्ट पकडून येत होते. त्यांचे डोळे मोठे झाले व ते सांगू लागले, “खोडकर मुले घसरफळ्या चोरतात. त्यावर बर्फ उडवतात व मुलांनाही पळवतात.”

त्याना घसरफळी काही सापडेना. पण रस्त्यावर त्यांना, एक झकपक ड्रेस केलेली रागीट बाई भेटली. ती अल्फ आणि जोहान्सची दाई होती. बराच वेळ ते घरी न आल्याबद्दल, ती त्यांना ओरडत होती व धमकावत होती, की ममी व पपा आता घरी गेल्यावर तुम्हाला ओरडणार आहेत. त्या लहान मुलीचे नाव स्वानहिल्ड आहे व तिची घसरफळी हरवली

आहे, याच्याशी तिला काही देणेघेणे नव्हते. ती त्या मुलांची गचांडी पकडून, ओरडत ओरडत निघून गेली. नंतर एका जोराने घसरत येणाऱ्या माणसावर सिमोन्सन आपटला. त्याच्या डोळ्याला व नडगीला लागले.

“ठीक आहे, स्वानहिल्ड, तुझी घसरफळी हरवली. मला वाटत नाही, की आता ती आपल्याला सापडेल. सिमोन्सनने सुस्कारा सोडला. तो उदास झाला. “पण माझ्या छकुली, रडू नकोस. आपण ख्रिसमसमध्ये तुला नवीन आणू. चल आपण कार्ल जोहान्सच्या दुकानात जाऊन, बघू --- आज ते दुकान इतके छान सजवलेले असेल --- आपल्याला तुझ्यासाठी नवीन मस्त घसरफळी मिळेल. तो चालू लागला.

स्वानहिल्ड व तिचे पपा खाली दुकानात जाऊन, तेथील माल बघू लागले. त्या दुकानासमोर लोकांची गर्दी जमली होती. सिमोन्सनने स्वानहिल्डला उचलून घेतले. व गर्दीतून वाट काढू लागला. ते दुकानाच्या झगमगत्या शोकेससमोर आले. तिथे एकच वस्तू शिल्लक राहेपर्यंत, ते तिथे उभे राहिले व त्या वस्तूच्या किंमतीचा अंदाज करू लागले. काही ठिकाणी, रंगीबेरंगी ख्रिसमस झाडे उभारली होती. त्याला

दिव्यांच्या माळा लावल्या होत्या. ख्रिसमसच्या संध्याकाळी, स्वानहिल्डला देखील ख्रिसमसचे झाड हवे होते. एका खिडकीत नेहमीप्रमाणे नटलेल्या बाहुल्यांची ख्रिसमसची मेजवानी चालू होती. स्वानहिल्ड मोठी झाल्यावर तिची पण अशीच मेजवानी असेल. दुसऱ्या दुकानात, ख्रिसमसच्या झाडाच्या खोडात, पिशव्या लटकवल्या होत्या. छोट्याशा तळ्यात छोटीशी मगर होती. ती मगर जिवंत आहे का हे बघायला त्यांना, तिथे खूप वेळ उभे रहावे लागले. शेवटी मगरीने एक डोळा मिचकावला. त्यांनी विचार केला, ती जिवंत असावी. आणि ही छोटीशी मगर जेव्हा मोठी होईल, तेव्हा इतकी मोठी होईल का, की ती अख्ख्या स्वानहिल्डला एका घासात गिळू शकेल!

.”पण आता ती कुणाला चावू शकणार नाही. नाही ना?”

“नाही. आता ती तुला काही इजा करू शकणार नाही.”

वरती एकेटोर्व्हेटजवळ एका खिडकीत, जाहिरातींची चलतचित्रे चालू होती. स्वानहिल्ड पपांच्याबरोबर सिनेमा बघायला गेली होती --- तीन वेळा --- त्यांनी काय काय बघितले, ते सर्व तिला आठवत होते. दोन मुलींना

वाहनदुरुस्तीच्या दुकानातील चोरांनी पळवलेले असते आणि असेच काही. तोपर्यंत ते त्यांची घसरफळी हरवली आहे, हे ते विसरुन गेलेले असतात. ममा दमून चिडेपर्यंत, शिवणकाम संपवत बसलेली असते. आता सर्व काही विसरलेले असते. फक्त एवढेच आता उरलेले असते की --- स्वानहिल्ड पपांची छोटी मुलगी आहे आणि ख्रिसमसची पूर्वसंध्या सतरा दिवसांवर आलेली आहे.

नंतर ते खेळाच्या सामानाच्या दुकानावरून चालले होते. तिथे खूप लहानमोठ्या घसरफळ्या होत्या. गुलाबाची फुले त्यावर काढलेली गडद लाल रंगाची घसरफळी सर्वात छान होती. त्याला लोखंडी चौकटीत ब्रॉन्झमध्ये, सोनेरी पाने काढलेली होती.

ती ख्रिसमसची भेट म्हणून, स्वानहिल्डला पपांकडून मिळणार होती.

नंतर त्यांना थोडीशी उब आणेल, असे काही हवे होते. रविवार असल्याने दारूचे दुकान बंद होते. सिमोन्सनला एक चांगलेसे कॉफीचे दुकान माहिती होते. सिमोन्सनच्या विनोदी, थट्टेखोर व हलक्याफुलक्या स्वभावाला मजेने तोंड देणारी

अशी, तेथील वेटर बाई होती. तिथे दुसरे कुणी लोक नव्हते. तिथे त्याने सँडविच व कॉफी घेतली आणि स्वानहिल्डने केक घेतला. ती पपांच्या कॉफीतील घुटके घेत होती.

सिमोन्सन डोळे मिचकावत, काळजीने स्वानहिल्डला म्हणाला, “हे ममाला सांगायची गरज नाही.” पण स्वानहिल्डला ममाला काय सांगायचे ते माहिती असे. संध्याकाळी पपांच्याबरोबर भटकताना ते कुठेकुठे जात. स्वानहिल्डला आइस्क्रुट मिळे. ममाला वाटे --- त्यामुळे लहान मुलीला दातदुखी होईल. पपा काही पेय घेत. त्यामुळे ममाला वाटे --- त्यांचे पोट बिघडेल. पण ममा नेहमी इतकी व्यग्र असे आणि त्यांनी असे केल्यास, ती चिडे. पपा गोदामात जात आणि हेन्री कार्यालयात जाई, तेव्हा ते व्यग्र असत. जेव्हा एक मोठा झाला होता व एकजण अती कामात गुरफटलेला असे, तेव्हा स्वानहिल्ड काय सांगायचे व काय नाही, हे शिकली होती.

रविवारनंतर सोमवार आला आणि पाच इतर करडे दिवस आले आणि गेले. स्वानहिल्ड शिवणाच्या खोलीत जमिनीवर बसली होती व तिची ती खेळत होती. कारण पपा हल्ली घरी

इतक्या उशीरा येत, की ते तिला बाहेर फिरायला घेऊन जाऊ शकत नसत. पपा पण हल्ली चिडलेले असत. हे स्वानहिल्डच्या लक्षात आले --- कदाचित त्याना कार्यालयात फार काम पडत असेल किंवा ममाला इतके काम असे, की तिला जेवण करायलाही वेळ मिळत नसे संध्याकाळचा स्वयंपाक करायला तिला रात्र होई. हेन्रीदेखील चिडलेला असे. कारण त्याच्या झोपायच्या खोलीत कपडे शिवायला देणाऱ्या बायका दाटीवाटी करत. त्या बायकांचे कपडे घालून बघणे, दुरुस्ती केल्यावर, परत घालून बघणे, इत्यादी रात्री उशीरापर्यंत चाले. त्यामुळे त्याला त्याची खोली वापरता येत नसे. पण स्वानहिल्डने असा विचार करून, स्वतःचे समाधान करून घेतले, की तिला ख्रिसमसला नवीन घसरफळी मिळणार आहे.

पंधरा तारखेला अंतोन सिमोन्सनने त्याच्या मुलाला लिहिले. तो काम मिळवण्यासाठी धावाधाव करून कंटाळला होता --- आणि नाहीतरी ते मिळतच नव्हते. असे झाल्यावर त्याने, भविष्यात साधेपणे रहायचे ठरवले. स्वानहिल्डला बाहेर फिरायला घेऊन जायला, तिला घसरायला मदत

करायला व तिला नवीन नवीन घसरफळी आणण्याबद्दल बोलायला, त्याला परत वेळ मिळू लागला.

अठरा तारखेला तो मशीनमध्ये काही ठोकाठोकी करत असतांना, गोदामाचा फोरमन तिथे आला. त्याने त्याला टेलीफोनशी बोलावले असल्याचे सांगितले. सिगर्ड शहरात होता व त्याने सिमोन्सनला त्याच्याबरोबर कॉफी घ्यायला कॅफे ऑगस्टीनमध्ये बोलावले होते. त्याला जेवणानंतर काही तासांनी बोलावता आले नसते का? --- म्हणजे त्यांना बोलायला वेळ मिळाला असता.

"मोसा आणि मुले कसे आहेत?"

"मुले ठीक आहेत. आभारी आहे. मोसा माझ्याबरोबर आली आहे. तिला ख्रिसमससाठी काही खरेदी करायची आहे."

"मुला, मी जेव्हा याचा विचार करतो, तेव्हा आता मला तासभर सुद्धा काढणे मुश्कील आहे. ख्रिसमसपूर्वीची नेहमीची धावाधाव!" सिमोन्सनने स्पष्टीकरण दिले.

सिगर्डने स्वतः व्यवस्थापकाला भेटायचे ठरवले.

“ठीक आहे. असे असेल, तर मग ठीक आहे. तू खूप दयाळू आहेस. मोसाला विचारले आहे म्हणून सांग.”

हे मोसाच्या स्वभावासारखेच झाले. अर्थात तिने त्याला कॅफे ऑगस्टीनमध्ये जेवायला बोलावले नसतेच –-- नाही. --- पण देवाच्या कृपेनी त्याच्याकडे बिअर होती.

मोसा कार्लिंगने तिच्या बाटलीचे बूच उघडणाऱ्या नवऱ्याला विचारले, “तुम्हाला असे वाटते का, की त्याना बोलावणे जरुरीचे होते?”

“मला वाटते, वडिलांसाठी एक पेलाभर पेय हवे.”

“ठीक आहे --- जशी तुझी इच्छा, डार्लिंग.” मिसेस कार्लिंगने तिची दुहेरी हनुवटी दाखवता येईल तितकी दाखवत म्हटले. ती सुंदर नव्हती. कानशीलांच्या बाजूस तिच्या पापण्या जास्त दाट होत्या. त्यामुळे तिचे छोटेसे करडे डोळे नाकाच्या पुलाकडे वळलेले वाटत. तिचा चेहरा मोठा आणि ताजातवाना होता. पण तोंड अरुंद व लहान होते. ओठ पातळ होते आणि छाती पोकळ व खुरटी होती. खालचा भाग रुंद होता.

ती सोफ्याच्या मध्यभागी, बरोबर झुंबराखाली बसली होती. त्यातील तीन दिवे हॉटेलची खोली उजळून टाकत होते --- दोन लोखंडी पलंग, दोन महोगनी बेसिन, दोन लहान टेबले, आरशासकट कपड्यांचे कपाट, ॲशपॉट असलेल्या मोठ्या टेबलासमोर दोन आरामखुर्चा, असे सर्व सामान तिथे होते.

दारावर टकटक करून सिमोन्सन काळजीपूर्वक आत शिरला. त्यांनी दोघांबरोबर हातमिळवणी केली.

“शुभ दुपार, सिगर्ड, तुम्हाला परत बघून आनंद वाटला. मुला, शुभ दुपार. शुभ दुपार. मोसा, तुला परत बघून, छान वाटले. आणि नेहमीसारखी तरुण आणि सुंदर --- “

मोसाने कॉफीसाठी घंटी वाजवली व ती ओतली तर सिगर्डने पेले भरले.

सिमोन्सन शांत बसलेल्या त्याच्या सुनेकडे बघत राहिला. तो सिगर्डशी बोलत  असतांना, तिचे तोंड घट्ट बंद होते. खेळकरपणे विविध विषयांवर बोलतांना, संभाषण मुख्य विषयाकडे वळले.

“मोसा, आम्ही सिगरेट ओढली, तर तुझी काही हरकत नाही ना? बाबा, सिगरेट --- ?

“आणि आता तुम्ही लिहिले आहे, त्याबद्दल बोलू. मी वर कार्यालयात गेलो होतो व तुमच्या व्यवस्थापकाशी माझे बोलणे झाले. त्याचे मत माझ्यासारखेच आहे. हे शहर ही तुमच्यासाठी योग्य जागा नाही. तुमच्या वयाच्या माणसासाठी, हे फार ताण देणारे काम आहे --- त्यालाही असेच वाटते. त्याबाबतीत मी तुम्हाला अजून वेगळे काही सांगू शकत नाही --- “

सिमोन्सन काहीच बोलला नाही. पण मोसाने तो धागा पकडला.

“सिगर्ड स्वतः खालच्या जागी आहे --- हे निदान काही प्रमाणात तरी --- तुम्ही लक्षात घ्यायला हवे. येथील विश्वस्त मंडळ नेहमी त्याच्या वडिलांना इथे ठेवावे की नाही याबाबत, सिगर्डचा सल्ला घेण्याची उदारता दाखवेल, असे नाही. त्याने आधीच तीन वेळा तुम्हाला नोकरी लावून दिली आहे --- आणि तुम्ही सगळा घोळ करून ठेवला आहे. मला तुम्हाला असेही सांगायचे आहे, की सिगर्डने मागील वेळी तुम्हाला

काम मिळवून दिले, त्यानंतर त्याला गंभीर अडचणींना तोंड द्यावे लागले. तुम्ही मात्र ते कामही नीट केले नाहीत, असे मला समजले --- "

"ते काम मी तुम्हाला लाऊन दिले, पण हे मी खात्रीने सांगतो, की तुम्ही इथे सामावून जाऊ शकत नाही. सारख्या नवीन गोष्टी करून बघायचे, तुमचे आता वय राहिले नाही. त्यामुळे, मी आता तुम्हाला एकाच बाबतीत मदत करू शकतो. ओईमार्कमध्ये मेनस्टॅड कारखान्यात मी तुम्हाला नोकरी लाऊ शकतो. छान, सोपे काम आहे. खरे तर पगार फार नाही. मला वाटते, सुरवातीला साठ क्रोनर. पण तिथे मी तुमच्यासाठी शब्द टाकू शकतो."

सिमोन्सन काहीच बोलला नाही.

सिगर्ड कार्लिंग परत बोलला, "फक्त एवढीच मदत, मी तुम्हाला करू शकेन. तुम्ही काय म्हणता? बाबा, मी तुमच्यासाठी तिथे प्रयत्न करू का?" त्याने थोडे थांबून विचारले.

सिमोन्सनने बोलण्यापूर्वी, बराच वेळ घसा साफ केला.

“त्याचे असे आहे सिगर्ड, मला माहिती नाही, की तू हे ऐकले आहेस की नाही --- पण गोष्ट अशी आहे, की मी गेली सहा वर्षे रहात असलेल्या बाईबरोबर, विवाह करायचे ठरवतो आहे. तेव्हा याबद्दल पहिल्यांदा मला ओल्गाशी बोलले पाहिजे --- ती काय म्हणते बघू. त्याने स्पष्ट केले, “तिचे नाव ओल्गा आहे. मिसेस ओल्गा मार्टीन्सेन ती विधवा आहे.”

तिथे एक त्रासदायक अडथळा आला. सिमोन्सन खुर्चीच्या आच्छादनाच्या गोंड्यांशी खेळत होता.

“प्रत्येक बाबतीत, ती एक खरीखुरी चांगली बाई आहे. तिचे शिवणकामाचे मोठे खटले आहे. त्यामुळे ती ते सोडून, ओईमार्कमध्ये यायला तयार होईल की नाही, हा प्रश्न आहे. तिच्या मुलाला शहरात नोकरी नाही आहे.”

सिगर्डने काळजीने विचारले, “मी ऐकले, तीच ही बाई का, जिच्यापासून तुम्हाला एक मूल झाले आहे?”

“हो आम्हाला एक मुलगी आहे --- स्वानहिल्ड नावाची. पुढच्या एप्रिलमध्ये ती पाच वर्षांची होईल.”

मोसा म्हणाली, “अस्स! तर मग प्रत्येक बाबतीत, चांगल्या असलेल्या बाईपासून, तुम्हाला एक मुलगी आहे!”

“हो. ओल्गा शिस्तशीर आणि चांगली आहे --- उद्योगी आणि मेहनती. शिवाय दयाळू.”

मिसेस मोसा मोठ्या गोडीने बोलली, “बाबा, हे खरच, विचित्र आहे. तुम्ही या छानशा मिसेस मार्टीन्सेनशी लग्न केलेले नाही. हे काही वर्षांपूर्वी करण्यासाठी, तुमच्याकडे चांगली कारणे होती.”

सिमोन्सन आनंदाने म्हणाला, “प्रिय मोसा, तुला सांगतो, मला माझ्या बायकोने इतके श्रम केलेले आवडत नाहीत. त्यामुळे, मी चांगली नोकरी शोधतो आहे. पण मी तिला लग्नाचे वचन दिलेले आहे. आणि माझे नाव अंतोन सिमोन्सन असेपर्यंत, मी ते पाळेन.”

मोसा अजूनच गोड होत म्हणाली, “ओहो, पण सुरवातीला साठ क्रोनर हे लग्न करून एक मूल सांभाळायला --- पुरेसे नाहीत. मला वाटते, ओईमार्कमध्ये मिसेस मार्टीन्सेनला शिवणकामातून फारसे पैसे मिळणार नाहीत.”

“बाबा, यातील सर्वात वाईट भाग म्हणजे, तुम्हाला मुलगी आहे. पण मिसेस मार्टीन्सेनला अशा परिस्थितीची कल्पना असेल --- आम्ही कदाचित तिच्याबरोबर काही करार करू शकू.”

“सिगर्ड, तुला एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल, की तुला एक स्वानहिल्ड नावाची लहान बहीण आहे. ती अनौरस संतती असल्यामुळे, तिला त्रास व्हावा असे मला वाटत नाही. सिगर्ड, मला वाटते, तू या गोष्टीत लुडबुड करून, पण थंडपणे तुझी  जबाबदारी टाळतो आहेस.”

त्याचे बोलून संपण्यापूर्वीच, मोसा तावातावाने बोलली. आता तिच्या बोलण्यात जराही गोडवा नव्हता.

“बाबा, तुम्ही जेव्हा जबाबदारीबद्दल बोलता --- अनौरस संततीबद्दल बोलता, तेव्हा तुम्ही मला फार गंमतशीर वाटत. सिगर्ड तुम्हाला चौथ्यांदा ओईमार्कमध्ये नोकरी मिळवून देतो आहे. इथे तो मिळवू शकत नाही. तुमच्या काही खासगी गोष्टींमुळे, तुम्ही हे गाव सोडू शकत नाही, तर तुम्हाला इथेच रहायचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. जर तुम्हाला इथे नोकरी मिळत असेल, आणि त्याच्या जोरावर लग्न करायचे असेल, तर तो

आमचा नव्हे, तर तुमचा प्रश्न आहे. पण सिगर्ड तुम्हाला, याहून वेगळी काही मदत करू शकत नाही. त्याला आधी स्वतःच्या बायको आणि मुलांचा विचार करावा लागेल.”

मिसेस मार्टीन्सेनच्या रुसेलोकव्हेईनमधील सदनिकेत दुसऱ्या दिवशी सकाळी मिसेस मोसा निघाली, तेव्हा तिने रेशमी कपडे व फरचा नवीन सेट घातला होता. तिने सिमोन्सनच्या मळकट पाटीवरील बटन बोटाने जोरात दाबले.

तिला आत घेणारी बाई छोटीशी, काळसर व जाडी होती. तिचे डोळे छान निळे होते. चेहरा सूर्याने भाजलेला होता.

“आपण मिसेस मार्टीन्सेन का? मी मिसेस कार्लिंग. मला तुमच्याशी बोलायचे आहे.”

ओल्गाने थोडे का कू करत जवळील खोलीचे दार उघडले. “तुम्ही आत येणार नाही का? माफ करा, इथे शेकोटी नाही. पण इतर खोल्यांमध्ये शिवणकाम सुरु आहे.”

मिसेस मोसा आत आली व खोलीतील एकुलत्या एक खुर्चीवर बसली. भाड्याच्या खोल्या जशा असतात, तशी ती होती. आधीच्या मिसेस सिमोन्सनचे पांढऱ्या ड्रेसमधील फोटो

तिथे झळकत होते. सिगर्डचे व तिचेही फोटो व सर्व कुटुंबाचे दोन फोटो होते.

ओल्गा फोटोंशेजारी उभी राहून, तिला निरखत राहिली. मिसेस मोसा म्हणाली, “माझ्या प्रिय मिसेस मार्टीन्सेन, मला तुमच्याशी एकदोन गोष्टी बोलायच्या आहेत. तुम्ही बसणार नाही का?”

“आभारी आहे. पण मी फार कामात आहे. आपल्याला काय हवे आहे?”

“ठीक आहे. मी तुम्हाला फार वेळ अडकवून ठेवत नाही. माझ्या नवऱ्याचे वडील, सिमोन्सन --- यांच्याकडून आम्हाला तुमच्याबद्दल कालच कळले, त्याची सगळी माहिती त्याने तुम्हाला दिली आहे की नाही, हे मला माहिती नाही.”

“म्हणजे तुम्हाला ओईमार्कमधील नोकरीसंबधी काही म्हणायचे आहे का? तो ती घेणार आहे.”

“तर मग, ठीक आहे. तुम्हाला माहिती आहे. अर्थात ते लहानसे गाव आहे. त्याने तेथील नोकरी स्वीकारली, तर तो तुमच्याकडे पुरेसे लक्ष देऊ शकणार नाही.”

ओल्गा घाईघाईने मुद्द्याचे बोलली, “आभारी आहे. पण त्यासाठी तुम्ही त्रास करून  घ्यायची काही गरज नाही. सिमोन्सन आणि मी --- आम्ही दोघांनी लग्न करायचे ठरवले आहे.”

“मिसेस मार्टीन्सेन, तर मग मला एका गोष्टीकडे, तुमचे लक्ष वेधून घ्यायचे आहे. सिमोन्सन माझ्या नवऱ्याकडून, कसलीही अपेक्षा ठेऊ शकत नाही. काडीचीही नाही. त्याचे स्वतःचे मोठे कुटुंब आहे. चार लोकांना साठ क्रोनरमध्ये चौघांचे कुटुंब चालवणे अवघड आहे. माझ्या सासऱ्यांच्या असलेल्या त्या लहान मुलीशिवाय, तुम्हाला अजूनही मूल आहे का?”

“माझा मुलगा इथे राहील --- ट्रोन्ढजेम्सव्हिएनला माझी बहीण असते. तो तिच्याबरोबर राहू शकेल. आमचा असा बेत आहे, की फ्रेडरिकस्टॅडला घर घ्यायचे --- मी शहरात माझा शिवणकामाचा व्यवसाय चालू ठेवायचा.”

“अस्स. ठीक आहे. हे ठीक वाटते आहे. पण हे लक्षात ठेवा,, की फ्रेडरिकस्टॅडला शिवणकामाची खूप दुकाने आहेत.

मिसेस मार्टीन्सेन, तुम्हाला येथील व्यवसाय गुंडाळून, तिथे नव्याने सुरु करणे परवडणारे ठरेल का, याचाही विचार करा.”

ओल्गा चमकली.

“मिसेस मार्टीन्सेन, मी तुम्हाला परत सांगते. तुम्ही काय करायचे, ते ठरवा. मी आणि माझा नवरा, आम्ही थोडे संशोधन केले आहे. तुम्हाला नवल वाटायचे कारण नाही. तुम्ही कुठल्या प्रकारचा माणूस शोधला आहे, याची तुम्हाला जाण असू द्या.”

ओल्गा चिडवल्यासारखी खोकली.

“ठीक आहे तर मग. मिसेस कार्लिंग --- मला एवढेच सांगायचे होते. खरी गोष्ट अशी आहे की, मी ज्या माणसाशी लग्न करायचे ठरवले आहे, तो मला व माझ्या लहानशा मुलीला, आम्हाला आमच्या भरवशावर एकटे सोडून अमेरिकेला चालला आहे. सिमोन्सनने मला वचन दिले आहे --- परत परत तो म्हणाला आहे, ओल्गा, काळजी करू नकोस. मी तुझ्याशी कधीच प्रतारणा करणार नाही. आणि मग, मिसेस कार्लिंग, तुम्हाला असे का वाटत नाही? आम्ही तुम्हाला कधी त्रास देणार नाही. तुमचे काय ते चालू दे ---

आणि तुमच्या नवऱ्याने त्याच्या वडिलांचे नाव राखायची काळजी घेतलेली नाही”

हनुवटी बाहेर काढून मिसेस कार्लिंगने अच्छा केला. ती बोलली, “माझ्या प्रिय मिसेस मार्टीन्सेन, कृपया, इतकया रागाऊ नका. तुमच्यात लुडबुड करायचे, माझ्या कधी स्वप्नातही आलेले नाही. उलट मी चांगल्या हेतूने इथे आले. मला फक्त सगळी परिस्थिती, तुम्हाला नीट समजावून सांगायची होती. सिमोन्सन तुमची काळजी घेईल, अशा भ्रमात तुम्ही राहू नये, अशीच माझी इच्छा होती. मला कबूल केले पाहिजे, की या लग्नातून तुम्हाला काही मिळेल, असे मला वाटत नाही. तुम्हालाच त्या मुलीबरोबर त्यांना पोसावे लागेल. तुम्हाला आठवेल, की माझे प्रिय सासरेबुवा कधीच होतकरू मनुष्य नव्हते. पूर्वी ते जसे होते तसे ते परत वागणार नाहीत, याची खात्री आम्ही देऊ शकत नाही. त्यामुळे जपून रहा. तुम्हाला असे वाटते का, की त्यांचा वयाच्या माणसाला --- कुटुंबवत्सल माणसाला --- सारख्या नवीन नोकऱ्या झेपतील?

माझ्या नवऱ्याच्या वतीने मी तुम्हाला सावध करायला आले आहे. माझ्या प्रिय बाई, आजपर्यंत तुमचे लग्न न करता व्यवस्थित चालले आहे. आता माझा नवरा तुम्हाला काही देऊ करतो आहे --- आम्ही पाचशे क्रोनर तुम्हाला द्यायचा विचार करतो आहोत. तुमचा आधार --- सिमोन्सन --- असा अचानक तुम्हाला सोडून जाण्याने, तुमचे जे नुकसान होईल, त्याची भरपाई म्हणून आम्ही हे पाचशे क्रोनर तुम्हाला देतो आहोत. हे काही अटींशिवाय देतो आहोत, समजले का? जर माझ्या सासऱ्यांना चांगली नोकरी मिळाली, तर त्याना लग्न करणे शक्य होईल. आम्हाला त्यात काही दखल घ्यायची इच्छा नाही. तुम्ही अगदी बरोबर म्हणालात, की त्यात पडायचे आम्हाला काही कारण नाही. आणि तुमच्या लहान मुलीबद्दल म्हणाल, तर आमचे बोलणे झाले आहे व आम्ही तिला आमच्या घरी घेऊन जायला तयार आहोत.”

ओल्गा ओरडली, “कधीच नाही. मी जिवंत आहे, तोपर्यंत तरी नाही. स्वानहिल्ड पासून वेगळे व्हायचे! तुम्ही मला दुसरे काहीही सांगा. पण या गोष्टीला मी कधीच तयार होणार नाही.”

“ठीक आहे. जशी तुमची इच्छा. अर्थात, तुम्ही आणि माझे सासरे, दोघाना साठ  क्रोनर महिन्यात लग्न करणे --- येथील मुक्काम हलवून, फ्रेडरिकस्टॅडला नवीन सुरवात करणे --- हे पटत असेल, तर बघा. पण हे फार फार अवघड आहे. सिमोन्सनकडून तुम्हाला काय हवे आहे, हे मला कळत नाही. अरे देवा, तुम्ही लग्नापूर्वीच स्वतःला मिसेस म्हणवता. तुम्ही काही बारीकसारीक प्रकरणे केली, तरी तुमच्या वर्तुळातील लोक फारसे लक्ष देत नाहीत. पण कायमचे त्यांच्याबरोबर बेडीत अडकायचे, म्हणजे, मला माफ करा. पण मला वाटते, हे तुमच्यासाठी फारसे चांगले नाही. खरे सांगायचे तर, तो म्हणजे निव्वळ म्हातारडे डुक्कर आहे!”

ओल्गा मध्येच बोलली.

“मिसेस कार्लिंग, तुम्ही तुमची बडबड इथेच थांबवावी, ते बरे. मला अंतोन सिमोन्सनकडून काय हवे आहे, ते  मी तुम्हाला साध्या सरळ भाषेत सांगते. त्याच्यात काही हरकत घेण्यासारखे दुर्गुण असतीलही. पण मला एक गोष्ट लगेच समजली, की कुणी काही म्हणाले, तरी तो फार दयाळू आहे. माझ्याभोवती दयाळू लोक फारसे नाहीत. मी कष्ट घेते. तो

दुःखी असून, मला त्याला समाधानी बनवायचे आहे, हे त्याला कळल्यावर, तो घरच्यासारखे वागू लागला. त्याने सरळपणा अंगीकारून, त्याच्या सवयींना शिस्त लावली. त्याला आधी असे समाधान मिळाले असते, तर तो आधीच असा झाला असता. तो दयाळू आणि दुसऱ्याची जाणीव असणारा आहे, हे तुम्ही नाकारू शकत नाही. त्याला स्वानहिल्डचा लळा आहे. तिच्या बाबतीत तो प्रेमाचे टोक गाठतो --- इतके, की मला कधीकधी वाटते तो तिला बिघडवणार, तर नाही ना. मिसेस कार्लिंग, मला हे सांगू दे, की मला सिमोन्सन आवडतो.”

मोसा उठली आणि तिचे हातमोजे घातलेले हात, लेस लावलेल्या झालरीत घातले.

ती निघून गेली.

मिस्टर सिगर्ड कार्लिंगला त्याच्या बायकोचे म्हणणे पटले, हे पुरेसे खरे आहे. त्याने दुसऱ्यांना नेहमी असे बोलतांना ऐकले होते --- त्यामुळे त्याचा विश्वास बसू लागला होता --- तो साधा कारकून असतांना, मोसा मायहरने सिगर्ड कार्ल सिमोन्सनच्या आयुष्यात आनंद फुलवला होता. त्याला

आज तो असलेला माणूस बनवले होते. तथापि त्याच्या मनात शंका होती, की मिसेस मार्टीन्सेनला समजून घ्यायला, ती योग्य व्यक्ती होती का. ती प्रत्येक गोष्टीकडे कडकपणे व शिस्तीत बघे, यात काही शंका नव्हती, आणि ओल्गाला दोन मुले, थोड्या वेगळ्या परिस्थितीत झाल्यासारखे वाटत होते. प्रसंगी, मोसा पटणार नाही, असे कडक देखील वागू शकते. त्यामुळे त्याला नंतर खंत वाटली, की त्याने तिला ओल्गाकडे उगीच पाठवले. काहीतरी समजूत पटणे गरजेचे होते. जर वडील फ्रेडरिकस्टॅडला येऊन राहिले, तर ते कुटुंबाला पोसू शकणार नाहीत, --- हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट होते. काही अनपेक्षित झाल्यास किंवा काही मदत लागल्यास, त्यांना सुरक्षित वाटणार नाही. मग बाबांना नेहमी होणारे, गंभीर काही होणे सुरु होईल. मग मोसाच्या मागे नवीन कटकटी लागतील.

म्हाताऱ्याने काही नको ते निर्णय घेण्यापूर्वी --- हे प्रकरण नीट सोडवायला हवे होते --- शिवाय तातडीने. तो हर्क्युलीस मशीनच्या दुकानात होता आणि त्याने दोन नवीन जनित्रे मागवली होती. तसेच, त्याच वेळेस वडीलांच्या नातेवाईकांशी काही बोलताही आले असते. सिमोन्सन ---

आता हे ठरले होते --- ख्रिसमसच्या संध्याकाळी तो निघणार होता. म्हणजे तो त्याच्या मुलाच्या, सिगर्डच्या, घरी कुटुंबीयांसमवेत, ख्रिसमस साजरा करू शकला असता.

नंतर सिगर्ड स्वतःच मिसेस मार्टीन्सेनला भेटायला निघाला.

सिमोन्सन जेवायला घरी आला, तेव्हा ओल्गाचे डोळे रडून लाल झाले होते. तिथे सिगर्ड कार्लिंग होता. तो आला ते बरे झाले, असे ती म्हणाली. त्याने स्वानहिल्डला त्याच्या गुडघ्यांवर बसवले आणि ख्रिसमससाठी तिला काहीतरी देण्याचे कबूल केले. मग तो ओल्गाशी बोलला. तिला काही विचित्र कर्जे होती --- तिचे भाडे थकले होते आणि बऱ्याच दुकानांची बिले द्यायची राहिली होती. त्याने स्वानहिल्डसाठी तिला दर महिन्याला पंधरा क्रोनर द्यायचे कबूल केले --- ते तसे नक्कीच होते. तिला हेन्रीकडेही बघायचे होते --- अजून काही काळ तरी, तो स्वतःची काळजी घेऊ शकत नव्हता. तो म्हणाला, “सध्यातरी पंधरा क्रोनर मी पाठवू शकतो. निदान बाबा पैसे मिळवायला लागून, तुमचे लग्न होईपर्यंत तरी!” मग तो गेला. कुटुंबाचे फोटो लावलेल्या सिमोन्सनच्या थंड

खोलीत ओल्गा आरामखुर्चीत, बसली होती. ती रडत होती. सिमोन्सन तिला थोपटून तिची समजूत घालत होता.

"अंतोन, मला खरच माहिती नव्हते --- ! मी अजून काय करू शकते? जर त्याने तुला मदत केली नाही --- पण दुसरा काही मार्गच नाही आहे. त्याच्या बोलण्यावरून मला असे समजले, की तो अजून काही मदत करू शकत नाही. जर ते इतके आपल्याविरुद्ध असतील, ते तर फ्रेडरिकस्टॅडला जाण्याचे रद्द का करू नये? तू विचार कर --- "

तिने नाक ओढले, तिचे अश्रू पुसले व परत रडायला सुरवात केली.

"प्रत्येकाने येईल त्या संकटाला, तोंड द्यायला हवे. गरिबीतही दिवस काढले पाहिजेत."

पण सिमोन्सनला तेथे जाऊन सिगर्ड आणि मोसा यांच्या कुटुंबांबरोबर ख्रिसमस साजरा करायला, ते दोघे प्रवृत्त करु शकले नाहीत. त्यांनी सगळे वर्णन करून,  त्याला आग्रह करायचा प्रयत्न केला. ख्रिसमसचे झाड, नातवंडे, बिअर, चीज, अशी मजा, आपण ख्रिसमसभर करू असे सांगितले. पण म्हातारा ठाम होता --- त्याला ओल्गा आणि मुलांबरोबर

ख्रिसमस घालवायचा होता. पण ख्रिसमसनंतरच्या दिवशी त्याने त्यांच्याबरोबर दिवस घालवावा, हे मात्र त्याने मान्य केले. ख्रिसमसची भेट म्हणून सिगर्डने त्याला पंचवीस क्रोनर दिले. निदान त्याला शहरातून बाहेर काढून, खिशात पैसे असलेल्या अवस्थेत सुट्टी इकडे तिकडे फिरून घालवायला लावणे, शक्य झाले. शेवटी हे होणे चांगले होते, की म्हाताऱ्याने ख्रिसमस त्यांच्याबरोबर --- प्रमाणात --- दारू पिऊन साजरा केला.

ख्रिसमसच्या संध्याकाळच्या आदल्या दिवशी, सिमोन्सन जेव्हा घरी आला, तेव्हा तो घसरफळी घेऊन आला होता. मोठ्या जल्लोषाने त्याने ती आणल्याचे जाहीर केले.

ओल्गासाठी दोनतीन प्रकारची पेये त्याने आणली होती. आता बिअर घेतली, की सर्व काही झाले असते. हेन्रीसाठी पाईप घेतला. फार खर्च झाला नाही --- हे फक्त असे दाखवायला होते, की मुला, आम्ही तुला विसरलो नाही --- नाहीतर सिमोन्सन तसा पैसे खर्च करायला, चिक्कू होता. त्याने ओल्गाला एकशे पंचेचाळीस क्रोनरचे कापड आणले. --- शिवाय तीनशे पंचाहत्तरचा पिनेचा दागिना, ब्रूच आणले

होते. आणि ते दहा क्रोनरपेक्षा कितीतरी जास्त होते. सिमोन्सनने ते पेटीतून बाहेर काढले. ओहो, तिला किती आनंद होईल! मिस अब्राहमसेनसाठीदेखील त्याने लक्षात ठेऊन, काही आणले होते. त्याला सहज परवडू शकेल, अशी किरकोळ वस्तू.

आणि आता घसरफळी! सिमोन्सनने टेबलावरील आच्छादन काढून टाकले व त्यावर ती घसरफळी ठेवली.

“ओल्गा प्रिये, तू क्षणभरासाठी इथे येऊ शकतेस का?”

“का? काय आहे? मी कामात आहे.”

सिमोन्सनने टेबलावर दिवा ठेवला.

“ओल्गा, स्वानहिल्डला काय वाटेल, याचा तू अंदाज करू शकतेस का?”

“अंतोन, हे छान लाकडी काम कसले आहे?” ओल्गाने घसरफळी व दिव्याखाली वर्तमानपत्र ठेवले. “ओहो, किती छान घसरफळी --- !

सिमोन्सनने आच्छादन काढून तिला रंगवलेले गुलाब दाखवले. “अर्थात यावर उशी मिळाली, कळले का?”

“हं! मला वाटते, याची किंमत बरीच असेल, नाही का?”

सिमोन्सन अभिमानपूर्वक म्हणाला, “उशीसकट, पाच क्रोनर”

“अंतोन, असल्या वस्तूमध्ये एवढे पैसे कशाला खर्च करायचे? अजून ती किती लहान आहे --- तिला आवडेल, असे काही लहानसेही चालले असते.” ओल्गाने सुस्कारा सोडला.

“आपल्याकडे खर्च करायला काही पैसे आहेत. त्यामुळे आपण ते खर्च करू शकतो. थोडे उदारपणे मी हे आणले. यात मजा आहे. आता तू तुझी कर्जे पण चुकवून टाक --- त्याने तिच्या चेहऱ्यावरून प्रेमाने हात फिरवत म्हटले, “मी माझ्या प्रेमाला विसरलेलो नाही. तू बघशील. ओल्गा, तू काही पेले आणशील का? मी काही पेये आणली आहेत. बघू तुला ती आवडतात का. हे बघ, हे तुझ्यासाठी आणले आहे.”

ओल्गाने बाटल्या बघितल्या. तिने परत सुस्कारा टाकला. मग तिने पेले आणले.

ख्रिसमसच्या आदल्या दिवशी, ओल्गाची कामे संपायला खूप उशीर झाला. पण शेवटी सगळे काही उरकले. ड्रेस तयार झाल्याबरोबर हेन्री ते देऊन आला. ओल्गाने व मिस अब्राहमसेनने खुर्च्या व टेबलावरील सर्व पसारा आवरून, शिवणाच्या खोलीत ठेवला. मिस अब्राहमसेनने कॉफी व केक घेतला. तिला जाण्यापूर्वी सिमोन्सनकडून यू डी कोलनची बाटली भेट म्हणून मिळाली.

मग ओल्गा हॉलमध्ये गेली. तिने टेबलावरून फॅशनची मासिके उचलली. खुर्च्यांवरून ड्रेसची व अस्तराची कापडे उचलली. बटने पिना असे सामान नीट गोळा केले. मग तिने आदल्या दिवशी तयार करून ठेवलेले, ख्रिसमसचे झाड दिवे लाऊन झगमगीत केले.

स्वानहिल्ड, हेन्री व सिमोन्सन आले. मोठे लोक मऊ खुर्च्यांवर बसले. सर्वत्र असलेल्या झगमगाटाने खूष होऊन स्वानहिल्ड नाचू लागली. तिची नजर घसरफळीवर पडली. ती आनंदाने ओरडली --- ती ख्रिसमसच्या झाडाशी गेली आणि आनंदाने काय करावे, ते तिला कळेना. सिमोन्सन चमकला. ओल्गाचे डोळे रागावून लाल झाले होते, तरी ती हसली.

सिमोन्सनने त्यांना दुपारी खूप वेळा खूष असलेले बघितले. आता रात्री जेव्हा त्याला खरे तर सर्वांनी खूष असायला हवे होते, तेव्हा त्याच्या नशिबात तिचे रडणे होते.

त्याने आणलेल्या अजून भेटी गोळा करून आणल्या आणि खट्याळपणे हसला. तिला आणलेले कापड तिला लहानशी भेट वाटली. मग त्याने यू डी कोलनची बाटली काढली. जेव्हा तो दुकानात मिस अब्राहमसेनसाठी काहीतरी आणायला गेला, तेव्हा त्याने अजून एक बाटली व ओल्गासाठी शिवण टोपली घेतली. हेन्रीसाठी एक छोटीशी चांदीसारखी दिसणारी काडेपेटी घेतली. हेन्रीने पाईप व काडेपेटी तो जिथे आरामखुर्चीत बसला होता, तेथील खिडकीत ठेऊन सिमोन्सनचे आभार मानले.

आणि आता शेवटी पिनेचा दागिना, ब्रूच!

या बाकीच्या फुटकळ वस्तू आहेत. पण ओल्गा, तुझ्यासाठी मला --- खास काहीतरी आणायचे होते --- “

सिमोन्सनने हात उंचावून लक्ष वेधले.

“ओल्गा प्रिये, तू हे घालशील, तेव्हा माझी आठवण काढशील.”

“नक्कीच काढेन, अंतोन.”

“आज संध्याकाळी आलेल्या खोक्यात, स्वानहिल्डसाठी काय असेल?”

ओल्गाने ते आत आणले.

त्यावर असे लिहिले होते, “छोट्या मिस स्वानहिल्डसाठी, पत्ता, मार्टीन्सेन शिवणकामाचे दुकान. ओल्गाने ते उघडले. आत लिहिले होते, ‘ख्रिसमसच्या शुभेच्छा’ ते सिगर्ड कार्लिंगकडून आले होते. ती बाहुली होती. ओहो, किती सुंदर बाहुली होती! तिचे केस सोनेरी कुरळे होते. उघडमिट करणारे डोळे होते. पांढऱ्या फरचा पांढरा कोट, फरची टोपी आणि मफलर, असे तिचे कपडे होते. तिच्या एका हातात घसरायचे बूट होते, ते सर्वात छान होते. ती बाहुली बघून, स्वानहिल्ड अवाक्  झाली --- पण सिमोन्सन मूर्खासारखे काही बरळू लागला. तो आणि स्वानहिल्ड, दोघेही बाहुली बघून सारखेच खूष झाले होते.

“मला वाटते ममाला ती बाहुली तुझ्यासाठीच उचलून ठेऊ दे --- रोजच्यासाठी ती नको. समजले का? फक्त रविवारी तू तिच्याशी खेळत जा.”

तो गरम पाणी घेऊन आलेल्या ओल्गाला म्हणाला, “शेवटी सिगर्ड दयाळू आहे. हे मी नेहमीच म्हणत आलेलो आहे. त्याची बायको त्याला गोंधळवून, स्वतःच्या तालावर नाचायला लावते. तो खरेच दयाळू --- “

सिमोन्सनने गरम पाण्यात स्वतःसाठी व ओल्गाने तिच्यासाठी पेय तयार केले. स्वानहिल्डसाठी पण वेगळ्या पेल्यात पेय तयार केले. ती ते तिच्या पपांच्या मांडीवर बसून पिऊ लागली.

“हेन्री, तू इथे येऊन पेय घेणार नाहीस का? तू आता मोठा झाला आहेस. तू माझ्यासारखे पेय घेऊ शकतोस.”

हेन्री काहीशा नाईलाजाने उठला. तो सिमोन्सनकडे बघायचे टाळत होता. त्याचा चेहरा फिकट व थोडा सूर्याच्या उन्हाने भाजलेला होता. त्याचे डोळे फिक्या रंगाचे होते. त्याने घातलेल्या कपड्यात, तो बारीकसा मोठा मनुष्य दिसत होता.

“तर मग तुम्हा तिघांनाही चिअर्स! हा आपला खरा आरामशीर उबदार वेळ आहे. नाही का, ओल्गा?”

तिच्या डोळ्यात आलेले अश्रू थोपवत, ओठ चावत, ती म्हणाली, “हो खरच, फक्त पुढच्या ख्रिसमसच्या दिवशी आपण कुठे असू, कोणास ठाऊक --- !”

सिमोन्सनने त्याची सिगरेट पेटवली. तो थोडा त्रस्त वाटत होता.

“हेन्री, तुझा पाईप ओढून बघ. जर तुझ्याकडे नसेल --- तर माझ्या टेबलावर थोडीशी तंबाखू आहे.

हेन्री उत्तरला, “नको, आभारी आहे.”

“हो, ठीक आहे. पुढच्या ख्रिसमसला --- “ ओल्गाने सुस्कारा टाकून रडणे संपवायचा प्रयत्न केला.

सिमोन्सनने शेरा मारला व सोफ्यात टेकून बसला. “एखाद्याला जे माहिती नाही, ते माहिती करून घेणे सोपे नाही. ही नक्कीच चांगली सिगार आहे. ओल्गा, चिअर्स! कोणाला माहीत --- कदाचित पुढचा ख्रिसमस आपण गावातील शेतकऱ्यांबरोबर साजरा करत असू. मला असे

सांगितले आहे, की ओईमार्कमध्ये ते ख्रिसमस राजेशाही पद्धतीने साजरा करतात. ओल्गा, मला वाटते, तुला मनापासून गावात रहायला आवडते. मला खरेच आवडते. फक्त तुम्हाला स्वतःलाच बाहेर पडून ख्रिसमसचे झाड तोडून आणावे लागेल. स्वानहिल्ड, तुला पपांबरोबर जंगलात जाऊन, ख्रिसमसचे झाड आणून, तुझ्या घसरफळीमागे बसवायला आवडेल का?"

स्वानहिल्डला अतिशय आनंद झाला.

"आणि हेन्रीला कार्यालयातून रजा घेऊन, आपल्याबरोबर ख्रिसमस साजरा करावा लागेल."

हेन्री समाधानाने हसला.

"स्टेशनवर जाऊन हेन्रीला घेऊन यायला किती मजा येईल, नाही का, स्वानहिल्ड? तुला ममा आणि पपांबरोबर, घोडे, डुकरे, गाई व कोंबड्यांसकट मोठ्या बागेत रहायला आवडेल का? आणि तुला बाहुली देणाऱ्या छान सिगर्डबरोबर रहायला आवडेल का? त्यालाही तुझ्याएवढी मुलगी, थोडासा मोठा मुलगा व छोटेसे बाळ आहे. तुला शहरात त्यांच्याबरोबर खेळता येईल."

“आणि अंतोन, मी तुझ्या त्या जाड्या सुनेबरोबर चहा प्यायला जाईन, असे तुला म्हणायचे आहे का?

“असे मी कुठे म्हणालो?”

“तू असे कसे काय म्हणू शकतोस?” ओल्गा हसून म्हणाली व मग रडू लागली.

“पण ओल्गा प्रिये, आता तू का रडते आहेस? तू नेहमी ते त्याच अर्थाने का घेतेस ---?”

“मग तुला मी, ते कसे घ्यायला हवे आहे? मी त्यांचे उपकार मानायला हवे आहेत का? मला वाटते, तुझ्या त्या जाड्या सुनेने मला असे फटकारले, की हेन्रीचे वडील पूर्वी मला सोडून गेले आणि आता तू ही सोडून चालला आहेस. आम्ही इथे लाजिरवाण्या पद्धतीने राहू --- माझी मुले आणि मी --- माझी वडिलांशिवाय असलेली मुले! मला वाटते, तूदेखील त्यांच्याप्रमाणेच विचार करतोस. तू ज्यांच्याबरोबर हास्यविनोद करतोस, अशा फॅशनेबल बायकांसाठी मी कायम गुलामासारखे राबायचे. मला वाटते, तुम्हा सगळ्या लोकांना असे वाटते, की मला काय कसेही वागवावे. ठीक आहे . तेच माझे नशीब आहे. तुम्ही सगळे पुरुष कसे असता, ते मी

ओळखायला हवे होते --- गरीब बाईकडून तुम्हाला हवे ते मिळाले, की झाले. मग तिला सोडून तुम्ही का जाता?”

“पण ओल्गा!”

“तुझ्यासाठी सर्व सोपे आहे. मी असेच म्हणेन. तुझ्या दृष्टीने काय, तर गाव बदलायचे व परत पिणे आणि बायकांचे नाद सुरु करायचे. मजा मारत हिंडायचे.

मी तुला भेटण्यापूर्वी तू जसा होतास, तसे परत व्हायचे --- अरे देवा किती साधे आणि मूर्खपणाचे, माझे वर्तन होते. मी तुला माझ्याबरोबर पाहिजे ते करू दिले.”

“पण ओल्गा, निदान मुलांचा तरी विचार कर!”

“ओहो, काही काळजी करू नकोस. ते ऐकत आहेत. आता जिन्यात आणि इतरत्रही याचा बोलबाला होणार आहे. त्याना माझ्याकडूनही, सर्व काही समजणार आहे.”

सिमोन्सन पालकत्वाचा आव आणून म्हणाला, “पण --- आज ख्रिसमसची रात्र आहे --- तू एवढे तरी लक्षात ठेवायला हवेस.”

ओल्गा टेबलावर डोके ठेऊन गुपचूप रडू लागली. सिमोन्सनने तिच्या खांद्यावर हात ठेवला.

“ओल्गा, तुला नक्की चांगले माहिती आहे, की मला तुझा आणि स्वानहिल्डचा  लळा आहे. मी माझ्या छोट्याशा निरागस मुलीला कधीतरी विसरेन का? तेवढी खात्री तू बाळग. ओल्गा, मी तुला कधीही फसवणार नाही किंवा तुला सोडूनही देणार नाही --- मी जे बोलतो आहे, ते माझे वचन मी पाळेन.”

ओल्गा नाक ओढत म्हणाली, “गरीब बिचारा! मला भीती वाटते, अंतोन, हे तू बोलत नाही आहेस”

त्याने एक हात ओल्गाच्या व दुसरा हात स्वानहिल्डच्या गळ्यात टाकला व तो सावरून बसला. तो पोट पुढे काढत म्हणाला, “ओल्गा, तू एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजेस, की सिगर्ड व मोसा यांच्यावरदेखील कुणीतरी आहे --- आपल्या सगळ्यांच्या वर तो आहे. पण आता ख्रिसमसची गाणी गायची वेळ झालेली आहे, नाही का?” त्याने पेयाचा एक घोट घेतला व त्याचा घसा साफ केला. ‘ही ख्रिसमसची संध्याकाळ किती सुंदर आहे’, हे म्हणायचे का? माझी खात्री

आहे, स्वानहिल्डला ते माहिती आहे. ठीक आहे गोडुल्या, स्वानहिल्ड!”

स्वानहिल्डने ते मोकळेपणे म्हटले. सिमोन्सनने तिच्या सुरात सूर मिसळला. फक्त उंच सूर आले, की तो गप्प रहात होता. पण प्रत्येक कडव्याच्या सुरवातीची ओळ जोरात गात होता. तिचा रडका आवाज घेऊन ओल्गाही, थोड्या वेळाने त्याना सामील झाली. फक्त हेन्री गाणे म्हणत नव्हता.

मग ओल्गा क्रीम पुडिंग आणायला गेली. पण सिमोन्सन व स्वानहिल्ड अजूनही गात होते.

आणि शेवटी ती सकाळ उजाडली. ओल्गाच्या खोलीतील गजर वाजला. पण अंधारात, सिमोन्सनने अर्धवट पेंगत, फक्त कूस बदलली --- उठायला फार थंडी होती. सर्व काही धुरकट करडे होते. विशेषतः उठून आवरून, थंडीत बाहेर पडणे --- सगळ्यापासून दूर.

असे पिसांचे छान अंथरूण! तो इतके ठिकाणी राहिला, पण त्याने असे कुठेच अनुभवले नव्हते.

ओल्गाने दार उघडले. तिच्या खोलीतील उजेडात तिने ट्रे तयार करून आणला. दिवा लावला. आणि पलंगावर ट्रे सरकवला. त्यात कॉफी आणि केक होता.

“अंतोन, मला वाटते, तुला घाई करायला हवी.”

“मलाही तसेच वाटते.”

सिमोन्सनने सुस्कारा सोडला. त्याने कॉफी आणि केकचा आस्वाद घेतांना, तिला जवळ ओढून थोपटले.

“वा, आज काय छान कॉफी झाली आहे. ओल्गा प्रिये, तू माझ्याशेजारी बसून थोडी घेणार नाहीस का?”

मला वाटते मला घाईने न्याहारीच्या तयारीला लागले पाहिजे --- “

सिमोन्सन अंथरुणाबाहेर पडून कपडे करायला लागला. त्याने शेवटच्या काही वस्तू बॅगेत भरल्या. दोन्ही बॅगा बंद केल्या. मग तो ओल्गाच्या खोलीत गेला. तिथे स्वानहिल्ड झोपली होती. तो हात खिशात घालून तिथे काही वेळ तिच्याकडे बघत उभा राहिला. “माझी आवडती छोटी स्वानहिल्ड!” तो पुटपुटला.

मग तो उठाबसायच्या खोलीत आला. तिथे गुडूप काळोख होता आणि बर्फाळ थंडी होती. ख्रिसमसच्या दिवशी सकाळी हेन्री, त्याच्या काही मित्रांबरोबर नॉर्डमार्केनला गेला होता. थोडा वेळ सिमोन्सन तिथे फिरला --- मग तो काळोखात, स्वानहिल्डच्या ख्रिसमसच्या झाडाशी व हलणाऱ्या झिरमिळयांशी गेला. ओहो --- त्याने सुस्कारा टाकला --- आता पुन्हा कधी --- या जागी यायला मिळेल!

मग पुन्हा ओल्गाच्या खोलीत गेला. ती उबदार व आरामशीर होती. टेबलाचा खालील भाग स्वच्छ केला होता. तिथे मिस अब्राहमसेन व ओल्गा दिवसभर शिवण शिवत बसलेल्या असत. त्यावर पांढरे आच्छादन घातलेले होते. आणि न्याहारी तयार होती. तिथे चीज, पेये आणि बरेच काही होते. दिवा शांतपणे जळत होता. वर तिच्या लहानशा पलंगावर झोपलेल्या स्वानहिल्डवर थोडासा उजेड पडला होता. तिचे सुंदर केस तिच्या कपाळावर आले होते. बिचारी छोटीशी मुलगी!

खोलीत उब आणि सुख होते. ओहो, तो इथे ओल्गा आणि स्वानहिल्डबरोबर किती आरामशीर होता! त्याने

डोळ्यातून अश्रू वाहून दिले. ओल्गा ते कदाचित बघेल, म्हणून पुसले नाहीत. ओल्गा कॉफी घेऊन आली, तेव्हा त्याचे थुलथुलीत लाल गाल ओले झाले होते.

ती म्हणाली, "चल आपण खाऊन घेऊ."

"हो. चल. आणि स्वानहिल्ड ---? तिला आपल्याबरोबर गाडीपर्यंत यायला आवडले असते. नाताळच्या गाडीत बसायला आवडले असते, नाही का?

अंतोन, मी असा विचार केला होता. पण बाहेर इतका अंधार आणि थंडी आहे --- पण कदाचित मी तिला उठवून बघते. ती आपल्याबरोबर थोडी कॉफी तरी घेईल."

तिने जाऊन हळूवारपणे स्वानहिल्डला हलवले.

"स्वानहिल्ड, तुला उठून ममी आणि पपांबरोबर कॉफी घ्यायची नाही का?"

ती तिच्या रात्रीच्या कपड्यात, डोळे चोळत, सिमोन्सनच्या मांडीवर बसली. कॉफीमुळे थोडी जागी झाली. पण अजून ती मंद आणि शांत होती --- कारण मोठी माणसेही शांत होती.

“पपा, तुम्ही कुठे चालला आहात?”

“अर्थात, फ्रेडरिकस्टॅडला.”

“पण तुम्ही परत केव्हा येणार?”

“मी अशी कल्पना करतो आहे, की तूच आधी मला भेटायला येशील.”

“त्या देशात --- तुम्ही सांगितलेत त्या?”

“का? हो --- “

“तिथे तुम्ही माझ्याबरोबर परत घसरणार का पपा --- घसरू शकणार नाही?”

“तिथे आपण घसरायला जाऊ शकू --- असे मला म्हणायला हवे.”

दाराची घंटी वाजली. ओल्गा बघायला गेली. गाडी आली होती. गाडीतील मुलगा सिमोन्सनच्या बॅगा घेऊन गेला.

सिमोन्सन स्वानहिल्डचा पापा घेऊन उठला. तिला घेऊन थोडा वेळ उभा राहिला.

“आणि आता स्वानहिल्ड, पपा लांब असतांना --- तू एक शहाणी मुलगी असले पाहिजेस.”

स्वानहिल्ड उत्तरली, “मी शहाणी असेन.”

ओल्गा स्वयंपाकघरात गेली. गॅस बंद केला --- आणि परत आली --- तयार होऊन उभी राहिली. स्वानहिल्ड एकटी घरात रहाणार होती.

“ठीक आहे अंतोन --- “

त्याने स्वानहिल्डचा पापा घेऊन, तिला पलंगावर ठेऊन पांघरून घातले.

“ठीक आहे, स्वानहिल्ड, बाळा, अच्छा!”

ओल्गाने दिवा मालवला. ते बाहेर गेले. हॉलमध्ये त्याने तिच्याभोवती हात टाकून तिला जवळ ओढले. दोघांनी एकमेकांचे चुंबन घेतले.

गाडी रस्त्याने जातांना पहाटेच्या अंधारात, ते शांत बसले होते. स्टेशनवर ते उतरले, तेव्हा गार होते. त्यांना काहीच बोलायचे नव्हते. पण ती सतत त्याच्याजवळ होती. त्याने

तिकिटे आणली. स्वतःचे सामान तपासले. काळ्या ड्रेसमधील छोटीशी ती, त्याच्यामागे उभी होती.

ते गाडीची वाट बघत, आरामशीरपणे बसले. मधूनमधून ते स्टेशनवरील घड्याळाकडे नजर टाकत होते.

ओल्गा म्हणाली, “आपण नक्कीच इथे लवकर आलो आहोत.”

“आपण लवकर आलो आहोत, हे खरे आहे. प्रवासात तसे करणे बरे असते. ओल्गा तुला --- आता सुट्टी असून, इतक्या लवकर उठावे लागले, त्याबद्दल मी दिलगीर आहे.”

ओल्गा उत्तरली, “ओहो --- आपण बाहेर जाऊन, तुझे आसन नक्की करू.”

सिमोन्सन उठला. त्याचे सामान घेऊन, सिगरेट ओढणे चालणाऱ्या डब्यात टाकले. तो आत खिडकीशी व ओल्गा बाहेर खाली फलाटावर उभी राहिली.

“ओल्गा, स्वतःची काळजी घे. तुझे कसे चालले आहे --- याबद्दल सतत पत्र लिही.”

“तू पण तेच कर, अंतोन.”

गाडीची दारे बंद होऊ लागली. ओल्गा दारात शिरली. त्यांनी परत एकमेकांचे चुंबन घेतले.

“ओल्गा ठीक आहे. तू माझा मोठा आधार होतीस.”

“अंतोन, तू मला होतास, त्यापेक्षा जास्त नाही. तुझा प्रवास सुखकर होवो.”

शिट्टी झाली. गाडीला धक्का बसला. ती पुढेपुढे जाऊ लागली. ओल्गा आणि सिमोन्सनने रुमाल काढून, एकमेकांना हलवून दाखवले.

पहाटेच्या करड्या उजेडात, गाडी निघून गेली. बेकेल्गोट --- नॉरस्ट्रँड --- लजन, येथील घरे मागे पडली. काही खिडक्या आधीच उजळल्या होत्या. खालील बाजूस बर्फाळ खाडी व त्यावरील बेटे क्षणभर दिसली.

अरेरे, चांगले वाटत नव्हते. डब्यात सिमोन्सन एकटाच होता. खिडकीतून बाहेर बघत होता. जंगले आणि बर्फाचे पट्टे असलेली शेते, मागे पडली.

आता ओल्गा बहुतेक घरी पोचली असेल. ती आता काय करत असेल, असा विचार त्याने केला. कदाचित

स्वानहिल्डला तयार करत असेल. ती म्हणाली होती ---आज तिला शिवणाचे भरपूर काम आहे. तेव्हा स्वानहिल्डला खिडकीशी बसून बाहुलीशी खेळत रहावे लागेल. तिला बागेत घेऊन जायला पपा नाहीत.

ओहो, दोन उबदार पलंग असलेली ती आरामशीर खोली --- दिवा आणि सर्वत्र पडलेला शिवणाचा पसारा, जमिनीवरील चिंध्या, त्यावरून चालणारे घरातील लोक आणि खिडकीशी बसलेली त्याची लाडकी स्वानहिल्ड! तो तिला एकटीला खिडकीशी बसलेले बघत होता. थोड्या थोड्या वेळाने मिस हेलम किंवा दुसरी कुणी तिला गोळ्या देत असणार. स्वानहिल्डला पपांची खूप आठवण येत असणार.

हे असे असायला नको --- असायला नको.

एका क्षणी त्याला आतून उमाळा फुटणार होता --- कारण असे असायला नको होते.

त्याचे जे काही आयुष्य उरले होते, त्यात त्याचे हृदय आतून जळत होते.

तो स्वतःशीच पुटपुटला, “स्वानीला, लाडकी स्वानीला!”

पण त्याने निग्रहाने, ते विचार बाजूला सारले.

छोटीशी निरागस मुलगी --- इतकी चांगली!

त्याने त्याचे अश्रू पुसले. शेवटी त्यांच्याहून बळकट असे कोणी, या सर्व गोष्टी नियंत्रित करत असते --- शेवटी आपण नियतीच्या हातातील बाहुले आहोत, असे प्रत्येकाला स्वतःचे सांत्वन करावे लागते.

## अनुवादिकेची ओळख



# डॉ. वृषाली जोशी

B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून
पंधरा पुस्तके ई साहित्यतर्फे प्रसिद्ध

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन

संशोधन प्रकल्पात सहभाग


कॉलेजमध्ये प्राचार्यपद


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद


संपर्क वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल

(नेट आवश्यक)
























शेरलॉक होम्स ७
वृषाली जोशी

Adventures of
Sherlock Holmes
शेरलॉक होम्स ४
वृषाली जोशी
SIR ARTHUR CONAN DOYLE

शेरलॉक होम्स ५
वृषाली जोशी

शेरलॉक होम्स ६
वृषाली जोशी

The Sherlock Holmes
शेरलॉक होम्स
वृषाली जोशी

SHERLOCK
2
HOLMES
शेरलॉक होम्स-२
वृषाली जोशी

THE ADVENTURES OF
SHERLOCK HOLMES
शेरलॉक होम्स ३
वृषाली जोशी
SIR ARTHUR CONAN DOYLE

शेरलॉक होम्स ८
वृषाली जोशी

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे सोळावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य तर होत्याच. त्यांनी काही काळ विदेशातही राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशीच वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतू मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपलॆ साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषालींसारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ.

स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२५ पुस्तके), अनील वाकणकर (७ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (४), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), पुनम संगवी(४), डॉ. नंदिनी धारगळकर (८) अंकुश शिंगाडे(४)  असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी व वाचकप्रिय लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।